मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर श्रावण – आश्विन १९४२

जुलै–सप्टेंबर २०२० / खंड ४४, अंक २

## ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२०/ खंड ४४ / अंक २

**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय,वारणा नगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०१८-२१)**
जनार्दन काकडे
राजू शिंदे
अजय देरेकर
मोहन सदामते

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
विद्यापीठ क्वार्टर नं. डी-३४,
सायबरसमोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
पिन : ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. ज्ञानदेव तळुले
भूमिअधिग्रहणाची राजकीय अर्थव्यवस्था: एक संक्षिप्त टिपण ...... १०३

२. पी. एस. कांबळे
कोविड -१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम :
एक समग्र दृष्टिकोण ...... ११६

३. आर.एस.देशपांडे
प्राध्यापक बोरकर : राजस्व या क्षेत्रातील एक निष्णात सैद्धान्तिक
अर्थशास्त्रज्ञ ...... १२९

४. अविनाश कुलकर्णी
जागतिकीकरणाचा बदलता प्रवाह ...... १४४

५. रसूल कोरबू
भारतातील सहकारी संस्थांचा विकास ...... १५४

६. गजानन गं. भारती
केंद्र व राज्य शासनाच्या जलधोरणाची मीमांसा ...... १६३

७. रवींद्र बा. शेंडे
चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकास :
पाहणी अभ्यास ...... १७०

८. संतोष दास्ताने
भारतातील उद्योजकता विकास : सामाजिक संदर्भ ...... १७९

९. अनिलकुमार वावरे : पुस्तक परिचय
'करोना बंध' उलगडताना...! ...... १९१

१०. शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे...
'Shell Company' ...... १९७

११. जे. एफ. पाटील : अर्थ शब्दांची वाट पाहे...
अरिष्ट गृहीतक, राजस्व दुरांतरण ...... १९९

# मराठी अर्थशास्त्र परिषद


## कार्यकारी मंडळ २०१९-२०

- **अध्यक्ष**
  **अनिल बा. सूर्यवंशी (सोलापूर)**
- **कार्याध्यक्ष**
  **कैलास के. पाटील (परभणी)**
- **कार्यवाह खजिनदार**
  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**
- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**
  **राहुल शंकरराव म्होपरे (कोल्हापूर)**
- **विश्वस्त**
  **आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**
  **रामकृष्ण टाले (नागपूर)**
  **अजय दरेकर (बारामती)**
- **सदस्य**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **स्नेहा देशपांडे (नागपुर)**
  **बळवंत कोरे (कराड)**
  **गणेश मांगडे (दापोली)**
  **माधव शिंदे (अहमदनगर)**
  **सुरेश ढाके (भुसावळ)**
  **शिवाजी काकडे (बीड)**
  **अरुण पिसे (धुळे)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **दयाळू राठोड (अकोला)**
  **मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)**
- **स्वीकृत सदस्य**
  **जयवंत इंगळे (विटा)**
  **गोरक्षनाथ सानप (संगमनेर)**
- **स्थानिक कार्यवाह**
  **संजय जगदेव कोठारी (नांदगाव)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना. पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७


**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु.३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु.२०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

| | |
|---|---|
| शैक्षणिक संस्था<br>व्यावसायिक संस्था<br>ग्रंथालये | रु.२०००/-(त्रैवार्षिक)<br>रु.३०००/-(पंचवार्षिक) |

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
टिप: म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहुपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# भूमिअधिग्रहणाची राजकीय अर्थव्यवस्था: एक संक्षिप्त टिपण

**ज्ञानदेव तळुले** †

**प्राक्कथन**

तंत्रज्ञान व संरचनात्मक पाया भक्कम करून भारतीय कृषीची उत्पादन क्षमता वृद्धिंगत करणे आणि प्रथमत: अन्नधान्याकरिताचे परावलंबित्व संपुष्टात आणणे हे सन १९६० व १९७० च्या दशकातील पहिल्या भारतीय हरितक्रांतीचे प्रमुख उद्दिष्ट होते. तद्नंतर भारतीय कृषिक्षेत्राचा व्यापारीय विस्तार करण्यासाठी उत्पादनानुरूप कृषिक्रांती अवलंबिल्या गेल्या. उदाहरणार्थ, तद्नंतर धवलक्रांती व गुलाबी क्रांती (White and Pink Revolution) ही या उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने टाकलेली महत्त्वाची पावले होती. अशा सर्व प्रकारच्या कृषिविकास क्रियेत जलस्रोतांचे नियोजन करून विविध आकाराची धरणे बांधण्याची कामे सन १९५० व १९६० च्या दशकात सुरू झाली. अर्थात, अशा विविध क्षमतेच्या धरणबांधणी मागील प्रमुख उद्दिष्ट जरी कृषी पाणीपुरवठा असले तरी ही या एकाच उद्दिष्टाशी अशा प्रकल्पांचे नियोजन सीमित नव्हते. यातूनच 'बहुउद्देशीय जलप्रकल्प' या संकल्पनेचा उदय झाला. देशपातळीवर याची अनेक उदाहरणे देता येतील. नव्हे, अशा प्रकारची विविध क्षमतेची अनेक धरणे स्वातंत्र्यानंतर भारतात बांधून पूर्ण झाली व अद्यापही अनेक योजना अपूर्ण आहेत.

तर अनेक जलयोजना हाती घेणे बाकी आहे. ब्रिटिशकालीन भारतातही अशा अनेक जलयोजना हाती घेऊन पूर्ण करण्यात आल्या तर अनेक योजना ब्रिटिशकालीन संस्थानिकांनीही पूर्ण केल्याची उदाहरणे आहेत. अशा प्रकारच्या योजनापूर्तीकरिता प्रचंड प्रमाणात भूमिअधिग्रहण व विस्थापितांच्या निवासांचे व उदरनिर्वाहाचे प्रश्न उभे ठाकतात, याकडे मात्र सर्वांगीण दुर्लक्ष झाले. असे दुर्लक्ष फक्त ब्रिटिश काळातच झाले नाही तर स्वतंत्र भारतीय पुनर्वसन व नियोजन त्याला अपवाद नाही, असाच इतिहास आहे. बहुउद्देशीय जलप्रकल्प फक्त सरकारी अथवा सार्वजनिक मालकीचेच होते असे नव्हे; तर अनेक खाजगी उद्योगपतींच्या मालकीचे ही होते व अद्यापही आहेत.

अशा खाजगी जलप्रकल्पांकरिता ही अनेक ठिकाणी भूमिअधिग्रहण करण्यात आले. परंतु विस्थापितांच्या पुनर्वसनाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. तद्नंतर अशा भूमिअधिग्रहणास जनतेचा विरोध होऊ

† अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. : ८१७, भ्रमणध्वनी : ९४२३७५०५५५, ई-मेल : dnyanshrinit@gmail.com

लागला. उदाहरणार्थ, सन १९२०-२१ साली पुण्याजवळ मुठा नदीवर जेव्हा टाटांचा मुळशी हा मोठा जलप्रकल्प बांधण्याचे ठरले व त्याकरिता ब्रिटिश सरकारने भूमिअधिग्रहणाची प्रक्रिया सुरू केली तेव्हा शेतकऱ्यांचा प्रखर विरोध सुरू झाला होता. सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन यावेळी उभे राहिले होते. असे खाजगी व सार्वजनिक प्रकल्प की जे सरकारला जनहिताचे वाटतील त्याकरिता सन १८९४ साली भूमिअधिग्रहण कायदा पारित केला होताच. प्रस्तुत अधिग्रहण कायद्यात जमिनीचा मोबदला, पुनर्वसन व पुनर्निवासाची कोणतीही जबाबदारी सरकारने स्वत:वर ठेवली नव्हती. इतकेच नव्हे; तर सन १९११ साली देशाच्या राजधानीसाठी रायसीनागावची जमीन अधिग्रहित केली गेली. ज्या ठिकाणी आज लोकसभा, राज्यसभा व राष्ट्रपती भवन यांसारख्या सर्वोच्च लोकशाही संस्था उभ्या आहेत. परंतु शेतकऱ्यांचा जमीन मोबदला अद्यापही बाकी आहे असे कागदपत्रांवरून लक्षात येते (Pritha Chatterjee, 2011). सन २०१४ पर्यंतची अशी सर्व भूमिअधिग्रहणे सन १८९४ च्या कायद्यांतर्गत झाली असल्याने पुनर्वसनाची समस्या अत्यंत बिकट व दुर्लक्षित राहिली. परंतु सन २०१३ च्या 'भूमिअधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास' कायद्याने या परिस्थितीत आमूलाग्र बदल होईल, अशी अपेक्षा केली जाते.

**प्रास्ताविक**

पूर्वीच्या काळी भारतीय ग्रामीण समाजात शहरी निवासाविषयी फारशी आस्था नव्हती. भारतातील शहरीकरणाचा विस्तार, विकास व लोकांची शहरीकरणाविषयीची ओढ हा गेल्या आठ दशकात विकास पावलेला दृष्टिकोन आहे(Janaki Nair, 2015). यामुळेच सिंगापूरला आशियाची पहिली आधुनिक शहरीसंस्कृती संबोधले गेले. शहरीकरणाच्या विस्तार व विकासाने लोकांच्या आधुनिक आशाआकांक्षांना एक प्रकारे वृद्धिंगत करण्याच्या कामी भूमिका बजावली (Burte- 2014, Dutton- 2015). अलीकडच्या काळात शहरीकरणाबरोबर ज्या पायाभूत सुविधांच्या विस्ताराची निकड भासू लागली त्या प्रमाणात गुंतवणूकही वाढत गेली. जुन्या लहान अथवा मध्यम शहरांचे रूपांतर मोठ्या महानगरात होऊ लागले. याचे मुख्य कारण म्हणजे बदलत्या आर्थिक विकासाच्या गतीमुळे शहरी भागात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. पर्यायाने मोठ्या प्रमाणात ग्रामीण-शहरी स्थलांतर झाल्यामुळे शहरांच्या आजूबाजूच्या उपनगरांची निर्मिती आणि त्याबरोबरच झालेल्या औद्योगिक व सेवाक्षेत्राच्या विस्तारामुळे दळणवळणाच्या साधनांचा प्रचंड विस्तार होऊ लागला. पर्यायाने पायाभूत सुविधांची एकंदरीत व्याख्याच बदलून गेली. वेगवान दळणवळणाची निकड भासल्यामुळे वाहतुकीची साधने जशी विकसित होत गेली तसे रस्ते आणि इतर प्रकारच्या वाहतुकीचे व दळणवळणाचे जाळेही विस्तारत गेले. या सर्व पार्श्वभूमीतून रस्ते, महामार्ग, रेल्वे व विमानतळांसाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात जमिनींची आवश्यकता भासू लागली. यातूनच कधी नव्हे ते शेकडो हजारो कोटी रुपये खर्चाचे महामार्ग, रेल्वेमार्ग व विमानतळे निर्माण करण्याच्या विचारांना मूर्त रूप प्राप्त होऊ लागले. या कामांच्या पूर्ततेकरिता भांडवल व जमिनीचा प्रश्न महत्त्वाचा वाटला आणि यातूनच जमिनीला आधुनिक काळात भांडवलाचे स्वरूप प्राप्त झाले (Dhanmanjiri Sathe, 2015).

आर्थिक उदारीकरणाच्या काळात विकासासाठी चक्रे वेगाने फिरू लागली तशी भांडवल गुंतवणूक आणि त्याकरिता भूमिअधिग्रहणाची प्रक्रियाही वेगाने

सुरू झाली. भारतात जमीन अधिग्रहणाचे प्रमुख तीन टप्पे पडतात. पहिला टप्पा ब्रिटिशकालीन भारतात जे विविध प्रकल्प सुरू झाले त्या वेळचे भूमिअधिग्रहण महत्त्वाचे ठरते. यामध्ये प्रामुख्याने धरणे व नवशहरांचा समावेश करावा लागेल. परंतु जमीन अधिग्रहणाच्या प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्यांना दोष देण्याची विकृत प्रवृत्ती दिसून आली. असा आरोप झाला की, शेतकरी विकासप्रक्रियेत सहभागी होऊ इच्छित नाहीत व पर्यायाने दारिद्र्यात राहतात (Hatekar Niraj, 2003). भारतात जमीन अधिग्रहणाचा दुसरा टप्पा म्हणून संबोधले जाते तो म्हणजे हरितक्रांतीचा. या काळात मोठमोठ्या सिंचन प्रकल्पांकरिता प्रचंड प्रमाणात जमिनीचे अधिग्रहण झाले. तसेच भारतीय शेतकऱ्यांनी याकरिता आपल्या जमिनी देऊन हा आरोपही चुकीचा आहे हे सिद्ध केले (Subramaniam C, 1979). कारण प्रत्येक प्रकल्पाकरिता शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी देऊ केल्या किंवा तसे करणे त्यांना भाग पडले. यानंतरचा जमीन अधिग्रहणाचा प्रमुख टप्पा म्हणजे १९९१ च्या आर्थिक उदारीकरणानंतरचा कालखंड होय. उदारीकरणानंतर गेल्या तीन दशकांच्या काळात जमीन अधिग्रहणाचे स्वरूप व आवश्यकता यात प्रचंड बदल व वाढ झाल्याचे दिसून यते. या काळात वेगाने वाढणारे शहरीकरण, उपनगरांचा विस्तार व रोजगार संधींचे शहरीकरण पर्यायाने ग्रामीण-शहरी स्थलांतर या सर्व घटकांतून निर्माण झाली ती म्हणजे पायाभूत व दळणवळणाच्या क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक व जमीन अधिग्रहणाची आवश्यकता होय. परंतु या काळात मात्र अगोदरच्या दोन टप्प्यांवरील जमीन अधिग्रहणाप्रमाणे अत्यल्प मोबदला अथवा काही प्रमाणात सक्तीने जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया राबविणे शक्य होणार नाही हे सरकार व ज्या खाजगी क्षेत्राच्यावतीने सरकार हे काम करत असे अशा खाजगी क्षेत्राचीही खात्री पटली (Dhanmanjiri Sathe, 2016). याची प्रचिती खाजगी औद्योगिक क्षेत्र व लोकनियुक्त लोकशाही सरकारलाही आली. या काळात जमीन अधिग्रहणावरून भारत तसेच इतर आशियायी देश व आफ्रिकी देशांतही अनेक तंटे उद्‌भवले (Cao et.al. 2008, FAO; 2009). भारतातील प्रमुख उदाहरणात पश्चिम बंगालमधील नंदिग्राम, सिंगूर (Maitreesh Ghatak et.al; 2010) आणि महाराष्ट्रातील नवी मुंबईचा महा मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र व गोवा विशेष आर्थिक क्षेत्र (Dhanmanjiri Sathe, 2016) इत्यादींचा समावेश करावा लागेल. नंदिग्राम सिंगूर जमीन अधिग्रहण प्रकरणामुळे तर पश्चिम बंगालचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तीस वर्षांचे सरकार त्यानंतरच्या सार्वजनिक निवडणुकीत पडले. नागरीकरण, रस्ते, महामार्ग, उपनगरे व औद्योगिकीकरणाकरिता आर्थिक उदारीकरणानंतर जी मोठी जमीन अधिग्रहणे घडून आली त्यास उत्तरप्रदेशमधील नोयडा, कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉर, महाराष्ट्रातील अनेक विमानतळे, तामिळनाडूमधील मद्रास शहरातील आडियारचे विशेष आर्थिक क्षेत्र इत्यादींचा उल्लेख करता येऊ शकतो. तुलनात्मक विचार केला तर आंध्रप्रदेश, हरियाणा, कर्नाटक, तामिळनाडू व गुजरात इत्यादी राज्यांत जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा फारसा विरोध झाला नाही, असे दिसून येते (Jenkin, Kennedy and Mukhopadhyay, 2014). परंतु ओरिसा, पश्चिम बंगाल इत्यादी राज्यांत मात्र जमीन अधिग्रहण ही निश्चितच सोपी बाब नाही असे परिस्थितीजन्यतेवरून सिद्ध झाले आहे. शेतकऱ्यांचा जमीन अधिग्रहणास विरोध आहे असे अगदी सर्वदूर सत्य मानणे निश्चितच चुकीचे आहे. कारण शेतकरी जर त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळणार असेल व त्यांचे योग्य पुनर्वसन

होणार असेल तर प्रकल्पाकरिता निश्चितपणे जमीन देण्यास तयार असतात. अर्थात, राष्ट्रीय नमुना पाहणी (NSSO; 2005) २००५ च्या अहवालानुसार, एकूण ४०% शेतकऱ्यांना शेतीव्यवसाय नकोसा झालेला आहेच. या प्रमाणात नंतरच्या काळात वाढ सुद्धा झाली असणार (Dhanmanjiri Sathe, 2016 - GoI, 2005). याचे प्रमुख कारण कृषिक्षेत्रावरील संकटात सापडते. अशावेळी शेतकऱ्यांना जर जमिनीच्या मोबदल्यात योग्य रक्कम अथवा पर्यायी जमीन आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून दिल्या तर ते निश्चितपणे आपली शेतजमीन देण्यास तयार होतात, असेही दिसून आले आहे. अर्थात, चीन व मेक्सिको सरकारांनी गेल्या दोन दशकात ज्याप्रमाणे सात कोटी शेतकऱ्यांना आपल्या जमिनींचा सक्तीने त्याग करणे भाग पाडले अशा प्रकारचे औद्योगिकीकरण व आर्थिक विकासाचे प्रमेय भारतात राबवणे शक्य नाही. आंध्रप्रदेशच्या तेलंगणा व आंध्रप्रदेश अशा विभाजनानंतर अमरावती या ठिकाणच्या जमिनी आंध्रप्रदेशची नवीन राजधानी निर्माण करण्यासाठी सरकारने अधिग्रहित केल्या. अधिग्रहित जमिनींच्या मोबदल्याव्यतिरिक्त ३०% विकसित जमीन मूळ मालकांना परत देण्याचे धोरण अवलंबिले. तसेच प्रतिएकर जमिनीकरिता दरवर्षी रुपये पन्नास हजार असे दहा वर्षांकरिता देऊ केले की, त्यामुळे अधिग्रहण मोबदल्याव्यतिरिक्त शेतकऱ्यांचे अधिग्रहित जमिनीतून मिळणारे उत्पन्नही सुरू राहू शकेल. कोणत्याही प्रकल्पाकरिता जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा जो विरोध असतो त्याचे प्रमुख कारण म्हणजे नवीन प्रकल्पातील एकूण भांडवली गुंतवणुकीत जमिनीचे न्यूनतम मूल्य (सन २००४ मध्ये केवळ १.८% एवढेच होते. सन २००८ मध्ये त्यात वाढ होऊन २.९% इतके झाले) (Kakani R. K., T. L. Ranga Ran and Tigga and Nutan Singh; 2008). अशा प्रकारच्या न्यून मूल्य धोरणामुळे शेतकऱ्यांचा जमीन अधिग्रहणास विरोध असतो हे प्रामुख्याने समजून घेणे आवश्यक आहे. जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा विरोध असण्याचे आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे संबंधित व त्या आजूबाजूच्या जमिनींचे प्रकल्पोपरांत होणारे मूल्य भांडवलीकरण होय (Value Capitalization) (Talule Dnyandev; et. al; 2019). कारण जमीन अधिग्रहण करताना जरी संबंधित जमिनीची किंमत कमी असली तरी प्रकल्पपूर्तीनंतर त्या जमिनीच्या व आजूबाजूच्या जमिनींच्या किमती अनेकपट वाढतात आणि अशा जमीनमूल्य भांडवलीकरणाचा फायदा मूळ जमीन मालकास मात्र होत नाही (Talule Dnyandev; et. al; 2019).

**जलसिंचनधोरण व भूसंपादन**

महाराष्ट्रातील लघु, मध्यम आणि मोठ्या धरणांची संख्या, पाटबंधारे खात्यातील गुंतवणूक आणि पाटबंधारे खात्यातील कार्यस्त मानवीश्रमाचा विचार केला तर राज्याचा जलसिंचन विभाग देशात सर्वात मोठा असल्याचे निष्पन्न होते. देशातील एकूण मोठ्या प्रकल्पांपैकी ३५% सिंचन प्रकल्प महाराष्ट्रात आहेत. परंतु राज्यातील स्थूल पीकक्षेत्राच्या (GCA) फक्त १८% एवढेच क्षेत्र सिंचनाखाली असणे हे एक विदारक वास्तव आहे. म्हणजेच देशातील सर्वाधिक गुंतवणूक आणि धरणांची महत्तम संख्या असलेल्या राज्याचे सिंचन क्षेत्र इतर राज्यांच्या व राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत देशात कमी असल्याचे दिसून येते (Narayanmoorthy, 2013). राष्ट्रीय जल आयोगाच्या अहवालानुसार, राज्यातील मध्यम आणि मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांच्या जल उपयोगक्षमतेची राष्ट्रीय जल उपयोग क्षमतेशी तुलना केली तर अत्यंत असमाधानकारक किंवा किमान पातळीवर असल्याचे

दिसून येते. याकरिता बेभरोशी पर्जन्यमानालाच फक्त दोष देता येणे शक्य नाही तर वर्षांनुवर्षे कारक ठरलेल्या इतर कारणांचाही यासंबंधी ऊहापोह करावा लागेल. याचे महत्त्वाचे कारण राज्यातील अनावश्यक पीकपद्धती होय. राज्यात पाण्याचे दुर्भिक्ष असूनही ऊस लागवडीखालील क्षेत्रात सातत्याने वाढ होत असल्याचा अनुभव आहे. सन १९७१-७२ ते सन २०११-१२च्या दरम्यान महाराष्ट्रातील ऊस लागवडीखालील क्षेत्र सहापटींनी वाढले (Narayanmoorthy, 2013). याच काळात देशपातळीवर मात्र ऊस पिकाखालील क्षेत्रात झालेली वाढ १.७८ पट एवढी सीमित असल्याचे दिसून आले. परिणामे ३.५% ऊसाखालील क्षेत्र राज्यातील ६०% पाणी वापरते, अशी स्थिती निर्माण झाली आहे. अशी परिस्थिती असल्याने महाराष्ट्रातील जल उत्पादकता अत्यंत किमान पातळीवर राहिली. उत्तरप्रदेशाची जल उत्पादकता महाराष्ट्रापेक्षा १०६% अधिक आहे (CAG, 2012). प्रति किलो साखर उत्पादनाकरिता उत्तरप्रदेशपेक्षा महाराष्ट्रात १००० लिटर अधिक पाण्याचा वापर केला जातो. याची प्रमुख कारणे राज्यातील सिंचनपद्धती आणि अनियंत्रित पाणी वापरात सापडतात.

महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाच्या (१९९९) अहवालानुसार, सन १९३० पर्यंत राज्यातील गोदावरी, तापी व कृष्णा खोऱ्यात पाण्याचा तुटवडा अधिक प्रमाणात भासू शकतो. एकंदरीत काय तर महाराष्ट्राची कृषी व जल अर्थव्यवस्था अकार्यक्षम राहिल्याचे सिद्ध होते. अशा प्रकारची सरकारनिर्मित सिंचनव्यवस्थेची अकार्यक्षमता एका बाजूला असताना विदर्भात एकूण १.२८ लक्ष हेक्टर सिंचन क्षमताधारित जवळपास ७००० मालगुजारी तळी दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहेत. त्याकडे मात्र सर्वदूर दुर्लक्ष झाल्याने विदर्भाच्या सिंचनक्षमतेवर गंभीर मर्यादा आल्या आहेत.

याचे प्रमुख कारण म्हणजे निधीचा तुटवडा. एकूण वित्तीय तूट ४७.६०% पर्यंत पोहचली आहे. (GoM, Kelkar Committee, 2013). पर्यायाने विदर्भाच्या एकूण जलसिंचन तुटीचे प्रमाणसुद्धा ३५.२६%पर्यंत पोहोचले (GoM, Kelkar Committee, 2013).

संघराज्य प्रशासकीय तरतुदीअंतर्गत राज्य यादी २(१७) अन्वये जलसिंचन हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारित येतो. त्यामुळे राज्यातील जलस्त्रोतांचे विकास, नियोजन, जपणूक व सवंर्धनाची जबाबदारी संबधित राज्य सरकारची असते. वास्तविक पाहता जलस्त्रोत हा नैसर्गिकदृष्ट्या स्वयंनुतनिकृत सार्वजनिक वस्तू असून ती राज्यातील लोकांच्या उपयोगितेयोग्य बनविण्याची राजकोषीय जबाबदारी संबंधित राज्य सरकारची मानली जाते. या कामी राज्य सरकारने जलस्त्रोत व्यवस्थापनाकरिता आवश्यक त्या सर्व बाबींवर पर्याप्त खर्चाचे वेळेवर नियोजन करणे अपेक्षित आहे.

हे सर्व करत असताना राज्य सरकारने पुरेसा निधी वेळेवर उपलब्ध करून त्याचा योग्य विनियोग करणे व प्रस्तावित वेळेत प्रकल्पाची कामे पूर्ण करून सिंचनसुविधांचे जाळे निर्माण करून राज्यातील कृषिक्षेत्राच्या विकासाला चालना देणे अपेक्षित आहे. अलीकडच्या काळात वेगाने होणारे शहरीकरण व ग्रामीण आणि नागरी औद्योगिकरणामुळे पाण्याची गरज अनेक पटींनी वाढली आहे. पर्यायाने पाणी वापराचा अग्रक्रम बदलला गेला. उदाहरणार्थ, दोन दशकांपूर्वी पुणे शहराकरिता खडकवासला धरणातून प्रतिवर्षी चार दशलक्ष घनमीटर इतके पाणी वापरण्याची आवश्यकता भासत असे. त्यात आता किमान चारपट वाढ झाली आहे. अशा प्रकारच्या जलमागणी वृद्धीमुळे एकूणच राज्याच्या निर्मित जलस्त्रोतांवर ताण निर्माण झाला आहे.

पर्यायाने उर्वरित जलक्षमतेचा पूर्णपणे वापर करण्याकरिता राज्य सरकारने पर्याप्त अर्थिक तरतूद करून राज्यातून वाहून जाणारे पाणी आडविणे आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय जल लवादाच्या निवाड्याप्रमाणे आंतरराज्य नदी खोऱ्यातील आपल्या वाट्याचे पाणी अपेक्षित वेळेत आडविणे आवश्यक असल्याने प्रत्येक नदी खोऱ्यातील धरणे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे आव्हानही राज्यासमोर आहेच.

ज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य जलसिंचन प्रकल्प संरचनेबाबत देशात अग्रेसर आहे त्याच प्रमाणात जलसिंचन प्रकल्पपूर्ती दिरंगाईतही राज्य संपूर्ण देशात वरच्या क्रमांकावर असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रकल्पपूर्तीचा कालावधी वाढून त्याचे लाभ मिळण्यास विलंब तर होतोच; परंतु प्रकल्पाचा व्यय अनेक पटींनी वाढतो. महाराष्ट्रात जवळजवळ ३०२ प्रकल्पांची कामे गेली १५ वर्षे सुरू अथवा अर्धवट अवस्थेत अपूर्ण आहेत. या सर्व प्रकल्पांच्या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनात अक्षम्य दिरंगाई झाल्यामुळे प्रकल्प व्ययात ४२८% इतकी वृद्धी झाल्याचे दिसून येते (CAG, 2012).

अशा प्रकारच्या व्ययवृद्धीमुळे इतर विकास कामांवरील खर्च कमी करून तो निधी अशा अपूर्ण प्रकल्पांवर खर्च करावा लागतो. पर्यायाने तात्कालिक गरजेचे प्रकल्प मागे पडून विकास तूट निर्माण होते. प्रकल्पपूर्तीच्या विलंबास अनेक कारणे दिली जातात (Talule Dnyandev; et. al; 2019). एक तर सिंचन प्रकल्पांना मोठा निधी आवश्यक असतो. परंतु सरकारकडून सुरुवातीस उपलब्धतेनुसार शक्य तितक्या निधीची तरतूद केली जाते. परिणामे, प्रकल्पाचे काम पूर्ण क्षमतेने सुरू होऊ शकत नाही. त्यामुळे वेळेचा अपव्यय होऊन मूळ व्ययात वृद्धी होणे अपरिहार्य बनते. तसेच जलसिंचन प्रकल्पांना लागणारी जमीन व त्या अनुषंगाने करावे लागणारे भूमिअधिग्रहण हा तर प्रकल्पपूर्तीच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा मानला जातो. कारण पूर्वीच्या प्रकल्पबाधितांचा अनुभव चांगला नसल्याने संभाव्य प्रकल्पबाधित शेतकरी सहजासहजी जमीन देण्यास तयार होत नाहीत. जमीन अधिग्रहण, मूल्यांकन व पुनर्वसन कामी सरकारचा महसूल विभाग जबाबदार असतो. परंतु जलसिंचन आणि महसूल विभागातील अधिकाऱ्यांचे अनेक बाबींवर एकमत होत नसल्यामुळे याकामी अधिकच विलंब झाल्याची उदाहरणे सर्वश्रुत आहेत (Talule Dnyandev; et. al; 2019). लोकशाही व्यवस्थेत प्रकल्पातील राजकीय हस्तक्षेप शक्यतो टाळला जात नाही; नव्हे तशी अपेक्षाही करणे योग्य नाही. अनेकदा राजकीय अनुनयापोटी मूळ प्रकल्पाची क्षमता नंतरच्या टप्प्यावर वाढवून अधिक पीकक्षेत्र लाभक्षेत्रात समाविष्ट करण्याकरिता राजकीय हस्तक्षेप होतो. परिणामे, प्रकल्प खर्च आणि पुनर्वसनाची समस्या गंभीर स्वरूप धारण करून प्रकल्पपूर्तीस अक्षम्य विलंब लागतो, अशी अनेक उदाहरणे देता येतील. तत्सम समस्येपासून सरदार सरोवर प्रकल्पही अलिप्त राहू शकला नाही (Talule Dnyandev; et. al; 2019).

त्यामुळे प्रकल्पपूर्तीत अनेक दशकांचा विलंब झाला. प्रकल्प आकारमान, लाभक्षेत्रात तद्नंतर केलेला बदल व पाणी वाहून नेण्यासाठी पाट व चऱ्यांची लांबी नंतरच्या टप्प्यात वाढविल्यामुळे प्रकल्प व्यय, भूमिअधिग्रहण व पुनर्वसनाच्या समस्या अधिकच गंभीर स्वरूप धारण करतात. परिणामे, प्रकल्पबाधितांची आंदोलने उभी राहून प्रकल्पपूर्तीत काही वर्षेच नव्हे; तर दशकांचाही विलंब लागतो, अशा दीर्घकालीन विलंबामुळे प्रकल्पपूर्तीचा व्यय अनेक पटींनी वाढतो. काही बहुउद्देशीय मोठे प्रकल्प राज्य व केंद्र सरकारच्या

सामायिक खर्चातून साकारत असतात. अशा प्रकल्पांमधील केंद्राच्या हिश्श्याचा निधी येण्यास काही वेळा विलंब लागतो. अशावेळी प्रकल्प वेळेत मार्गी लावण्यासाठी जर राज्याने स्वत:च्या वित्तीय तरतुदीतून हा खर्च पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तर प्रस्तुत प्रकल्प मार्गी लागण्यास मदत होते. परंतु त्याबरोबरचे राज्यातील इतर प्रकल्प मागे पडतात. राजकीय हस्तक्षेपाचे हे एक नमुनेदार उदाहरण. अनेकदा तर प्रशासकीय बाब म्हणून एका प्रकल्पावरील अधिकारी तथा अभियंते बदलून इतरत्र प्रकल्पावर रवानगी केले जातात किंवा अशा कर्मचाऱ्यांच्या जागी नवीन कर्मचारी तात्काळ दिला जात नाही. त्यामुळे प्रकल्पपूर्तीत अक्षम्य विलंब झाल्याचीही अनेक उदाहरणे आहेत. पर्यायाने व्ययवृद्धी तर होतेच; परंतु पुनर्वसनाची समस्याही उग्र स्वरूप धारण करते. प्रशासकीय सहकार्य आणि सरकारच्या विविध विभागांतील बेबनावसुद्धा प्रकल्प दिरंगाईस अनेक ठिकाणी व अनेकवेळा कारणीभूत ठरल्याचाही अनुभव नवीन नाही (Talule Dnyandev; et. al; 2019). अशा अनेक कारणांमुळे महाराष्ट्रातील बहुउद्देशीय सिंचनप्रकल्प प्रदीर्घ काळ रखडले असून अशा प्रकल्पांच्या मूळ व्ययात हजारो कोटींची वृद्धी झाली आहे. त्यामुळेच राज्यातील कार्यपूर्तीत दिरंगाई झालेल्या प्रकल्पांचा समस्यानिहाय आढावा घेऊन संबंधित प्रकल्प शक्य तितक्या वेगाने पूर्ण होणे सरकारच्या अंदाजपत्रकीय खर्च, पुनर्वसन व कृषी, औद्योगिक व नागरी विकासाच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे (Talule Dnyandev; et. al; 2019).

**महामार्ग प्रकल्पकामी प्रसंगी अतिरिक्त जमीन अधिग्रहण**

अनेक रस्ते किंवा महामार्गांची लांबी शेकडो किलोमीटर व रुंदीही प्रचंड असते. पर्यायाने हजारो एकर जमिनीची आवश्यकता भासते. कारण असे महामार्ग अनेक जिल्हे अथवा प्रसंगी विविध राज्यांना जोडणारे तसेच अनेक पदरी वाहतुकीची क्षमता असणारे असतात (Talule Dnyandev; et. al; 2019). देशातील याची प्रमुख उदाहरणे म्हणजे कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉर, महाराष्ट्रातील पुणे-मुंबई एक्सप्रेस महामार्ग, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग इत्यादी आहेत. विशेष म्हणजे अशा महामार्ग प्रकल्पांकरिता अधिग्रहित करावयाच्या जमिनीत नव शहरे, उपनगरे व इतर सुविधांकरिताच्या जमीन अधिग्रहणाचाही समावेश केला जातो. उदाहरणार्थ, मुंबई-नागपूरला जोडणारा समृद्धी महामार्ग एकूण ७०० किलोमीटर लांबीचा असून त्याकरिता लागणारी एकूण जमिनीची आवश्यकता ८४०० हेक्टर इतकी आहे (२१००० एकर) तर महामार्गालगत विकसित करावयाच्या सोयीसुविधा व पायाभूत सुविधांकरिता अधिक १६०० हेक्टर (४००० एकर) इतकी जमीन अधिग्रहित केली जाणार आहे. म्हणजेच प्रस्तुत प्रकल्पाची एकूण जमीन आवश्यकता दहा हजार हेक्टर म्हणजे पंचवीस हजार एकर इतकी प्रचंड आहे. अशा प्रचंड आवश्यकतेमुळे प्रकल्पपूर्तीस विलंब होऊन मूळचा प्रकल्पव्यय ४६,००० कोटी रुपयेवरून ५६,००० कोटी रुपये इतका वाढला आहे. कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉरसाठी ही एकूण ६९९९ हेक्टर (१७४९७.५ एकर) इतक्या जमिनीची आवश्यकता होती. परंतु रस्ता बांधकामाव्यतिरिक्त इतर सुविधा निर्माण करण्याचेही नियोजन केले गेले व एकूण जमिनीची आवश्यकता वाढली (Janaki Nair 2015). अशाप्रकारच्या अतिरिक्त अधिग्रहणास शेतकऱ्यांचा विरोध असतो. कारण या अतिरिक्त सोयीसुविधा व नवीन शहरीकरणाचा व्यापारी लाभ मात्र प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना मिळत नाही. तसेच

उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्पोपरांत जमीनमूल्य भांडवलीकरणाच्या लाभापासूनही मूळ प्रकल्पबाधित जमीनमालक वंचित राहतात. याकामी नव आंध्रप्रदेशचे अमरावती येथील राजधानी प्रमेय अधिक आश्वासक व आदर्श ठरते (Talule Dnyandev; et. al; 2019).

**सरकारकरिता धडा**

स्वातंत्र्यपूर्व ब्रिटिशकालीन अथवा स्वातंत्र्योत्तर पहिल्या टप्प्यात झालेल्या जमीन अधिग्रहणाप्रमाणे अत्यल्प किमतीस जमीन अधिग्रहण करून प्रकल्पपूर्ती करणे शक्य राहिले नाही. किंबहुना काही प्रमाणात सक्ती करून भूमिअधिग्रहण केले तर लोकशाही राज्यव्यवस्थेत पश्चिम बंगालप्रमाणे तीस वर्षे सत्तेवर असलेले सरकारही निवडणुकीत हार खावून सत्ताच्युत होऊ शकते. परिणामे, संबंधित राज्य सरकार व राजकीय पक्ष जमीन दलाल ठरण्याची शक्यता असते. म्हणूनच लोकशाही शासनव्यवस्थेत कोणत्याच राजकीय पक्षाला असे सक्तीचे अधिग्रहण धोरण अवलंबिणे शक्य नाही. किंबहुना गुजरातप्रमाणे शेतकऱ्यांकडून अधिक किमतीस जमिनी अधिग्रहित करून उद्योजकांना कमी किमतीत देऊ करणे व झालेला तोटा राजकोषीय तरतुदीतून भरून काढण्याचेही धोरण काही वेळा अवलंबिले जाते (Talule Dnyandev; et. al; 2019). यामुळे सर्वच राजकीय पक्ष व राज्य अथवा केंद्र सरकारांना आपण शेतकऱ्यांच्या बाजूचे आहोत हे सिद्ध करण्याची आवश्यकता निर्माण झाली. यातूनच २०१३ चा नवीन जमीन अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायद्याचा उदय झाला. या कायद्याला तेव्हा विरोधी पक्षात असलेल्या सर्व पक्षांनीही पाठींबा दिला होता. नंतर मात्र २०१४ मध्ये नवीन सरकारने कायदा बदलण्याचा प्रयत्न केला; परंतु ते शक्य झाले नाही. लोकसभेत पाठींबा मिळू शकला नाही. पर्यायाने नोव्हेंबर २०१५ मध्ये बिहार विधानसभेची निवडणूक आल्याने केंद्र सरकारने ऑगस्ट २०१५ मध्ये आपला स्वत:चा अध्यादेश नैसर्गिकरित्या मृत होऊन देण्याचे धोरण अंगिकारले.

एकंदरीत काय तर जमीन दलाल अशी भूमिका घेऊन विकासधोरण राबविणे शक्य नाही. शेतकरी आपली जमीन प्रकल्पकामी देण्यास तयारही असतात. परंतु त्यांना योग्य तो मोबदला व रोजगाराच्या संधी देऊन विकासप्रक्रियेत भागीदार करून घेणे आवश्यक आहे. आर्थिक सुधारणोपरांत तीन दशकांच्या काळात असे अनेक अनुभव आले. जमीन अधिग्रहण हा विकासप्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक समोर आला. यातूनच २०१३ च्या नवीन अधिग्रहण कायद्याचा उदय झाला.

**न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने**

बहुउद्देशीय नदीप्रकल्प, विशेष आर्थिक क्षेत्रे, उपनगरे, रस्ते व महामार्ग, मेट्रो रेल्वे इत्यादीकरिता मोठ्या प्रमाणात जमिनीची व पर्यायाने अधिग्रहणाची आवश्यकता भासते. त्यामुळे विस्थापन व पुनर्वसनाचे नियोजनही एक मोठी समस्या बनली आहे. भूमिअधिग्रहणात फक्त शेतकऱ्यांच्या खाजगी मालकीच्या जमिनींचाच समावेश नसतो तर केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांच्याही जमिनींचे कित्येकदा अधिग्रहण करावे लागते. त्याकरिता प्रत्येक विभागाची उद्दिष्ट्ये व जबाबदाऱ्या भिन्न असल्यामुळे एक विभाग दुसऱ्या विभागास प्रकल्पपूर्तीकामी आवश्यक भूमिअधिग्रहणाकरिता सहकार्य करेलच असे नाही. वन विभागाचे उदाहरण याबाबतीत महत्त्वाचे ठरते. इतर सरकारी विभागांच्या प्रकल्पपूर्तीकरिता जर वनविभागाची जमीन अधिग्रहित करावी लागणार असेल तर त्या बदल्यात इतर ठिकाणची म्हणजे प्रकल्प विभागाच्या अथवा राज्य सरकारच्या ताब्यातील वन जमिनीच वन विभागाला पर्याय म्हणून देऊ कराव्या

लागतात. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश व स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने जलसिंचन, औद्योगिकीकरण, शहरीकरण, संरक्षण विभाग, रेल्वे इत्यादींकरिता अनेकदा भूमिअधिग्रहण केले. परंतु मूळ मालक असलेल्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न बहुतांश प्रकल्पांच्या बाबतीत अनुत्तरितच राहिला. अशा पूर्व अनुभवांमुळे आणि कृषिक्षेत्रासमोरील इतर समस्यांमुळे भारतात विविध शेतकरी चळवळी उभ्या राहून त्यांनी सरकारसमोर आपले म्हणणे मांडण्यास व प्रसंगी आंदोलनाची तयारी करण्यास प्रारंभ केला. यातूनच नंतरच्या काळात आदर्श पुनर्वसन व अधिग्रहण आणि अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्याची समस्या अधिक तीव्र स्वरूप धारण करू लागली. प्रकल्पबाधितांच्या रोजगार समस्येची जाणीव पूर्वी सरकारला नव्हती असेच काहीसे झाले. किंबहुना त्याबाबत एकदंरीतच प्रशासकीय अनास्था दिसून आली (Talule Dnyandev; et. al; 2019 and 2020). त्यामुळे नंतरच्या प्रकल्पबाधितांनी रोजगार, मोबदला व पुनर्वसन समस्येकडे अंगुलीनिर्देश करून सरकारला विचार करण्यास भाग पाडले. अनेकदा तर जलसिंचन प्रकल्प आणि औद्योगिकरणाकरिता भूमिअधिग्रहण केलेल्या प्रकल्पबाधितांना मूलभूत रोजगाराच्या संधी अथवा पर्यायी जमिनी न मिळाल्याने प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना स्थलांतर करून शहरी झोपडपट्टी व दारिद्र्याचे जीवन जगावे लागले. १९५७ साली पूर्ण केलेल्या कोयना धरणाच्या प्रकल्पबाधितांचा अनुभव याबाबत अत्यंत विदारक आहे. कारण अद्यापही कोयना धरणग्रस्तांपैकी काहींचे पुनर्वसन बाकी आहे. पर्यायाने सरकारला न्याय्य विस्थापन व पुनर्वसन धोरणाचा मसुदा तयार करण्याची निकड भासली. साधारणपणे १९८०च्या दशकात भारत सरकारने सर्व प्रकल्पबाधितांच्या न्याय्य पुनर्वसनाकरिता विचार करणे सुरू केले. या विषयावर अनेकवेळा मंत्रिमंडळ व सार्वजनिक पातळीवर चर्चा झाल्या (Ramaswami Iyer 2007). तसेच याकरिता मंत्रिगटाची स्थापना करून विचारविनिमय घडवून आणला (Ramaswami Iyer; 2007). तब्बल दोन दशके चर्चा व मसुदा आणि पुनर्मसुदा तयार करण्यात गेली; परंतु योग्य मार्ग निघू शकला नाही. पर्यायाने मसुदा तयार होण्यात दिरंगाई झाली. शेवटी ऑक्टोबर २००६ मध्ये 'राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००६'चा मसुदा चर्चेकरिता समोर आला. त्यानंतर आलेल्या सूचनांची दखल घेऊन भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने शेवटी राष्ट्रीय पुनर्वसन कायद्याचा मसुदा तयार करण्याचे काम हाती घेतले. यातूनच नंतर 'नॅशनल रिहॅबिलिटेशन ॲन्ड रिसेटलमेंट पॉलिसी २००७' चा अंतिम मसुदा तयार झाला (Walter Fernandez 2004). तद्नंतर पुढे ७ सप्टेंबर २०११ रोजी नवीन भूमिअधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्निवास कायद्याचा मसुदा लोकसभेत मांडला गेला. एकूण २३५ सदस्यांपैकी २१६ सदस्यांनी मसुद्याच्या बाजूने तर १९ सदस्यांनी विरोधात मतदान केल्याने मसुदा एकमताने मंजूर झाला. दि. २९ ऑगस्ट २०१३ रोजी मसुदा लोकसभेत तर दि. ४ सप्टेंबर २०१३ रोजी राज्यसभेत पारित झाल्याने दि. २७ सप्टेंबर २०१३ रोजी राष्ट्रपतींनी त्यावर सही केली आणि दि.१ जानेवारी २०१४ रोजी कायदा अस्तित्वात येऊन त्याची अंमलबजावणी सुरू झाली. प्रस्तुत कायदा पारित होऊन प्रत्यक्ष अंमलात येईपर्यंत देशात सार्वजनिक अथवा सरकारला सामाजिक व आर्थिकदृष्टीने लोककल्याणकारी वाटणाऱ्या खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या प्रकल्पांकरिता ब्रिटिशपारीत १८९४ च्या कायद्याअंतर्गतच जमिनीचे अधिग्रहण करण्याची तरतूद अंमलात आणली जात असे. परंतु

१८९४ च्या कायद्याअंतर्गत प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाची कोणतीही जबाबदारी सरकारवर असत नव्हती. कारण १८९४ च्या ब्रिटिश कायद्यात भूमिअधिग्रहित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व पुनस्थैर्याच्या बाबतीत जबाबदारीचे उत्तरदायित्व सरकारवर नव्हते. किंबहुना सरकारने असे उत्तरदायित्व टाळले होते; परंतु अशा उत्तरदायित्वाची जबाबदारी २०१३ च्या राष्ट्रीय पुनर्वसन धोरणामुळे व नवीन कायद्याने सरकारवर व पर्यायाने प्रकल्प विभागावर आली. इतकेच नव्हे; तर या धोरणाअंतर्गत प्रकल्पबाधितांना पुनर्वसनाबरोबरच योग्य मोबदला देण्याची जबाबदारी संबंधित राज्य अथवा केंद्र सरकारच्या प्रकल्प विभागावर देण्यात आली. तसेच या कायद्यामुळे भूमिअधिग्रहण आणि प्रकल्पबाधित संसाधनांच्या मोबदल्याच्या बाबतीत पारदर्शकतेचा आग्रह धरण्यात आला हे विशेष.

प्रस्तुत कायद्यात विस्थापितांच्या पुनर्वसनाकरिता संबंधित प्रकल्प विभागाने मध्यस्थाची (Ambudsman) नेमणूक करणे बंधनकारक करण्यात आले. परंतु या कायद्याअंतर्गत प्रकल्पग्रस्तांना न्यायालयीन प्रक्रियेत जाण्याकरिता फारशी संधी उपलब्ध नसल्याने त्यांचे सरकारवरचे अवलंबित्व अधिक राहते. तथापि, प्रस्तुत कायद्याच्याअधीन राहून महाराष्ट्र शासनाने भूमिअधिग्रहण व पुनर्वसन कामी सकारात्मक भूमिका घेऊन प्रकल्प विस्थापितांना मोबदला व पुनर्वसन आणि पुनर्निवासाकरिता विशेष प्रयत्न करण्याचे नक्कीच आरंभिले. प्रकल्पग्रस्तांना मोबदला देताना जमिनीच्या वर्तमान बाजार मूल्याच्या चारपट किंमत व पुनर्निवासाकरिता भूखंड तसेच शक्य असेल तेथे प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीच्या मोबदल्यात जमीन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो हे विशेष.

उपरोल्लेख केल्याप्रमाणे लाभक्षेत्रात सर्वांगीण संक्रमण होऊन अपेक्षित विकासाच्या संधी दीर्घकाळ पुढे ढकलल्या जातात किंवा कायमस्वरूपी गमवाव्या लागतात. प्रकल्प दिरंगाईच्या समस्या व्ययवृद्धी अथवा विकास दिरंगाई इतक्याच सीमित नसतात तर अशा दिरंगाईमुळे प्रकल्पबाधितांच्याही जीवनविकासात अडथळे निर्माण होतात. कारण अधिग्रहणाची घोषणा झाल्यानंतर संबंधित प्रकल्पबाधितांची गुंतवणूक व कृषीसुधारणा क्षमता आपोआप कुंठित होऊन संपुष्टात येते (Talule Dnyandev; et. al; 2019). सरकारवरही व्ययवृद्धीचा ताण येतो. इतकेच नव्हे; तर यामुळे इतर प्रकल्पाकरिताच्या गुंतवणुकीवरही त्याचा दूरगामी परिणाम होतच असतो (Talule Dnyandev; et. al; 2019 and 2020).

**निष्कर्ष व अनुमान**

नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर देशात अनेक खाजगी व सार्वजनिक प्रकल्प हाती घेऊन विकासप्रक्रिया गतिशील करण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्याचा एकंदरीत परिणाम देशाच्या विकास/वृद्धिदरावर दिसून आला. परिणामे, खुल्या व्यापारधोरणाच्या अंमलबजावणीच्या पहिल्या टप्प्यात औद्योगिक व एकंदरीतच विकासदर झपाट्याने वाढला. या सर्व प्रक्रियांना गती देताना जे अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले (उदा. विशेष आर्थिक क्षेत्रे, औद्योगिक महामंडळांचा विस्तार, बहुउद्देशीय सिंचन/जलप्रकल्प, बहुपदरी महामार्ग, शहर व निवासी परिसर विस्तार.....इत्यादी). अशा सर्व प्रकल्पांकरिता विविध राज्यांत हजारो हेक्टर शेतजमिनींचे संपादन करण्यात आले. परंतु जमीन संपादन करताना संबंधित शेतकऱ्यांच्या रोजगार पुनर्वसनाकडे दुर्लक्ष झाल्याने देशात आर्थिक दरी निर्माण होऊन ती सतत वाढत असल्याचे गेल्या अडीच दशकांच्या (२५ वर्षे) काळात

निष्पन्न झाले. परिणामे, शेतकरीवर्गाने कधी संघटित तर अनेकदा असंघटित स्वरूपाचे लढे उभारले. प्रामुख्याने हे लढे आर्थिक व निवासी पुनर्वसन आणि भूसंपादन मोबदला इत्यादी संदर्भात असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील तीन लक्ष कोटी रुपये गुंतवणुकीचा तेलशुद्धीकरण प्रकल्पाविरोधात तेथील शेतकऱ्यांनी उभारलेले लढे याची ज्वलंत उदाहरणे आहेत. प्रस्तुत प्रकल्पविरोधामुळे महाराष्ट्र शासनाने भूसंपादन मोबदल्याविषयीचे बाजारमूल्याच्या चार पट मूल्य धोरण बदलून समृद्धी महामार्ग विस्थापित जमीनमालक शेतकऱ्यांना प्रतिएकर किमान एक कोटी रुपये (१ कोटी) मोबदला देण्याची तयारी दर्शविली. नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाबाबतही राज्य शासनाने असेच धोरण स्वीकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे दिसून आले. नाणारप्रकल्प मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाने सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार करण्याचे काम गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे यांचेकडे सोपविले होते.

उपरोल्लेखित प्रकल्प अथवा प्रकल्पबाधित शेतजमीन मूल्यांकनाविषयी राज्य सरकारने घेतलेल्या भूमिकेकडे अंगुलीनिर्देश करता असे निष्पन्न होते की, ज्या ठिकाणी प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचा विरोध तीव्र आहे अशा ठिकाणी राज्य सरकार जमीन मूल्याचा पुनर्विचार करून शेतकऱ्यांचा विरोध होणार नाही अशाप्रकारचे मूल्य निर्धारण करते असे दिसून येते. या सर्व बाबींचें अवलोकन केल्यास प्रकल्पनिहाय मोबदला, जमीन मूल्यांकन, कमाल जमीन धोरण इत्यादी भिन्न असल्याचे स्पष्ट होते.

परिणामे, महाराष्ट्रातील जलसिंचन प्रकल्प भूसंपादन व जमीन मूल्यांकनाविषयी ही राज्य सरकारने मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाप्रमाणे धोरण अंगिकारण्यास हरकत नसावी. तसेच जमीन मूल्यांकन धोरण सर्व भूमिअधिग्रहणार्थ लागू करून प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यास हरकत नसावी. याच्या पुष्ट्यर्थ असा युक्तिवाद असू शकतो की स्वेच्छा पुनर्वसन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे उदरनिर्वाह व रोजगाराचे साधन कायम स्वरूपी संपुष्टात येते. तसेच ज्या प्रकल्पबाधितांना प्रकल्प लाभक्षेत्रात पर्यायी जमिनी देऊ केल्या जातात त्यांनाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

सारांशात, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाकरिता राज्य शासनाने अवलंबिलेल्या अथवा नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाकरिता अवलंबिलेल्या प्रकल्पबाधित जमीन मूल्यांकनाचे/मूल्याचे धोरण राज्यातील इतर सर्व प्रकल्पांकरिता अवलंबिले तर ते राज्यातील विविध/सर्व प्रकारच्या प्रकल्पबाधितांकरिता समान पुनर्वसन मूल्याचे व न्याय्य पुनर्वसनाचे धोरण असेल. अन्यथा, विविध प्रकल्पबाधित जमिनींकरिता विविध मूल्य धोरण प्रकल्पग्रस्तांच्या मनात भेदभावाची भावना निर्माण करणारे व पर्यायाने निम्न मूल्य प्रकल्पबाधितांकरिता अन्यायकारक ठरेल.

**संदर्भ सूची**


1. A Narayanamoorthy (2013), Diagnosing Maharashtra's Water Crisis, Economic and Political Weekly, Oct. 12, 2013, Vol. VLVIII, No. XXXXI, PP. 23.
2. Burte, Himanshu (2014), The Smart City card, Economic and Political Weekly, Vol. XXXXI, No. XXXXVI, PP. 23-25.
3. Cao, Guangzhong, Changchun Feng, Ran Tao (2008), Local Land Finance in China's Urban Expansion: Challenges and Solutions, China and World

Economy, 16 (2), 19-30.

4. Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, PP. 52-58.
5. Dnyandev C Talule, Mahadev Deshmukh and Vijay Kakade (2019), Delay in Completion of Irrigation Projects: The Lacuna and Problems in Rehabilitation of Project Affected People, Samaj prabodhan Patrika, Oct. Dec. 2019, Vol. XXXXXVII, No. 228, PP. 29-50.
6. Dnyandev C. Talule, Vijay Kakade and Mahadev Deshmukh (2019), Rehabilitation Problems and Feasibility of Irrigation Projects in Maharashtra: An Abstract Note Based on Ground Reality, Journal of Shivaji University (Humanities and Social Sciences), Jan. June. 2018, Vol. XXXXI, No. I, ISSN: 0368-4199, PP. 01-23.
7. Dnyandev C. Talule, Mahadev Deshmukh and Vijay Kakade (2019), Maharashtrateel Sinchan Prakalpapurtiteel Pradirgha Vilambava Prakalpabadhitanchya Punarvasanateel Samasya: Sthal Vastav Pariprekshatoon Punarvasan Niyojanartha Sankshipta Tipan, Arthasanwad, April-June 2019, Vol. XXXXIII, No. I, ISSN: 0973-8452, PP. 16-42.
8. Dutta, Ayona (2015), New Urban Utopias of Post-Colonial India, Entrepreneurial Urbanization in Dholera Smart City, Gujarat, Dialogues in Geography, Vol. V(I), PP. 03-22.
9. FAO (2009), Land Grab and Development Opportunities? Agricultural Investments and International land Deals in Africa, FAO-IFAD Report.
10. FAO (2009), Land Grab and Development Opportunities? Agricultural Investments and International land Deals in Africa, FAO-IFAD Report.
11. Ghatak, Maitreesh and Parikshit Ghosh (2011), The Land Acquisition Bill: A Critique and a Proposal, Economic and Political Weekly, October 8, 2011, Vol. XLVI, No. XXXXI.
12. Govt of India (2005), National Sample Survey Organization, New Delhi
13. Govt of India (2012), Comptroller and Accountant General of India.
14. Govt of Maharashtra (1999), Maharashtra Irrigation Commission.
15. Govt of Maharashtra / Vijay Kelkar (2013), Report of the High Level Committee on Balanced Regional Development Issues in Maharashtra, GoM, Planning Department, Oct. 2013.
16. Hatekar, N. (2003), Farmers and Markets in Pre Colonial Deccan: The Plausibility of Economic Growth in Traditional Society, Post and Present, No. 178, PP. 116-147.
17. Janaki Nair (2015), India Urbanization and the Terrain of the Law, Economic and Political Weekly, September 5, 2015, PP. 54-63.
18. Jenkins, R. L. Kennedy and Mukhopadhyay (Eds) (2014), Power, Policy and Protest: The Politics of India's Special Economic Zones, New Delhi, Oxford University Press.
19. Kakani, R. K., T. L Ranga Ran and Tigga and Nutan Singh (2008), Insights into Land Acquisition Experiences of Private Business in India, Working Paper 08-11,

Jamshedpur, XLRI School of Business and Human Resources.

20. Pritha Chatterjee (2011), From Sonepat, Three Hundred Landlords Stake Claim to Rashtrapati Bhawan, The Indian Express, 11th Aug. 2011.
21. Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, PP. 3103.
22. Subramaniam, C. (1979), The New Strategy in Indian Agriculture: The First Decade and After, New Delhi, Vikas Publishing House.
23. Talule Dnyandev, Vijay Kakade and Mahadev Deshmukh (2019), Social Impact Assessment Study of the Kadgaon PWD Road Bridge Project-2019, Public Works Department, Govt of Maharashtra, A Study of the Department of Economics, Shivaji University of Kolhapur.
24. Talule Dnyandev, Vijay Kakade and Mahadev Deshmukh (2019), Social Impact Assessment Study of the Hiranyakeshi Sarfanala Medium Irrigation Project-2018, Department of Irrigation, Govt of Maharashtra, A Study of the Department of Economics, Shivaji University of Kolhapur.
25. Talule Dnyandev, Vijay Kakade and Mahadev Deshmukh (2019), Social Impact Assessment Study of the Ambeohol Medium Irrigation Project-2019, Department of Irrigation, Govt of Maharashtra, A Study of the Department of Economics, Shivaji University of Kolhapur.
26. Talule Dnyandev, Vijay Kakade and Mahadev Deshmukh (2019), Social Impact Assessment Study of the Rukadi PWD State Highway Project-2019, Public Works Department, Govt of Maharashtra, A Study of the Department of Economics, Shivaji University of Kolhapur.
27. Talule Dnyandev, Vijay Kakade and Mahadev Deshmukh (2020), A Study of Micro Irrigation in Kolhapur District: Attainment and Benefits, Govt of Maharashtra, District Planning Committee, Kolhapur, A Study of the Department of Economics, Shivaji University of Kolhapur.
28. Talule Dnyandev, Vijay Kakade and Mahadev Deshmukh (2020), Social Impact Assessment Study of the Substitute Road and Bridge of the Shirval Minor Irrigation Scheme Canal in Kankawali Tehsil in Sindhudurg District, Department of Irrigation, Govt of Maharashtra, A Study of the Department of Economics, Shivaji University of Kolhapur.
29. Walter Fernandez (2004), Rehabilitation Policy for the Displaced, Economic and Political Weekly, March 20, 2004, PP. 1191.011.

◆

# कोविड -१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम : एक समग्र दृष्टिकोण

**पी. एस. कांबळे** †

**प्रास्ताविक**

भारतासाठी आर्थिक वर्ष २०२०-२१ हे अत्यंत त्रासाचे, कष्टाचे आणि विशेष म्हणजे विकासावर अत्यंत प्रतिकूल परिणाम करणारे अनुभवास येत आहे. वर्ष २०१७ नंतर आर्थिक घसरणीस झालेली सुरुवात वाढत जाऊन तिची तीव्रता आणि व्याप्ती सातत्याने वाढतच गेली. तिचे वाईट सामाजिक आणि आर्थिक परिणाम देशाला आणि समाजाला भोगावे लागत आहेत. तिच्या नियंत्रणाचे धोरण आणि उपाय राबविणे सुरू असतानाच अतिवृष्टी आणि महापुराचा झटका महाराष्ट्र आणि इतरही काही राज्यांना सहन करावा लागला की, ज्यामुळे देशाचा आणि राज्याचा विकास घसरत जाण्यास मदतच झाली. या नैसर्गिक संकटकालीन परिस्थितीतून बाहेर पडण्यापूर्वीच कोरोना महामारीचे संकट येऊन धडकले आहे. देशातील कोणत्याही प्रकारच्या, नैसर्गिक, राजकीय, आर्थिक आणि आरोग्यविषयक संकटांचे विकासावर परिणाम प्रतिकूल आणि घातकच होतात असे दिसून येते. कोविड-१९ ची लागण नियंत्रित करण्यासाठी आपण स्वीकारलेल्या टाळेबंदीचे अत्यंत प्रतिकूल परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होत आहेत. या पार्श्वभूमीवर, कोरोना महामारीचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणामांचे बहुआयामी विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**भारतातील कोरोना महामारीचे स्वरूप आणि व्याप्ती**

कोरोना महामारी हे जागतिक स्वरूपाचे संकट आहे. आज जगातील १९६ देशांपैकी १७५ देशांत ही महामारी अस्तित्वात आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. भारतात सर्वात पहिली कोरोनो व्हायरसबाधित व्यक्ती केरळमधील थ्रिसुरमध्ये ३० जानेवारी, २०२० रोजी सापडली, जिचा संबंध चीनमधील वुहान शहराशी होता. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब नियोजन मंत्रालयाच्या मते, २ एप्रिल, २०२० रोजी देशभरात एकूण २००० केसेस आढळल्या असून, त्यातील १५१ केसेस बऱ्या झाल्या असून एकूण ५० जणांचे मृत्यू झाले आहेत. या केसेस १५ मार्च, २०२० ला १०० पेक्षा अधिक झाल्या. त्या २४ मार्चला ५०० झाल्या, २८ मार्चला १०००, ३१ मार्चला १५०० आणि १ एप्रिलला हा आकडा २००० पर्यंत पोहचला.

† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. : ४८७, भ्रमणध्वनी : ९४२३०३३१७९, ई-मेल : pskamble2006@gmail.com

पहिल्या कोरोनाबाधित सौदी अरेबियातून आलेल्या ७६ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. आज देशातील अनेक राज्यात कोरोना महामारीने प्रवेश केला असून त्यात महाराष्ट्र, दिल्ली, आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, गुजरात, पंजाब, हरियाणा यांचा प्रामुख्याने समावेश आहे. २ एप्रिल, २०२० च्या आकडेवारीप्रमाणे, जगात ९.६३ लाख लोक कोविड-१९ बाधित तर ४९,१९९ लोकांचा मृत्यू झाला असून, आपल्या देशात २४०० आणि ६९, तर महाराष्ट्रात ४१६ आणि १९ अनुक्रमे संख्या आहे. परदेशातून देशात परत आलेले भारतीय आणि ३१ मार्च, २०२० रोजी दिल्लीत झालेल्या सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होऊन आलेले लोक आणि त्यांची न केलेली तपासणी ते आपआपल्या ठिकाणी गेल्यानंतर या आजाराच्या केसेस वेगाने वाढत आहेत. देशातील सर्वात अधिक कोरोना केसेस महाराष्ट्र राज्यात असून त्या मुंबई, ठाणे, पुणे यांसारख्या शहरात आणि जिल्ह्यात आहेत. सोमवार दि. २० जुलै, २०२० रोजी जगात कोरोनाबाधित एकूण संख्या १४.४६ दशलक्ष होती, त्यातील ८.६४ दशलक्ष रुग्ण बरे झाले असून ६,०५,७३३ जणांचा मृत्यू झाला आहे. त्याचदिवशी भारतात एकूण १०,८१,४९७ लोक कोरोनाबाधित होते, त्यातील ३,७३,६२१ रुग्णांवर उपचार चालू असून ६,८१,००३ लोक बरे झाले तर २६,८७३ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. देशात कोविड-१९ ची लागण काही राज्यातच केंद्रित झाल्याचे दिसून येते. रुग्णांचे राज्यनिहाय विश्लेषण केल्यास महाराष्ट्रात सर्वाधिक ३,००,९३७ रुग्ण होते, त्यानंतर अनुक्रमे तामिळनाडू (१,६५,७१४), दिल्ली (१,२२,७९३), कर्नाटक (५९,६५२) आणि गुजरात (४७,४७६) राज्यांचा क्रमांक लागतो. त्याबरोबरच, ही कोरोना लागण काही शहरातच केंद्रित झाली आहे, ज्यात दिल्ली (१,२२,७९३), मुंबई (१,००,३५०), चेन्नई (८४,५९८), ठाणे (७३,२८९), पुणे (५१,५७५), हैदराबाद (३१,३७२), बेंगलोर (२९,६१६), अहमदाबाद (२४,१६३), कोलकत्ता (१२,६८२),आणि पालघर (११,५६६) यांचा प्रामुख्याने समावेश आहे. यावरून हे स्पष्ट होते की, कोविड-१९ ची लागण किती व्यापक आणि तीव्र होत असताना अत्यंत वेगाने वाढत आहे.

**कोविड-१९ चा भारताच्या आर्थिक वृद्धीवरील परिणाम**

कोविड-१९ ची लागण नियंत्रित करण्यासाठी आपण इतर कांही उपायाबरोबरच टाळेबंदीवर फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहून सर्व आर्थिक उपक्रम आणि व्यवहार बंद केल्याचा सखोल आणि व्यापक परिणाम देशाच्या आर्थिक वृद्धीवर होत आहे. २ मार्च, २०२० रोजी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने कोरोनाच्या २ केसेस जाहीर केल्या त्याचवेळी बीएसई सेन्सेक्स कोसळला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालप्रमाणे, भारताचा व्यापार ३४८ दशलक्ष अमेरिकन डॉलरने फक्त या महामारीचा परिणाम म्हणून घटेल आणि भारत हा जगातील प्रतिकूल परिणाम झालेला १५ वा देश असेल असे संगितले. तसेच आशियाई विकास बँकेच्या अभ्यासाप्रमाणे, २९.९ अब्ज अमेरिकन डॉलरएवढे आर्थिक नुकसान होईल. बीएसईचा निर्देशांक ३५,६३५ वरुण १,९४२ पर्यंत तर एनएसई निर्देशांक १०,४५१ वरून ५३८ पर्यंत घसरला. भारत सरकारच्या वित्तमंत्रालयाप्रमाणे, भारताचे स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) जुलै २०१९ मधील ५.२% दरावरून जानेवारी २०२० मध्ये ४.१% आणि टाळेबंदी नंतरच्या काळात ३.१% पर्यंत घटले आणि ते पुढेही घटत आहे. देशाचा तिमाही वृद्धिदर विचारात घेता तो वर्ष २०१९ मध्ये अनुक्रमे ७.१%,

६.२%, ५.६% आणि ५.८% वरून ५.६%, ५.१%, ४.३% आणि ३.१% राहून पुढे सातत्याने घटत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मुख्य अर्थशास्त्रज्ञ गीता गोपीनाथ यांच्या अभ्यासाप्रमाणे, वर्ष २०२० मध्ये देशाचा वृद्धिदर १.९% राहील जो चीनचा १.२%, अमेरिका -६.१% तर जगाचा -३% असेल. जागतिक बँकेच्या ९ जून, २०२० च्या अंदाजाप्रमाणे, २०२० या वर्षात आपला वृद्धिदर -.३.२% राहील, तर चीनचा १%, अमेरिका--७% आणि जगाचा -५% असेल. २५ जून, २०२० रोजीच्या नाणेनिधीच्या सुधारित अंदाजाप्रमाणे, वर्ष २०२१ मध्ये जगाचा वृद्धिदर -४.९% तर भारताचा GDP दर ४.५% ने कमी होईल. India Rating and Research च्या मते, २०२०-२१ मध्ये आपला GDP वृद्धिदर -५.३% राहील आणि तो गेल्या चाळीस वर्षातील सर्वात कमी असेल. भारतीय स्टेट बँकेच्या मते, एप्रिल -जून २०२० या तिमाहीत भारताचे GDP चे ४०% ने नुकसान झाले आहे. रिझर्व्ह बँकेच्या अभ्यासाप्रमाणे, २०२०-२१ आर्थिक वर्षात आपला वृद्धिदर शून्य आणि येत्या वर्षात तो उणे असेल. २३ जुलै, २०२० च्या ICR-अंदाजाप्रमाणे भारताचा वृद्धिदर २०२१ मध्ये ९.५% ने घटेल तो पूर्वी ५% ने घटण्याचे भाकीत केले होते. तर CARE तो ६.३% ने घटेल जो १.३% अंदाजित होता. तसेच HDFC बँकेच्या मते, वृद्धिदर २०२१ मध्ये -६.५ ते ७% राहील जो -५% असेल असे भाकीत केले होते. हे सर्व विश्लेषण सिद्ध करते की, कोविड -१९ प्रसार नियंत्रित करण्यासाठी खात्रीचा उपाय म्हणून लागू केलेल्या टाळेबंदीचा भारताच्या आर्थिक वृद्धिवर अत्यंत व्यापक, सखोल आणि दूरगामी परिणाम होत आहे. आपल्या देशाची वाटचाल आर्थिक घसरणीकडून आर्थिक मंदीकडे वेगाने होत आहे.

**उद्योग क्षेत्रावरील परिणाम**

कोरोना संकटाचा सर्वात वाईट परिणाम भारताच्या उद्योग क्षेत्रावर अधिक सखोल आणि व्यापक झाला आहे. देशाच्या उद्योगक्षेत्राचा वृद्धिदर टाळेबंदीपूर्वी जानेवरी २०२० मध्ये २.१% होता तो जुलैमध्ये -१८.३% राहिला आहे. एप्रिल २०२० मध्ये भारतातील उद्योगक्षेत्राचे ३८% ने नुकसान झाले आहे. देशातील प्रमुख आठ उद्योगांचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणात आणि वेगाने घटले आहे. कोळसा उत्पादन एप्रिल २०१९ मधील ३.२% वरून एप्रिल २०२० मध्ये -१५.५% ने घटले आहे. याच कालावधीत क्रूड तेल उत्पादन -६.७% वरून -६.४% राहिले आहे. तर नैसर्गिक वायू उत्पादन -.०% वरून -१९.९% वेगाने घटले आहे. तसेच रिफायनरी वस्तू उत्पादन ४.३% वरून -२४.२% एवढे अत्यल्प राहिले आहे. प्रमुख ८ उद्योगांचे उत्पादन याच कालावधीत ८.२% वरून -३८.१% ने अत्यंत जलदगतीने घटले आहे. एप्रिल २०२० मध्ये अत्यंत महत्त्वाच्या (core) उद्योगांचे उत्पादन ३८% ने घटले आहे. सिमेंट उत्पादन ८६% ने, वीज उत्पादन २२.७% ने, खते उत्पादन ४.५% ने आणि क्रूड तेल ६.८% ने घटले आहे. यावरून हे सहज सिद्ध होते की, उद्योगक्षेत्रावर कोविड-१९ टाळेबंदीचा अत्यंत खोल आणि सर्वात जास्त वाईट परिणाम झाला आहे. जगाचा आर्थिक इतिहास असे सांगतो की, ज्या देशांनी उद्योगक्षेत्राचा विकास साध्य केला तेच देश उद्योगप्रधान आणि आर्थिक प्रगत देश म्हणून उदयास आले आहेत. यावरून कोविड -१९ च्या उद्योग क्षेत्रावरील प्रतिकूल परिणामाची कल्पना आणि गांभीर्य लक्षात येते.

**शेतीक्षेत्रावरील परिणाम**

कोविड -१९ चा आपल्या शेतीवर आणि शेती पूरक व्यवसायावर सखोल आणि व्यापक परिणाम

दिसून येत आहे. यावर्षी पाऊस अतिरिक्त झाल्याने आणि महापुरामुळे खरीपाचा हंगाम नुकसानीचा गेला, मात्र त्या अतिरिक्त पावसाचा परिणाम म्हणून रब्बी पिके आणि उत्पादन चांगले आले होते. यात ऊस, फळे, भाजीपाला, मिरची, कांदा, लसूण, भात, गहू, सोयाबीन, हरभरा, कापूस, ज्वारी यांचा समावेश आहे. मात्र टाळेबंदीत सर्व कामे बंद राहिल्यामुळे या पिकांची कापणी आणि काढणी करता आली नाही आणि नुकसान झाले. द्राक्षे, पेरू, काजू, चिक्कू, आंबा, कलिंगड आणि इतर फळफळावळांची काढणी न झाल्याने नुकसान झाले आहे. तसेच प्रक्रिया उद्योग यात दुग्ध, कुक्कुटपालन, फळप्रक्रिया उद्योग बंद राहिल्याने मोठे नुकसान झाले आहे. भाजीपाला, फळे यांच्या किमती कमी झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. मजूर काम करू न शकल्याने त्यांना उत्पन्न न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. एकूण शेतमजुरांपैकी ५४.९% भूमिहीन, तर ४५.१% अल्पभूधारक आहेत. ४०० दशलक्ष लोकांना टाळेबंदीचा फटका बसला आहे. रोजगार बंद झाल्याने औद्योगिक कामगारांचीही शेतमालाला मागणी कमी झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. २०१८-१९ मध्ये शेतीमाल निर्यातीपासून ३८ अब्ज मिळाले होते ते या वर्षात सोडून द्यावे लागले. नगदी पिकांना लागणारा मजूर स्थलांतरित असल्याने आणि काम बंद आणि गावी गेल्याने आत्ता तुटवडा निर्माण झाला असून मजुरीदर वाढल्याने खर्चात वाढ होत आहे. बाजारपेठ बंद, वाहतूक सुविधांचा अभाव यामुळे मुंबई, पुणे दिल्ली यांसारख्या शहरांना होणारा शेतमालाचा उठावच झाला नाही आणि शेतकऱ्यांचे नुकसान झाले. खेड, पिंपळगाव, पुणे येथील शेतकरी दौंडकर यांच्या मते, फ्लोवर, कोबीपासून दर एकरी ४०,००० प्रमाणे दोन एकरचे ८०,००० रुपयाचे नुकसान झाले. झांशी, मध्यप्रदेशमधील कलिंगड शेतकरी म्हणतो, एक किलोस एक रुपया ही भाव न मिळाल्याने दोन एकरचे ९०,००० रुपयांचे नुकसान झाले, जो भाव १० रुपये मिळाला होता. साखर कारखाने बंद असल्याने ऊसतोडणी बंद राहिल्याने कामगार येऊनही ते काम करू शकले नाहीत, त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली तर शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आणि त्यांना सावकारांकडे कर्जसाठी जावे लागले. हळूहळू शेती आणि संलग्न व्यवसाय शिथिल होत आहेत; मात्र शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने पुढील खरीप हंगामाची तयारी मशागत, खते, बी-बियाणे, अवजारे, उपलब्ध करणे आर्थिकदृष्ट्या कठीण होत आहे. टाळेबंदीचा शेती आणि पूरक व्यवसायावरील परिणाम राज्य आणि क्षेत्रनिहाय वेगवेगळा आहे. यातून जरी आत्ता धान्यसाठा पुरेसा असला तरी भविष्यात टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे मत अखिल भारतीय शेती संघर्ष समितीचे समन्वयक अविक शहा व्यक्त करतात. पश्चिम बंगाल मधील झारग्राम, सुंदरबन परिसरात अन्नधान्याची टंचाई जाणवत आहे. एकूण हापूस आंब्याच्या उत्पादनांपैकी ५५% उत्पादन महाराष्ट्रात होते आणि त्यासही मुंबई, पुणे आणि कोल्हापूर ही मोठी बाजारपेठ आहे. मात्र या बाजारपेठा बंद असल्याने आणि मागणी घटल्याने उत्पादकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे असे निरीक्षण आंबा उत्पादक संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत मोकळ नोंदवितात. उत्तरप्रदेशमध्ये आगावू पैसे देऊन अन्नधान्य आणि फळ फळावळांची मागणी केली जाते, मात्र ती न झाल्याने आणि वाहतूक सुविधा ठप्प झाल्याने व पॅकेजिंग न झाल्याने ७०% मागणी कमी झाली आहे. त्यामुळे जर शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला नाही तर ते कोरोनाऐवजी उपासमारीने मारतील,

असे मत आंबा उत्पादक संघटनेचे अध्यक्ष इश्राम अली व्यक्त करतात. सिराज हुसेन माजी शेती सचिव म्हणतात, पंजाब आणि हरियाणातून गहू सरकारने खरेदी केला मात्र तो बिहारमधून झाला नाही. मक्याची आधारभूत किमत १७६० रुपये प्रतिक्विंटल असताना ११०० रुपयांना विकावा लागला. मध्यप्रदेश मध्ये उठाव नसल्याने चन्याला प्रतिक्विंटल ६०० ते ७०० रुपये कमी मिळाले. महेंद्र देव माजी शेतीमाल आयोग अध्यक्ष यांच्या मते, टाळेबंदी काळात मागणी घटल्याने शेतकऱ्यांचे खूपच नुकसान झाले आहे, त्यामुळे त्यांना रोख स्वरूपात मदत देणे अत्यावश्यक आहे. मात्र दुसऱ्याच बाजूने, काही शेतमालाच्या किमती मात्र वाढून त्याचा आर्थिक बोजा विशेषतः गरिबांवर पडत आहे, यात तृणधान्ये आणि उत्पादने, दूध आणि उत्पादने, तेले, फळे, भाजीपाला, कडधान्ये, साखर आणि बेकरी उत्पादने, मसाले यांचा समावेश आहे. उदा. तृणधान्यांच्या बाबतीत भाववाढ एप्रिल २०१९ मधील १.२% वरून मार्च २020 मध्ये ५.३% तर एप्रिल २०२० मध्ये ७.८% पर्यंत वाढली तर याच कालावधीत कडधान्याच्या बाबतीत ती अनुक्रमे -.०८%, १५.८% आणि २३.६% राहिली. वरील हे सर्व विवेचन कोविड-१९ टाळेबंदी भारतीय शेती विकासास मारक ठरली आहे ते सिद्ध होते.

**कोरोना महामारी आणि कामगार**

महामारीच्या काळात देशाची वृद्धी (GDP) चे नुकसान ४% ने होईल आणि ते ९ लाख कोटी रुपयांचे असेल. हे नुकसान भरून काढण्यासाठी २०२२ पासून तीन वर्षे ८.५% वेगाने आर्थिक वृद्धी साध्य करणे आवश्यक आहे. आर्थिक वृद्धी आणि रोजगार यांचा प्रत्यक्ष संबंध असून तेवढ्या प्रमाणात रोजगार घटून बेरोजगारी वाढण्यास मदत होते आहे. सी.आय.एम.ई.च्या मते, भारतातील बेकारी दर ८ मार्च, २०२० रोजी एकूण ७.७%, ग्रामीण ७% आणि शहरी ९.१% होती, ती ५ एप्रिल, २०२० रोजी अनुक्रमे २३.८%, २१.२%, ३०.९% एवढा अधिक आणि अतिरिक्त झाला आहे. सी.एम.आय.ई.च्या मते, मार्च २०२० च्या शेवटच्या आठवड्यात शहरी भागासाठी बेकरीचा दर ३०% पर्यंत वाढला. तो ग्रामीण भागासाठी २१% पर्यंत वाढला तर एकूण देशासाठी तो २३% पर्यंत वाढला आणि ही वाढ झाली आहेत. तर एप्रिल २०२० पहिल्या आठवड्यात बेकारी दर अनुक्रमे शहरी ३१%, ग्रामीण २९% आणि संपूर्ण देशासाठी तो २४% पर्यंत वाढला आहे. याबरोबरच शरद कुमार सराफ अध्यक्ष फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशनच्या (एफ.आय.ई.ओ.) मते, जवळपास ५०% निर्यात ऑर्डर्स रद्द झाल्याने २.५ ते ३ दशलक्ष जॉब बंद झाले आहेत. वस्त्रोद्योगात ३ दशलक्ष तर हस्तकला क्षेत्रात २ दशलक्ष रोजगार बंद होतील. या काळात निर्यात क्षेत्रात १५ दशलक्ष तर वस्त्रोद्योगात ३ दशलक्ष कामगार बेकार झाले आहेत. वाढती बेकारी आणि अधिक आर्थिक विषमता यामुळे गरिबी उच्च पातळीवरच पोहचली आहे. एन.एस.ओ.च्या मते, २०१६-१७ मध्ये बेकारीचा दर राष्ट्रासाठी ६.२% आणि तरुणांसाठी ग्रामीण आणि शहरीसाठी २०% पेक्षा अधिक होता. २०१९ मध्ये तो देशासाठी ९% पोहचला आणि तरुणांसाठी तो किती तरी अधिक राहिला. त्यातच वाढती आर्थिक विषमता यामुळे गरिबी उच्च पातळीवर गेली. ओक्स्फम (Oxfam) अहवालाप्रमाणे २०१९ मध्ये भारतात १% कुटुंबाकडे एकूण उत्पन्न आणि संपत्तीच्या ७३% हिस्सा केंद्रित झाला आहे. त्यामुळे गरिबी रेषा जरी अपुरी असली तरी गरिबांचे प्रमाण कोटीत राहिले. जागतिक बँकेच्या मते, बहुआयामी गरिबी निर्देशांक विचारात घेतल्यास

देशात गरिबांचे प्रमाण एकूण लोकसंख्येपैकी ५५% म्हणजे ६५ कोटीपर्यंत पोहचते. मनरेगा (MANREGA) अंतर्गत ही रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणावर घटली आहे. २०१४ मध्ये मनरेगा ने १.२४ कोटी कुटुंबांना १८.६८ कोटी मनुष्य दिवस एवढा रोजगार निर्माण केला होता. तो २०१७ मध्ये १.३७ कोटी आणि २०.९१ कोटी झाला तर २०२० मध्ये तो फक्त .३४ कोटी आणि ३.५९ कोटी एवढा अत्यल्प निर्माण झाला आहे. भारतात ९०% म्हणजेच ४० कोटीपेक्षा अधिक अनौपचारिक क्षेत्रात कामगार असल्याने आणि या टाळेबंदीमुळे आर्थिक चक्र थांबल्याने रोजगार बंद झाल्याने, वेतन नसल्याने उदरनिर्वाह करणे आणि जगणे कठीण होत आहे. त्यामुळे ते ५०० ते १५०० किलो मीटर आणि त्यापेक्षा ही जास्त अंतर चालत डोक्यावर सामानाचे ओझे घेऊन आपआपल्या गावी जावे लागत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारे, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संस्था आणि मंडळे त्यांच्या अन्नाची गरज भागविण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र तो पुरेसा नाही आणि त्यांना शक्य ही नाही. एकंदरीत, कोरोना महामारीचा अत्यंत प्रतिकूल परिणाम देशातील सर्वच कामगारांवर झाला असून अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांवर तो अधिक झाला आहे. कारण त्यांचे मुळातच अधिक गंभीर प्रश्न आणि आव्हाने असताना या कोरोना महामारीने त्यांची तीव्रता अधिक करून त्यांना जगणे मुश्किल केले आहे. Oxfam अहवालाप्रमाणे, कोरोना महामारीने जगाच्या ५० कोटी कामगारांना गरिबीत ढकलले आणि तेवढी वाढ गरिबीत झाली, त्यांच्या पुनर्वसनासाठी २.५ ट्रीलियनची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणात वाढ भारतातही झाली आहे.

## पर्यावरणपूरक टाळेबंदी

कोविड -१९ टाळेबंदीचा प्रतिकूल आणि दूरगामी आर्थिक परिणाम झाला असला तरी पर्यावरण गुणवत्ता आणि दर्जा सुधारण्यास मदत झाली आहे. मुहमद आणि इतर अभ्यासाप्रमाणे नासा आणि ईसाच्या आकडेवारीच्या आधारे जगातील वुहान, इटली, स्पेन, आणि अमेरिकेतील पर्यावरण प्रदूषण कोविड-१९ टाळेबंदीमुळे ३०% ने घटले, तर लोकांची गतिशिलता ९०% घटली. NO२ (नायट्रोजन ऑक्साइड) या प्रदूषकाचा विचार करता टाळेबंदीमुळे वुहानमध्ये जानेवारी, फेब्रुवारी २०१९ ते २०२० या काळात ३०% ने घट झाली आहे. तर चीनमध्ये जानेवारी आणि फेब्रुवारी २०२० कालावधीत २० ते ३०% घट झाल्याचे दिसून येते. युरोपमध्ये मार्च २०१९ ते २०२० काळात २० ते ३०% घट आढळून येते. अमेरिकेत मार्च २०१९ ते २०२० कालावधीत ही घट ३०% आहे तर इटली, फ्रान्स, स्पेन या राष्ट्रात ही NO२ प्रदूषकातील घट २० ते ३०% झाली आहे. याचे कारण म्हणजे टाळेबंदीमुळे सर्व आर्थिक उपक्रम आणि व्यवहार ठप्प झाल्याने लोकांचे फिरणे आणि हालचाल बंद झाली आणि त्यातून हवेचे प्रदूषण कमी होण्यास मदत झाली. यात प्रामुख्याने वाहतूक, ग्रोसरी आणि औषधे, किरकोळ आणि करमणूक, कामाचे ठिकाण, पार्क्स यांचा समावेश आहे, तर घरातील उपस्थिती ८% पासून २४% पर्यंत वाढली आहे. सुशांत महातो आणि इतर यांच्या अभ्यासाप्रमाणे दिल्ली महानगरात टाळेबंदीमुळे PM१० आणि PM२.५ धुलिकण या महत्त्वाच्या हवा प्रदूषकात टाळेबंदीपूर्व स्थितीशी तुलना करता ५०% पेक्षा अधिक घट झाली आहे. २०१९ शी तुलना करता ही घट अनुक्रमे ६०% आणि ३९% आहे. इतर हवा प्रदूषकात NO२ (नाट्रोजन ऑक्साइड) मध्ये ५२.६८% तर CO

(कार्बन मोनोऑक्साइड ) ३०.३५% एवढी उल्लेखनीय घट टाळेबंदीपूर्व आणि नंतर कालावधीत घट झाल्याचे दिसून येते. राष्ट्रीय हवा गुणवत्ता निर्देशांक (NAQI) हवेची गुणवत्ता आणि दर्जा दर्शवितो. दिल्ली महानगरात टाळेबंदीमुळे शुद्ध हवा निर्देशांक ४० ते ५०% नी सुधारला आहे. दिल्लीचा मध्य, पूर्व, दक्षिण, पश्चिम आणि उत्तर भाग असा विचार करता हवेची शुद्धता अनुक्रमे ५४%, ४९%, ४३%, ४७% आणि ३१% घट झाल्याचे दिसून येते. असाच निष्कर्ष शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासातूनही निघाला आहे. त्याचप्रमाणे कोल्हापूर शहरातील हवा आणि ध्वनी प्रदूषण फार मोठ्या प्रमाणावर घटण्याबरोबरच पंचगंगा नदीचे पाणी मोठ्या प्रमाणावर शुद्ध झाले आहे. तसेच सजीवसृष्टी प्रामुख्याने प्राणी, वनस्पती आणि इतर जीव मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. गंगा नदीचे पाणी प्रथमच मोठ्या प्रमाणावर शुद्ध झाल्याचे आढळले.

पर्यावरणाची गुणवत्ता, दर्जा आणि मानवी आरोग्य यांचा जवळचा संबध आहे. Centre for Research on Energy and Clean Air च्या मते, शुद्ध हवेमुळे एक महिनाकाळात युरोपमध्ये अवेळी मृत्यू पडणारे ११ हजार लोकांचे प्राण वाचले. दमा तक्रारीत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. मुलांबरोबरच ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य मोठ्या प्रमाणात सुधारले आहे. अपरिपक्व जन्मदरात घट झाली आहे. तर १९०० हून अधिक मुले आपत्कालीन उपचारापासून वाचली आहेत. शुद्ध हवेमुळे जर्मनीत २,०८३, इंग्लंड १,७५२, इटली १,४९०, फ्रान्स १,२३० आणि स्पेनमध्ये १,०८१ मृत्यू टळून जीव वाचले आहेत. युरोपमधील २१ देशांतील २,०८३ ने मृत्यू कमी झाले असून स्वीडन, नॉर्वे, पोर्तुगालसह १० देशांतील हा आकडा १२० ते ७७० ने कमी झाला आहे. अर्थात, ही पर्यावरण दर्जा सुधारणा कायमस्वरूपी नसून टाळेबंदी उठल्यानंतर सर्व आर्थिक उपक्रम आणि व्यवहार सुरू होऊन गतिमान झाल्यानंतर पूर्वस्थिति निर्माण होणार, त्यामुळे ते भविष्यात कसे टिकवता येईल, त्याचा विचार करावा लागेल.

**कोविड -१९ आणि आरोग्य क्षेत्र**

कोरोना विषाणू आजारावर आज कोणतेही औषध किंवा लस नाही. मात्र त्याचा प्रसार आणि लागण वेगाने होत आहे. कोरोना संसर्ग ओळखण्यासाठी आवश्यक प्रयोगशाळा, चाचणी उपकरणे व सुविधा देशात अत्यंत कमी आहेत. सिंगापूरमध्ये दर दहा लाख लोकांमागे चाचण्यांची संख्या २४६०० एवढी, तर कोरियात १२३६५, मलेशिया ६०५१, इराण ५९०९, नेपाळ २१६६, पाकिस्तान ९६२ आहे, तर भारतात हे प्रमाण फक्त ८०२ एवढे अत्यल्प आहे. कोरोना रोग्यांना ट्रीटमेंट फक्त सरकारी दवाखान्यात दिली जाते. जेथे डॉक्टर्स, नर्स, आशा, इतर स्टाफ अत्यंत अपुरा असून आवश्यक स्वयंसंरक्षण किटही उपलब्ध नाहीत. ट्रीटमेंट देण्यासाठी किमान १४ दिवस क्वारंटाईनसाठी संस्था, दवाखाने आणि बेड्स अपुरे पडत असून त्यांचा मोठा तुटवडा देशात जाणवतो. ट्रीटमेंट, बेड आणि दवाखाना न मिळाल्याने अनेकांना आपला प्राण गमवावा लागला. आरोग्यसेवा ही सामाजिक सेवा असतानाही आपल्या देशात ती दुर्लक्षित बाब असून केंद्र आणि राज्य सरकारे जीडीपीच्या १.५% ही खर्च आरोग्य सेवेवर करीत नाहीत.

**घटत्या आर्थिक वृद्धीचे निर्धारक घटक**

कोरोना विषाणूची लागण नियंत्रित करण्यासाठी अवलंबलेली टाळेबंदी देशाच्या आर्थिक वृद्धीवर, उत्पादक क्षेत्रावर, रोजगार आणि बेकारीवर अत्यंत प्रतिकूल परिणाम करत आहे. टाळेबंदीचा परिणाम अर्थव्यवस्थेवर का प्रतिकूल झाला त्याचे विश्लेषण

करणे आवश्यक आहे. देशाची आर्थिक वृद्धी स्थूल देशांर्गत उत्पादन (GDP) मध्ये मोजली जाते. सैद्धांतिक दृष्ट्या GDP = C + I + G + (X - M²) होय. म्हणजेच देशाची आर्थिक वृद्धी ठरविणारे खाजगी उपभोग (C), गुंतवणूक (I), सरकारी खर्च (G) आणि निव्वळ आयात (X - M²) हे घटक किंवा निर्धारक आहेत. रिझर्व्ह बँकेच्या मते, यात खाजगी उपभोग खर्चाचा हिस्सा ६०% असतो. कोरोना टाळेबंदीच्या काळात उपभोक्त्यांच्या विश्वासात मोठ्या प्रमाणात घट झाल्याने मागणी घटून वृद्धी घटण्यास मदत झाली. त्यामुळे ग्राहक किंमत निर्देशांकात घट झाली आहे. संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठीचा खरेदी व्यवस्थापक निर्देशांक (PMI) टाळेबंदी काळात वेगाने घटला आहे, तो उपभोग खर्च घटीचा निदर्शक आहे. बँकाकडून होणारा कर्जपुरवठा जानेवारी २०२० मधील ७.२% वरून ६.३% पर्यंत घटला आहे. त्यामुळे भांडवल गुंतवणूक आणि निर्मितीही घटली आहे, यातून गुंतवणूक खर्च घटल्याचे सिद्ध होते. व्यवसाय अपेक्षा निर्देशांक टाळेबंदीपूर्व ११५ वरून १०५ पर्यंत वेगाने घटून सेवाक्षेत्रातील घट दर्शवितो. टाळेबंदी काळात थेट परकीय गुंतवणूक ही मोठ्या प्रमाणात (५६६८-१३६६) घटली आहे. वस्तू निर्माण क्षेत्राचा खरेदी व्यवस्थापक निर्देशांक (PMI) टाळेबंदी काळात वेगाने घटला असल्याने या क्षेत्राची प्रगती घटल्याचे दर्शवितो. मागणी घटल्याने उद्योगांची क्षमता वापर ७६% वरून ६९% पर्यंत उल्लेखनीय प्रमाणात घटली आहे. आर्थिक संकटात सरकारी खर्च वृद्धी महत्त्वाची भूमिका बजावतो. टाळेबंदी काळात सरकारी खर्च लक्षणीय घटल्याचे दिसून येते. मे २०२० पर्यंत भारताची निर्यात ६०% ने घटली आहे. रोजगार घटल्याने बेकारी वाढून कामगारांची मागणी घटल्याने की जे ४५ कोटीपेक्षा अधिक आहेत, उपभोग खर्च वेगाने घटण्यास मदत झाली. अशाप्रकारे, टाळेबंदी काळात उपभोग खर्च (C), गुंतवणूक खर्च (I), सरकारी खर्च (G) आणि निव्वळ निर्यात (x) घटल्याने एकूण आणि क्षेत्रनिहाय ही आर्थिक वृद्धी वेगाने घटली आहे आणि त्यामध्ये आणखी घट होत आहे.

**विकासाची गाडी रुळावर आणण्यासाठी आर्थिक उत्तेजन पॅकेज**

घसरलेली विकासाची गाडी रुळावर आणण्यासाठी केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेने काही उपाययोजना, प्रामुख्याने उत्तेजन पॅकेज जाहीर केले आहे. केंद्र सरकारच्या वतीने अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पहिल्या टप्प्यात एकूण १.७० लाख कोटी रुपयांचे रीलीफ पॅकेज जाहीर केले आहे. यात प्रामुख्याने अन्न सुरक्षितता आणि थेट पैसा स्थलांतर लाभ यांचा समावेश आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्नयोजना अंतर्गत ८० कोटी लोकांना वाढीव पाच किलो तांदूळ/गहू प्रति व्यक्ती आणि एक किलो डाळ प्रति कुटुंबास प्रथम तीन महिने आणि नंतर नोव्हेंबरपर्यंत उपलब्ध करून दिले जाणार आहे, ज्याच्यासाठी ४५,००० कोटी खर्च केला जाणार आहे. याबरोबरच आरोग्यक्षेत्रात काम करणाऱ्यांना प्रत्येकी ५० लाख रुपये विमा कवच दिले जाणार आहे. किसान सन्मान निधी अंतर्गत २००० रुपयांचा पहिला हप्ता एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात दिला जाणार आहे. मनरेगात काम करणाऱ्यांचे वेतन सरासरी २०० रुपयांनी वाढविले जाणार आहे. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि विधवांना १००० रुपये दोन हप्त्यात दिले जाणार आहेत. जनधन खाती असलेल्या स्त्रियांना प्रति महिना ५०० रुपये तीन महिने दिले जाणार आहेत. गरीब कुटुंबांना तीन महिने गॅस-सिलेंडर मोफत दिला जाणार आहे. स्वयं बचत गटातील स्त्रियांना तारणविरहित कर्ज मर्यादा २० लाख पर्यंत दुप्पट

करण्यात आली आहे. ज्या आस्थापनात १०० कर्मचारी असून त्यांचे उत्पन्न १५००० रुपयेपेक्षा कमी आहे, त्यांचा भविष्यनिर्वाह निधीचा हप्ता केंद्र सरकार भरणार आहे. याबरोबरच भारतीय रिजर्व्ह बँकेने आर्थिक घसरण नियंत्रित करून विकासाची गती सुधारण्यासाठी काही चलनविषयक उपाय जाहीर केले आहेत. यात सर्व प्रकारच्या कर्जाची हप्ते वसुली तीन महिन्यांसाठी स्थगित करण्यात आली आहे, ती पुढेही वाढविण्यात आली आहे. व्याजाचे दर कमी करण्यात येतील. रिजर्व्ह बँकेने रेपो रेट ४.४% पर्यंत कमी केला आहे जो मागील १५ वर्षातील सर्वात कमी आहे. बँकांचा राखीव निधी १०० बिंदूने कमी केला असून त्यामुळे १.३७ लाख कोटी रुपये जादा अर्थव्यवस्थेत खेळते राहतील. याबरोबरच रिव्हर्स रेपो रेट .९० बिंदूने कमी करून ४% पर्यंत ठेवण्यात आला आहे, असे प्रयत्न रिझर्व्ह बँकेने दोन टप्प्यात केले आहेत.

या आर्थिक उत्तेजन पॅकेजचा समावेश करून पंतप्रधान यांनी १२ मे रोजी एकूण २० लाख कोटी रुपयाचे आर्थिक उत्तेजन पॅकेज जाहीर केले असून त्याचे विभाजन आणि क्षेत्रनिहाय वाटप अर्थमंत्री टप्याटप्याने करत आहे. पहिल्या टप्प्यात लघु उद्योगांसाठी (MSMEs) सहा लाख कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर केले आहे. कारण एकूण उद्योग क्षेत्रात आणि रोजगार निर्मितीत त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. याबरोबरच ३० हजार कोटी रुपये NBFCs, HFCs, MFIs साठी प्रस्तावित केले आहेत. एकूण ९० हजार कोटी रुपये ऊर्जानिर्मिती कंपन्यांसाठी ठेवले आहेत तर २ हजार ५०० कोटी रुपये कामगारांच्या भविष्यनिर्वाह निधीसाठी दिले आहेत. एमएसएमई (MSMEs) साठी ३ लाख कोटी रुपये तारणविरहित कर्जपुरवठा केला जाईल आणि त्याचा फायदा ४५ लाख उद्योगांना होईल, असा अंदाज आहे. हे कर्ज चार वर्षांत फेडायचे असून पहिल्या वर्षात कर्जफेडीची सूट असेल. अडचणीत असलेल्या एमएसएमईना वाढीव २० हजार कोटीचे कर्ज दिले जाईल आणि २ लाख उद्योगांना त्याचा फायदा होणार आहे. प्रगतीला वाव असणाऱ्या एमएसईएस मध्ये ५० हजार कोटी रुपये समभाग स्वरूपात गुंतवणूक केली जाईल. मध्यम उत्पन्न गटातील करदात्यांना उद्गम कर (TDS) आणि स्रोतकर संकलनात (TCS) २५% सवलत दिली जाईल. उद्योगातील कामगारांच्या भविष्यनिर्वाह निधी वर २ हजार ५०० कोटी खर्च सरकार करणार असून या निधीची वर्गणी १२% वरून १०% पर्यंत कमी करून खरेदीशक्ती वाढविण्याचा मानस आहे. दुसऱ्या व टप्प्यात कामगारांसाठी काही उपाय करण्याचा प्रयत्न मानस केला आहे. स्थलांतरित कामगारांना ५ किलो गहू/ तांदूळ प्रति व्यक्ति आणि १ किलो डाळ प्रति कुटुंब मोफत रेशनसाठी ३५०० कोटी रुपये प्रस्तावित केले असून, एक राष्ट्र एक रेशनकार्ड माध्यमातून पोर्ट्याबिलिटी करण्यासाठी प्रयत्न केला जाईल. फेरीवाल्यांसाठी ५ हजार कोटीतून कर्जपुरवठा आणि ऑनलाइन व्यवहारांसाठी ५,००० रुपये प्रोस्ताहण अनुदान दिले जाणार आहे. नाबार्डमार्फत शेतीसाठी २९,५०० कोटी पुनर्वित्त पुरवठा आणि ४२०० कोटी ग्रामीण पायाभूत सुविधासाठी दिले जाणार आहेत. भारत आज ही शेतीप्रधान आणि ग्रामीण क्षेत्र प्राबल्य असलेला देश असल्याने शेती, शेतीपूरक व्यवसाय आणि ग्रामीण विकासास पर्याय नाही. त्यामुळे शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसायांना उभारी आणण्यासाठी आर्थिक पॅकेजमध्ये काही तरतुदी केल्या आहेत. यात शेतीक्षेत्रातील शीतगृहे, साठवणगृहे, अन्नप्रक्रिया उद्योग सहकारी संस्थामधील पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी १ लाख कोटी रुपये तरतूद केले आहेत. पशूरोग नियंत्रण कार्यक्रमासाठी

१३,३४३ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मधुमक्षिका पालनासाठी ५०० कोटी रुपये तरतूद केले आहेत. पशुपालन पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी १५ हजार कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत. औषधी वनस्पती लागवडीसाठी ४ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. लघु अन्नप्रक्रिया उद्योगासाठी १० हजार कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत. मासेसंपदा विकासासाठी २० हजार कोटी रुपये राखून ठेवले असून मासे उत्पादन वाढविण्याचा मानस आहे. जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ दुरुस्त करून तृणधान्ये, कडधान्ये, बटाटा, कांदा, खाद्यतेल, तेलबिया नियंत्रणमुक्त केल्या जाणार आहेत. शेतमाल विक्रीत सुलभता आणण्यासाठी केंद्रीय कायदा आणला जाणार आहे. शेतकऱ्याला आर्थिक उत्पन्नाची हमी देणारी कायदेशीर यंत्रणा तयार केली जाणार आहे. अशाप्रकारे कृषिपूरक उद्योगांना उत्तेजन देण्यासाठी एकूण १,६३,३४३ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे.

**पुरवठाकेंद्रित उत्तेजन पॅकेज**

कोरोना पुरस्कृत टाळेबंदीमुळे भारतीय अर्थव्यवस्था घसरणीकडून मंदीकडे वाटचाल करत असताना केंद्र सरकारने २० लाख कोटी रुपयांचे आर्थिक उत्तेजन पॅकेज जाहीर केले असून ते GDP च्या १०% आहे असे सरकारचे म्हणणे आहे. ते पहिल्या टप्प्यात १.७० लाख कोटी रुपये आणि दुसऱ्या टप्प्यात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSMEs) ३ लाख कोटी, ऊर्जा ९०,००० कोटी, बँकेत्तर कंपन्या, गृहवित्त संस्था ३०,००० कोटी, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी २,५०० कोटी आहे. शेती आणि पूरक व्यवसायासाठी १,६३,३४३ कोटी रुपये, गरीब, स्थलांतरित कामगार ३०,००० कोटी, रोजगार हमी १०,००० कोटी, रस्त्यावरील व्यावसायिक ५,००० कोटी, मुद्रा उद्योजक १५०० कोटी, आदिवासी ६००० कोटी, मध्यमवर्गीय ७०००० कोटी यांचा प्रामुख्याने समावेश आहे. तज्ज्ञांच्या मते, हे आर्थिक उत्तेजन पॅकेज GDP च्या १०% आणि २० लाख कोटी रुपयांचे नसून प्रत्यक्षात ते १.८६ लाख कोटी रुपयांचे असून ते GDP च्या ०.९१%च आहे, ते किमान ५% तर असायला पाहिजे होते. परकीय तज्ज्ञांच्या मते, ते कसे तरी १% होईल त्यात बँक ऑफ अमेरिका, डच बँक, मॉर्गन स्टंले यांचा समावेश आहे. या पॅकेजमध्ये अर्थव्यवस्थेतील रोखता वाढविणे, कमी व्याजदराने कर्जपुरवठा करणे व कर्जाचे हप्ते, परतफेड पुढे ढकलणे यांचा समावेश आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, रोजगार हमी योजना आणि स्थलांतरित कामगारासाठी मोफत धान्य वाटप यांवरील खर्च वगळता लोकांच्याकडे थेट पैसा किंवा खरेदीशक्ती वाढण्याच्या तरतुदी नाहीत, म्हणून हे पॅकेज पुरवठा केंद्रित असून मागणी दुर्लक्षित आहे. त्यात कर्जघटक अधिक असून थेट रक्कम स्थलांतरण अत्यंत कमी आहे. जगातील देशाशी तुलना करता भारताचे आर्थिक उत्तेजन पॅकेज खूपच कमी आहे ते अमेरिका(१०.७१%), जपान (१०%), मलेशिया (१६.१७%), इंग्लंड (१५.२७%), जर्मनी (२०.९५%) आणि इतर देशांत खूपच अधिक आहे. विशेष म्हणजे त्यात कर्जघटक कमी असून थेट रक्कम स्थलांतर प्रमाण अधिक होते. त्यांनी सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांना उत्तेजन पॅकेज देताना ही थेट रक्कम स्थलांतरासाठी अधिक पसंती दिली होती.

देशाची आर्थिक वृद्धी स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) मध्ये मोजली जाते. सैद्धांतिक दृष्ट्या $GDP = C + I + G + (X - M^2)$ होय. म्हणजेच देशाची आर्थिक वृद्धी ठरविणारे खाजगी उपभोग (C), गुंतवणूक (I), सरकारी खर्च (G) आणि निव्वळ

आयात (X - M²) यातून ठरते. रिझर्व्ह बँकेच्या मते, यात खाजगी उपभोग खर्चाचा हिस्सा ६०% असतो. देशातील टाळेबंदी काळात उपभोग वेगाने घटत आहे. निव्वळ निर्यात उणे किंवा ऋण आहे. सार्वजनिक क्षेत्र वेगाने घटत असून सरकारची गुंतवणूक फारशी नाही. मात्र खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक वाढविण्यासाठी स्वस्त व्याजदराने कर्जपुरवठा आणि रोखता वाढविण्याचे धोरण पुरवठा सुधारण्यास मदत करू शकेल. त्यातून पुरवठा सुधारू शकेल मात्र त्यावर मर्यादा आहेत. कारण मागणी असेल आणि तो वाढत असेल तर उत्पादन आणि पुरवठा वाढविण्यास प्रेरणा मिळून तो वाढू शकतो. म्हणजे पुरवठा सुधारण्यासाठी ही मागणी वाढणे गरजेचे असते. त्यातच मागणी असेल तरच उत्पादक कर्जे घेतील आणि उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करतील. उत्पादन वाढवून पुरवठा सुधारताना काही रोजगार निर्माण होऊन मागणी वाढू शकते, मात्र त्यावर मर्यादा आहेत कारण सर्वांना रोजगार मिळणार नाही. देशात रोजगार लवचिकता अल्प आहे. केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेचे आर्थिक उत्तेजन पॅकेज पुरवठा केंद्रित असल्याने आणि मागणीकडे दुर्लक्ष करत असल्याने देशाचे अर्थचक्र रुळावर आणण्यास आणि गतिमान करण्यास उपयुक्त ठरणार नाही. कारण तो एकांगी प्रयत्न असून त्यामुळे पुरवठा सुधारू शकतो, मात्र त्यालाही मर्यादा आहेत त्यामुळे ते अर्थचक्र गतिमान करू शकत नाही. या पॅकेजमध्ये कर्जाचे प्राबल्य असून मदतीची आणि थेट उत्पन्न स्थलांतरण कमी आहे.

**भविष्यकालीन धोरण दिशा**

केंद्र आणि राज्य सरकारांनी सामाजिक क्षेत्र विशेषत: आरोग्य, निवारा, रोजगार, गरिबी, बेकारी यांना आपल्या विकास धोरणात आणि राज्यवित्तीय धोरणांनाही प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. आरोग्य, शिक्षण, पायाभूत सेवा आणि सुविधा मोठ्या प्रमाणावर वाढविण्याबरोबरच खाजगी क्षेत्राचे नियमन करणे आवश्यक आहे. देशात आर्थिक वृद्धीबरोबरच रोजगार निर्मितीस प्राधान्य देण्याबरोबरच रोजगारचे औपचारिककरण, बेकारी नियंत्रण आणि सामाजिक सुरक्षितता सेवा विशेषत: किमान आवश्यक उत्पन्न योजना राबविण्यास प्रयत्न करावेत. शेती आणि उद्योग क्षेत्रांच्या विकासासाठी खास धोरण आणि प्रयत्न येत्या काळात गरजेचे आहेत. त्यांना होणारा कर्जपुरवठा नियमित करण्याबरोबरच मालाला योग्य भाव आणि विपणन व्यवस्था कार्यक्षम आणि प्रबळ करण्यासाठी प्रयत्न करावेत. केंद्र सरकारने वित्तीय पॅकेज जाहीर केले असले तरी ते अपुरे आहे. खास कामगारांसाठी स्वतंत्र वित्तीय पॅकेज जाहीर करावे आणि त्याची अंमलबजावणी करावी. राज्य सरकारांनी ही त्यात आपली भर घालून त्यांचे पुरुज्जीवन करावे आणि त्यांचे वेतन कपात किंवा रद्द करू नये. आर्थिक वृद्धी धोरणात रोजगार निर्मितीस प्राधान्य देऊन रोजगारपूरक वृद्धीच साध्य करण्याचा प्रयत्न करावा. देशात खाजगी क्षेत्राचे प्राबल्य असून त्यावर नियंत्रण ठेवून कामगार सामाजिक सुरक्षितता व्यवस्थेत आणावी. कामगार धोरण निश्चित करून त्याच्या पुनर्वसन योजना आणि कार्यक्रमासाठी केंद्र आणि राज्य अंदाजपत्रकात तरतूद करावी. देशात धान्याचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने ते सर्व गरीब, कामगार, मजूर, स्थलांतरित यांना रेशनकार्डचा विचार न करता वाटावे. त्यांना मूलभूत/किमान आवश्यक उत्पन्न (Basic Universal Income) म्हणून प्रतिमहिना किमान ७५०० रुपये उत्पन्न त्यांचे पुनर्वसन होईपर्यंत द्यावे. या उत्तेजन पॅकेजचे कर्जस्वरूप बदलून थेट उत्पन्न किंवा पैसा स्थलांतरण करावे आणि लगेच एक नवीन पॅकेज जाहीर करून अंमलबजावणी करावी. महात्मा गांधी

रोजगार हमी योजना गतिमान करून ती शहरी भागातही सुरू करावी. आर्थिक वृद्धीचे केंद्र अर्धनागरी आणि ग्रामीण भागाकडे वळवावे. आत्मनिर्भर भारत या अंतर्गत शेती आणि शेतीपूरक व्यवसाय सुधारण्यासाठी भारत सरकारने आर्थिक पॅकेज जाहीर करून उपाययोजना सूचित केल्या आहेत, त्या प्रामुख्याने घोषणा या स्वरूपाच्या आहेत, त्यांचे धोरण तयार करून राबवावे. यात जलसिंचन सुविधा, जलसंवर्धन व वाढ, पाणी आडवा आणि जिरवा, धरणे, कालवे आणि पाटबंधारे तयार करणे, नद्याजोड प्रकल्प आणि जल व्यवस्थापन, गुंतवणूक वाढविणे, निर्यात प्रोस्ताहन आणि सुलभीकरण यांचाही समावेश करावा. शेतकऱ्यांना, शेतमजुरांना आणि कामगारांना उदरनिर्वाहासाठी किमान आवश्यक उत्पन्न ताबडतोब द्यावे. शेतकरी आणि पूरक व्यावसायिक यांच्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून त्यांना नुकसान भरपाई देणे. शेतमजूर आणि कामगारासाठी रोजगार हमीची कामे हाती घेऊन वाढीव दराने मजुरी देणे. शेतकऱ्यांना खरीपाची तयारी आणि कामे करण्यासाठी बिनव्याजी कर्जपुरवठा आणि अवजारे, बी-बियाणे, खते, किटकनाशके, कच्चामाल उपलब्ध करून देणे. जो काही शेतमाल आणि पूरक व्यवसायातील माल विक्रीयोग्य आहे त्यांना हमीभाव देण्याबरोबरच बाजारपेठा खुल्या करणे आणि वाहतूक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे. आरोग्यसेवा ही सामाजिक सेवा म्हणूनच तिचा पुरवठा आणि व्यवस्थापन प्रगती, आधुनिकीकरण आणि अद्यावतीकरणातही सरकारची जबाबदारी आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी आरोग्यावर फक्त स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) १.६% खर्च २०१९-२० मध्ये केला होता, तो ५% पर्यंत वाढविणे गरजेचे आहे. सरकारी आणि खाजगी क्षेत्रांनी एकत्रित काम करण्याबरोबरच आरोग्यक्षेत्राच्या विकासासाठी एक स्वतंत्र निधी, देणग्या, मदत आणि कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीतून (CSR) निर्माण करावा. उत्तेजन पॅकेज आणि अर्थव्यवस्था अधिक खुली करून टाळेबंदी कंटेनमेंट झोनपुरती मर्यादित ठेवण्याबरोबरच लोकांनी सॅनिटायझर, हॅन्डवॉश, मास्क, सुरक्षित अंतर वापरून सहकार्य करावे.

**संदर्भ सूची**


1. CMIE (2020), Reports on Employment and Unemployment, Mumbai.
2. Daily Economic Times ; 24 March 2020 to 23 July 2020, Mumbai.
3. Dasgupta and Rajeev (2020), Paradox of a Supply Constrained Keynesian Equilibrium The COVID-19 Case, Economic Political Weekly, May 30, 2020 Vol LV no 22 , Mumbai, pp22-27.
4. Dasgupta et al. (2020), Procedural Rationality in the Time of COVID-19, Economic Political Weekly, May 30, 2020 Vol LV no 25 , Mumbai, pp13-16.
5. Ghosh, Sangeeta (2020), Examining the COVID-19 Relief Package for MSMEs, Economic Political Weekly, May 30, 2020 Vol LV no 22 , Mumbai, pp10-12.
6. Government of India (2019), Economic Survey Reports, New Delhi.
7. Government of India (2020), Ministry of Health and Family Welfare Reports, New Delhi.
8. International Monetary Fund (2020), Reports and Occasional Publications,

New York.
9. Muhammad et al (2020), COVID-19 pandemic and environmental pollution: A blessingin disguise?, Science of the Total Environment 728 (2020) 138820, pp1-5. www.elsevier.com/locate/scitotenv
10. NSSO (2006-7), Report on Employment and Unemployment, New Delhi.
11. Reserve Bank of India (2020), Reports and Occasional Publications, Mumbai.
12. State Bank of India (2020 ), Reports and Occasional Reports, Mumbai.
13. World Bank (2020), Reports and Occasional Publications, New York.
14. World Health Organisation (2020 ), Reports and Occasional Publications, Geneva.

◆

## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ग्रंथालये यांच्यासाठी **त्रैवार्षिक वर्गणी रु. २०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. ३०००/-** आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**
विद्यापीठ क्वार्टर्स नं. डी-३४, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर. पिन : ४१६ ००४. भ्रमणध्वनी : ०९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना व अर्थसंवाद लेखकांना कळविण्यात येते की, कार्यकारिणीच्या ठरावानुसार दि. १ एप्रिल २०२० पासून अर्थसंवाद हा '**तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक**' करण्यात आलेला आहे. त्यामुळे यापुढील काळात अर्थसंवादचे लेख हे तज्ज्ञांकडून परिक्षण करुन घेऊन, गरजेनुरूप त्यामध्ये लेखकांकडून योग्य त्या सुधारणा करुन घेऊनच अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध केले जातील. युजीसीचे बदलते धोरण आणि गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने सदर हितावह बदल अर्थसंवादमध्ये करण्यात आलेला आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# प्राध्यापक बोरकर : राजस्व या क्षेत्रातील एक निष्णात सैद्धान्तिक अर्थशास्त्रज्ञ

**आर.एस.देशपांडे** †

चंद्रपूर येथे आयोजित मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४२ व्या वार्षिक अधिवेशनात परिषदेचे माजी अध्यक्ष 'प्रा. विष्णू विनायक बोरकर यांचे अर्थशास्त्रातील योगदान' या विषयावर राम देशपांडे, बेंगलोर यांचे व्याख्यान. मूळ इंग्रजी व्याख्यानाचे मराठी भाषांतर अर्थसंवादचे माजी संपादक आणि परिषदेचे माजी अध्यक्ष विनायक श्रीधर देशपांडे, नागपूर यांनी केले आहे.

सार्वजनिक वित्त या अर्थशास्त्राच्या क्षेत्रात ज्यांना वरदानच प्राप्त झाले होते अशा माझ्या अत्यंत आवडत्या प्राध्यापकाची आजच्या प्रसंगी मला प्रकर्षाने आठवण येते. कारवार येथे प्राध्यापक बोरकरांचा जन्म झाला आणि मुंबई गाठण्यापूर्वी त्यांनी आपले शिक्षण कर्नाटकातील बेळगांव आणि धारवाड येथून पूर्ण केले. आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी मुंबई विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. प्राध्यापक सी.एन. वकील, प्राध्यापक दांतवाला आणि मुंबई विद्यापीठातील इतर निष्ठावंत प्राध्यापक बोरकरांना शिक्षक म्हणून लाभले. माझा जन्म ज्या वर्षी झाला त्याचवर्षी बोरकरांनी प्रथम श्रेणीत अर्थशास्त्र या विषयात एम.ए. ही पदवी प्राप्त केली. सार्वजनिक वित्त या क्षेत्रातील नावाजलेले प्राध्यापक डी.टी. लकडावाला यांनी प्राध्यापक बोरकरांना आचार्य पदवीसाठी विद्यार्थी म्हणून स्वीकारले. राजस्व या क्षेत्राशीच संबंधित 'सार्वजनिक वित्त आणि पूर्ण रोजगार' या विषयावरील सैद्धांतिक विवेचन बोरकर यांनी त्यांच्या पीएच.डी. प्रबंधाच्या माध्यमाने केले. सार्वजनिक वित्त या क्षेत्रातील हे संशोधन कार्य अत्यंत प्रशंसनीय ठरले. 'पूर्ण रोजगारावरील वादविवाद आणि भारतीय अर्थशास्त्रात या प्रश्नाची समर्पकता' या विषयावरील प्रा. बोरकरांच्या योगदानाची दखल लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या उर्सुला हिक्स सारख्या नावाजलेल्या प्राध्यापिकेने घेतली आणि त्यांच्या प्रबंधाची प्रशंसा केली. सुरुवातीच्या काळात डॉ. बोरकरांनी मुंबई येथील पोद्दार कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स येथे कार्य केले. मुंबईच्या सिडनॅम कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स आणि एलफिन्स्टन कॉलेज येथे अधिव्याख्याता म्हणून रुजू होऊन महाराष्ट्र शासनाच्या सेवेत प्रवेश केला. कर्नाटक

† मानद अभ्यागत प्राध्यापक, इन्स्टिट्यूट फॉर सोशल अँड इकॉनॉमिक चेंज, बेंगलोर.
आजीव सभासद क्र. : ६००, भ्रमणध्वनी : ०९८४५४३६०९६, ई-मेल : rs.kalbandi@gmail.com

कॉलेज धारवाड येथे १९५७ साली त्यांची बदली झाली आणि ते कर्नाटक विद्यापीठ, धारवाड येथील अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख झाले. आपल्या कौशल्याने आणि निष्ठेने सुरुवातीच्या टप्प्यात त्यांनी विभागाला प्रगतीपथावर आणले. योग्य प्रशिक्षण देऊन आणि मार्गदर्शन करून अव्वल दर्जाचे विद्यार्थी त्यांनी घडविले आणि देशात त्यांच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट अर्थशास्त्रज्ञ म्हणून ख्यातीदेखील प्राप्त केली. मी अत्यंत विनयपूर्वक नमूद करू इच्छितो की, मी या सर्व दिग्गजांमध्ये अपवाद होतो; परंतु माझे इतर सहकारी ज्यांनी प्रा.बोरकरांच्या तालमीत प्रावीण्य प्राप्त केले त्यांनी अर्थशास्त्र या विद्याशाखेत शिखर गाठले. कर्नाटकात ज्यांना प्रा. बोरकरांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाला ते आजदेखील तितक्याच आदराने प्रा.बोरकरांचा नामोल्लेख करतात. त्यांतील बरीच मंडळी वयाच्या सत्तरी आणि ऐंशीच्या उंबरठ्यावर पोहचली आहेत.

फेब्रुवारी १९६० मध्ये नव्याने स्थापन झालेल्या मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे अर्थशास्त्र विभागाचे पहिले प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून प्रा.बोरकर रुजू झाले. तेव्हाचे मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डोंगरकेरी यांच्या आग्रहाखातर त्यांनी औरंगाबाद आणि तेथील बाल्यावस्थेत असलेल्या विद्यापीठाची निवड केली. त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे आपली संपूर्ण कारकीर्द आपल्या प्रदेशाच्या विकासासाठी अर्पण केली. महाराष्ट्राच्या प्रादेशिक असमतोल समितीला त्यांनी सादर केलेली मतभिन्नता ही त्यांची प्रदेशाप्रति असलेली आस्था आणि मागासलेपणाबद्दलची तळमळ हे त्याचेच द्योतक आहे. पूर्णा नदीखोऱ्यावरील त्यांनी परिश्रमपूर्वक यशस्वीपणे पूर्ण केलेला संशोधन प्रकल्प भविष्यात मराठवाड्यासाठी संजीवनीच घेऊन आला असता. दुष्काळप्रवण अर्थव्यवस्थेत भूपृष्ठावरील सिंचनाचे मूलभूत तत्त्व आणि होणाऱ्या बदलांची शक्यता पडताळून पाहण्यासाठी प्रा.बोरकरांनी काटेकोरपणे केलेले हे संशोधन आजदेखील समर्पक आहे. मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेचे ते पहिले अध्यक्षदेखील होते आणि त्यांचे अध्यक्षीय भाषण अत्यंत प्रगल्भ होते. १९८० साली धुळे येथे आयोजित चौथ्या मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ते अध्यक्ष होते 'महाराष्ट्रातील आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय' हा त्यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय होता.

प्रा. बोरकर अत्यंत लोकप्रिय आणि निष्ठावंत शिक्षक होते, सर्वच विद्यार्थ्यांना त्यांची शिकविण्याची शैली आवडत असे. मी तसा फारच बेशिस्त विद्यार्थी होतो. परंतु त्यांच्या शिकविण्यामुळे मला सार्वजनिक वित्त या विषयाचा गाभा समजण्यास मदत झाली आणि मी या विषयाचा समर्पित असा विद्यार्थी झालो. खरे तर मी निकोलस कलडॉर यांच्या 'खर्चावर आधारित कर' या प्रस्तावाला अनुसरून अभ्यास करण्याचा बेत आखला होता, परंतु प्रा. बोरकरांनी गणित आणि सांख्यिकी या विषयाची माझी पार्श्वभूमी लक्षात घेऊन माझे मन वळविण्याचा प्रयत्न केला आणि मला पटवून दिले की सार्वजनिक वित्त या विषयाव्यतिरिक्त इतर कोणत्याही विषयात संशोधन कार्य करणे माझ्या दृष्टीने कसे अधिक योग्य होईल. प्रतिमानीकरण या अभ्यासपद्धतीने आजच्याप्रमाणेच तेव्हाचे तरुण फारच भारावलेले होते; परंतु प्रा. बोरकरांनी मोकळेपणाने मला सांगितले की, कोणत्याही प्रकारच्या गणितीय प्रतिमानाची मांडणी करण्यात त्यांना रुची वाटणार नाही. माझा क्षणभर विरस झाला; परंतु मी त्यांचा सल्ला असंदिग्धपणे स्वीकारला आणि सार्वजनिक वित्त हा विषय माझ्यासाठी नेहमीकरिता आवडता विषय म्हणूनच राहिला. फोरम ऑफ फ्रि

एंटरप्राईझच्या वतीने प्रकाशित होणारी नानी पालखीवालांची व्याख्याने त्यांनी मला दिली. यातून मला काही संकेत मिळाले आणि पहिल्यांदा मराठीत १९७४ च्या अर्थसंकल्पावर मी एक छोटेखानी लेखन अजंटा या स्थानिक वृत्तपत्रातून केले. औरंगाबादच्या त्या काळातील एका प्रसिद्ध वृत्तपत्राने माझ्या या लिखाणाला नकार दिला होता. माझे तीन पानी लिखाण मूल्यमापनासाठी माझे एक शिक्षक प्रा.पाध्ये यांच्याकडे गेले होते. समाजात सामाजिक बदल घडवून आणण्यात अर्थसंकल्प किती महत्त्वाचा असतो आणि हे अर्थसंकल्प कुठे अपयशी ठरतात यांवर त्यांनी मला प्रदीर्घ असे व्याख्यानच दिले. डिसेंबर १९७२ च्या शेवटच्या आठवड्यात प्रा.बोरकरांनी आम्हाला संघीय वित्तव्यवस्था शिकविली आणि जरी त्या काळातील बी.पी.आडारकर यांचे प्रसिद्ध पाठ्यपुस्तक ते संदर्भांकित करीत होते तरी या पुस्तकाच्या फार पलीकडे जाऊन प्रा. बोरकर शिकवित असत. वित्त आयोगाची भूमिका, कार्ये आणि मर्यादा अधिक चांगल्या पद्धतीने सामोरे याव्या या हेतूने त्यांनी अतिरिक्त वर्गदेखील घेतल्याचे माझ्या स्मरणात आहे. पाचव्या आणि सहाव्या आयोगासारखी उदाहरणे देत त्यांनी आम्हाला विविध वित्त आयोगाच्या कार्यपद्धतीची जाणीव करून दिली. आजदेखील त्या सर्व नोंदी मी जपून ठेवल्या आहेत, सार्वजनिक वित्त या विषयाचे ते उत्कृष्ट शिक्षक होते, अर्थशास्त्राच्या या शाखेत त्यांचा हातखंडा होता. त्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न मी सातत्याने केला; परंतु त्यात मला एका अंशही यश प्राप्त झाले असे वाटत नाही. ते वर्गात प्रवेश करून विषय शिकविण्यास प्रारंभ करीत असत आणि घंटीचा टोला वाजण्यापूर्वी बरोबर एक मिनिट अगोदर तो भाग पूर्णत्वाला नेत असत. ह्या भाषणाच्या माध्यमाने आपल्याला त्यांनी केलेल्या संशोधनाचा परिचय करून देण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

त्यांच्या संशोधनाचे विभाजन ढोबळमानाने तीन उपघटकांमध्ये करता येऊ शकेल. पहिले, त्यांचे राजस्व जे त्यांच्या अभ्यासाचे गाभा क्षेत्र होते यात त्यांनी दोन अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथांचे लेखन केले, ‘सार्वजनिक वित्त आणि पूर्ण रोजगार’ दुसरा ‘भारतातील उत्पन्न करसुधार’ हा ग्रंथ त्यांनी १९६० च्या शेवटास हार्वर्ड लॉ स्कूल केंब्रिज येथे फुलब्राईट फेलो असताना पूर्ण केला, १९७१ साली या ग्रंथाचे प्रकाशन झाले. यानंतर त्यांनी प्रा.एम.डी.पाध्ये यांच्या समवेत ‘पूर्णा नदी खोरे प्रकल्प’ यांवर क्षेत्रीय संशोधन करून मराठवाड्याच्या हितासाठी आपले लक्ष प्रादेशिक बाबींवर केंद्रित केले. जेव्हा संपूर्ण प्रदेश १९७२-७३ च्या दुष्काळाने उद्ध्वस्त झाला होता तेव्हा त्यांच्यातील प्रामाणिकतेला साद देत त्यांनी ‘मराठवाड्यातील ग्रामीण जीवनावर दुष्काळाचा प्रभाव’ या विषयावरील क्षेत्रीय संशोधनाचे कार्य माझे गुरू एम.व्ही. नाडकर्णी यांच्यासोबत हाती घेतले. मला काम करण्याची पहिली संधी या अभ्यासामुळे प्राप्त झाली हे मी माझे भाग्य समजतो. पीएच.डी. साठी नोंदणी करण्यापूर्वी अडुल आणि भडजी या दोन तीव्र दुष्काळग्रस्त खेडेगावांना मी भेट दिली. संकलित करण्यात आलेल्या समंकांकडे अत्यंत काटेकोरपणे बघण्याची सवय प्रा. बोरकरांनी आत्मसात केली होती आणि आमच्यातील काही लोकांसोबत ते क्षेत्रीय परिस्थितीबाबत चर्चादेखील करीत असत. प्रा. वि.म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रादेशिक असमतोलावर नेमण्यात आलेल्या सत्यशोधन समितीवर त्यांनी केलेल्या योगदानाची विविध स्तरांवर चांगल्याप्रकारे दखल घेण्यात आली. प्रा. दांडेकरांनी अवलंबिलेल्या संशोधन पद्धतीवर त्यांनी तीव्र आक्षेप घेतला आणि अत्यंत कडक शब्दात मतभिन्नता सादर करून वाचकांचे/

अभ्यासकांचे लक्ष वेधले. मराठवाड्यासोबत त्यांनी आपली स्वत:ची ओळख जोडली, परंतु खरे सांगायचे तर, सार्वजनिक वित्त या क्षेत्रात नावाजलेले राजा चेलैया, जे अत्यंत निष्ठावंत/थोर अर्थशास्त्रज्ञ होते. यांच्याशी डॉ. बोरकरांनी राजस्व या विषयात केलेल्या कार्याची तुलना होऊ शकते. चित्तवेधक बाब अशी की, प्रा. बोरकर यांचे सार्वजनिक वित्त आणि पूर्ण रोजगार तसेच प्रा. राजा चेलैया यांचे राष्ट्रांचे राजकोषीय धोरण या दोन्ही ग्रंथांचे ग्रंथ परीक्षण एकाच वेळी अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यूमध्ये प्रकाशित झाले. ग्रंथपरीक्षक प्रा.सी.लॉवेल हॅरिस लिहितात, 'दोन्ही खंड व्यावसायिक अर्थशास्त्रज्ञांचे प्रयत्न प्रतिबिंबित करतात ज्याचा उपयोग अँग्लो-सेक्सॉन अर्थव्यवस्थांपासून ज्या राष्ट्रांची बोली भाषा इंग्रजी आहे, अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलँड वगैरे अशा भूभागापासून तर जो भूभाग संपूर्णपणे भिन्न आहे ज्या ठिकाणी या आर्थिक संकल्पना विकसित झाल्या तेथे देखील या लागू होऊ शकतील. भारतात लागू करण्यात आलेली क्रमवर्धी कराधान पद्धत (Progressive Taxation) प्रगतीला अडथळा निर्माण करते याचा पुरावाच येथे आढळतो. भारताच्या रोजगार समस्येचे निराकरण करण्यास केन्सप्रणित रोजगार सिद्धांत फारसा उपयुक्त ठरत नाही हे या लेखकांनी शोधून काढले'. (हॅरिस, एइआर, १९६१, पृष्ठ २०८) केन्सप्रणित स्थापित सिद्धांताला पीएच.डी.प्रबंधाच्या माध्यमाने आव्हान करणे म्हणजे मर्दपणा दाखविणेच होते. प्रा. बोरकरांनी आत्मविश्वासाने हे केले. डॉ.बोरकरांच्या पीएच.डी.प्रबंधावर भाष्य करताना त्यांच्या परीक्षक प्रा. श्रीमती उर्सुला हिक्स यांनी दिलेले मत म्हणूनच आश्चर्यकारक नव्हते त्या म्हणतात, 'विकासाच्या आर्थिक प्रक्रियेचे आणि त्यांवर राजकोषीय धोरणाचे नियंत्रण याबाबतचे विश्लेषण हे या अभ्यासकाचे खरेखुरे योगदान मानावे लागेल'.

या व्याख्यानात प्रा.बोरकरांनी केलेल्या संशोधन कार्याची ओळख आणि आजच्या स्थितीत त्या संशोधनाची समर्पकता याची जोडणी करण्याचा प्रयत्न मी करणार आहे. देशातील सध्याचे वातावरण राजकीय दृष्ट्या तापलेले असून त्यापासून मी स्वत:ला दूर ठेवून शुद्ध तात्विक/विद्वत बाजू आपल्यापुढे ठेवणार आहे. प्रा. बोरकरांच्या श्रद्धेय स्मृतींना हे व्याख्यान समर्पित करताना मी विनम्रपणे आपणास सांगू इच्छितो की, प्रा.बोरकरांचे कार्य आणि आजच्या परिस्थितीशी त्या कार्याची समर्पकता दाखविणे हे अत्यंत जिकिरीचे काम आहे. माझ्या बौद्धिक क्षमतेबाबत मला जाण आहे. प्रा. बोरकरांचे कार्य समजून आपल्यासमोर मांडताना माझ्या मर्यादांची जाणीव मला आहे. हे व्याख्यान चार भागांत विभागण्यात आले आहे.

**सार्वजनिक वित्त आणि पूर्ण रोजगार**

अर्थशास्त्रातील सैद्धांतिक विषयावर संशोधन करणे हे खूप आव्हानात्मक कार्य आहे आणि गेल्या अनेक दशकात भारतातील बऱ्याच संशोधकांनी या क्षेत्रात आपले कर्तृत्व दाखविण्याची फारशी हिंमत केली नाही. प्रा.केन्स यांच्या 'जनरल थिअरी ऑफ एम्प्लॉयमेंट इन्टरेस्ट अँड मनी' ने मौद्रिक आणि समष्टी धोरण चौकटीच्या माध्यमाने रोजगाराचे व्यवस्थापन करण्याची आशा जागृत होण्याचे संकेत दिले. परंतु या सैद्धांतिक चौकटीची विकसनशील राष्ट्राच्या संदर्भात प्रत्यक्ष प्रयोज्यते (Application) विषयी कुणीही प्रश्न उपस्थित केला नव्हता तो प्रश्न डॉ.बोरकरांनी मुद्देसूद मांडला व हा त्यांच्या प्रतिपादनाचा गाभा आहे. विकसनशील राष्ट्रे अशा प्रकारच्या उत्तेजनांना प्रत्यक्षरित्या प्रतिसाद देत नाहीत. राजकोषीय धोरणातील साधनांच्या सहाय्याने अशा

अर्थव्यवस्थेत राज्यांनी महत्त्वाची भूमिका निभावल्यास पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट साध्य करणे सोयीचे होते. राजकोषीय धोरणांच्या माध्यमाने प्रत्यक्ष नियंत्रण आणण्याच्या आणि मौद्रिक धोरणांच्या काही बाबतीत मर्यादा असल्या तरी राजकोषीय साधनांच्या माध्यमाने विविध क्षेत्रांची असलेली गुंतवणुकीबाबतची मागणी पूर्ण करू शकेल. त्यामुळे राज्याचे प्रत्यक्ष नियंत्रण आणि मौद्रिक धोरण यांतील अंतर राजकोषीय धोरणांच्या सहाय्याने भरून काढण्यास मदत होऊ शकेल. विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये रोजगारीचा मुद्दा हाताळण्यास मौद्रिक धोरण पूर्णत: कार्यक्षम राहू शकणार नाही हे प्रतिपादन १९५० मधील केन्सप्रणित युक्तिवादाच्या प्रवाहाला बाजूला सारून करणे शैक्षणिक क्षेत्रात एक प्रकारचे धाडसच होते. रहस्यमय लिखाण शैलीच्या माध्यमाने सनातन पद्धती सामोरे आणण्यासाठी राजकोषीय साधनांना प्रामुख्य देऊन प्रा. बोरकरांनी एकात्मिक विश्लेषणात्मक दृष्टिकोनाची व्युत्पत्ती केली. रोजगाराबाबत सैद्धांतिक विश्लेषण विकसित आणि विकसनशील राष्ट्रांसाठी तुलनात्मक व्यासपीठावर आणण्यात प्रा.बोरकरांचे योगदान स्पृहणीय राहिले. त्यांनी केलेला युक्तिवाद केन्सवादी चौकटीत असून विकसनशील राष्ट्रांशी त्याची जोडणी करून राजकोषीय साधनांची भूमिका सामारे आणण्यात ते यशस्वी झाले. खरे तर केन्सच्या मूळ तत्त्वावर हा एक प्रकारचा आघातच होता.

केन्सवादी सिद्धांताची पुनर्रचना विकसनशील राष्ट्रांत असलेल्या परिस्थितीला अनुसरून त्याचे सामान्यीकरण करून राजकोषीय नियंत्रण आणि कार्यकारीसंबंध याचा व्यापक स्तरावर विचार व्हावा असा युक्तिवाद डॉ. बोरकर यांनी केला.

सनातन पारंपरिकतेवर भर देऊन उपभोग आणि व्याजदराच्या संदर्भात त्यांनी बेरोजगाराबाबत चर्चा करून पुढे पूर्ण रोजगारीची समर्पक व्याख्या देण्याचा प्रयत्न केला. पुस्तकाच्या चौथ्या आणि पाचव्या प्रकरणात प्रा. बोरकर प्रभावी मागणीच्या संदर्भात भाष्य करून त्याचा संबंध, 'पूर्ण रोजगाराशी' जोडतात. विकसनशील राष्ट्रांच्या संदर्भात पूर्णरोजगाराची अंतर्गत पुनर्तपासणी रोजगाराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विशेषकरून राजकोषीय धोरणांच्या व्यासपीठाचा प्रामुख्याने उपयोग करून आणि मौद्रिक धोरणांवर पूर्णपणे अवलंबून न राहता करणे असा एक प्रयत्न त्यांनी केला. विकसनशील अर्थव्यवस्थांच्या संदर्भात रोजगार आणि पूर्ण रोजगाराच्या स्थितीच्या संदर्भात ताज्या दृष्टिकोनाला प्रस्थापित करण्याची सुरुवात प्रा.बोरकरांनी केली. डॉ. व्ही.के.आर.व्ही.राव यांच्या विकसनशील राष्ट्रातील गुंतवणूक, उत्पन्न आणि गुणक या गाजलेल्या लेखात केलेल्या युक्तिवादात शिरून रोजगार आणि राजकोषीय धोरणांची साधने यांतील सहसंबंध अधोरेखित करून त्याची ओळख होणे किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी दर्शविले आणि डॉ. राव यांच्या लिखाणातील मर्यादा दर्शविल्या. पूर्ण रोजगाराच्या व्याख्येतील फसवणूक निदर्शनास आणली आणि तीक्ष्ण लिखाण करून दर्शविले की, 'पूर्ण रोजगाराची स्थिती खरी असल्याचे जरी मानले आणि मोठ्या प्रमाणावरील बेरोजगार पूर्ण रोजगारीत परिवर्तित होत असला आणि पूर्ण रोजगार ही व्याख्या विभिन्न परिस्थितीत चलनात असली तरी त्यातील विसंगती प्रतिबिंबित होतेच. पुढे ते अशी देखील मांडणी करतात की, 'या व्याख्येला विज्ञानाची सेवा करू द्यावी; परंतु या व्याख्येमुळे होणारा जुलुम त्याचा भाग होता कामा नये'! आर्थिक धोरणांच्या सहाय्याने उच्चस्तरावरील रोजगार प्राप्ती हा विकासाचा उद्देश ओळखण्याची आवश्यकता असली तरी पूर्ण रोजगाराचे ध्येय स्पष्टपणे समजणे त्यामुळे गरजेचे आहे. भारत

देशाच्या संदर्भात रोजगार आणि उत्पन्न सिद्धांतांच्या विचारसरणीच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत गोंधळ असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्यांच्या युक्तिवादाला बळकटी देण्यासाठी त्यांनी इतर अनेक लेखकांचा आधार घेतला आणि अंतिमत: या निष्कर्षाला पोहचले की, 'अभिमतपंथी रिकार्डो आणि हॅरॉड यांच्या सारख्या अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकासाच्या समस्यांबाबत फक्त प्रभावी मागणीच्या परिप्रेक्षातून मांडलेले विचार अप्रासंगिक ठरतात. उत्पादक क्षमता आणि मनुष्यबळ यांची निश्चितता झाल्याखेरीज आणि त्यांचे महत्त्व गृहीत धरल्याशिवाय आर्थिक विकासाच्या समस्यांचे निराकरण होणार नाही'.

प्रकरण ३ मध्ये पूर्ण रोजगाराच्या समस्येच्या संदर्भात चर्चा करताना विकसनशील आणि अविकसित व्यवस्थांमधील रोजगार आणि राहणीमानाच्या खर्चाच्या दोन रेखाकृतींच्या सहाय्याने पूर्णरोजगाराच्या संकल्पनेला अधिक स्पष्टता आणण्याचा प्रयत्न डॉ. बोरकरांनी केला आहे. अविकसित अर्थव्यवस्थांची परिस्थिती लक्षात घेऊन संपूर्ण चर्चेचा भर एकूण उत्पादन फल विकसित करण्यावर आढळतो आणि हे उत्पादन फल इतर विविध बाबी ध्यानात ठेवून कसे कार्यरत होईल या संदर्भातच होता. केन्सप्रणित जनरल थिअरी ऑफ एम्प्लॉयमेंट बऱ्याच विविध प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये आढळणाऱ्या विशिष्ट परिस्थितींना सामावून घेण्यास सामान्यत: पुरेशी नसते हा मुद्दा डॉ.बोरकर या अनुषंगाने समोर आणतात. त्यामुळे त्यांनी पूर्ण रोजगाराची व्याख्या करताना अशी स्थिती लक्षात घेतली की, जेव्हा श्रमिकांचा पुरवठा जे प्रादेशिक स्तरावर उपलब्ध असलेल्या दरावर काम स्वीकारण्यास इच्छुक असतात आणि हा दर त्यांच्या सीमांतिक उत्पादकतेबरोबर असतो; परंतु राहणीमानाच्या खर्चापेक्षा कमी नसतो यांची जुळवणूक श्रमिकांच्या मागणीशी होते. ज्या आधारे चांगल्या आरोग्याची हमी प्राप्त करणे शक्य होईल इतक्या न्यूनतम उत्पन्नाची प्राप्ती होणे राहणीमानाच्या खर्चात अपेक्षित आहे. अनैच्छिक बेकारीवर त्यांनी भर दिल्याचे यावरून निदर्शनास येते. यानंतर डॉ. बोरकर सार्वजनिक खर्चाचा उपयोग उच्चतम उपभोग प्रवृत्ती गाठणे, बचतीच्या माध्यमाने विनिमयन करण्यात येऊन गुंतवणुकीसाठी प्रवृत्त करणे, गुंतवणूक आणि उपभोग यांची युक्ततम पातळी गाठणे या उद्दिष्टांची पूर्ती कशारीतीने करता येईल याकडे वळतात. डॉ.बोरकर राजकोषीय धोरणांची मूळ उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे समोर आणतात. (१) व्यवस्थेमधील उत्पादित वस्तू किंवा क्षमता या बाबी सकल प्रभावी मागणीशी तदनुरूप (Corresponds) होतील याची खात्री करून घेणे. (२) उत्पादन क्षमतेनुसार रोजगार वाढीस लागेल याची खात्री व्हावी म्हणून उत्पन्नाचा घटक असलेल्या गुंतवणुकीत महत्तम प्रमाणात वाढ करणे. (३) उपभोग आणि गुंतवणुकीचा प्रवाह या व्यक्तीच्या सकल मागणीच्या घटकांना योग्य दिशा प्राप्त होण्यासाठी पूर्णक्षमतेचा खर्च करण्याची आवश्यकता आहे.

सार्वजनिक गुंतवणुकीची भूमिका आणि सार्वजनिक संसाधनांच्या माध्यमाने विविध क्षेत्रांना होणारे गुंतवणुकीचे आवंटन यावर भर देताना सकल उत्पादन फलाची वर्तणूक या घटकाचे अवलंबित्व लक्षात घ्यावे लागेल. पुढे युक्तिवाद मांडताना डॉ.बोरकर प्रभावी मागणीवर नियंत्रण, विकसनशील राष्ट्रांसाठी काय आवश्यक आहे याची कारणमीमांसा करतात. सत्कृतदर्शनी गुंतवणूक आणि बचत फलनात उपभोग अनुकूल असूनदेखील वास्तविक उत्पन्न आणि पूर्ण रोजगार साध्य करणे सहज शक्य होत नाही. अतिरिक्त उत्पादन क्षमता निर्माण करण्यासाठी सार्वजनिक गुंतवणूक आवश्यक आहे. प्रभावी रोजगार


निर्माण करण्याच्या दृष्टिने सर्वंकष राजकोषीय धोरण आणि तुटीचा खर्च हा एक महत्त्वपूर्ण युक्तिवाद डॉ. बोरकर यांनी केला आहे. राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (FRBM) या सध्याच्या कायद्याच्या संदर्भात तुटीचा वित्तपुरवठा आणि खर्च करीत असताना निर्माण झालेले सामाजिक आधिक्य यांतील संबंध बघणे आवश्यक आहे असे ते प्रतिपादित करतात. डॉ.बोरकरांनी केलेला युक्तिवाद संक्षिप्त परंतु स्पष्ट अशा स्वरूपाचा असल्याने आजच्या राजकोषीय धोरणांच्या संदर्भात त्याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. अप्रत्यक्ष कराची एकंदर राजकोषीय धोरणातील भूमिकेचा ऊहापोह करून निर्धारित उद्दिष्ट साध्य करण्यास अप्रत्यक्ष कर हे कसे परिणामकारक उपाय म्हणून ठरू शकतात हे त्यांनी दर्शविले.


प्रा.बोरकरांनी पुस्तकाचे शेवटचे प्रकरण, 'आर्थिक कल आणि भारतातील राजकोषीय धोरण' लिहिताना भारतीय अर्थव्यवस्थेची १९५०च्या सुरुवातीला असलेली वास्तविक परिस्थिती अत्यंत काळजीपूर्वक सामोरे आणली. त्यांनी केलेल्या युक्तिवादाला बळकटी यावी म्हणून त्यांनी पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांची चर्चा केली. वाढत्या कर महसुलीच्या सहाय्याने अत्यंत धीम्या गतीने वाढणारा सार्वजनिक खर्च आणि नगण्य प्रमाणात ठेवण्यात येणारी तूट अशा धोरणांचा अवलंब केल्याने विकासाची गती जलदगतीने साध्य करण्याची संधी गमवावी लागली अशी मांडणी डॉ.बोरकरांनी केली. दोन नियोजनांचा अनुभव पुढे ठेवून केन्सप्रणित सिद्धांताच्या व्यवहार्यतेचा भारताच्या संदर्भात कुठलाही पुरावा प्राप्त होत नाही असे दर्शविले. सकल मागणी आणि उपलब्ध उत्पादक क्षमता यात संतुलन प्रस्थापित करण्यावर त्यांचा भर होता. त्यामुळे अशा वस्तूंसाठी उत्पादक क्षमता आणि मनुष्यबळाची आवश्यकता या बाबी हाताळण्यासाठी गुंतवणुकीच्या दरात वाढ करणे आवश्यक आहे. प्रा. बोरकरांच्या पुस्तकावर अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यूमध्ये प्रा. लॉवेल हॅरिस जे निष्ठावंत केन्सवादी होते त्यांनी समीक्षा केली. 'लेखकाचा राजकोषीय धोरणाचा कार्यक्रम शासकीय गुंतवणुकीवर मोठ्या प्रमाणात भर देणारा आहे. संसदेतील आणि नागरी सेवांमधील शासनाची गुणवत्ता यावर ते आधारित राहील. नजीकच्या काळात विकसनशील राष्ट्रांमध्ये अशा प्रकारचे शासन मिळणे अवघड आहे', असे मत त्यांनी व्यक्त केले. भारताच्या सुदैवाने आणि समीक्षकाच्या दुर्दैवाने भारताने समस्यांवर मात करून वेगळेपण सिद्ध करून दाखविले. समस्येचा विस्तारच इतका मोठा होता की, आर्थिक साधनांचे अपयश कारणीभूत ठरूच शकले नाही. भरमसाठ लोकसंख्या, उत्पादनक्षमता, आधारभूत संरचना, करपद्धती, भाववाढीवर नियंत्रण आणण्यात येणारे अपयश यांमुळे राज्याची वाढती भूमिका आणि एकंदरीतच निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा आवाका किती मोठा राहू शकतो याची जाण जगाला असणे शक्य नाही. गेल्या सात दशकाचा आढावा घेतल्यास भारताने स्वबळावर समस्यांची परिणामकारकरित्या सोडवणूक केल्याचे निदर्शनास येते.

मुद्रास्फितीचा वाढता वेग आणि बेरोजगारी त्यासोबतच कुंठितावस्था याचा अनुभव आपण गेल्या सात दशकात अनेकदा घेतला. यांतील प्रत्येक टप्प्याला सामोरे जाताना मौद्रिक धोरणांच्या साधनांचा उपयोग करण्यात आला; परंतु अर्थसंकल्पीय राजकोषीय धोरणांच्या माध्यमाने समस्येचे निराकरण अधिक प्रभावीपणे होऊ शकले ही वस्तुस्थिती आहे. येणारी सरकारे मुद्रास्फिती आणि बेरोजगारीवर आळा बसवू शकले, परंतु काय कारण असेल ते असो ३.५% हिंदू वृद्धिदराप्रमाणे बेरोजगारी कमी करण्यात आपल्या प्रयत्नांना फारसे यश प्राप्त होऊ शकले नाही. खाजगी

क्षेत्राची वाढती भूमिका आणि व्यापारीकरण यामुळे १९९१ नंतर बेरोजगारीच्या दरात लक्षणीय घट होण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती, परंतु तसे घडले नाही. बाजारकेंद्रित दृष्टिकोनामुळे रोजगार निर्मिती झाली; परंतु अशाच ठरावीक क्षेत्रात वाढ झाली जेथे श्रमिकांची मागणी लक्षणीय स्वरूपात नव्हती, याचा परिणाम म्हणजे श्रमप्रधान क्षेत्र महत्त्वपूर्ण न राहता अनुषंगिक स्वरूपाचे राहिले. श्रमिकदलाच्या रचनेत आणि संरचनेत बाजारधिष्ठित अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल झाले. श्रमिकदलाचे मोठ्या प्रमाणात नैमित्तिकीकरण (Casualization) होऊन महिला श्रमिकांच्या भूमिकेत लक्षणीय वाढ होणे ही एक चित्तवेधक घटना घडली. परंतु हे सर्व असंघटित क्षेत्रात घडल्याने अपेक्षेनुसार कामाची सुरक्षितता प्राप्त होऊ शकली नाही. २००८च्या सुरुवातीपासून गेल्या दशकात बेरोजगारीचा दर जवळपास ४% होता यात घट होऊन २०१४ च्या सुमारास तो ३.४१% झाला; मात्र नंतरच्या काळात यात वाढ होत गेली. रोजगार निर्मितिच्या कार्यक्रमांची आखणी अर्थसंकल्पीय धोरणांच्या माध्यमाने योग्यरित्या न केल्यास येणाऱ्या काळात बेरोजगारीचा दर नजीकच्या काळात ४%चा उंबरठा पार करण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही धोक्याची सूचना लक्षात घेता येणाऱ्या अर्थसंकल्पात खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार सुरक्षित करावयाचा असल्यास या दोन्ही क्षेत्रातील गंतवणुकींना प्राधान्याने वाव देणे आवश्यक आहे. गुंतवणूक प्रवाहात वाढ करण्यास मौद्रिक धोरण यशस्वी झाले नाही आणि सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक प्रत्यक्षात मंदावली. गेल्या पाच वर्षांत रोजगार दरात वाढ करण्यास खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकी पुरेशा प्रमाणात वाढू शकल्या नाहीत. आकृतीत दर्शविल्यानुसार वृद्धिदर, मुद्रास्फिती दर आणि गंगाजळीतील वाढ यांतील संबंध अलक्षणीय स्वरूपाचा दिसतो.

मुद्रास्फितीचा दर देखील मौद्रिक धोरणाची अपरिणामकारकता दर्शविते, शेवटी धोरण चौकटीत







राजकोषीय साधनांचा अवलंब करणे भाग पडले आणि पुरवठा तसेच व्यापाराचे व्यवस्थापन करण्यास धोरणात्मक साधनांचा उपयोग करावा लागला. भारतासारख्या राष्ट्रात रोजगाराची परिस्थिती हाताळण्यास ढोबळ केन्सप्रणित चौकट यशस्वी होऊ शकणार नाही. सामान्य सिद्धांताच्या पलीकडे जाऊन राजकोषीय साधनांचा उपयोग देखील करावा लागेल. डॉ. बोरकरांनी त्यांच्या प्रबंधात याच प्रमेयाची मांडणी केली आणि त्याची प्रचिती आज येत असल्याचे जाणवते.

**भारतातील आयकर सुधार**

विद्यार्थी म्हणून मला आठवतंय सार्वजनिक वित्त या विषयाचे प्रा.बोरकर हे उत्कृष्ट शिक्षक होते.



'भारतातील आयकर सुधार' या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर त्यांनी एका ग्रंथाचे लिखाण पूर्ण केले. 'फुलब्राईट स्कॉलर' म्हणून करव्यवस्था या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत, हार्वर्ड लॉ स्कूल यु.एस.ए. येथे त्यांनी त्यांच्या या ग्रंथाचे कार्य पूर्णत्वास नेले. हार्वर्ड लॉ स्कूलच्या निष्ठावंतांसोबत त्यांनी आपल्या या शैक्षणिक कार्याबाबत चर्चा केली. प्रामुख्याने या ग्रंथाचे तीन घटकांमध्ये विभाजन करता येईल. सुरुवातीच्या भागात करपात्र ही संकल्पना स्पष्ट करून भारताच्या आयकर कायद्यात मान्य असलेल्या घसारा आणि वजा करण्यास योग्य ठरविण्यात आलेल्या बाबींची चर्चा करून व्यापारविषयक वजावटीबाबतचे विश्लेषण देऊन प्रा.बोरकरांनी ग्रंथाचा समारोप केला. सत्तरीच्या सुरुवातीच्या काळात उत्पन्न कर सुधारणाबाबत भाष्य करणे हे अद्वितीय आणि काळाच्या पलीकडील होते हे मान्यच करावे लागेल. त्याकाळात, करव्यवस्थेच्या कार्यक्षेत्रातील प्रत्यक्ष कराच्या क्रमवर्धिता किंवा परागामिता (Progressive or Repressiveness) या फक्त दोन प्रमुख अंगानेच चर्चा होत असे. राज्यांच्या दृष्टिकोनातून महसुलीचे महत्त्वाचे स्त्रोत पडताळून बघणे आवश्यक असल्याने लागोपाठ येणाऱ्या अर्थसंकल्पात प्रत्यक्ष करापासूनच संसाधने संकलित करण्यावर भर देण्यात आला. त्याचा परिणाम असा झाला की, सर्वात जास्त कर आकारणी करणारे राष्ट्र म्हणून भारताची गणना होऊ लागली. करसुधारणेबाबत गांभीर्याने लक्ष देण्यात न आल्याने प्रा. राजा चेलैया यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करण्यात येऊन प्रत्यक्ष करसुधारणेबाबत प्रयत्न करण्यात आले. त्यानंतर प्रा. पार्थसारथी शोम यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने सुचविलेले पर्याय डॉ. बोरकरांनी १९७१ साली केलेल्या विश्लेषणाशी बरेच मिळते जुळते होते.

गेल्या किमान पाच दशकापासून तरी भारतातील प्रत्यक्ष करपद्धतीत सुधार करण्याची आवश्यकता वेळोवेळी विशद करण्यात आली होती. काही वेळेला थोडे प्रयत्नदेखील करण्यात आले; परंतु सरतेशेवटी ते निष्फळच ठरले. करसुधारणेमुळे ज्यांच्यावर परिणाम होणार असा गट धोरण आखणीत सामर्थ्यवान असावा आणि त्यामुळे सुधार कार्यक्रम परिणामकारकरित्या राबविण्यात अडचण निर्माण झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. उदारीकरणाच्या उद्देशाने सुरुवातीलाच काही पावले टाकल्यानंतर लगेचच भारत सरकारने देशातील तेव्हाच्या कररचनेचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यात योग्य बदल सुचविण्यासाठी डॉ. राजा चेलैया यांच्या अध्यक्षतेखाली कर सुधार समितीचे गठन केले. परंतु यापूर्वीच १९७१ साली प्रा. बोरकरांनी सुचविलेल्या उपायांपेक्षा या समितीचे निष्कर्ष फारसे वेगळे नव्हते. विविध दरांना मर्यादित करून कर आधार सुलभ करावा आणि कर्जमाफीच्या मोजक्याच तरतुदींना मान्यता द्यावी, जेणेकरून उत्पन्नाची संकल्पना अधिक स्पष्ट होण्यास मदत होईल. प्रा. बोरकरांनी त्यांच्या पुस्तकाच्या पृष्ठ क्र. १०२-०४ वर उत्पन्नाच्या संकल्पनेचे सैद्धांतिक विवेचन करून कर सुलभीकरणाच्या आवश्यकतेला स्पष्टपणे अधोरेखित केले. इतर अनेक शिफारशींसोबत करसुधार समितीने पुढील उपाययोजना सुचविल्या: (१) कराचे दर कमी करणे आणि करविस्तार संकुचित ठेवणे (२) दुहेरी कराधान टाळण्यात यावे. (३) देशीय आणि विदेशी कंपन्यांच्या निगम कर दरातील तफावत कमी करणे. (४) भांडवली लाभकराचे सुसूत्रीकरण करणे ह्या शिफारसी आणि प्रा.बोरकरांनी त्यांच्या ग्रंथाच्या पहिल्या भागात केलेले लिखाण यात साम्य असल्याचे आढळते. कर सवलतीबाबत ते फारच चिकित्सक होते आणि संपत्तीच्याबाबत

घसाऱ्यावर देण्यात येणाऱ्या सुटीवर त्यांचा आक्षेप होता, विशेषत: अवलंबिण्यात येत असलेल्या पद्धतीवर आणि भारताच्या संदर्भात व्यावहारिक अडचणींबाबत त्यांनी भाष्य केले होते. संसाधनांना सुसज्ज करून त्यात वाढ करणे आणि महसुलाची उद्वर्धनशीलता (Buoyancy) वाढेल याची खात्री करून घेणे आणि त्यासोबतच करप्रणालीत नियमबाह्य तसेच विपर्यास होण्याची शक्यता असणाऱ्या काही बाबी असल्यास त्या बाजूला सारणे ही भारतातील करसुधार उपायांची उद्दिष्ट्ये आहेत. या दिशेने करण्यात आलेल्या प्रयत्नांना मात्र यश प्राप्त झाले असे म्हणता येत नाही. सुधार कार्यक्रमांतर्गत अंमलात आणलेल्या उपाययोजनांची परिणती करसकल घरेलू उत्पादनाच्या प्रमाण वाढीत प्रतिबिंबित होणे अपेक्षित होते; परंतु नाट्यमयरित्या यात बदल झाल्याचे आढळले नाही. आघाडी सरकारने (UPA) प्रत्यक्ष कर कायद्याचे पुनरावलोकन करून प्रत्यक्ष कर नियमांना अंतिम स्वरूप दिले. नुकत्याच गठीत करण्यात आलेल्या समितीचे प्रमुख म्हणून डॉ. अरबिंद मोदी यांची निवड योग्यच आहे. प्रत्यक्ष कर पद्धतीची ही समिती नव्याने पाहणी करेल. २००९ मध्ये तयार करण्यात आलेल्या प्रत्यक्ष कर नियमावली तयार करण्याच्या मागे अरबिंद मोदीच होते. दुर्दैवाने लोकसभेत ते पारित होऊ शकले नाही. या दस्तऐवजात विचारार्थ मांडण्यात आलेल्या मुद्द्यांचा पुनरुच्चार होणे आवश्यक आहे. २०१० मध्ये लोकसभेत प्रत्यक्ष कर नियमावली बील मांडण्यात आले; परंतु १५ वी लोकसभा विसर्जित झाल्याने हे बील रद्द झाले. पाठोपाठ नंतरच्या शासनकाळात डॉ.अरविंद सुब्रमण्यम यांनी अहवाल दिला आणि असे नमूद केले की, 'डॉ. अरबिंद मोदी यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष करसमितीचे गठन करण्यात आले आहे'. या समितीत त्यांना सर्वप्रकारच्या प्रत्यक्ष करात सुधार कसा करण्यात यावा, याबाबत शिफारस करण्यास आमंत्रित करण्यात आले होते. कुणीतरी अगदी योग्यच विधान केले आहे. 'नंतरच्या पिढीतील सुधार हे नंतर येणाऱ्या पिढीवर सोपविले जातात.' विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचा प्रवास असाच वडील यशवंत सिन्हा ते मुलगा जयंत सिन्हा असा झाला. विवाद्य वस्तू आणि सेवा कर सर्वप्रथम २००४ मध्ये मांडण्यात आला, घटनादुरुस्ती २०१६ साली झाली आणि त्याचे रूपांतर कायद्यात झाले. जेव्हा आवश्यकता वाटेल तेव्हा सतत जुळवणूक करवून घेण्यासाठी वेळोवेळी दुरुस्ती करून प्रत्यक्ष अंमलबजावणी २०१७ मध्ये झाली. अशी तात्पुरती उपाययोजना प्रा. बोरकर यांना चिंताजनक वाटत होती आणि ते व्यवसायाच्या वजाबाकी आणि गुणग्राहकतेबाबत भाष्य करीत असत. त्यांच्या मते, पारदर्शक प्रत्यक्ष करनियम-निर्बंध तीन मार्गाने उपयुक्त ठरू शकतात. आंतरराष्ट्रीय तुलनेत किरकोळ सूट देण्यात आल्याने व्यवहारातील कार्यक्षमतेत सुधार होऊन अर्थव्यवस्था अधिकाधिक स्पर्धात्मक होण्यास सहाय्यभूत ठरू शकेल. दुसरे उत्पन्न करदात्यांच्या संख्येत वाढ झाल्यास भारतीय सामाजिक मित्रत्वात बदल देखील घडू शकतो. तिसरे वस्तू आणि सेवा कर दरात घट होऊन राजकोषीय प्रशस्तपणा निर्माण झाल्यास गरीबांवरील कराचा बोजा कमी होण्यास मदत होऊ शकते.

प्रत्यक्ष कराच्या संदर्भात सध्याचा अनुभव चित्तवेधक आहे. विमुद्रीकरणाचे ऐतिहासिक पाऊल उचलल्यानंतर महसुलात मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. प्रत्यक्षात जे घडलं ते पुढीलप्रमाणे:

सी.बी.डी.टी. सांख्यिकीनुसार (२० ऑक्टोबर, २०१८), गत तीन वर्षात प्रत्यक्ष करसकल घरेलू उत्पादन प्रमाणात सातत्याने वृद्धी होत असून २०१७-

**तक्ता क्र.१: प्रवर्गानुसार भरण्यात आलेले विवरण** (Returns Filed by categories)

| **Category** | **FY 2013-14** | **FY 2014-15** | **FY 2015-16** | **FY 2016-17** | **FY 2017-18** | **CAGR** |
|---|---|---|---|---|---|---|
| AOP | 1,01,290 | 1,06,848 | 1,47,693 | 1,62,455 | 2,07,218 | 26% |
| BOI | 4,283 | 4,178 | 5,556 | 5,546 | 6,963 | 17% |
| Company | 7,15,013 | 7,53,514 | 7,80,470 | 8,03,962 | 9,42,821 | 7.5% |
| FIRM | 9,60,678 | 9,92,192 | 11,10,823 | 11,81,296 | 13,93,762 | 10.25% |
| Govt. | 10 | 35 | 75 | 108 | 238 | 560% |
| HUF | 9,55,504 | 9,66,554 | 10,42,561 | 11,60,871 | 12,86,075 | 9% |
| AJP | 8,654 | 8,786 | 10,384 | 10,889 | 11,440 | 8.75% |
| Local Authority | 2,818 | 2,631 | 3,396 | 3,480 | 3,957 | 10% |
| Indicidual | 3,50,44,548 | 3,74,10,677 | 4,29,27,250 | 5,21,16,096 | 6,43,88,028 | 21% |
| AOP (Trust) | 1,83,756 | 1,88,199 | 2,75,837 | 2,64,383 | 2,92,008 | 15% |
| Total | 3,79,76,554 | 4,04,33,614 | 4,63,04,045 | 5,57,09,086 | 6,85,32,510 | 20.50% |

Note : AOP: Association of Persons (व्यक्तिंच्या संस्था) BOI: Body of Individuals (व्यक्तिंचा समूह), HUF: Hindu Undivided Family (हिंदू अविभक्त कुटंब), AJP: Artificial Juridical Person (कृत्रिम न्यायालयीन व्यक्ती), CAGR- Compound Annual Rate of Growth (संयुक्त वार्षिक वृद्धिदर)

Source : CBDT Statistics, 2018

१८ या वित्तीय वर्षातील ५.९८% हे प्रमाण गेल्या १० वर्षातील सर्वात उत्कृष्ट प्रत्यक्ष कर-सकल घरेलू उत्पादन प्रमाण असल्याचे आढळून आले. गेल्या चार वित्तीय वर्षात विवरणपत्र सादर करणाऱ्यांच्या संख्येतदेखील वाढ झाली. वित्तीय वर्ष २०१३-१४ (आधार वर्ष) साली ३.७९ कोटी असलेली संख्या २०१७-१८ साली ६.८५कोटीपर्यंत वाढली. याच कालावधीत विवरण सादर करणाऱ्या व्यक्तींच्या संख्येतदेखील वाढ होऊन २०१३-१४ साली ३.३१ कोटी असलेली ही संख्या २०१७-१८ साली ५.४४ कोटी झाली. गेल्या तीन निर्धारण वर्षात सर्व प्रकारच्या वर्गवारीतील करदात्यांनी त्यांनी सादर केलेल्या विवरणपत्रात नमूद केलेल्या उत्पन्नाच्या रकमेत देखील सातत्याने वाढ होत असल्याचे दिसते. वित्तीय वर्ष २०१३-१४ (आधार वर्ष)च्या संबंधात २०१४-१५ या वित्तीय वर्षासाठी विवरण सादरकर्त्यांनी एकूण सकल उत्पन्न रु.२६.९२ लाख कोटी इतके घोषित केले होते, यात वाढ होऊन निर्धारण वर्ष २०१७-१८ या वर्षासाठी ही रक्कम रु. ४४.८८ लाख कोटी इतकी होऊन यात साधारणपणे ६७%ने वाढ झाली. शासनाने विविध वैधानिक आणि प्रशासकीय उपाययोजना अंमलात आणल्याने कायद्याचे पालन योग्यरित्या होत असल्यामुळे आणि यासोबतच कर बुडवणाऱ्यांवर परिणामकारक कार्यवाहीचे उपाय अंमलात आणल्याने घोषित रकमेत वाढ झाल्याचे दिसते.

कर कायद्यात बदल करावयाचे झाल्यास, पारदर्शकता आणि करातील सुलभीकरण या बाबी ध्यानात ठेवून संपूर्ण व्यवस्थेत सुधार करताना कर कायद्यात अशा प्रकारचे बदल करणे आवश्यक असल्याचे संकेत प्रा. बोरकर यांनी दिले होते. अर्थशून्य सूट टाळण्यात यावी याबाबत ते फार जागरूक होते. सूट द्यायचीच झाल्यास त्याची पद्धत सुलभ आणि

समजण्यालायक असावी, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

**आकलन-दुष्काळाच्या परिणामाचे**

प्रा.बोरकर १९६० साली औरंगाबादला स्थानांतरित झाले आणि नव्याने स्थापन झालेल्या मराठवाडा विद्यापीठात अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख म्हणून रुजू झाले. सुरुवातीच्या काळात त्यांनी डॉ.एम.डी.पाध्ये यांच्यासोबत पूर्णा नदीखोरे प्रकल्पाची आर्थिक बाजू समजून घेण्याच्या दृष्टिने अभ्यास करण्यास सुरुवात केली. यात मराठवाड्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे आकलन होणे हा प्रमुख उद्देश होता. सिंचनासाठी पाण्याची सोय उपलब्ध झाल्यास मराठवाड्यातील दुष्काळप्रवण भूदृश्य (Landscape) कसे बदलू शकेल हे बघण्याचा प्रयत्न त्यांनी केला. हा अभ्यास बऱ्यापैकी विस्तृत स्वरूपाचा होता आणि आजच्या चर्चेला अनुसरून असे तीन महत्त्वाचे पैलू या अभ्यासाच्या माध्यमाने समोर आले. पहिला, पाण्याचा निम्नप्रवाह असलेल्या प्रकल्प क्षेत्राच्या तुलनेत पाणलोट क्षेत्राच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय फरक असतो. वर प्रवाहातील लाभधारकांना सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता अल्पप्रमाणात मिळते. मात्र निम्नप्रवाहातील लाभधारकांना प्राप्त होणारा सिंचनाचा लाभ अधिक असतो. दुसरा, सिंचन प्रकल्पाच्या लाभ धारकांना पूर्वनिर्धारित पीकरचनेचा अवलंब करण्यास भाग पाडता येत नाही. जमिनीचा हिस्सा अधिकाधिक प्राप्त करण्यास आणि रोख पिके घेण्यास शेतकरी प्राधान्य देतात. तिसरा, प्रकल्पाची उभारणी करण्यापूर्वी किंवा किमान प्रकल्पासोबतच इतर सहाय्यक आधारभूत संरचना विकसित करणे आवश्यक असते. प्रकल्पाच्या क्षेत्रांतर्गत आधारभूत संरचना विकसित झाल्यास आर्थिक लाभ अधिक जोमाने पसरण्यास मदत होऊ शकते आणि विकासाचे उत्प्रेरक (Catalyst) म्हणून देखील अशी रचना कार्य करू शकेल. सर्वंकषपणे विचार केल्यास हा संपूर्ण अहवाल पारंपरिक सर्वेक्षण दस्तऐवजाच्या स्वरूपात असून विश्लेषणात्मकतेपेक्षा वर्णनात्मक अधिक असल्याचे आढळून येते.

प्रा.बोरकरांच्या लेखणीतून आणि संशोधनातून त्यांची मराठवाड्याप्रति असलेली आपुलकी नेहमीच स्पष्टपणे व्यक्त होत असे. १९७२-७३च्या जनजीवन उद्ध्वस्त करणाऱ्या अवर्षणाला प्रतिसाद म्हणून त्यांनी प्रा. एम.व्ही.नाडकर्णी यांच्यासोबत मराठवाडा प्रदेशात दुष्काळाचा प्रभाव समजून घेण्याच्या दृष्टिने अभ्यास करण्याचे ठरविले. सुदैवाने संशोधन अन्वेषक म्हणून या अभ्यासात सामील होण्याची संधी मला प्राप्त झाली आणि अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या दोन खेडेगावात राहण्याची संधी प्राप्त झाली. अत्यंत जाणीवपूर्वक निवडण्यात आलेली दोन खेडी अडूल आणि भाडजी चित्तवेधक विरोधाभास दर्शवित होते. अडूल हे अधिक मोठे खेडेगाव होते तर भटजी हे फक्त ८०१ (१९७१) लोकसंख्या असलेले तुलनात्मकदृष्ट्या लहान असे खेडेगाव होते. अडूल हे भटजीच्या तुलनेत अधिक विकसित, चांगली पायाभूत संरचना आणि विपणनाची सोय उपलब्ध असलेले गाव होते. पायाभूत संरचना, संकटांना यशस्वी लढा देण्यास समर्थ ठरू शकतात हे गृहितकृत्य या संशोधनात अंगभूत होते. दुष्काळाचा परिणाम बघणारा हा अभ्यास चांगलाच चित्तवेधक होता. दुष्काळाच्या वेदना किती तीव्र असू शकतात याचा प्रत्यक्ष अनुभव मला या अभ्यासामुळे प्राप्त झाला. दोन्ही खेडेगावांमध्ये संपत्तीची घसरण लक्षणीय स्वरूपाची झाली आणि एकूण पशुधन २९%पर्यंत आले. ७१%ने पशुधनात घट झाल्याची नोंद करण्यात आली आहे. चाऱ्याची उपलब्धता नसल्याने बरीच जनावरे मृत्युमुखी पडलीत तर काहींची इतर प्रदेशात विक्रीदेखील करण्यात आली.

कृषी श्रमिक, लहान आणि मध्यम शेतकरी हे सर्वात अधिक दुष्काळाने पीडित झाले होते. अशा आपत्तीत शेतकरी आणि विशेष करीन दुर्बल घटक यांच्या संरक्षणासाठी दुष्काळी कामे अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात. दुष्काळी कामांच्या दरम्यान गोरगरिबांना एक वेळेचा पौष्टिक आहारदेखील देण्यात आला; परंतु यात भुरट्या चोऱ्यादेखील होत असत. १९७२-७३ च्या दुष्काळानंतर महाराष्ट्र राज्यात रोजगार हमी योजना अवलंबिण्यात आली. ही योजना म्हणजे मनरेगाची जननीच आहे, हे देखील विसरून चालणार नाही. अवर्षण-प्रवण क्षेत्रात दुष्काळाचा सहज परिणाम होऊ शकेल अशा वर्गाला संरक्षण देण्याच्या दृष्टीने ही योजना बऱ्यापैकी परिणामकारक ठरली. बोरकर आणि नाडकर्णी (१९७५) यांच्या अभ्यासामुळे हे तथ्य सामोरे येण्यास मदतच झाली. त्या काळात पाण्याची ने-आण टँकरद्वारे होत नसे तर बैलगाड्यांवर मोठी टाकी ठेवून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत असे. पायाभूत सुविधांची कोंडी निर्माण झाल्यास ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दुष्काळाच्या संकटावर मात करता येणार नाही. ही बाब अत्यंत जोरकसपणे या दोन्ही अभ्यासकांनी अधोरेखित केली. ग्रामीण रोजगार कार्यक्रम उत्पन्नाला पूरक म्हणून सहाय्यक ठरू शकतात; परंतु कृषी, श्रमिक आणि सीमांतिक शेतकरी हे राज्य शासनाच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करणाऱ्यांच्या दयेवर किंवा गावातील मोठे शेतकरी आणि व्यापारी यांच्यावरच अवलंबून राहणार. या अधिरोधाला (Embargo) पर्याय शोधणे आवश्यक असल्याचे या अभ्यासातून प्रतिपादित होते.

**मराठवाड्याचा विकास**

प्रा.वि.म.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या प्रादेशिक असमतोल सत्यशोध समितीचे प्रा. बोरकर सदस्य होते. या अहवालाच्या शेवटी मतभिन्नता दर्शविणारी काही टिपणे आढळतात. प्रा.बोरकर आणि डॉ. भुजंगराव कुळकर्णी यांनी एक विस्तृत टिपण लिहून आपले भिन्न मत नोंदविले. अहवालातील संशोधन पद्धतीलाच त्यांनी आव्हान दिले आणि अंतिमत: मागासलेपणाची झळ लहान भौगोलिक प्रघटकापेक्षा प्रदेशाला अधिक जास्त प्रमाणात पोहचते यावर त्यांनी भर दिला. मागास प्रदेशांना समितीने स्वीकारलेल्या दृष्टिकोनाचा लाभ प्राप्त होणार नाही आणि विशेष करून ठाण्यासारख्या जिल्ह्यांना अनुशेषातून बाहेर काढण्यासाठी भरमसाठ निधी लागेल असा युक्तिवाद मतभिन्नता नोंदविताना प्रा.बोरकरांनी केला. राज्यात यानंतर बराच वाद प्रादेशिक असमतोलाबाबत झाला, परंतु मागासलेल्या प्रदेशाचे प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात २०१३ पर्यंत लक्षणीय उपाययोजना अमलात आल्या नाही. सरतेशेवटी तीच उद्दिष्ट्ये कायम ठेवून डॉ.केळकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने समितीचे गठन करण्यात आले.

**आकलनशक्ती आणि अलौकिक बुद्धी**

प्रा. विष्णू विनायक बोरकर हे आपले काम अत्यंत प्रामाणिकपणे आणि चोखपणे पूर्णत्वाला नेणारे निष्ठावंत संशोधक होते. अर्थशास्त्राशी निगडित आणि विशेषत: सैद्धांतिक विषयाशी झुंजण्याची त्यांची आगळीवेगळी शैली होती. आवश्यक वाटल्यास प्रायोगिक तत्त्वाचा वापर करणे त्यांनी सहजपणे स्वीकारले होते. सैद्धांतिक मांडणी ते अत्यंत प्रभावीपणे करीत असत, परंतु क्षेत्रीय परिस्थितीनुसार सैद्धांतिक रचनेत आवश्यक वाटल्यास बदल करण्याची क्षमतादेखील त्यांची होती. त्यांची भारतीय परिस्थितीबाबतची जाण अद्वितीय होती. भारतीय परिस्थितीबाबत त्यांची आगळीवेगळी असलेली समज

'सार्वजनिक वित्त आणि पूर्ण रोजगार' या त्यांच्या सैद्धांतिक प्रबंधात पुरेशा प्रमाणात प्रतिबिंबित होते; परंतु पाश्चिमात्य राष्ट्रात सत्य मानण्यात आलेल्या स्थापित सिद्धांताला आव्हान देताना विकसनशील अर्थव्यवस्थांना हा सिद्धांत लागू करण्याच्या दृष्टिने केन्सवादी सिद्धांतात बदल करण्याच्या आवश्यकतेवर सतर्कता बाळगून त्यांनी सावधपणे भरदेखील दिला. बऱ्याच केन्सवाद्यांना ही त्यांची भूमिका पटली नसावी आणि त्यामुळे कदाचित विकसनशील राष्ट्रांना लागू होऊ शकणारा पूर्ण रोजगाराचा नवा सिद्धांत वर्ग खोल्यांचा उंबरठा ओलांडू शकला नाही. आमच्या वर्गात त्यांनी याचा जेव्हा उल्लेख केला तेव्हा ते नेहमीच सावधगिरीच्या स्वरात आम्हाला हा सिद्धांत अधिक जाणीवपूर्वक वाचन करूनच समजून घेण्यास सांगत असत. पूर्ण रोजगार आणि सार्वजनिक वित्त यावरील प्रबंधाचे वाचन करण्याऐवजी आम्ही इतर कार्यात जास्त गुंतत गेलो त्यामुळे अर्थशास्त्राच्या या क्षेत्राकडे काही प्रमाणात दुर्लक्षच झाले. पूर्णा नदीखोरे प्रकल्प किंवा मराठवाड्यातील दुष्काळाचा प्रभाव या सर्वेक्षणाच्या अनुभवाधिष्ठित विश्लेषणातून सांख्यिकीय आकडेवारी, विश्लेषणात्मक अवगाहन शक्ती (Analytical Insights) प्राप्त होते, परंतु गृहितकृत्य लक्षात घेतल्यास मतितार्थ हाच निघतो की, विशेषत: मागास प्रदेशासाठी विकासाचे गमक पायाभूत रचनाच आहे. विकासप्रक्रिया आरंभ करण्यापूर्वी पायाभूत रचनेवरच भर देणे आवश्यक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. एक शिक्षक म्हणून ते कमालीचे निष्ठावंत आणि प्रत्येक मुद्दा स्पष्ट केल्याशिवाय, विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केल्याखेरीज ते वर्ग सोडून जात नसत. आम्ही निष्ठावंत आणि परिपूर्ण संशोधक अशी व्यक्ती डॉ. बोरकरांच्या रूपात बघितली. अल्पशा प्रयत्नाने साकारलेला हा माझा लेख मी विद्यानिष्ठ प्रतिभावंत डॉ.बोरकर यांच्या स्मृतीला समर्पित करतो.

**संदर्भ सूची**


1. Borkar, V. V. (1959). Public Finance and Full Employment, University on Bombay, Bombay.
2. Borkar, V. V. (1971). Income Tax Reforms in India, Popular Prakashan, Bombay.
3. Borkar, V. V. and M. D. Padhye (1966). Purna River Valley Project, Marathwada University, Aurangabad.
4. Borkar V. V. and Nadkarni M. V. (1975). Impact of Drought on Rural Life, Popular Prakashan, Bombay.
5. Harriss, Lowel C. (1961). Review of Public Finance and Full Employment, in American Economic Review, Vol 51, No 1.
6. Kalyankar, G. S. (1986). Current Economic Issues in India's Economic Development,Essays in the Honour of Dr V. V. Borkar, Marathwada Economic Association, Aurangabad.
7. Staelin, Charles P. (1972). Review of the book Income Tax Reforms in India, The Journal of Asian Studies. Vo 31, no 2.


◆

सामाजिक प्रगतीशिवाय आर्थिक वाढीमुळे बहुतांशी लोक गरीब राहातात, तर काही खाजगी लोकांना विपुलतेचा फायदा होतो.

**- केनेडी**

# जागतिकीकरणाचा बदलता प्रवाह

**अविनाश कुलकर्णी** †

**प्रस्तावना**

१८ व्या शतकातील ॲडम स्मिथ असो वा डेव्हिड रिकार्डो अथवा २०व्या शतकातील आर्थर डंकेल, मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापारातील अडथळे दूर करून आर्थिक वृद्धी आणि विकास साधण्याचे समर्थन वेळोवेळी करण्यात आले. खरे तर दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातच मुक्त व्यापार या विषयावर वेळोवेळी जागतिक परिषदांमध्ये चर्चा करण्यात आली. या काळात सर्वप्रथम १९४७ साली स्वित्झर्लंड येथील जिनिव्हा येथे झालेल्या परिषदेस २३ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते तर दुसऱ्या बाजूस जगातील अनेक देश वसाहतवादी साम्राज्यवादातून मुक्त झालेले नव्हते. त्यामुळे अशा मुक्त व्यापाराच्या चर्चेत त्यांचा सहभाग नव्हता. परंतु त्यानंतरच्या काळात जगातील विशेषत: आशिया आणि अफ्रिका खंडातील अनेक वसाहतींना स्वातंत्र्य मिळून स्वतंत्र देश अस्तित्वात आले. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सीमा आणि निर्बंधही अस्तित्वात आले. त्यातूनच मुक्त व्यापाराची मूळ कल्पना जोर धरू लागली. वेळोवेळी झालेल्या चर्चा सफल होत नाही हे पाहून आर्थर डंकेल यांनी एक प्रस्ताव चर्चेसाठी ठेवला (१९९१) त्यास डंकेल प्रस्ताव (Dunkel Draft) या नावाने ओळखले जाते. त्यानंतर जागतिकीकरणाच्या व उदारीकरणाच्या प्रक्रियेला गती आणि दिशा प्राप्त झाली. जगातील काही देशांनी ही प्रक्रिया स्वेच्छेने स्वीकारली तर काही देशांनी आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्या दबावाखाली स्वीकारली. असे असले तरीही आंतरराष्ट्रीय व्यापार निर्बंधात्मक असावा की, अनिर्बंध असावा हा विषय वादातीतच राहिला म्हणूनच २१ व्या शतकाच्या पूर्वाधातही त्यावरील चर्चेच्या फेऱ्या पुढे चालूच राहिल्या त्यातील काही यशस्वी झाल्या तर काही अयशस्वी ठरल्या. थोडक्यात, जागतिकीकरणाच्या वृद्धी आणि विकासामध्ये अडथळे निर्माण झाले. त्याचा विवेचनात्मक आणि विश्लेषणात्मक आढावा या शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न पुढीलप्रमाणे-

**शोधनिबंधाचा हेतू व उद्दिष्ट्ये**

खरे तर जागतिकीकरणाच्या मूळ संकल्पनेतच त्याविरुद्धच्या स्थानिकीकरणाची अथवा प्रादेशिकीकरणाची बीजे दडलेली आहेत.

† संशोधक विद्यार्थी, पाषाण, पुणे.
आजीव सभासद क्र. : १५२५, भ्रमणध्वनी : ९८२२२०३१८७, ई-मेल : dravikul@gmail.com

जागतिकीकरणाच्या फायद्यांबरोबरच काही मर्यादा व तोटे हे प्रादेशिक अस्मितेशी निगडित होते आणि आहेत. हीच प्रादेशिक अस्मितेची जाणीव आणि सार्वभौमत्व संरक्षणाची भावना जागतिकीकरणास पुन्हा अ-जागतिकीकरणाकडे (De-globalisation) वळण घेणारी ठरली. जागतिकीकरण आणि अ-जागतिकीकरणाच्या या महत्त्वपूर्ण पैलूंवर प्रकाश टाकण्याच्या प्रमुख हेतूने या शोधनिबंधाची मांडणी करण्यात आली आहे तर जागतिकीकरणाच्या संकल्पनेत दडलेला मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार आणि त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडणे, त्याच्या परिणामांची मीमांसा करणे आणि जागतिकीकरणाच्या यशापयशाची चर्चा करणे ही या शोधनिबंधाची इतर उद्दिष्ट्ये आहेत.

**गृहीतक**

सामान्यत: आर्थिक प्रगती आणि विकास साधणे ही मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे जी त्यास धोका पत्करून व्यापारवृद्धीसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरही प्रोत्साहित करते. त्याचबरोबर व्यापारातील फायदेशीर असमतोल वर्चस्ववादी विचारांना ताकद देतो तर दुसऱ्या बाजूस व्यापारातील नुकसानकारक असमतोल प्रादेशिक अस्मितेची जाणीव निर्माण करतो. त्यातूनच आंतरराष्ट्रीय व्यापाराचा संकोच होतो. त्यामुळे जागतिकीकरण (Globalisation) आणि अ-जागतिकीकरण (De-Globalisation) ही प्रक्रिया चक्रीय पद्धतीने चालू राहते.

**शोधनिबंधाची पद्धती**

या शोधनिबंधाची मांडणी करण्यासाठी ऐतिहासिक दृष्टिकोनाचा उपयोग करण्यात आला आहे. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय व्यापारातील असमतोल हा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनही महत्त्वाचा भाग आहे. त्यातूनच निर्माण होणारे आर्थिक वर्चस्ववादासारखे प्रश्न, सामरिक सुरक्षितता आणि प्रादेशिक अस्मिता यांचाही स्पर्श या शोधनिबंधात आहे. त्यामुळे या शोधनिबंधाची मांडणी विवेचनात्मक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक अशा विविध पद्धतींवर आधारित आहे.

**सैद्धांतिक व संकल्पनात्मक पार्श्वभूमी**

या शोधनिबंधास डेव्हिड रिकार्डो यांच्या तुलनात्मक लाभ सिद्धांताची अथवा संकल्पनेची पार्श्वभूमी आहे. त्याचबरोबर या शोधनिबंधात जागतिकीकरण, अ-जागतिकीकरण, व्यापार समतोल, आर्थिक साम्राज्यवाद/वर्चस्ववाद, संरक्षणनीति (Protectionism) अशा विविध संकल्पनांची पार्श्वभूमी या शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आणि रूपरेषा मांडण्यासाठी वापरली आहे.

**संकल्पनांचा अर्थ**

हा शोधनिबंध मुख्यत्वे आंतरराष्ट्रीय व्यापारातील घडामोडी आणि त्याचे परिणाम यावर आधारित आहे. त्यामुळे या शोधनिबंधात मांडलेल्या संकल्पनांचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे-

(अ) जागतिकीकरण - याचा सर्वसाधारण अर्थ आंतरराष्ट्रीय व्यापारातील घडामोडी आणि परिणाम असा घेतला आहे. (ब) अ-जागतिकीकरण - याचा सर्वसाधारण अर्थ आंतरराष्ट्रीय व्यापारातून स्थानिक वस्तूंच्या व्यापारावर भर असा घेतला आहे. (क) स्थानिकीकरण किंवा प्रादेशिकीकरण - याचा सर्वसाधारण अर्थ स्थानिक किंवा प्रादेशिक उत्पादने, उद्योग या दृष्टिकोनातून घेतला आहे.

**शोधनिबंधाची मर्यादा**

हा शोधनिबंध तथ्य संकलनाच्या दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे. यामध्ये पुस्तके, नियतकालिके आणि इंटरनेटवरील उपलब्ध माहितीचा समावेश आहे. तसेच यामध्ये विषयाच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय व्यापारातील निवडक घडामोडींचाच आधार घेतलेला

आहे ही या शोधनिबंधाची मर्यादा आहे.

**आंतरराष्ट्रीय व्यापाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

प्राचीन काळापासून भारताच्या मुख्य भूमीचा जवळपासच्या इतर राज्यांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार होत असल्याचे ऐतिहासिक दाखले मिळतात. पुरातत्त्व अभ्यासकांना (Archaeologists) त्यांनी केलेल्या विविध ठिकाणच्या उत्खननामध्ये (Excavations) भारताचे ग्रीस, अरब देश, जर्मनी, चीन, जपान, जावा इ. देशांशी व्यापारी संबंध असल्याचे आढळून आले आहे. भारताच्या तत्कालीन समृद्धीचे ते एक मूलभूत कारण होते. या आंतरराष्ट्रीय व्यापारात सुवासिक अत्तरे, मसाले, धातूंची भांडी, सुती कपडे इ.चा समावेश होता. या वस्तूंना विशेषत: इराण, इजिप्त, रोम आणि ग्रीस या देशांमध्ये अधिक मागणी होती. या आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ व्हावी म्हणून भारताने थायलंड (Siam), मलेशिया, इंडोनेशिया, जावा इ. देशांबरोबर संबंध आणि गुंतवणूक विस्तृत केली. हा आंतरराष्ट्रीय व्यापार जमिनी आणि सागरी मार्गे होत असल्याचे दिसून येते. या काळातील आंतरराष्ट्रीय व्यापार तोल हा भारतासाठी अनुकूल होता. भारताची निर्यात आयातीपेक्षा अधिक होती.

मौर्य साम्राज्यकाळात भारत आणि रोममधील दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा संख्यात्मक व्यापार मोठा होता. यात चैनीच्या वस्तूंचाही समावेश होता. भारताकडून मसाले, मोती व मौल्यवान खडे/रत्ने दक्षिण भारतातून, तर मलमल दक्षिण व मध्य भारतातून रोम येथे आयात केली जात. पोलादची भांडी आणि इतर वस्तूही रोमला निर्यात केल्या जात. चीन आणि मध्य आशियातून आणलेल्या काही वस्तूसुद्धा रोमला निर्यात केल्या जात. परंतु चीन आणि रोममध्ये रेशीमचा अफगाणिस्तानमार्गे एक परस्पर व्यापार मार्गही होता.

परंतु या व्यापारातूनच वर्चस्ववादी विचार आणि त्याचे समर्थक यांनी जगातील समृद्ध देशांवर आक्रमण केल्याचे दाखलेसुद्धा इतिहासात सापडतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे निर्माण होऊन त्याचा संकोच झाल्याचेसुद्धा आढळून येते. असे असले तरी आर्थिक विकास आणि स्वत:चा विकास साधणे ही मानवी प्रवृत्ती प्रत्येक काळातील मनुष्यास धोका पत्करून व्यापार वृद्धीस प्रोत्साहित करत होती. त्यातूनच आंतरराष्ट्रीय व्यापाराची दिशा आणि दशा काळानुरूप बदलत गेली.

मध्ययुगीन काळातील मुघल साम्राज्यात भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील घटक बदलले. त्यामध्ये खाद्यपदार्थ उदा. साखर, भात इ.चा समावेश होता. तसेच हा व्यापार शेजारील राज्यामध्ये होई. तसेच दक्षिण आणि पश्चिम आशिया देशातील व्यापारात सुती कापडाची महत्त्वाची भूमिका होती. त्याकाळी या व्यापारी वाहतुकीसाठी अनेक नैसर्गिक बंदरे होती. याच मध्ययुगीन काळात राजा छत्रपती शिवाजींचे धोरण मात्र सावधगिरीचे होते. कारण बऱ्याच विदेशी व्यापाऱ्यांचा उद्देश फक्त व्यापारापुरताच मर्यादित नव्हता. त्याकाळी कोकण भागात अनेक मिठागरे होती आणि बरेच लोक मीठ उत्पादनात गुंतलेले होते. परंतु उत्तम गुणवत्ता आणि स्वस्त किंमत यामुळे विदेशी मीठाने मोठी बाजारपेठ काबीज केली आणि देशी मीठ उत्पादकांपुढे स्पर्धात्मक समस्या निर्माण झाली. त्यामुळे छत्रपती शिवाजी राजांनी मीठाच्या देशी व्यापाराला संरक्षण देण्यासाठी विदेशी मीठावर मोठा कर लावला. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय व्यापारातील संरक्षणनीतिचा अवलंब दिसू लागला.

आधुनिक काळात भारताबरोबरच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात फ्रेंच, डच आणि पोर्तुगीजही सहभागी झाले. परंतु तेव्हा भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर ईस्ट इंडिया कंपनीचा ताबा होता. औद्योगिक क्रांतीमुळे

इंग्लंडला कच्च्या मालाचा पुरवठा गरजेचा होता आणि त्यांच्या उत्पादन केलेल्या वस्तूंसाठी बाजारपेठ हवी होती. परिणामी, भारतातील उद्योग व्यवस्थाबद्ध पद्धतीने नष्ट करण्यात आले. त्यामुळे व्यापारतोल ब्रिटिशांच्या फायद्याचा झाला. अशाप्रकारे जगभरात आर्थिक आणि वसाहतीवादी साम्राज्यवाद दिसू लागला होता. परिणामी, आंतरराष्ट्रीय व्यापाराची दिशा आणि दशा बदलली गेली. वसाहतीत देश साम्राज्यवादी देशातील उत्पादनांच्या बाजारपेठा बनल्या. त्यांचे खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण झाल्याने हे देश दरिद्री आणि कंगाल बनले. भारतासारख्या देशातील विचारवंतांनी आणि सुधारकांनी या आर्थिक शोषणावर आधारित आर्थिक निस्सारणाचा सिद्धांत मांडला आणि वेळोवेळी ब्रिटिशांकडून होणारी भारताची आर्थिक लूट लोकांसमोर मांडली, त्यातूनच पुढे स्वदेशीची चळवळ उभी राहिली. याचाच भाग म्हणून ब्रिटिशमालाची होळी केली गेली. त्यांच्या मालावर बहिष्कार टाकला गेला. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या असमतोलातून स्वदेशहित महत्त्वाचे मानणारी प्रादेशिक अस्मिता प्रभावी ठरू लागली आणि जागतिकीकरणाला आव्हान देत अ-जागतिकीकरणाचा प्रवाह हळूहळू जगभरातील वसाहतींमध्ये प्रवाहित होत गेला.

**जागतिकीकरणाचा प्रथम टप्पा**

आधुनिक जगाच्या इतिहासात दळणवळणाच्या साधनांची वाढ झाल्यावर निरनिराळ्या प्रदेशातील लोकांचा परिचय होऊन व्यापारात वाढ झाली. या व्यापारी युगात लॅटिन अमेरिकेतील ब्राझील, चिलीसारखी राष्ट्रे आणि ब्रिटिश व डच इस्ट इंडिज हे या आर्थिक परिवर्तनापासून दूर राहिले तर आशियातील जुनी राज्ये म्हणजे भारत, चीन, तुर्की साम्राज्यातील प्रदेश आणि इराण ही राष्ट्रे जागतिकीकरणाच्या पहिल्या टप्प्यात सामील झाली. जागतिकीकरणाच्या या पहिल्या टप्प्यात (१८७० ते १९१४) आर्थिक एकात्मीकरणात वाढ झाली. त्यातूनच वर्चस्ववादी विचारांना पाठबळ मिळाले. जागतिक भांडवलशाहीवर अथवा व्यापारावर कुणाचे वर्चस्व राहणार या वर्चस्ववादी विचारसरणीतून इंग्लंड आणि जर्मनी या राष्ट्रांमध्ये असलेल्या स्पर्धेतून दोन महायुद्धे झाली. येथेच आधुनिक जगाच्या इतिहासातील जागतिकीकरणाचा पहिला टप्पा संपुष्टात आला.

**अ-जागतिकीकरणाचा प्रथम टप्पा**

१९१४ साली झालेल्या पहिल्या महायुद्धातून जागतिकीकरणाच्या उलट प्रवाहाचा टप्पा सुरू झाला. अर्थात अ-जागतिकीकरणास सुरुवात झाली. युद्धात झालेले नुकसान भरून काढण्याच्या प्रयत्नातून १९२२ पर्यंतची काही वर्षे तेजीची गेली आणि नंतर पुन्हा आर्थिक मंदीला सुरुवात झाली. साम्राज्यवादी राष्ट्रांनी वसाहतींच्या बाजारपेठांचा फायदा घेऊन आपल्या उद्योगांना संरक्षण देऊन पुन्हा उभे राहण्याचा प्रयत्न केला. येथेसुद्धा राज्यकर्त्यांनी व्यापारात स्वदेश हितासाठी राजा शिवाजींप्रमाणे संरक्षणनीतिचा (Protectionism) अवलंब केला. त्यामुळे या टप्प्यात जागतिकीकरणाची अ-जागतिकीकरणाकडे सुरुवात झाली. १९१७ च्या साम्यवादी क्रांतीनंतर रशियाने जागतिक व्यापारातून माघार घेतली. १९२० च्या सुमारास आलेल्या स्पॅनिश फ्ल्यू या जागतिक महामारीने आर्थिक अस्थैर्य निर्माण झाले. १९२९ मधील नवीन स्थलांतर निर्बंध, मोठ्या प्रमाणातील निराशाजनक वातावरण आणि १९३० मधील मोठ्या प्रमाणातील संरक्षणनीतिचा अवलंब इ.मुळे अ-जागतिकीकरणात भरच पडली.

जागतिकीकरणाचा दुसरा टप्पा - युद्धाच्या परिणामातून अर्थव्यवस्था पुन्हा उभ्या करणे यासाठी विचारविनिमय करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष

रुझवेल्ट यांनी १९४४ साली एक जागतिक परिषद बोलावली. या बैठकीत आर्थिक मदत या विषयासोबत मुक्त व्यापार या विषयावरही चर्चा झाली. तेथूनच गॅटसाठी (GATT-General Agreement on Trade and Tariff) विविध चर्चाफेरींची सुरुवात झाली. जागतिकीकरणाच्या या दुसऱ्या टप्प्यात आंतरराष्ट्रीय व्यापारात असणारा आयात शुल्काचा प्रमुख अडथळा दूर करण्यासाठी चर्चेच्या विविध फेऱ्या झाल्या त्याची माहिती खालीलप्रमाणे-

**तक्ता क्र. १ : जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील गॅट कराराच्या चर्चाफेरींचा तपशील**

| चर्चाफेरी | वर्ष | परिषदेचे ठिकाण | सहभागी देश | विषय |
|---|---|---|---|---|
| प्रथम | १९४७ | जिनिव्हा, स्वित्झर्लंड | २३ | ४५ हजार वस्तुंवरील १० अब्ज डॉलर्सचे आयात शुल्क कमी केले. |
| दुसरी | १९४९ | ॲनेसी, फ्रान्स | ३३ | ५ हजार वस्तुंवरील आयात शुल्क कमी केले. |
| तिसरी | १९५१ | टॅरक्के, ब्रिटन | ३८ | ८७०० वस्तुंवरील आयात शुल्कात कपात |
| चौथी | १९५६ | जिनिव्हा, स्वित्झर्लंड | २६ | २.५ अब्ज डॉलर्सची आयात करात कपात |
| पाचवी | १९६०-६१ | जिनिव्हा, स्वित्झर्लंड | २६ | ४ हजार वस्तुंवरील ५ अब्ज डॉलर्सचे आयात शुल्क कमी केले. |
| सहावी | १९६४ | जिनिव्हा, स्वित्झर्लंड | ६२ | आयात कर कपात |
| सातवी | १९७३ | टोकियो, जपान | ९९ | आयात कर कपात |

(स्त्रोत :- अर्थजिज्ञासा, ले. डॉ. वि.म. गोविलकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २०१५)

वरील तक्ता पाहता असे दिसून येते की, जागतिक व्यापारामध्ये अडथळा असणारे आयात शुल्क कमी करण्यासाठी जगातील विविध देशांमध्ये चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या आणि आयात शुल्क कमी करण्यात आले. चर्चेच्या फेऱ्या चालू ठेवून जागतिकीकरणाची ही प्रक्रिया काही अडथळ्यांसह पुढे चालूच राहिली. तर दुसऱ्या बाजूस आंतरराष्ट्रीय व्यापार आणि प्रादेशिक हितसंबंध या दृष्टिकोनातून जगातील विविध देशांचे गट आणि संघटना अस्तित्वात आल्या. उदा. सार्क, ब्रीक्स, आशियान, जी-७, जी-२० इ. त्यापैकी या शोधनिबंधाची मर्यादा यामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे काही निवडक गटांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आढावा पुढीलप्रमाणे-

सार्क आणि भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापारतोल - एप्रिल १९८३ साली नवी दिल्ली येथे दक्षिण आशियातील भारतीय उपखंडातील देशांच्या सार्क या गटाची घोषणा करण्यात आली. या सार्कमधील सदस्य देशांसोबत भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापार तोलाचा आढावा पुढीलप्रमाणे. २००४-०५ मध्ये भारताचा सार्क सदस्य देशांबरोबर असणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील व्यापार अधिक्य ६५% होते. तर एकूण व्यापार ५.२ अब्ज डॉलरचा होता. यामध्ये बांग्लादेश आणि श्रीलंका या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्यात केली जात. भारताकडून सार्क देशांना होणारी निर्यात खालील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. २ : भारताची सार्क देशांना होणारी निर्यात**

| देश | निर्यात रक्कम (दशलक्ष डॉलर) |
|---|---|
| अफगाणिस्तान | ४५०.८३ |
| बांग्लादेश | ४६३३.९७ |
| भूतान | १५८.४७ |
| मालदीव | ९२.८७ |
| नेपाळ | १९८८.८१ |
| पाकिस्तान | १४६७.७७ |
| श्रीलंका | ३३१३.२५ |

(स्त्रोत - SAARC Group on Statistics, SAARC Secretariate, 2012)

वरील तक्ता पाहता भारताचा सार्क सदस्य देशांसोबतचा व्यापारतोल अनुकूल होता. १९९६ साली भारताने पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी सर्वाधिक पसंतीचा दर्जा (Most Favoured Nation-MFN) दिला. सार्क सदस्य देशांनी जुलै २००६ मध्ये मुक्त व्यापार धोरणाचा स्वीकार केला. २०१५-१६ साली भारताचा पाकिस्तानशी व्यापार ६४३.३ अब्ज डॉलर रक्कमेचा होता. पाकिस्तान भारतास ४४१ दशलक्ष डॉलरची निर्यात करीत होता. हा व्यापारतोल भारतास अनुकूल होता. परंतु दहशतवाद आणि संघर्षपूर्ण स्थितीमुळे पाकिस्तानला बहाल केलेला सर्वाधिक पसंतीचा दर्जा रद्द करण्यात आला तर दुसऱ्या बाजूस भारत-पाकिस्तान संबंध आणि चीनचा वाढता व्यापार, गुंतवणूक यामुळे सार्कमधील सदस्यांचे संबंध संदिग्ध राहिल्याने हा गट प्रभावहीन होऊ लागला.

सार्कप्रमाणेच १९९९ साली जागतिक आर्थिक मुद्यांवर जी-२० गटाची स्थापना झाली. आंतरराष्ट्रीय व्यापार, आर्थिक बाजार नियंत्रणास प्रोत्साहन देणे हे या गटाचे प्रमुख उद्देश होते. या गटात एकूण १९ देश आणि युरोपियन युनियन असे २० सदस्य आहेत. या गटातील प्रमुख देश पुढीलप्रमाणे - अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, जर्मनी, फ्रान्स, भारत, इंडोनेशिया, इटली, जपान, मेस्किको, रुस, सौदी, द.अफ्रिका, द.कोरिया, तुर्की, ब्रिटन आणि अमेरिका.

गॅट व जागतिक व्यापार संघटना करार - दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात जिनिव्हा परिषदेपासून सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या विकासप्रक्रियेवर अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या महासत्तांचा प्रभाव राहिला. १९८६ साली गॅटची आठवी फेरी उरुग्वे येथे सुरू झाली. या चर्चाफेरीत आयात कराशिवाय इतर निर्बंध कमी करणे तसेच शेती, व्यापार, गुंतवणूक, बौद्धिक संपदा अधिकार, सेवा व्यापार यांचा समावेश केला गेला. चर्चेची ही फेरी १९९१ पर्यंत सुरूच राहिली. त्यानंतर श्री. आर्थर डंकेल यांनी कराराचा एक मसुदा चर्चेसाठी ठेवला तो डंकेल ड्राफ्ट म्हणून ओळखला जातो. त्यावर १९९४ पर्यंत चर्चा झाली आणि मग करारांवर सह्या केल्या गेल्या. या करारांना जागतिक व्यापार संघटनेचे करार असे म्हटले जाते. जागतिक व्यापार संघटनेच्या करारांनी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती आणि दिशा दिली. या करारांची अंमलबजावणी १ जानेवारी १९९५ पासून सुरू झाली. जागतिकीकरणाच्या या टप्प्यापर्यंत जागतिक व्यापारात अमेरिकेच्या कंपन्यांचा दबदबा होता. जगातील ९०% मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या या अमेरिकन होत्या. आंतराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना यांच्या दडपणाखाली जागतिकीकरणाचे धोरण जगातील अनेक गरीब देशांना स्वीकारावे लागले. जागतिक व्यापार संघटनेच्या करारातील तरतुदींनुसार

अनेक देशांना आयात शुल्क कमी करणे अनिवार्य झाले. जागतिक स्तरावर मुक्त व्यापारासाठी आयात शुल्क टप्प्याटप्प्याने कमी करण्यास सुरुवात झाली. १९९५ साली सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या या महत्त्वपूर्ण टप्प्यात २१व्या शतकाच्या सुरुवातीपासून जागतिक उत्पादनाचे केंद्र बदलले. चीन, भारत यांसारखी राष्ट्रे जागतिक उत्पादनाची केंद्र म्हणून उभी राहू लागली. या स्पर्धेत चीनसारख्या देशाने खूप मोठी प्रगती करून जागतिक व्यापार स्पर्धेत चीन अमेरिकेनंतर दुसरा महासत्ता बनला. येथेच जागतिकीकरणाच्या प्रवाह बदलास सुरुवात झाली. जागतिकीकरणाच्या या टप्प्यात व्यापारवाद्यांच्या मुक्त व्यापाराच्या विचारांचे अर्थात आंतरराष्ट्रीय व्यापाराचे समर्थन करणाऱ्या डेव्हिड रिकार्डो यांच्या तुलनात्मक सिद्धांताचा प्रत्यय येतो.

'दोन देशांमध्ये व्यापार सुरू होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, त्या देशांमध्ये निर्माण केल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या किंवा एकसारख्या वस्तू व त्यांचा असणारा वेगवेगळा उत्पादन खर्च, याची तुलना करता आपल्या देशात निर्माण होणारी स्वस्त वस्तू निर्यात करून आपल्या देशात निर्माण होणारी महाग वस्तू स्वस्तात आयात करावी. रिकार्डोच्या मते, देशादेशांमधील आंतरराष्ट्रीय व्यापाराचा पाया हा तुलनात्मक खर्च लाभ हा असतो.'

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला डेव्हिड रिकार्डो यांच्या या तुलनात्मक खर्च-लाभ सिद्धांतामुळे पुष्टी मिळाली. चीनसारख्या देशाने स्वस्तात वस्तू निर्मिती करून तो जागतिक उत्पादनाचे केंद्र बनला आणि इतर देश चीनच्या मालाची बाजारपेठ म्हणून ओळखले जाऊ लागले.

अ-जागतिकीकरणाचा दुसरा टप्पा - मोठ्या बहुराष्ट्रीय उद्योग समूहांकडे सुधारित तंत्रज्ञान व मुबलक निधी होता. त्यामुळे व्यापारात प्रबळ असे ९० टक्क्यांपेक्षा अधिक उद्योग अमेरिकन असल्याचे जागतिक निर्देशांक २०१६-१७ नुसार दिसून येते तर दुसऱ्या बाजूस इस्त्राईल, सौदी आणि चीन आपल्या कक्षेबाहेर जाऊन पारंपारिक युद्धनीती व अपारंपारिक मार्गाने आधुनिक साम्राज्यवाद पसरवत असल्याचे समोर येत आहे. छोट्या व अप्रगत देशांना मोठमोठी कर्जे देऊन वा त्यांच्या विकास प्रकल्पात गुंतवणूक करून आर्थिक ताबा मिळविणे हे आर्थिक साम्राज्यवादाचे स्वरूप चीनच्या आर्थिक धोरणातून दिसून आले आहे. चीनने वाढत्या व्यापाराची सुरक्षितता वाढावी यासाठी दक्षिण चीन समुद्र आणि हिंद महासागरात अनेक देशांमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी मोठी गुंतवणूक केली आहे. पाकिस्तानातील ग्वादर बंदर, श्रीलंकेतील हंबाटा बंदर, मालदीव येथे बंदराची उभारणी व ताबा, बांग्लादेशात चीतगांग येथील बंदरात चीनने मोठी गुंतवणूक करून भारतासारख्या देशाच्या सागरी सीमांची एकप्रकारे आर्थिक व सामरिक घेराबंदीच केली आहे.

जगामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढता असमतोल, अर्थव्यवस्थेवरील परिणाम आणि प्रादेशिक अस्मिता व सार्वभौमत्व यांसारख्या प्रभावशाली मुद्द्यांभोवती नवी सत्ताकेंद्र उदयाला आली. भारतासारख्या देशात २०१४ साली झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदींनी २५ सप्टेंबर २०१४ साली 'Make in India' ची घोषणा केली तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष मा. श्री. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिका 'First' धोरणाची घोषणा केली. यातूनच आंतरराष्ट्रीय व्यापार आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बदलास सुरुवात झाली. याच सुमारास अ-जागतिकीकरणाची संकल्पना सर्वप्रथम (२०१४)

संज्ञाबद्ध करण्याचा प्रयत्न दक्षिण चीन सागरी प्रदेशातील फिलिपाईन्स या देशातील प्रा. वाल्दन बेल्लो यांनी केला. त्यांचे मते, 'अ-जागतिकीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करून स्थानिक व राष्ट्रीय अर्थव्यवस्था अधिक दृढ व सक्षम करणे.' अ-जागतिकीकरणाचे धोरणात आयात कर आणि संख्यात्मक निर्बंधाची रूपरेखा देशादेशांमधील लोकांचा, उत्पादनांचा आणि सेवांचा मुक्त वावर यावर नियंत्रण मिळवणारी आहे. संरक्षणनीतिमागील कल्पना स्थानिक उद्योगांना ढालीप्रमाणे संरक्षण देण्याची आहे. स्थानिक उद्योगांचे हित संरक्षण करण्यासाठी अमेरिकेने मार्च २०१८ साली पोलाद आणि ॲल्युमिनियमच्या आयातीवर अनुक्रमे २५ आणि १०% कर लादला. त्यानंतर अमेरिकेने १३०० चिनी उत्पादनांवर २५% आयात शुल्क लादले. प्रत्युत्तरादाखल चीननेसुद्धा अमेरिकन उत्पादनांवर अतिरिक्त कर आकारणीची घोषणा केली. युरोपियन युनियनही व्यापार रणनीतिच्या या रिंगणात उतरले आणि त्यांनी अमेरिकन उत्पादनांवर २५% कर आकारणीची घोषणा केली.

दुसऱ्या बाजूस कोव्हिड-१९ या जागतिक महामारीने अ-जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भरच घातली. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युल मॅक्रान म्हणाले, ''ही महामारी जागतिकीकरणाचे स्वरूप बदलणारी ठरेल आणि तिच्या चक्राच्या शेवटास पोहोचेल.'' ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान स्कॉट मॉरिसन संसदेत म्हणाले, ''शतकामधे मुक्त व्यापार हा त्यांच्या समृद्धीचा गाभा आहे, परंतु आपणास आपले आर्थिक सार्वभौमत्व काळजीपूर्वक जपले पाहिजे.'' जपानही चीनकडून होणारा पुरवठा कमी करून देशातच उत्पादनाची चाचपणी करत आहे. परंतु अ-जागतिकीकरणाची ही प्रक्रिया फक्त कोव्हिड-१९ या महामारीमुळेच सुरू झाली असे नाही तर तिचे मूळ हे २००८ च्या आर्थिक पेचप्रसंगात आहे.

चीन आणि भारत सीमा वादाप्रसंगी भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी सर्व भारतातील लोकांना स्थानिक उत्पादनांसाठी आवाज बनण्यास 'Vocal for Local' सांगितले आणि 'आत्मनिर्भर भारत' अभियानाची सुरुवात केली. 'मेक इन इंडिया' आणि तत्सम घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारताचा चीनबरोबर असणारा व्यापार घाटा मागील काही वर्षात कमी होत आहे. चीनकडून होणारी आयात २०१७-१८ साली ६३ अब्ज डॉलर इतकी होती, त्यात घट होऊन ही आयात २०१८-१९ मध्ये ५३.५६ अब्ज डॉलर इतकी झाली तर २०१९-२० मध्ये ही आयात ४८.६६ अब्ज डॉलर इतकी झाली. तर २०१२-१३ मध्ये भारताची एकूण व्यापार तूट १९०.३ अब्ज डॉलर इतकी होती ती २०१६-१७ साली १०८.५ अब्ज डॉलर इतकी कमी झाली. कोव्हिड-१९ जागतिक महामारी, टाळेबंदी आणि इतर तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारताच्याच नव्हे तर इतरही अनेक देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारतोलावर परिणाम घडून येण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

**अ-जागतिकीकरणाचे महत्त्वपूर्ण परिणाम -** जागतिक व्यापाराचा संकोच होतो. व्यापारातील भागीदार बदलतात. राजनैतिक संबंधांवर परिणाम होतो. सामरिक नीतितसुद्धा बदल होत आहे. जी-७, जी-२०, ब्रिक्स, सार्क, आशियान यांसारख्या गटांवर आणि जागतिक आरोग्य संघटना, जागतिक व्यापार संघटना, संयुक्त राष्ट्रसंघ यांसारख्या इतर संघटनांवरही परिणाम होत आहे.

**निरीक्षण/निष्कर्ष :** 'सार्वभौमत्वाचे संरक्षण आणि देशी उद्योगांना संरक्षण ही नीती जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली अल्पकाळ जरी दबलेली असली तरी ती मुक्त व्यापाराच्या नीतिपेक्षा

अधिक प्रभावशाली असल्याचे दिसून येते. भारताच्या बाबतीत सांगावयाचे झाल्यास ब्रिटिश राजवटीत देशी उद्योगांना संरक्षण मिळावे यासाठी स्वदेशी चळवळीला पाठींबा मिळाला. परंतु स्वातंत्र्योत्तर भारतात विशेषत: जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली ही स्वदेशी चळवळ निष्प्रभ ठरली होती. परंतु भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावपूर्ण संबंध, चीन-भारत यांच्यातील सीमावाद, वाढती बेरोजगारी यांसारख्या विविध मुद्यांवर मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत अर्थात स्वदेशनीति अत्यंत महत्त्वपूर्ण आणि आवश्यक असल्याचे निष्कर्षास येते.

१९१८ च्या स्पॅनिश फ्ल्यू या महामारीप्रमाणेच कोव्हिड-१९ या महामारीने अनेक देशांना अ-जागतिकीकरणाकडे घेऊन जाण्यात भर घातली. त्याचप्रमाणे अमेरिकेने स्थलांतरासाठी नव्याने निर्बंध घातले आहेत, म्हणजेच स्थलांतरावरील निर्बंध ही आणखी एक साम्यता अ-जागतिकीकरणाच्या प्रथम आणि द्वितीय टप्प्यात दिसून येते.

**गृहीतक पडताळणी -** या शोधनिबंधाचे गृहीतक हे घटनात्मक आणि विवेचनात्मक असल्याने पडताळणीसाठी निवडक घटनांचा आधार घेतला आहे. या शोधनिबंधाच्या वरील विवेचनावरून आणि विश्लेषणावरून असे निष्कर्षास येते की, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत १९९५ साली झालेल्या जागतिक व्यापार संघटनेच्या करारातील तरतुदींनुसार जगातील अनेक देशांनी आंतरराष्ट्रीय व्यापार प्रमुख अडचण ठरणाऱ्या आयात शुल्कात मोठी कपात केली उदा. भारतात १९९१ साली आयात शुल्काचा कमाल दर १५०% इतका होता तो आता (२१व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात) ३०% इतका कमी झाला आहे. तर दुसरीकडे दुसऱ्या देशांवरील अवलंबित्व कमी करणे, प्रादेशिक उद्योग आणि व्यापारास संरक्षण देणे, बेरोजगारीची समस्या कमी करणे यांसारख्या आर्थिक मुद्द्यांबरोबरच देशाच्या सीमा आणि सार्वभौमत्व यांचे संरक्षण करण्याच्या दृष्टिकोनातून स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देणे, त्यांच्यासाठी विविध आर्थिक उपाययोजनांची घोषणा करणे, वेळप्रसंगी आयात धोरणात बदल करणे यांसारखे अ-जागतिकीकरणाचे म्हणजेच जागतिकीकरणाच्या उलट बदल घडून येताना दिसू लागले. त्यामुळे गृहीतकात मांडल्याप्रमाणे, जागतिकीकरण ही संकल्पना मुक्त व्यापार या संकल्पनेशी अतूट आहे तर दुसऱ्या बाजूस प्रादेशिक अस्मिता, सार्वभौमत्वाचे संरक्षण यांसारख्या महत्त्वाच्या गोष्टी मुक्त व्यापार संकल्पनेच्या हितास बाधक ठरत आहे. त्यामुळे जागतिकीकरण आणि अ-जागतिकीकरण ही एक चक्रीय प्रक्रिया आहे असे हे या शोधनिबंधाचे गृहीतक सिद्ध होते.

**जागतिकीकरणाचे भवितव्य -** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कररचना आणि करार यांमध्ये जरी सुधारणा करण्यात आल्या तरी काळानुरूप स्वदेशनीति आणि संरक्षणनीति ही आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये अविभाज्य भाग बनून राहणार असल्याचे दिसते.

**समारोप -** Vocal for Local अर्थात भारतीय संस्कृती आणि परंपरा, इथे फक्त वस्तुंचा व्यापार आणि बाजारपेठ असा मर्यादित विचार केला जात नाही तर वस्तुंची पूजा देखील केली जाते. दुसऱ्या बाजूस व्यापारवादी विचारवंत जग ही एक बाजारपेठ आहे असा मर्यादित विचार करताना दिसतात. तर आमची संस्कृती व परंपरा आम्हाला विश्वची एक कुटुंब आहे अशी शिकवण देते.

।।वसुधैव कुटुंबकम्।।

**संदर्भ सूची**

१. अर्थसंवाद, (ऑक्टोबर-डिसेंबर, २०१४),

मराठी अर्थशास्त्र परिषद.
२. अर्थसंवाद, (जानेवारी-मार्च २०१८), मराठी अर्थशास्त्र परिषद.
३. गोविलकर विनायक, (जानेवारी, २०१५), अर्थजिज्ञासा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
४. दैनिक लोकसत्ता, दिनांक ०३ जुलै २०२०, पान-१२.
५. धनार्थ स्मरणिका, (ऑक्टोबर, २०१७) मराठी अर्थशास्त्र परिषद ४१ वे राष्ट्रीय अधिवेशन, अथर्व पब्लिकेशन्स्, जळगाव.
६. पंडित नलिनी, (डिसेंबर, २००१), जागतिकीकरण आणि भारत, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
७. SAARC Group on Statistics, SAARC Secretariat, 2012.
८. http://Shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/123800/7/07.
९. http://voxeu.org/article/pandemic-adds-momentum-deglobalisation-trend.
१०. http://www.thehindubusinessline.com/opinion/columns/slate/all-you-wanted-to-know-about-de-globalisation.
११. http://www.ecfr.eu/article/commentary_the_deglobalisation_virus.

◆

## निवेदन : अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

## निवेदन - अर्थसंवाद

अर्थसंवादच्या सर्व वर्गणीदार शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालयांना कळविण्यात येते की, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणी व सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार १ एप्रिल, २०२० पासून अर्थसंवादची त्रैवार्षिक वर्गणी २००० रु. व पंचवार्षिक वर्गणी ३००० रु. करण्यात आलेली आहे. ज्या वर्गणीदार सदस्यांनी यापूर्वीच जुन्या दराने रक्कम पाठवली आहे त्यांनी फरकाची रक्कम त्वरित पाठवून देवून सहकार्य करावे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# भारतातील सहकारी संस्थांचा विकास

**रसूल कोरबू** †

ग्रामीण विकासाच्या दृष्टीने भारतातल्या सहकारी चळवळीला विशेष महत्त्व असून ग्रामीण जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणण्यासाठी या चळवळीचा उपयोग झाला. या चळवळीच्या माध्यमातून शोषणमुक्त समाजनिर्मिती, गरजू आणि दुर्बल घटकांना एकत्रित करून आवश्यक त्या सुख-सोयीसुविधा, समता, बंधुता व लोकशाहीची मूल्ये रूजविणे इत्यादी गोष्टी प्राप्त करण्याची संधी मिळाली. त्याचप्रमाणे कृषी पतपुरवठ्याच्या माध्यमातून कृषी अर्थव्यवस्थेचे औद्योगिक व्यवस्थेत रूपांतर करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका साकारल्याचे दिसून येते. २० व्या शतकातून २१ व्या शतकात सहकारी चळवळीची वाटचाल होत असताना ही चळवळ आज आरिष्टामध्ये सापडल्याचे दिसून येते. भारतातील अनेक सहकारी संस्था या जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण आणि विविध नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत आलेल्या आहेत. प्रस्तुत निबंधात भारतातील सहकारी संस्थांच्या प्रगतीवर व सद्य:स्थितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्या अनुषंगाने निबंधाचे लिखाण खालील प्रमुख उद्देशाने केलेले आहे.

१) भारतातील सहकारी संस्थांच्या प्रगतीचा आढावा घेणे.
२) सहकारी चळवळीचे आर्थिक, सामाजिक विकासातील योगदानाचा अभ्यास करणे.
३) सहकारी संस्थापुढील समस्या व त्यावरील उपाययोजनांचा आढावा घेणे.

प्रस्तुत निबंधाच्या लेखनासाठी पुढील गृहीतके स्वीकारण्यात आली आहेत.

१) देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात सहकारी संस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.
२) सहकारी संस्थांच्या गुणात्मक विकासापेक्षा संख्यात्मक विकास अधिक.
३) कृषी वित्तपुरवठ्यात सहकारी संस्थांची कामगिरी महत्त्वपूर्ण असून त्या कर्जाच्या विळख्यात सापडून अडचणीत आल्या आहेत.

प्रस्तुत निबंध हा मुख्यत: द्वितीय स्वरूपाच्या माहितीवर आधारलेला आहे. विविध प्रकारचे प्रकाशित व अप्रकाशित तसेच शासकीय किंवा अशासकीय लिखित साहित्यातील माहिती व विचारांचा आधार

† सहयोगी प्राध्यापक आणि व्यावसायिक अर्थशास्त्र विभागप्रमुख, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. : १६५९, भ्रमणध्वनी : ९४२३८६०२८३, ई-मेल : rgkorabu@gmail.com

घेण्यात आला आहे.

**भारतातील सहकारी चळवळीचा उगम व विकास**

भारतात सहकारी चळवळीचा उदय हा स्वातंत्र्यपूर्व काळातील असला तरी त्याची विधिवत सुरुवात दि. २५ मार्च १९०४ रोजी पारित झालेल्या पहिल्या सहकारी कायद्याने झाली. त्यानंतर १९१२ मध्ये दुसरा कायदा पारित करण्यात आला. सन १९१९ मध्ये संविधानातील सुधारणा अंतर्गत सहकार हा राज्यांच्या अखत्यारीतील विषय समजण्यात आला. भारत सरकारने १९५६ साली भारतातील सहकारी कायदा यावर समिती स्थापन केली. या समितीने आपला अहवाल केंद्रशासनास मे १९५७ साली सादर केला. सन १९४२ साली बहुएकक सहकारी कायदा (Multi-unit Cooperation Societies Act-1942) पारित करण्यात आला व १९८४ मध्ये बहुराज्य सहकारी कायदा अस्तित्वात आला. पण हा कायदा रद्द करून दि.१९/०८/२००२ रोजी नवीन बहुराज्य कायदा सहकारी सोसायटी कायदा पारित करण्यात आला. या कायद्यामध्ये वेळोवेळी दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत.

खालील तक्ता हा भारतीय सहकारी चळवळीचा विकास ठळकपणे दर्शवितो.

वरील तक्त्यानुसार भारतातील अर्थव्यवस्थेत सहकारी संस्थांचा सहभाग वाढीव दराने दिसून येतो. २०१७ पर्यंत प्राथमिक कृषी पतसंस्था ग्रामीण भागात ९०.८% इतके आहे. ५०% शेतकऱ्यांना किसान क्रेडीट कार्डांचे वितरण करण्यात आले आहे. एकूण साखर कारखान्यांपैकी ३८.६३% कारखाने हे सहकारी साखर कारखाने आहेत. एकूण रोजगारापैकी १३.३०% प्रत्यक्ष रोजगार व १०.९१% स्वयंरोजगार सहकारी संस्थांच्या माध्यमातून प्राप्त झालेला आहे.

**कृषी वित्तपुरवठा संस्था**

देशात कृषी वित्तपुरवठ्याच्या माध्यमातून सहकाराची चळवळ सुरू झाली. तथापि, काही राज्यांत द्विस्तरीय तर काही राज्यांत त्रिस्तरीय यंत्रणा कार्यरत आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, केरळ इ. अशा २० राज्यांमध्ये द्विस्तरीय व उर्वरित राज्यांमध्ये त्रिस्तरीय यंत्रणा अस्तित्वात आहे. या संस्थांचे विकासातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. राज्य पातळीवर राज्य सहकारी बँक, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व गाव पातळीवर प्राथमिक कृषी सहकारी संस्था या त्रिस्तरीय यंत्रणेचा पाया आहे. द्विस्तरीयमध्ये जिल्हा पातळीचा अभाव असतो. या बँका लघु व मध्यम मुदतीचे कर्ज कृषी विभागास देत असतात.

**राज्य सहकारी बँका**

सहकारी क्षेत्रात राज्य पातळीवर वित्तीय पुरवठा करणारी ही शिखर संस्था आहे. कृषी आणि कृषी संलग्न सहकारी संस्थांना जिल्हा मध्यवर्ती बँकांमार्फत वा थेट अर्थपुरवठा करण्याचे कार्य ही बँका करत असते. बँकेच्या आर्थिक स्थितीचे अवलोकन करता वित्तीय क्षेत्रात बँकेने लक्षणीय प्रगती केल्याचे दिसून येते. त्याची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

१) १९५०-५१ साली एकूण १५ राज्य सहकारी बँका होत्या. मार्च २०१७ अखेर त्यांची संख्या ३२ पर्यंत पोहचली.

२) २०१७-१८ मध्ये या बँकेकडे खेळते ८९,८५१ मार्च २०१७ अखेर २२,०८,५८१ कोटी रुपये होते.

३) २००७-०८ मध्ये बँकेने ८९९६१.३४ कोटी लक्ष रुपये तर मार्च २०१७ अखेर २७४०३ कोटी रुपये होती.

**तक्ता क्र. १ : भारती सहकार चळवळीचा दृष्टिक्षेप - २०१६-१७**

| तपशील | १९४८-४९ | २०१६-२०१७ |
|---|---|---|
| एकूण सहकारी संस्था | -- | ८,५४,३५४ |
| बंद असलेल्या सहकारी संस्था | -- | ५२,४४० |
| वित्तीय सहकारी संस्था (सर्व) | -- | १,७७,६०५ |
| बिगर वित्तीय सहकारी संस्था (सर्व) | -- | ६,७६,७५० |
| एकूण सभासद (दक्षलक्ष) | -- | २९०.०६ |
| वित्तीय सहकारी संस्थांचे सभासद (दशलक्ष) | -- | २०६.१६ |
| बिगर वित्तीय सहकारी संस्थांचे सभासद (दशलक्ष) | -- | ८३.९२१ |
| भाग भांडवल (सर्व स्तरातील संस्थांचे) (दक्षलक्ष) | -- | ४,०६,८८६.८ |
| खेळते भांडवल (दशलक्ष) | -- | १२५,३६,१७४ |
| राष्ट्रीय स्तरावरील सहकारी महासंघ | -- | १७ |
| राज्य स्तरीय सहकारी महासंघ | १५ | ३९० |
| जिल्हास्तरीय सहकारी महासंघ | ४८४ | २,७०५ |
| बहुराज्य सहकारी संस्था | -- | १,४३५ |
| प्राथमिक कृषी पतसंस्था (PACs) | १.१२ लाख | ९७,९६१ |
| प्राथमिक कृषी पतसंस्था सभासद संख्या (दशलक्ष) | ४४ लाख | १३१.२३ |
| प्राथमिक कृषी पतसंस्था भाग भांडवल (दशलक्ष) | -- | १,४१,२१५ |
| प्राथमिक कृषी पतसंस्था ठेवी (दक्षलक्ष) | -- | ८,४६,१६३ |
| एकूण सहकारी साठवणूक क्षमता (दशलक्ष मे. टन) | -- | ६.२६ |
| एकूण किसान क्रेडीट कार्ड (दशलक्ष) | -- | ७१.४७४ |
| सहकारी संस्थांनी किसान क्रेडीट कार्ड वितरित (दशलक्ष) | -- | ३५.८८३ |

स्त्रोत: Indian Cooperative Movement a Statistical Profile, 15th Edition, 2018.

### जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (जि. म. स. बँका)

राज्यातील त्रिस्तरीय वित्तपुरवठा यंत्रणेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक हा महत्त्वाचा घटक आहे. राज्य सहकारी बँका आणि प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था व इतर सहकारी संस्था यांच्यात प्रभावी दुवा म्हणून या बँकेचे कामकाज वैशिष्ट्यपूर्ण आहे. या बँकेच्या प्रगतीची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

१) देशात एकूण ७३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत.

२) २००७-२००८ मध्ये सभासद संख्या

३३९५४३४ वरून ३२३३८६४ इतकी २०१६-२०१७ साली होती.

३) सन २००७-२००८ साली खेळते भागभांडवल १६७७६८ कोटी रुपये वरून २०१६-२०१७ साली ५०७१३.०४ कोटी रुपये होते.

४) सन २०१२-१३ मध्ये थकबाकी ३१५३०.३० कोटी रुपयावरून २०१६-१७ साली ५०७१३.०४ कोटी रुपये.

**प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था**

शेतकऱ्यांना त्रिस्तरीय किंवा द्विस्तरीय यंत्रणेमार्फत केल्या जाणारा कर्जपुरवठा व्यवस्थेत प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांना महत्त्वाचे स्थान आहे. संपूर्ण कृषी पतपुरवठा या यंत्रणेवर विसंबून आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतर्फे झालेला पतपुरवठा नियोजित धोरणानुसार शेतकऱ्यांना देणे व सव्याज वसूल करणे हे यांचे प्रमुख कार्य आहे. याबरोबर विविध सेवा पुरविण्याचे कार्य सुद्धा या संस्थांच्या मार्फत केले जाते. या संस्थांच्या आर्थिक स्थिती अथवा प्रगतीची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) देशातील प्राथमिक कृषी पतसंस्थांची संख्या सन १९४८-४९ मध्ये १.१२ लाख होती. ती २०१६-१७ मध्ये ९७९६१ इतकी झाली.

२) या संस्थांचे एकूण भागभांडवल २००७-०८ मध्ये ४६८५ कोटी रुपयेवरून २०१६-१७ मध्ये १४१२२ कोटी रुपयांपर्यंत वाढले.

३) प्राथमिक कृषी पतसंस्थांचे खेळते भांडवल सन २००७-०८ मध्ये ५७५३६ कोटी रुपये होते. सन २०१६-१७ मध्ये २३९९६७ कोटी रुपये इतके झाले.

४) या सहकारी संस्थांची थकबाकी २००७-०८ मध्ये ४०२४४ कोटी रुपये होती ती सन २०१६-१७ मध्ये १७०४५९ कोटी रुपये होती.

५) या सहकारी संस्थांनी २००७-०८ मध्ये ३२९३२ कोटी रुपये वाटप केले तर २०१६-१७ मध्ये २००६७८ कोटी रुपये वितरण केले. कर्जाच्या अनुषंगाने थकबाकी फार मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे.

**ग्रामीण सहकारी वित्तीय संस्थांची आर्थिक स्थिती**

कृषी पतपुरवठ्यात या यंत्रणेचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या संस्थांच्या ठेवी, भांडवल, थकबाकी याबाबतची माहिती खालील तक्ता क्र. २ मध्ये दिलेली आहे.

वरील तक्त्यानुसार PACs व PCARDBs बँकांची वाढती थकबाकी, एन.पी.ए. आणि तोट्यात असणाऱ्या संख्या वाढलेली असल्याने ही यंत्रणा अडचणीत आली आहे.

**बिगर वित्तीय व प्रक्रिया सहकारी संस्था**

देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील कृषी प्रक्रिया सह. संस्थांचे योगदान महत्त्वाचे आहे. या सहकारी संस्थांमुळे शेतकऱ्यांना उत्पादनाचा वाजवी मोबदला व ग्रामीण उद्योगाच्या वाढीला चालना देऊन रोजगार प्राप्त करून देण्यासाठी यशस्वी वाटचाल केली आहे. या संस्थामध्ये प्रामुख्याने सहकारी साखर कारखाने, कापूस पिंजणी व गासड्या बांधणी करणाऱ्या संस्था, सूतगिरण्या, दुग्ध सह. संस्था, हातमाग व यंत्रमाग संस्था तसेच मत्स्य सह. संस्थांचा समावेश होतो. मार्च २०१७ अखेर भारतात जवळपास ३०,६,३४२ बिगर वित्तीय सह. संस्था कार्यरत होत्या. यातील प्रमुख सहकारी संस्थांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्र. २ : ग्रामीण सहकारी पतपुरवठ्याची आर्थिक स्थिती (मार्च २०१७ अखेर)**

(रु. अब्जामध्ये)

| तपशील | लघु/मध्यम काळ | | | दीर्घकाळ | |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सहकारी संस्था | राज्य सह. बँक SCBs | जिल्हा सह. बँक DCCBs | प्राथ. कृषी सह.पतपुरवठा संस्था PACs | राज्य सह. कृषी ग्रामीण विकास बँका SCARDBs | प्राथ. सह. कृषी ग्रामीण विकासबँका PCARDBs |
| अ) संख्या | ३३ | ३७१ | ९७९६० | १३ | ६०१ |
| ब) भागभांडवल | १५४ | ३८४ | ३३० | ४३ | २७ |
| क) कर्जे | १२७० | २५२७ | २००९ | २१२ | १५१ |
| ड) नफा मिळवणाऱ्या संस्थांची संख्या | ३१ | ३५१ | ४६५८६ | ८ | २३६ |
| इ) एन.पी.ए. (रक्कम) | ५२ | २६५ | ५३३ | ५२ | ४९ |
| फ) थकबाकी (टक्के) | ४.१ | १०.५ | २६.६ | २३.६ | ३३.०० |

स्त्रोत: Indian Cooperative Movement a Statistical Profile, 15th Edition, 2018.

**सहकारी साखर कारखाने**

मार्च २०१७ अखेर भारतात एकूण ४८७ साखर कारखान्यांपैकी १८८ सहकारी साखर कारखाने आहेत. महाराष्ट्रात मार्च २०१८ अखेर १७८ साखर कारखान्यांपैकी १०१ सहकारी साखर कारखाने कार्यरत आहेत.

संदर्भ वर्षात देशात सहकारी साखर कारखान्याकडून ५९.४८ मे. टन साखरेचे उत्पादन झाले आहे. मात्र देशपातळीवर बहुतांश साखर कारखान्यांची स्थिती समाधानकारक नसून अनेक सहकारी साखर कारखाने तोट्यात आहेत.

**दुग्ध सहकारी संस्था**

सन २०१७ अखेर भारतात १.६७ लाख दुग्ध संस्था कार्यरत होत्या. १६२ लाख सभासद आहेत. बहुराज्य दुग्ध सहकारी संस्थांची संख्या ९५ इतकी होती. दुधाचे उत्पादन १६५.४ मे. टन होते. दरडोई दर दिवशी (दूध उपलब्धता ३५५ ग्रॅम आहे.)

**मत्स्य सहकारी संस्था**

सन २०१७ अखेर भारतात २०८०४ आहेत. ३.२ दशलक्ष सभासद आहेत. महाराष्ट्र राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**सहकारी सूतगिरण्या**

मार्च २०१७ अखेर भारतातील एकूण २४२ सूतगिरण्यांपैकी १७३ स्पिनिंग मिल्स आहेत.

**नागरी सहकारी बँका**

मार्च २०१७ अखेर भारतात १५६२ नागरी सहकारी बँका व त्यांच्या १०२२१ शाखा आहेत. एकूण ठेवी ४४३४६८३ कोटी रुपये आणि कर्ज वाटप २६१२२.४५ कोटी रुपये आहे.

**मजूर सहकारी संस्था**

भारतातील मजूर सहकारी संस्थांची कामगिरी पुढीलप्रमाणे-

सन १९८०-८१ मध्ये एकूण १४३८९ संस्था अस्तित्वात होत्या व त्याची सभासद संख्या २७.२९ लाख होती.

**ग्राहक सहकारी संस्था**

भारतात मार्च २०१७ च्या अखेरीस एकूण २६३५५ इतक्या ग्राहक सहकारी संस्था होत्या व त्यांची एकूण सभासद संख्या ८.६१० दशलक्ष होती.

**सहकारी बाजार संस्था**

सन २००८-०९ मध्ये भारतात एकूण ७१८० संस्था व त्यांचे ६.१३ दशलक्ष सभासद होते. सन २०१६-१७ मध्ये ही ७३९९ इतकी वाढली तर त्यांचे एकूण ७.४१ दशलक्ष सभासद होते.

उपरोक्त अभ्यासावरून असे दिसून येते की,

१) देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात सहकारी संस्थांचा वाटा महत्त्वाचा आहेच; पण ग्रामीण भारतात त्याची व्याप्ती अधिक आहे.

२) विविध क्षेत्रांत सहकारी तत्त्वावर संस्था स्थापन झाल्याने त्या क्षेत्रात विकास होण्यास अधिकचा हातभार लागला आहे. तसेच त्यांचा विस्तार धीम्यागतीने वाढत असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

३) कृषी विभागातील विकासात सहकारी वित्तपुरवठ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. तसेच ग्रामीण भागातील काही घटक यांच्या लाभापासून वंचित आहेत.

४) देशातील सहकारी संस्थांची संख्या, सभासदांची संख्या, भागभांडवल, संस्थांचे खेळते भांडवल, ठेवी यांच्यात अभूतपूर्व वाढ झाली असली तरी अपेक्षित वाढ झाल्याचे दिसून येत नाही.

५) व्यवहार अनियमितता, वाढती थकबाकी, तोटा, भ्रष्टाचार, राजकारण आणि राजकीय दहशत या सहकारी संस्थांच्या प्रमुख समस्या आहेत. यामुळे सहकारी संस्थांच्या अडचणीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

**उपाययोजना**

सहकारी चळवळीच्या विकासात सुधारणा साधण्यासाठी व त्यामध्ये बळकटी निर्माण करण्यासाठी सरकारने प्रत्येक पंचवार्षिक योजनेवर लक्ष केंद्रित केले आहे. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत सहकार चळवळीच्या विकासासाठी भरीव आर्थिक तरतुदीबरोबर संविधानात्मक प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते. देशातील सर्वसामान्य जनता सहकारी संस्थांच्या कक्षेत आणण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत सहकारी चळवळीच्या विकासासाठी भरीव निधी व आर्थिक तरतुदी उपलब्ध करून देण्याचा योग्य असा प्रयत्न झाला आहे. रिझर्व्ह बँक, केंद्र सरकार व राज्य सरकारांनी वेळोवेळी वेगवेगळ्या समित्या, तसेच अभ्यास गट स्थापन करून सहकार चळवळ व संस्था बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. १९५१ साली ए. डी. गोरवला यांच्या समितीने 'सहकार अपयशी झाले असले तरी ते यशस्वी होणे आवश्यक आहे', असे मत मांडून अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी केलेल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे-

**१) अखिल भारतीय ग्रामीण पत सर्वेक्षण समिती All India Rural Credit Survey Committee**

भारतात स्वातंत्र्यानंतर सहकार चळवळीमधील इतिहासातील एक महत्त्वपूर्ण बाब नोंद करण्यासारखी आहे ती म्हणजे 'अखिल भारतीय ग्रामीण पत सर्वेक्षण समिती' होय. या समितीची स्थापना १९५१ साली ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली झाली. समितीने आपला अहवाल सन १९५४ साली सादर केला. समितीचे महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे 'सहकार अपयशी झाले, परंतु सहकार यशस्वी झाला पाहिजे.' समितीच्या समोर उद्देश एकच की देशातील कृषी विभागास पतपुरवठा भांडवल/पतची गरज, ग्रामीण

कुटुंबाच्या पतमागणी आणि त्यांना पतपुरवठा करणाऱ्या खाजगी व सरकारी वित्तसंस्था यांचा अभ्यास. समितीने नमुना सर्वेक्षणासाठी प्रत्येक जिल्ह्यातील ६०० खेडी याप्रमाणे ७५ जिल्ह्यांचे सर्वेक्षण करण्यासाठी निवडण्यात आले. गेल्या ५० वर्षामध्ये (१९५०च्या पूर्वी) सहकारी संस्थांच्या माध्यमातून त्यांच्या गरजेपैकी शेतकऱ्यांना फक्त ३.१% इतके कर्ज उपलब्ध झाले होते. तथापि, सावकार, खाजगी संस्था, महाजन यांच्या माध्यमातून त्यांच्या गरजेनुसार ७०% कर्ज उपलब्ध झाले होते. तत्कालीन सहकारी वित्तीय संस्थांचा लाभ लहान शेतकऱ्यांपेक्षा मोठ्या जमिनदारांना जास्त झाला होता. कर्जतारण फक्त शेतीक्षेत्राच्या आधारावर अवलंबून होता. समितीच्या मते, प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था या सहकार चळवळीमधील साखळीतील दुबळ्या संस्था होत्या. या संस्था सहकार चळवळीच्या विकासासाठी ना उपयुक्त ठरल्या, ना योग्य प्रमाणात कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी सक्षम होत्या. समितीच्या अहवालानुसार ग्रामीण भागात ७५० कोटी रुपयाची आवश्यकता होती असे नमूद केले आहे. म्हणून समितीने शेतकऱ्यांना माफक व्याजदरात उत्पादनासाठी कर्ज उपलब्ध करून द्यावे अशी शिफारस केली. देशातील फक्त ७ % कुटुंब सहकारामध्ये समाविष्ट होते तर ९३% सहकाराच्या परिघाबाहेर होती. वरील सर्व सर्वेक्षणाच्या आधारे श्री. गोरवाला समितीने खालील शिफारशी केलेल्या आहेत.

१) सहकारी संस्थांमध्ये शासनाची भागीदारी.
२) स्टेट बँकेची स्थापना.
३) विशेष निधीची निर्मिती.
४) सहकार चळवळीची पुनर्बांधणी
५) सहकारी प्रशिक्षणाच्या सुविधांची पूर्तता.

शासनाने बहुतांश शिफारशी स्वीकारून त्याच्या अंमलबजावणीसाठी पाच वर्षामध्ये अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. सन १९६८ पर्यंत शासनाकडून सहकारी संस्थांमधील भागभांडवलाचा सहभाग जवळपास ५८ कोटी रुपये होता. इंपिरियल बँक ऑफ इंडियाचे विलीनीकरण करून स्टेट बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. भारतात आर.बी.आय. कडून कृषी विभागास कर्जपुरवठा करण्यासाठी १९५६ साली राष्ट्रीय कृषी पतनिधीची (National Agriculture Credit Fund) स्थापना करण्यात आली. या पतनिधीचे सुरुवातीचे भागभांडवल १० कोटी रुपये होते. या विभागाकडून १९६९ साली रु. १५५ कोटी वाटप करण्यात आले. समितीच्या शिफारशीनुसार केंद्रशासनाने राष्ट्रीय सहकार विकास निधी (NCDP) व राष्ट्रीय गोडावून विकास निधी (NWDF) या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून सन १९६९ मध्ये रु.२ कोटी वितरित करण्यात आले. त्याचप्रमाणे समितीने सूचित केल्याप्रमाणे सहकाराचे विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

त्याचप्रमाणे निकोलसन समिती १८९२, गाडगीळ समिती १९४४, दाते समिती १९५६, मेहता समिती १९५९, मिर्धा समिती १९६४, दाते समिती अभ्यासगट समिती १९७२, दंतवाला समिती १९६४, बी. वेंकटप्पय्या समिती १९६९, शिवरामन समिती १९७९, डॉ. अे. एम. खुस्त्रो समिती १९८९, डॉ. शिवाजीराव पाटील समिती २००५, वैद्यनाथन समिती २००६, अलघ समिती २००२ इत्यादी समित्यांनी भारतातील सहकारी चळवळीचा अभ्यास करून उपयुक्त अशा सूचना केलेल्या आहेत. सहकार क्षेत्रातील शासकीय व राजकीय हस्तक्षेप कमी व्हावा, स्वायत्तता, जबाबदारी आणि संस्थेने स्वत: करून घ्यायचे लेखापरीक्षण इत्यादी बाबींसाठी ९७ वी घटनादुरुस्ती दि.१२ जानेवारी २०१२ रोजी पूर्ण केली. ९७ व्या

घटनादुरुस्तीनुसार सहकार क्षेत्रात खालीलप्रमाणे तरतुदी करण्यात आल्या.

**१) संचालक मंडळ**

- संचालक मंडळ सदस्यांची संख्या ही फक्त २१ असेल. त्यामधील २ तज्ज्ञ संचालक स्वीकृत असतील व त्यांना मतदान करता येणार नाही.
- अनुसूचित जाती-जमातीकरिता १ व महिलांकरिता २ राखीव जागांची तरतूद केलेली आहे.
- संचालक मंडळाचा कार्यकाल ५ वर्षे असेल, कार्यकाल संपण्यापूर्वी नव्या निवडणुका घेऊन नवे संचालक मंडळ प्रस्थापित करणे. रिक्त संचालकांची जागा संचालक मंडळानेच भरणे.

**२) प्रशासक**

- प्रशासक नेमल्यास त्याचा कालखंड ६ महिन्यांपेक्षा जास्त असू नये. या काळातच निवडणुका घ्याव्यात.
- कोणत्याही सहकार संस्थेमध्ये सरकारचे भाग भांडवल गुंतवलेले नसेल अथवा त्यास हमी दिलेली नसेल अशा सोसायट्यांचे संचालक मंडळ बरखास्त करता येणार नाही. बँकिंग व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थेच्या बाबतीत प्रशासकाची मुदत सहा महिन्यांऐवजी १ वर्ष असेल.

**३) हिशेब तपासणीस**

- वैधानिक ऑडिटर अथवा ऑडिटिंग फर्म यांची नेमणूक सर्वसाधारण सभेत सोसायट्यांना असेल. तथापि, नेमलेला ऑडिटर हा शासनाने मंजूर केलेल्या ऑडिटर्सच्या अधिकृत यादीमधील असावा व त्याची नियुक्ती ३ वर्षासाठी असेल. (लेखापरीक्षकांची संख्या वीसपेक्षा अधिक असणार नाही.) सहा महिन्यांच्या आत ऑडिट करून घेतले पाहिजे.

**४) अहवाल सादरीकरण**

आर्टिकल २४३ झेड ई अंतर्गत अहवाल सादर करणे बंधनकारक असेल.

**५) पोटनियम दुरुस्तीचा अधिकार संस्थेस असेल.**

**६) क्रियाशील सभासद : पात्रता व अधिकार**

- किमान भागधारणा, किमान ठेव, कर्ज किमान पाच वर्षांच्या काळातील, पाच वर्षात किमान एका सर्वसाधारण सभेस उपस्थिती आवश्यक. दरवर्षी एप्रिलमध्ये क्रियाशील सभासदांची यादी तयार करून संबंधितांना कळविणे. सतत पाच वर्षे क्रियाशील सभासद म्हणून गैरहजर असेल तर सभासदत्व रद्द होईल. मतदानाचा हक्क फक्त क्रियाशील सभासदांना असेल. थकबाकीदार सभासद मतदानास अपात्र असेल.

**७) संचालकासाठी अपात्रता**

- एखादा संचालक हा थकबाकीदार अथवा अक्रियाशील असेल, दुसऱ्या नागरी बँकेचा किंवा नागरी पतसंस्थेचा संचालक असेल, सहकारी कायदा ७९अ खाली त्याच्यावर कारवाई झाली असेल, त्या संचालकाच्या विरोधात २/३ अविश्वास ठराव मंजूर झाला असेल, मागील पाच वर्षात एक वर्षापेक्षा अधिक काळ शिक्षा झाली असेल आणि तीन सलग संचालकांच्या सभांना विनापरवानगी गैरहजर किंवा दोन वार्षिक सर्वसाधारण सभांना गैरहजर रहिल्यास संचालक पद आपोआप रद्द होईल.

९७ व्या घटनादुरुस्तीच्या उपाययोजनेमुळे सहकार क्षेत्रात खालील परिणाम दिसू लागले.

१. सहकार चळवळी नवीन पद्धतीत चकाकू लागली.
२. क्रियाशील सभासदास महत्त्व प्राप्त झाले.

३. सहकारी संस्थांची गुणात्मक वृद्धी होण्यास व त्या सभासदांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्यास वाव मिळू लागला.
४. सहकाराचा स्वाहाकार करणाऱ्यांना आळा बसला.
५. वसुलीच्या अधिकारामध्ये वाढ झाली.
६. स्वयत्ततेचे अधिकार मर्यादित झाले.

आजमितीस सहकारी संस्थांची सद्यस्थिती अभ्यासता ती फारशी समाधानकारक नाही, असे लक्षात येते. सहकारी संस्था सक्षम असल्याशिवाय त्याचा लाभ सर्वसामान्य जनतेस मिळणार नाही. या सर्वप्रकारच्या संस्था टिकविणे हे लोकशाही, समानता व कल्याण साधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संदर्भ सूची**


१) गाडगीळ धं. रा., सहकारी चळवळीचे समालोचन, सुलभा ब्रह्मे संपादित धं. रा. गाडगीळ लेखसंग्रह, खंड-२.

२) घाणेकर वि. वि. (२००४), सहकार चळवळीचे १०० वर्षाचे अवलोकन, प्रथमावृत्ती.

३) डॉ. रूपा शहा व डॉ. बी. एच. दामजी (२०१९), 'सहकार', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४) हिरालाल वामन चव्हाण (२०१५), महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा विकास, 'अर्थसंवाद', ऑक्टोबर-डिसेंबर २०१५, खंड-३९, अंक-३.

५) क्षीरसागर पां. रा., हवालदार ज. ब., भगत भा. तु., सहकारी समित्यांचे अहवाल, १९७३.

६) Indian Cooperative Movement A Statistical Profile, 15th Edition, 2018.

७) Prof.S.K.Kulkarni(2015), 'Cooperative Development', Fadake Prakashan, Kolhapur.


◆

---

ज्या दिवशी उत्पादनाची साधने विपुल प्रमाणात उपलब्ध होतील त्या दिवशी या जगातून अर्थशास्त्र अदृश्य होईल. परंतु तो दिवस कधीच उजाडणे शक्य नाही.

**- जोअेफ मॅकना**

---

# केंद्र व राज्य शासनाच्या जलधोरणाची मीमांसा

**गजानन गं. भारती** †

**प्रस्तावना**

जलधोरणात पाण्याचे नियोजन, संवर्धन व वितरण महत्त्वाचे ठरते. मूलत: सृष्टीवरील सर्व क्रिया-प्रक्रिया पाण्याशी संबंधित आहेत. जसे पिण्याचे पाणी, सिंचन, औद्योगिक उत्पादन, वीजनिर्मिती, बांधकाम, वनसंवर्धन, जैवविविधता अर्थात सजीवसृष्टी व विकासासाठी पाण्याची नितांत गरज आहे.

अलीकडे मान्सूनची अनिश्चितता पाहता भूपृष्ठीय जल असो वा भूजल ते दिवसागणिक घटत चालले आहे. त्याचा सजीवसृष्टीसह विकास कार्यावर प्रतिकूल परिणाम होत आहे. ही वस्तुस्थिती पाहता देशाच्या आणि महाराष्ट्राच्या जलधोरणाकडे विशेष लक्ष देण्याची व त्याची समीक्षा करण्याची खरी गरज आहे. मात्र या धोरणाचा अंमल व समीक्षेची प्रक्रिया केवळ शासन वा शासकीय अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत ठेवून चालणार नाही तर त्यासाठी अत्यंत सधन आणि अर्थपूर्ण असा लोकसहभाग असणे गरजेचे आहे. तसेच या धोरणाच्या समीक्षेत व फेर आखणीत जलस्रोतावरच्या सामूहिक हक्कांना अधोरेखित करणे, जुन्या जलधोरणातील पाणी वापराचा दोषपूर्ण प्राधान्यक्रम बदलणे आणि नवीन जलधोरणाची कार्यक्षम अंमलबजावणी करणे. सर्व ठिकाणच्या पाण्याचा मूळ जलस्रोत पाऊस अर्थात मान्सूनच आहे. परंतु हाच मान्सून अनिश्चित असेल तर कोणतेही धोरण कुचकामी ठरेल यात शंका नाही. पाणीप्रश्न कमी-अधिक प्रमाणात सर्वव्यापक आणि सदासर्वकाळ अस्तित्वात असतोच, त्यावर मात करणे किंवा विशेष अनुकूलता लक्षात घेऊन धोरण आखणे लाभदायी ठरते.

राष्ट्रीय धोरणे प्रत्यक्षात येण्यास व प्रचलित होण्यास वेळ लागतो, अर्थात धोरण कोणतेही असो त्यासाठी योग्य आराखडा, नियोजन, अंमलबजावणीची प्रक्रिया, आर्थिक पैलू आणि कालावधी अत्यंत महत्त्वाचा ठरतो, ही बाब शासकीय धोरणालाही लागू पडते. पाणी हे निसर्गदत्त संसाधन असून मानवाला विनामूल्य मिळालेली भेट आहे. पण मानव जेव्हा हीच बाब विसरतो तेव्हा त्याला त्याचे परिणाम भोगावेच लागतात. खरे तर मानवी जीवनामध्ये प्राणवायुनंतर पाण्याचाच क्रम लागतो, असेच पाण्याचे आर्थिक विकासातील महत्त्व लक्षात घेऊन देशात

† सहाय्यक प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.
आजीव सभासद क्र. : १३८४, भ्रमणध्वनी : ९७६४९९१५९७, ई-मेल : ggbharati67@gmail.com

स्वातंत्र्यानंतर जलधोरणाकडे विशेष लक्ष पुरवण्याचे कार्य शासनाने दिल्याचे स्पष्ट होते.

**भारताची पहिली भूजलनीती**

भारत सरकारने पहिले राष्ट्रीय जलधोरण ९ सप्टेंबर १९८७ ला जाहीर केले. त्यावर विविधांगी चर्चा करून अंतिमत: एप्रिल २००२ मध्ये सुधारित प्रतिमानाच्या रूपाने स्वीकारले. या जलधोरणात प्रारंभी पाणी हे अत्यंत महत्त्वाचे नैसर्गिक संसाधन असून राष्ट्रीय संपत्तीच्या स्वरूपात त्याचे नियोजन, विकास व व्यवस्थापन राष्ट्रीय हित लक्षात घेता झालेच पाहिजे असे स्पष्ट केले. या धोरणानुसार पाणी वापराचे प्राधान्य क्रम पुढीलप्रमाणे ठरले. १) पिण्यासाठी २) शेतीसिंचन ३) विद्युत ४) पर्यावरण रक्षण ५) उद्योगधंदे ६) जलवाहतूक व इतर. या अंतर्गत भूजलविषयी काही तरतुदी निश्चित केल्या गेल्या. त्या पुढीलप्रमाणे अ) विशिष्ट काळात भूजलसंग्रह, त्याच्या वाढीची शक्यता व पाण्याची गुणवत्ता तपासणे. ब) भूजल उपसा त्यात होणाऱ्या वाढीच्या प्रमाणापेक्षा कमी व्हावा. क) भूजल वापरात सामाजिक न्यायाचे पालन व्हावे, तसेच भूपृष्ठीय पाणी व भूजल यांचा संयुक्तिक वापर सुनिश्चित होईल, अशी खबरदारी जलप्रकल्पाच्या आखणीपासून ते अंमलापर्यंत घेतली जाईल. ड) समुद्रकिनाऱ्या लगतच्या भूजल साठ्यातून अतिरिक्त उपसा होऊन या साठ्यात समुद्राचे खारे पाणी शिरणार नाही, याची काळजी घेतली जाईल.

वास्तविक हे धोरण सामान्य असून भूजलाची मालकी व नियंत्रणाबाबत यात विशेष व स्पष्ट भूमिका दिलेली नाही, म्हणून ते प्रत्यक्षात आणणे कठीण आहे. सद्यस्थितीत केंद्र सरकार भूजल व्यवस्थापन व नियंत्रणाबाबत ठोस निर्णय घेत नाही, याचे कारण हा विषय राज्याच्या अधीन असून राज्यशासनानेच ठोस पावले उचलावीत असे गृहीत आहे.

**राष्ट्रीय जलधोरण व जलअभियान**

या धोरणाच्या अंमलबजावणी व देखभालीसाठी 'राष्ट्रीय जल बोर्डाची' स्थापना केली आणि २००९ मध्ये या मंडळाने हवामान बदलाला अनुसरून जलधोरणात बदलाची शिफारस केली. तत्पूर्वी २००८ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय हवामान बदल कृती योजनेअंतर्गत राष्ट्रीय जल अभियान सुरू केले. या अभियानाची उद्दिष्ट्ये-

१) जलसंवर्धनाला विशेष प्राधान्य देणे, पाण्याचा अपव्यय थांबविणे व पाण्याचे न्याय वाटप करणे.

२) हवामान बदलाची जलसपंत्तीवर झालेल्या परिणामाची अद्ययावत माहिती संकलित करणे.

३) जलसंवर्धन, जलभरण व संधारणासाठी लोकसहभाग आणि शासनाच्या कार्यामध्ये समन्वय साधणे.

४) जलउपयोजन कार्यक्षमता २० प्रतिशत वाढविणे व संवेदन क्षेत्राची विशेष काळजी घेणे.

या अभियानात हिमालय हिमखंडाचे घटते प्रमाण, अवर्षण व महापुराचे वाढते प्रमाण, भूजलदर्जा व त्याच्या पातळीतील घट, तसेच पाऊस व बाष्पीभवनाच्या बदलाचा भूजलावरील परिणाम आणि वाढत्या सागर पातळीमुळे किनारी प्रदेशात वाढलेले खाऱ्या पाण्याचे प्रमाण या बाबींकडे विशेष लक्ष देण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरून पाणी प्रश्न निकाली काढण्यासाठी सर्व पैलूचा विचार करून शासनाने अनेक योजना आणल्या व त्यासाठी सतत प्रयत्न केलेले आहेत. जसे की दुष्काळ व महापूर नियंत्रणार्थ, नदी जोड योजना, कालवे कंठमणी योजना, आंतरखोरे जोडणी योजना इत्यादी, तसेच जलविकास व नियोजनासाठी काही निकष दिलेले आहेत. ज्यामध्ये पाणी वापराचा अधिकार अबाधित राखणे, राष्ट्रीय

पाणी मंडळ अधिक कार्यक्षम बनविणे, आंतरराज्य व शेजारी राष्ट्राशी जे पाणी वाटप करार झाले आहेत ते अबाधित ठेवून भावी वाटाघाटी निश्चित करणे, या शिवाय शासनास देशात विशिष्ट भूस्तर रचनेमुळे धरणे बांधणे व जलसंग्रह निर्माण करणे कठीण असते, अशातच आर्थिक व इतरही मर्यादा येतात. अशावेळी लहान, मध्यम व मोठे जलसाठे निर्माण करता येतील अशा जागेचा शोध घेणे, सिंचन, विद्युत, जलवाहतूक व पूरनियंत्रण अशा विविध उद्योगांसाठी नव्या प्रकल्पाची निर्मिती करणे. पाण्याची भविष्यातील मागणी व गरज लक्षात घेऊन आंतरखोरे व आंतरराज्य पाणी हस्तांतरण धोरण ठरविणे. पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन व वनक्षेत्र विस्तारासाठी निधी उभारणे व जनजागृती करणे. उद्योग व नागरी वापरासाठी पाण्याला अग्रक्रम देतानाच प्रदूषण नियंत्रणासाठी धोरण आखणे अशा योजना व प्रकल्पामुळे जे लोक भूमिहीन होतील, घरेदारे व गावे सोडावे लागतील त्यांचे त्वरित पुर्नवसन करून पर्याप्त जागा व सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे इत्यादी कार्य पार पाडावी लागतात. अर्थात, व्याप्तीने मोठ्या आणि गुंतागुंतीच्या धोरणात प्रत्येक टप्प्यात यश मिळेलच असे नाही.

**महाराष्ट्र राज्याचे जलधोरण**

राज्य शासनाने जुलै २००३ मध्ये जलधोरणाची रूपरेषा आखली. ज्यामध्ये कलम ३.३ नुसार विपुल पाणी असलेल्या खोऱ्यातून कमी पाणी असलेल्या खोऱ्याकडे पाणी आणण्याची तरतूद केली. पुढे २००६ मध्ये सुधारित जलधोरण जाहीर केले आणि डॉ. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र जलसिंचन' आयोगाने पुढील खोऱ्यांचा पाठपुरावा करावा अशी शिफारस केली. वैतरणा-उत्तर कोकण, ऊर्ध्वकृष्णा, दमण गंगा, पार, मध्य वैनगंगा, ऊर्ध्व गोदावरी, उर्वरित भीमा, गोदावरी निम्मस्त्रोत या उपक्रमाला सहाय्यक व पूरक विकासाची जोड द्यावी व मुक्तपणे समुद्रात वाहून जाणाऱ्या जलसंपत्तीला नियोजनबद्ध अडवून तिचा पर्याप्त वापर करावा. त्या दृष्टीने महाराष्ट्र पाणी परिषदेने टोपोशिट्सचा (वनविभागाच्या क्षेत्रनिहाय नकाशाच्या प्रती) सखोल अभ्यास करून योग्य असे १३ प्रस्ताव बनविले. यानुसार काम केल्यास अल्पकालीन १७० व दीर्घकालीन २०० अब्ज घनफूट पाणी उपलब्ध होऊ शकेल. त्यासाठी पर्याप्त जलसाठे आणि उपसासिंचन योजना तयार करून त्यातूनच वीजनिर्मिती करावी अशी रूपरेषा २००३ च्या धोरणात होती. तसेच मुंबईच्या पाण्याची व्यवस्था, कोकणातील पाणी नियोजन, विदर्भ व मराठवाड्याचा पाणी प्रश्न, तापी खोरे व उत्तर महाराष्ट्र असा विभागनिहाय स्वतंत्र विचार केला गेला.

या धोरणात पाणलोटक्षेत्र विकास, पाणी अडविणे व जिरविणे, पाणी वापरातील काटकसर, ठिंबक सिंचनावर भर या बाबी पूर्णक्षमतेने करण्याचे ठरले. शिवाय सांडपाण्याचा पुनर्वापर, त्याचे शुद्धीकरण, त्यासाठी कठोर कायदे, सिंचन प्रकल्प जलव्यवस्थांचा कार्यक्षमतेने वापर, किमान पाणी लागणारे पिके, त्यासाठी संशोधनावर भर, जलवाटपात लोकसहभागाला प्राधान्य अशा तरतुदी आहेत. मोठी धरणे, नद्या जोडणी, जल विद्युत प्रकल्प अशी मोठी कामे केवळ शासनच पूर्ण करू शकते म्हणून जलधोरणात या बाबींना केवळ प्राधान्य देऊन चालत नाही, तर त्याची योग्य वेळेत प्रामाणिकपणे कार्यक्षम अंमलबजावणी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१३ चौ.कि.मी. असून भारतीय क्षेत्रफळाच्या ९.३ प्रतिशत आहे. यापैकी ५८ प्रतिशत लागवडीखाली असते, या लागवड क्षेत्राच्या ६१ प्रतिशत क्षेत्र अवर्षणग्रस्त असून केवळ १८ प्रतिशत क्षेत्राला सिंचन सुविधा उपलब्ध होते. अर्थात ८८

प्रतिशत क्षेत्र निव्वळ पावसाच्या पाण्यावर विसंबून आहे. राज्यात देशाची तुलना करता सर्वाधिक धरणे असतानाही सिंचनाची आणि पिण्याच्या पाण्याची उन्हाळ्यामध्ये बोंबाबोंब असते. राज्यात जंगलव्याप्त क्षेत्र केवळ १७ प्रतिशत आहे. जे किमान ३३ प्रतिशत असणे गरजेचे आहे. जंगलव्याप्त क्षेत्र कमी असल्याने पर्यावरणीय समतोल ढासळतो आणि विविध विकास कामावर त्याचा विपरित परिणाम होतो.

राज्यात आजही ६४ लाख शेतकरी अल्पभूधारक आहेत. म्हणून जलधोरणात सिंचन व्यवस्थेबरोबरच वाढत्या लोकसंख्येची पिण्याच्या पाण्याची वाढती गरज व अन्य बाबीसाठीची गरज विचारात घ्यावीच लागते. म्हणून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य दिले गेले. जनगणना २०११ नुसार राज्याची लोकसंख्या ११ कोटीच्या वर असून यापैकी ५५ प्रतिशत ग्रामीण तर ४५ प्रतिशत लोक नागरी भागात वास्तव्यास आहेत.

**राज्याच्या जलधोरणात विविध क्षेत्रासाठी तरतूद**

राज्याच्या जलधोरणात पहिला क्रम पिण्याच्या पाण्याला व घरगुती वापराला आहे. मात्र दुसरा क्रम शेतीऐवजी उद्योगाला दिला गेला. उलट भारताच्या जलधोरणात (२००२) शेतीला दुसरा प्राधान्यक्रम आहे. मात्र कृषिप्रधान महाराष्ट्राच्या जलधोरणात शेतीला तिसरा प्राधान्यक्रम का देण्यात आला, ज्यामुळे शेतीला दुय्यम स्थान मिळून शेतीसाठी राखीव असलेले पाणी उद्योगाकडे वळविले जात आहे आणि शेती पाण्यावाचून भकास होत आहे. वाटेल तिथे शेत जमिनी संपादन करून हजारो हेक्टरवर 'सेझ' प्रकल्प, ॲम्बी व्हॅली, लवासा सिटी यासारखे चंगळ प्रकल्प उभारले जात आहेत. या सर्वांना चैनीसाठी जादा पाणी पुरवताना मात्र पिण्याचे व शेतीचे पाणी पळविले जात आहे. ज्याचा विपरित परिणाम शेती, समाजजीवन आणि जलधोरणाच्या उद्देशावर होत आहे. राज्यात कृषीत्तर सर्व उद्योगामध्ये जेवढी रोजगार संख्या आहे त्यापेक्षा कैकपटींनी जास्त रोजगार शेतीमध्ये लोकांना मिळतो. हे वास्तव शासन व नियोजनकर्ते का विसरतात. या उलट राष्ट्रीय जलधोरणात वास्तव बाब लक्षात घेऊनच शेतीला व स्थानिक संसाधनावर आधारित ग्रामीण उपजीविकांना पाणी वाटपात प्राधान्य दिलेले आहे. इतरही अनेक राज्यांनी त्याचेच अनुकरण केलेले आहे. परंतु महाराष्ट्रात पाणी वाटपाबाबत शेतीवर अन्यायच झालेला आहे. ही बाब चिंतनीय असून शेती आणि शेतकऱ्यांची दैनावस्था पाहता धोरणाअंतर्गत बदलाची नितांत गरज आहे.

राज्याच्या जलधोरणात चौथा प्राधान्यक्रम पर्यावरणीय व पर्यटनासाठी दिलेला आहे. वस्तूत पर्यटन जलक्रीडा आदी मनोरंजनात्मक उपक्रमात पर्यावरणाची काही ना काही हानीच होत असते. तरीही या दोन भिन्न बाबींचे मूल्यमापन एकाच मापदंडाने करणे चुकीचे आहे. पाणी विकासाच्या व वाटपाच्या प्रक्रियेत सर्वसामान्य लोकांचा, स्त्रियांचा व शेतकऱ्यांचा प्राधान्याने सहभाग असायलाच हवा. याशिवाय जलधोरणाची एक बाजू म्हणजे धरणाचे कालवे व चाऱ्यांच्या देखभालीची जबाबदारी पाणी वापरकर्त्यांच्या संस्थानवर सोडून मोकळे होते. हे धोरण पाणी पुरवठादारांना (कंत्राटदार) व्यापारी तत्त्वावर घाऊक दराने पाण्याचे हक्क प्रदान करते. तसेच त्यांनी आपले हक्क इतर कोणत्याही प्रकारच्या वापरासाठी इतरांकडे हस्तांतरित करण्याची वा विकण्याची बेजबाबदार तरतूदही करते. अर्थात, पाणी वापरासाठी घालून दिलेला प्राधान्यक्रम काहीही असो पण या धोरणानुसार हक्कधारकांना आपापले हक्क स्वत:च्या मर्जीप्रमाणे कोणासही विकता येतात. उदा. प्रथम प्राधान्यक्रमाने पिण्यासाठी व घरगुती वापरासाठीचे पाणी या हक्कदारांना चौथ्या प्राधान्यक्रमाच्या मनोरंजनपर वापरासाठीही विकता

येते. तसेच गावकऱ्यांना जास्त पैशाची लालूच दाखवून शीतपेय तयार करणारी एखादी कंपनी त्या गावचे पाणी सहज विकत घेऊ शकते आणि मग सामान्य जनतेची फसवणूक होते. अशा अनेक विपरित तरतुदी असलेल्या या जलधोरणाने महाराष्ट्रात २००३ साली नव्या प्रस्तावित पाणी बाजाराचा भक्कम पाया भरला गेला.

वास्तविक पाण्यास विक्रीयोग्य आर्थिक वस्तू मानणे हेच मूलतः चुकीचे आहे. कारण पाणी हे अनमोल प्राणरक्षक निसर्गदत्त संसाधन आहे. अशा पाण्याचे बाजार हक्क प्रदान करणे व खरेदी-विक्रीला अनुमती देणे म्हणजे निसर्गप्रदत्त जलसंसाधनावर धनिकांची मक्तेदारी निर्माण करणे होय. ज्यामुळे गरिबांचे शोषण व सजीवसृष्टीला हानिकारक ठरेल, याशिवाय राज्यसंस्थेने पाणी विकास व वाटपाच्या जबाबदारीतून अंग काढून घेणे म्हणजे खाजगी उद्योजकाचे नफा-तत्त्व पाण्यालाही लागू होईल आणि सामाजिक गरज टाळून पाणी वितरण अन्यायकारक होईल. गरजेऐवजी मागणीधारीत पुरवठा व्यवस्था आणल्यास विक्रयप्रधान बाजारपेठेत भ्रामक मागणी वाढविली जाईल त्यामुळे एकूणच पाणी विकास व वाटप व्यवस्था अन्यायकारक, दिशाहीन व अकार्यक्षम होईल. खरेतर जनहित लक्षात घेता सार्वजनिक क्षेत्राच्या अकार्यक्षमतेवर खाजगीकरण हा उपाय होऊच शकत नाही. वास्तवात खाजगीक्षेत्र बहुधा सार्वजनिक संपत्तीचाच वापर करीत असते. (उदा. जमीन, अनुदाने, करसवलती, परती, मोफत वीज, पाणी) परंतु या प्रसंगी केलेल्या चुकांचे उत्तरदायित्व मात्र ते नाकारतात.

२००३ मध्ये अनेक लोक संघटनांनी हे सर्व मुद्दे मांडून असा आग्रह धरला होता की, नैसर्गिक संसाधनाबाबत कोणतेही धोरण किंवा कायदे आणताना त्यांच्या मसुद्यावर व्यापक चर्चा करावी आणि लाभधारकांची व सर्वसामान्य लोकांची मते घ्यावीत, परंतु या आक्षेप व आग्रहाकडे पूर्णतः दुर्लक्ष करून त्यावेळी महाराष्ट्रात हे जलधोरण लागू केले गेले. या जलधोरणाअंतर्गत आणि जागतिक वित्तसंस्थांच्या दबावात २००५ साली राज्य विधिमंडळाने 'जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम-२००५' हा कायदा पारित केला. त्यानुसार नियोजनापासून अंमलबजावणीपर्यंतचे सर्व अधिकार या प्राधिकरणास प्राप्त झाले. त्याची आजपर्यंतची वाटचाल नफा तत्त्वावरील पाणी बाजाराला उदार चालना देणारी असल्याने सर्वसामान्य पाणी वापरकर्ते चिंता व्यक्त करीत आहेत.

**या धोरणांतर्गत काही महत्त्वाचे दोष**

१) धोरणाची आखणी ज्या निकषावर झाली ते निकष पूर्ण झाले नाहीत.
२) गरजू व सर्वसामान्य लोकांचे हित जोपासण्यास हे धोरण अपयशी ठरले.
३) मोठे शेतकरी, उद्योगपती व ठेकेदारांचे हित जपणारे धोरण.
४) पाण्याला विक्रीयोग्य वस्तू म्हणून मान्यता प्रदान करणारे धोरण.
५) पाणी टंचाईचा सामना करण्यात असमर्थ.
६) प्रकल्प रखडणे व दिरंगाईमुळे अपेक्षित लाभ न मिळता केवळ खर्चात वाढ.
७) प्रकल्पाचा लाभ केवळ आजूबाजूच्या शेतकऱ्यांना व लोकांना झाला.
८) या योजना व प्रकल्पामुळे जे शेतकरी भूमिहीन झाले वा घरेदारे सोडावी लागली त्यापैकी अनेकांना पुनर्वसनाचा लाभ मिळाला नाही.
९) पाणी वाटपाचे अनेक प्रश्न कायम वादात राहिले.
१०) प्रादेशिक पाणी अनुशेष प्रश्न अजूनही कायम आहे.

वास्तविक पाण्याची सर्वांगीण गरज लक्षात घेता पाण्याशी संबंधित समस्येची मूलभूत कारणे शोधून, त्यांचा सखोल अभ्यास करून त्यावर पर्याप्त

उपाययोजना करणारे, वर्तमानपिढी तसेच भविष्यकालीन पिढीसह विकासाला पोषक ठरणारे दीर्घकालीन असे सर्वसमावेशक जलधोरण आखणे व त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे तरच पाण्याशी संबंधित सर्व प्रश्न मिटतील आणि सामाजिक लाभाची फलश्रुती मिळेल.

**नवे सुधारित जलधोरण**

महाराष्ट्रात २००३ नंतर २०१२ मध्ये नवे जलधोरण जाहीर केले. हे राष्ट्रीय जलधोरण २०१२ शी सुसंगत आहे. ज्यामध्ये सुसंगतता, लवचिकता आणि व्यापकतेवर अधिकभर देण्यात आला. २००३ च्या जलधोरणात वाढते शहरीकरण, औद्योगिकरण आणि सिंचनाचा गांभीर्याने विचार केला गेला नाही. त्यामुळे ज्या समस्या निर्माण झाल्या त्याचा आढावा २०११ मध्ये घेण्यात आला व त्यावर उपाय म्हणून २०१२ चे नवे जलधोरण जाहीर केले.

या धोरणात पाण्याचा प्रभावी वापर, पाण्याची बचत, सर्वांना पाणी तसेच घरगुती पाणी वापरात पाळीव जनावरांच्या पाण्याचा विचार आणि समावेश केला गेला. एकूणच २००३ च्या धोरणात ज्या त्रुटी राहिल्या होत्या त्यामुळे विविध विकासकार्यात आणि योजनांमध्ये अडथळे येत होते ते दूर करणे गरजेचे होते. विशेषत: राज्यासमोरील जी आव्हाने होती त्यामध्ये (१) पाण्याची मागणी - पुरवठ्यात मोठी तूट होती. (२) अनिश्चित पाण्याची उपलब्धता.(३) काही भागात पाणी वापरावर अधिक मर्यादा होती. (४) अलीकडे पूर व अवर्षण समस्येत वाढ. (५) निर्मित सिंचनक्षमता व प्रत्यक्ष वापरात मोठी तूट. (६) चिंताजनक भूजल पातळीतील घट. (७) नागरी भागात वाढता पाण्याचा अपव्यय. (८) पाण्याची खालावलेली गुणवत्ता. (९) मानवी चुका व निसर्गातील हस्तक्षेपामुळे नैसर्गिक जलसाठे धोक्यात आले. (१०) मानवी स्वार्थापोटी नद्या, नाले, ओहोळ, अतिक्रमणाच्या कचाट्यात आली. इत्यादी आव्हाने शासनास पेलावी लागणार. ही बाब वाटते एवढी सोपी नव्हती म्हणून जलधोरणात योग्य ते बदल करणे गरजेचे होते. त्यानुसार शासनस्तरावर राज्यात काही सुधारणा केल्या गेल्या. मात्र अलीकडे पुन्हा केंद्र सरकारने राज्याला नवे जलधोरण जाहीर करण्याचे सुचविले. म्हणून शासनाच्या राज्य जलसंपदा विभागाने ५ सप्टेंबर २०१९ ला सुधारित जलधोरण जाहीर केले. २० पानांच्या या नवीन जलधोरणात एकात्मिक जलव्यवस्थापन, जलगुणवत्ता व्यवस्थापन, कृषी पाणी वापराचे व्यवस्थापन, औद्योगिक पाणी वापर, गोड्या पाण्यातील मत्स्यशेती, पर्यटनाचे पाणी, जहाज किंवा विमान चालन, पाणलोट क्षेत्र विकास, आदी प्रमुख मुद्यांचा विचार केला गेला. राज्यात लागवड योग्य क्षेत्र २२५ लक्ष हेक्टर असून त्यापैकी १२६ लक्ष हेक्टर क्षेत्र (५६ प्रतिशत) सिंचनाखाली आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. त्याकरिता उद्योगातील गोड्या पाण्याचे प्रमाण मर्यादित करून त्याचा वापर शेतीक्षेत्रात वाढविण्याचे ठरले. तसेच परंपरागत खुल्या सिंचन व्यवस्थेला त्यागून बंद नलिकेतून पाणी पुरविणे, जास्तीत जास्त ठिकाणी सूक्ष्मसिंचनाचा वापर करणे, केळी व उसाखालील क्षेत्रात संपूर्णपणे सूक्ष्मसिंचनाद्वारे पाणी पुरविणे, तुटीच्या किंवा दुष्काळी खोऱ्यामध्ये, इतर खोऱ्यामधून पाणी वळविणे इत्यादी बाबींवर भर देण्यात आला आहे. पाणी वापराच्या संदर्भात पिण्याच्या पाण्याचा वापर हा त्या-त्या रहिवाशी क्षेत्रानुसार वेगवेगळा ठेवणे आणि त्या भागातील जनावरांसाठी आवश्यक पाण्यालाही या धोरणात विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

थोडक्यात, नवे जलधोरण २००३ च्या जलधोरणापेक्षा अधिक सक्षम व सरस आहे. तसेच उद्योगाच्या तुलनेत या धोरणात शेतीकडे विशेष लक्ष पुरविले आहे.

**नवीन जलधोरणाची वैशिष्ट्ये**

१) सिंचनक्षेत्र वाढीसाठी पाण्याच्या बचतीबरोबरच पीक पद्धती बदलणार.

२) सूक्ष्मसिंचनाला अधिकाधिक प्रोत्साहन देऊन स्वयंचलित सिंचन व्यवस्था उभारणीला प्राधान्य.

३) बाष्पीभवन व उत्सर्जन कमी करण्यासाठीच्या किफायतशीर यंत्रणा उभारण्यावर भर.

४) कार्पोरेट क्षेत्र, उद्योग क्षेत्र व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समन्वयातून जलसंपत्ती संवर्धन निधी उभारणार.

**समारोप**

जागतिक कोणत्याही देशात पाणी वापराचे प्रमाण केवळ पिण्यासाठी व स्वच्छतेसाठी लागणाऱ्या पाण्याच्या मात्रेवरून ठरत नाही तर देशातील नागरिकांच्या उपभोगासाठीच्या वस्तू आणि सोयीसुविधा यांच्या निर्मितीसाठी किती पाणी खर्च होते यावरून ठरते. अशा पद्धतीचा उपभोग ज्या देशात वाढता असतो तिथे पाण्याची टंचाई भासू लागते. ही बाब जलधोरणात प्रतिबिंबित असावी लागते. कारण भारत हा अवघ्या जगात सर्वाधिक पाणी वापरणारा देश आहे. उदा. भारत - १३ प्रतिशत, चीन - १२ प्रतिशत, अमेरिका- ९ प्रतिशत. यावरून देशात पाण्याला प्रचंड मागणी आहे. त्यासाठी आज प्रभावी जलधोरणाची गरज आहे.

देशात घटते वनांचे प्रमाण, जमीन खोदाई, खाणकाम, पायाभूत सोयींचा विकास, पाण्याचा अतिरिक्त उपसा, जमिनीचे क्षारीकरण, रासायनिक शेतीची वाढ, पर्यावरण असंतुलन, कारखान्याचे दूषित सांडपाणी, स्वच्छतेचा अभाव यामुळे देशात प्रचंड जलप्रदूषण वाढत आहे. म्हणून शुद्ध पाण्याची स्थिती गंभीर बनत आहे. यावर नियंत्रणासाठी सर्वव्यापक धोरणाची व कठोर कायद्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणींची गरज आहे ती या नव्या धोरणात अपेक्षित आहे. एकूणच २००३ पासून चालत आलेल्या जलधोरणाला अखेर मूठमाती देऊन, जुन्या धोरणातील सर्व त्रुटी व दोष कमी करण्याच्या हेतूने व्यापक व सर्व समावेशक धोरण आखले गेले. नव्या धोरणात महापूर आणि अवर्षणाची समस्या हाताळण्याबरोबरच पाण्याची उत्पादकता वाढविण्याचे ध्येय या जलधोरणात समाविष्ट करण्यात आले. याशिवाय राज्याच्या २०१९ च्या जलधोरणानुसार जे जलआराखडे तयार होतील, त्यामध्ये काही बदल करावयाचा असेल किंवा काम करावयाचे असेल तर त्यासाठी महाराष्ट्र जलमंडळ व राज्य जलपरिषदेची मान्यता किंवा परवानगी लागेल. अशा नव्या स्वरूपात आणि सुधारित जलधोरण जाहीर झाले असले तरी त्याची यशस्विता येणाऱ्या काळात त्याच्या वास्तव अंमलबजावणी आणि सामाजिक लाभावरूनच ठरेल. समजा, जर असे झाले नाही तर अस्तित्वातील पाण्याच्या समस्येची जटिलता अधिकच गुंतागुंतीची आणि गंभीर बनेल यात दुमत नाही. एकूणच नव्या जलधोरणाची रूपरेषा आणि त्या अंतर्गत असलेल्या उपाययोजना भावी आव्हाने पेलण्यास सहज यशस्वी होईल अशी अपेक्षा आहे.

**संदर्भ सूची**


१) धाराशिवकर मुकुंद : दुष्काळ भेडसावतोय, मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ, पुणे (२०१२).

२) दिवाण विजय : लेख - 'कहाणी पाण्याची सक्तीच्या अधिग्रहणाची', समाज प्रबोधन पत्रिका, समाज प्रबोधन संस्थेचे प्रकाशन, बेळगांव. (२००९).

३) राजपूत करमसिंह : महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, साई ज्योती प्रकाशन, कसारपुरा, नागपूर. (२०१७)

४) दैनिक सकाळ, प्रादेशिक २५ जाने. २००८.

५) https ://pib.gov.in

६) https : //wrd.maharashtra.gov.in


◆

# चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकास : पाहणी अभ्यास

**रवींद्र बा. शेंडे** †

**प्रस्तावना**

भारत हा खेड्यांचा शांतताप्रिय देश आहे. पश्चिमेकडे चला, शहरांकडे चला, खेड्यांकडे चला यामध्ये खेड्यांकडे चला हा संदेश जास्त महत्त्वाचा वाटतो. कारण शहरांच्या तुलनेत खेड्यांमध्ये आजही अधिक जिवंतपणा पाहायला मिळतो आहे. सर्वसमावेशक ग्रामीण विकासाबाबत मागच्या पिढ्यांनी मोठे योगदान दिले आहे आणि वर्तमान पिढीचे योगदान सुरू आहे. परंतु मागच्या काही दशकापासून सुरू असलेला विकास हा सर्वसमावेशक आहे किंवा नाही ते तपासणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतर अनुकूल व प्रतिकूल घटना घडलेल्या पाहायला मिळतात. अनुकूल घटनांमध्ये राज्यघटना, नीती(नियोजन) आयोग, केंद्रीय बँकेचे राष्ट्रीयीकरण, हरितक्रांतीचा प्रयोग, बँकांचे राष्ट्रीयीकरण इ. अशा अनुकूल घटना तर प्रतिकूल घटनांमध्ये भारत-चीन युद्ध, भारत-पाकिस्तान युद्ध, राष्ट्रव्यापी दुष्काळ, राष्ट्रीय आणीबाणी, १९९० चे मोठे आर्थिक संकट, यामध्ये अनुकूल घटनांपेक्षा प्रतिकूल घटना मोठ्या प्रभावी असल्यामुळे पुढे खा-ऊ-जा धोरणाचा प्रभाव सुरू झाला आणि त्यामुळे होत असलेला विकास देशात, राज्यात, जिल्ह्यात, तालुक्यात आणि गावात सर्वसमावेशक आहे का? या संपूर्ण वातावरणामुळे ग्रामस्थांची अंतिम आणि प्रत्यक्ष कार्यक्षमतेत फरक आहे काय? फरक असेल तर गळत्या दुरुस्त करण्यासाठी कोणते उपाय वापरता येईल या संपूर्ण बाबींचे आर्थिक अध्ययन करण्यासाठी हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला.

**सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचे ढोबळमानाने उदाहरण**

कोंबडी आणि तिची पिल्लं. कोंबडी आपल्या पिलांचा सांभाळ करीत असताना ती जी भूमिका वठविते व पिल्लं जे सहकार्य करतात (कोंबडी प्रत्येक पिलांची काळजी घेते आणि विशेषत: दुर्बल पिलांची ती विशेष काळजी घेते. सामान्य व संकट परिस्थितीत सर्व पिलांना एकत्र घेते व जो सुटलेला आहेत त्याची विशेष काळजी घेतांना दिसते.) एकमेकांना करीत असलेले सहकार्य सर्वसमावेशक विकास आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचे चांगले उदाहरण आहे. थोडक्यात, ग्रामीण परिसरातील सर्वांचा आणि

† अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर.
आजीव सभासद क्र. : १७५९, भ्रमणध्वनी : ९७६५९२६४५४, ई-मेल : shende.ravindra3@gmail.com

विशेषत: दुर्बल घटकांचा विकास किंवा सर्वांची प्रगती म्हणजे सर्वसमावेशक ग्रामीण विकास ( Inclusive Rural Development) होय.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

१) ग्रामीण संस्कृतीचे 'सर्वसमावेशकता' हे वैशिष्ट्य आहे, याचा अभ्यास करणे.

२) सर्वसमावेशक ग्रामीण विकासाची सहकार आणि पंचायतराज महत्त्वपूर्ण साधने आहेत, याचा अभ्यास करणे.

३) चंद्रपूर जिल्ह्यातील आगामी ग्रामीण उदरनिर्वाहासाठीच्या प्रभावी मागणीचा अभ्यास करणे.

४) सर्वसमावेशकता आणि विकास एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यामुळे उत्तरआधुनिकतेच्या दृष्टिकोनातून सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा अभ्यास करणे.

५) चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकासासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गृहीते**

१) चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामस्थ पर्याप्त पायाभूत सुविधांच्या अभावामुळे केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यशैलीवर अंशत: समाधानी आहेत.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनाकरिता प्राथमिक सामुग्रीसाठी अनुसूची या तंत्राचा वापर तर दुय्यम सामुग्रीसाठी इंटरनेट, अहवाल, पुस्तके अशा निवडक साधनांचा वापर करण्यात आला. गैरसंभाव्यता पद्धतीमधील 'सहेतुक नमुना' पद्धतीचा वापर करून नमुना निवड केली आहे. या अभ्यासाकरिता चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील ३ गावे व प्रत्येक गावातून १० कुटुंबांची निवड करण्यात आली. चंद्रपूर जिल्ह्यात १५ तालुके असल्यामुळे अशारीतीने समग्रातून ४५० नमुने निवडण्यात आले.

**विषयाचे विश्लेषण**

सर्वसमावेशक ग्रामीण विकास आणि चंद्रपूर जिल्ह्याचा समग्र आढावा.

सर्वसमावेशक वृद्धी व कल्याणकारी राज्य या दोन्ही संकल्पना परस्परपूरक आहे. या दोन्ही संकल्पनांचा विचार नव्याने होत असला तरी प्राचीन काळापासून निरनिराळ्या स्वरूपात चालत आलेल्या आहेत. रामराज्य, कौटिल्याची आदर्श शासन व्यवस्था तर आधुनिक काळातील ए.पी.जे.अब्दुल कलाम, डॉ. एम.एस. स्वामीनाथन व वर्गिस कुरियन यांच्या स्वप्नातील भारत या संकल्पनांचा मूळ गाभा कल्याणकारी राज्य व सर्वसमावेशक वृद्धी आहे. तसेच राममनोहर लोहिया, अब्राहम लिंकन, अमर्त्य सेन, मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला या विचारवंतांचा दृष्टिकोन कल्याणकारी राज्य होता. यावरून असे लक्षात येते की, प्रत्येक अर्थव्यवस्थेत सुरुवातीपासूनच सर्वसमावेशक विकासाचा प्रवास सुरू आहे आणि दैनंदिन जीवनात लोकांनी त्यांची जीवन जगण्याची व काम करण्याची पद्धत बदलविणे म्हणजे सर्वसमावेशक ग्रामीण विकास होय. ज्या प्रक्रियेमुळे ग्रामीण भागातील शेवटच्या पात्र व्यक्तीलासुद्धा आर्थिक, सामाजिक अशा सर्व जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी संधी मिळते. असा व्यापक प्रयत्न म्हणजेच सर्वसमावेशक ग्रामीण विकास होय.

**चंद्रपूर जिल्ह्याचा समग्र आढावा**

चंद्रपूर जिल्ह्याचा पाया घालण्याचे काम गोंड राजा खांडक्या बल्लाळशहा याने इ.स.१४८० मध्ये केले. लोकपूर, इंद्रपूर, चंद्रपूर, चांदा अशी विविध नावे या जिल्ह्याला मागच्या काळात मिळाली. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर चंद्रपूर हे नाव देण्यात

**तक्ता क्र. १ : चंद्रपूर जिल्ह्याचा समग्र आढावा**

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ | ११,४४३ चौ.कि.मी. |
| २ | एकूण लोकसंख्या (२०११) | २१, ९४, २६२ (पुरुष- ११, २०, ३१६ स्त्री- १०, ७३, ९४६) |
| ३ | लोकसंख्येची घनता (२०११) | १८१ व्यक्ति प्रति वर्ग किमी |
| ४ | स्त्री - पुरुष प्रमाण (२०११) | ९५१ : १००० |
| ५ | साक्षरता (२०११) | ८१.३५ टक्के |
| ६ | एकूण गावे (२०११) | १७९२ (लोकवस्ती -१४६३, निर्जन- ३२९) |
| ७ | एकूण ग्रामपंचायती व सभासद संख्या | अनुक्रमे ८४७ आणि ६६५२ |
| ८ | जिल्ह्यातील वनक्षेत्र (२०१४-१५) | ४८२२.६३ चौ.कि.मी., जिल्हा क्षेत्रफळाशी प्रमाण ४२ टक्के |
| ९ | पर्यटन स्थळांची एकूण संख्या | २५ (त्यापैकी सांस्कृतिक वारसा असलेली पर्यटन स्थळ १९), ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प विशेष |
| १० | हवामान | उष्ण व कोरडे (उन्हाळा हा दिवसेंदिवस कडक) |
| ११ | परिक्षेत्र व परिसीमा | उत्तर अक्षांश १८.४ अंश ते २०.५ अंश, पूर्व रेखांश ७८.५ अंश ते ८०.६ अंश<br>उत्तरदिशेला- भंडारा व नागपूर पूर्वेस- गडचिरोली जिल्हा<br>दक्षिणेस- तेलंगणामधील आदिलाबाद<br>पश्चिमेस- यवतमाळ जिल्हा वायव्येस - वर्धा जिल्हा |

**स्त्रोत -** जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन , जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. (२०१४-१५)

आले व ते कायम आहे. आज चंद्रपूर जिल्ह्यात १५ तालुके आहेत. चंद्रपूर जिल्ह्याचा समग्र आढावा तक्ता क्र. १ मध्ये दिलेला आहे. चंद्रपूर जिल्ह्याच्या समग्र आढाव्यावरून लक्षात येते की, 'जिल्हा समृद्ध व लोक गरीब' आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करून 'जिल्हा समृद्ध आणि लोक समृद्ध' हे समीकरण तयार करणे, शक्य असलेले निदर्शनास येते.

**सर्वसमावेशक ग्रामीण विकासाच्या पूर्वआवश्यक अटी व साधने**

ग्रामीण विकासाच्या पूर्वआवश्यक अटी

**अ) शिक्षण (मातृभाषेतून किमान शिक्षण)**

शिक्षण ही मानवाची प्राथमिक गरज आहे. शिक्षणाचा परिणाम पोषण, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा आणि निवारा इत्यादींवर घडून येतो. मिर्डाल, रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, विविध आयोग, शैक्षणिक धोरणे इत्यादीत नैतिकतेपासून तांत्रिकतेवर भर व अपेक्षा केलेली आहे. परंतु आज इंग्रजी माध्यम

शाळा व मराठी माध्यम शाळा यांच्या स्पर्धेत ग्रामीण भागातील मानवी भांडवल कमकुवत बनत जात आहे. त्यासाठी प्रथमता 'शिक्षकांची भूमिका' व 'मातृभाषेतून किमान शिक्षण' (मातृभाषेतून शिक्षणाचा अभाव म्हणजे पाणी नसलेल्या विहिरीत पोहण्याची कृती) या संकल्पनांचे सार्वत्रिकरण झाल्यास ग्रामीण उदरनिर्वाह सहज मोठा करता येईल. शिक्षण म्हणजे अज्ञान दूर करण्याचा प्रभावी मार्ग आहे असाही शिक्षणाचा व्यापक अर्थ लक्षात घेणे आवश्यक आहे.

**ब) पर्याप्त लोकसंख्या**

देशातील नैसर्गिक साधनसंपत्ती, तंत्रज्ञान, भांडवल, पायाभूत सुविधा, वित्तीय संस्था सामाजिक व सांस्कृतिक वातावरण अशा सर्व घटकांना अधिक गतिशील करण्याची क्षमता पर्याप्त लोकसंख्या या घटकात आहे.

अतिरिक्त लोकसंख्येच्या साहाय्याने आर्थिक विकास साधने म्हणजे पूर आलेल्या जमिनीवर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने घर बांधण्यासारखे आहे. तसेच अतिरिक्त लोकसंख्येच्या साहाय्याने विकास म्हणजे तारेवरची कसरत आहे. केव्हा तोल जाणार हे सांगता येत नाही. माल्थसपासून आजपर्यंत जो पर्याप्त लोकसंख्येचा विचार झाला आहे तो दीर्घकालीनदृष्ट्या फायद्याचा आहे. पर्याप्त लोकसंख्या निर्माण करण्याकरिता कुटुंब नियोजनातील दोष (उदा. विवाहित बाजू, अविवाहित बाजू आणि सरकार बाजू) शून्य करणे. तसेच 'शक्यतो उशिरा लग्न व हम दो हमारा एक' हे वर्जन वापरल्यास पर्याप्त लोकसंख्या निर्माण होईल. आज पर्याप्त लोकसंख्येसाठी सर्वच देश प्रयत्नशील आहे. भारत व ग्रामीण परिसरसुद्धा यासाठी अपवाद नाही.

**जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकासासाठी साधने**

**अ) सहकारी संस्था**

ग्रामीण विकासात सहकारी चळवळीस अनन्यसाधारण स्थान आहे. सहकार ही मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यानंतरही सहकाराचे महत्त्व आहे. केवळ सरकारी यंत्रणेवर अवलंबून राहून ग्रामीण विकासाचा प्रश्न सोडविणे कठीण असल्यामुळे खाजगी संघटनांचेही सहकार्य घेणे आवश्यक आहे. सरकारी व खाजगी संघटनांनी एकमेकांविषयीचे गैरसमज व पूर्वग्रह दूर करावेत. विकास कार्यात एकमेकांचे अस्तित्व मान्य करावे. सरकारी संघटनांनी खाजगी संघटनातील सेवावृत्ती, अनुभव व कौशल्य यांचा उपयोग विकास कार्यात करावा. बिनसरकारी संघटनांनीही सरकारी संघटनाकडून अनुदान, निधी घेण्यात कमीपणा मानू नये. भारतातील ग्रामीण विकासाचा प्रश्न सोडविणे अवघड आहे; परंतु अशक्य मात्र नाही. सेवाभावी संस्थेचा इतिहास, कार्ये जाणून घेतल्यानंतर लक्षात येते की, देश-विदेशातील सरकारी संघटना व खाजगी संघटना यात समन्वय साधण्यात शासकीय यंत्रणाच कमी पडलेली दिसते.

**ब) पंचायतराज**

लोकशाही शासनप्रणालीत पंचायतराज व्यवस्थेस अनन्यसाधारण महत्त्व आहे. लोकशाही विकेंद्रीकरणाची त्रिस्तरीय पद्धती म्हणजे पंचायतराज पद्धती होय. ग्रामीण भारताचा विकास झाला तर भारताचा विकास होईल. यादृष्टीने सामुदायिक विकास कार्यक्रम १९५२ मध्ये हाती घेतला. परंतु या उपक्रमाला ग्रामीण भागातून अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद न मिळाल्याने त्याचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी व त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने 'बलवंतराय

मेहता' यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. या समितीच्या अहवालानुसार, लोकशाही विकेंद्रीकरणाची त्रिस्तरीय योजना म्हणजे पंचायतराजची कल्पना विकसित झाली. महाराष्ट्रात १ मे, १९६२ पासून पंचायतराज कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली. सरकारने १९९२-९३ मध्ये ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांमध्ये वाढ केली. शहरी आणि ग्रामीण भागातील विकेंद्रित आणि लोकशाही तत्त्वावर आधारलेली शासन व्यवस्थेची पायाभूत रचना निर्माण करण्यासाठी संसदेचा हा निर्णय महत्त्वाचा ठरला आहे. केंद्रसरकार ते ग्रामपंचायत यामधील दुवे मजबूत असल्यास स्थानिक साधनांचा वापर पर्याप्त होऊन जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास मजबूत आणि समृद्ध होईल. यात तळपातळीला असलेले ग्रामनियोजनातील 'ग्रामसभेचे' महत्त्व उत्तरोत्तर कायदेशीररीत्या तसेच नैतिकदृष्ट्या समृद्ध करणे आवश्यक आहे.

सहकार आणि पंचायतराजने खऱ्या जादुगाराची भूमिका वठविणे आवश्यक आहे. खेड्यांचे अंतर्गत व बाह्य स्वरूप बदलविण्याची क्षमता या दोनही साधनात असल्यामुळे नैतिक व कायदेशीररीत्या ही साधने सदाकाळ मजबूत असणे आवश्यक आहे. थोडक्यात पूर्वआवश्यक अटींमध्ये (आर्थिक व आर्थिकेतर) प्रथमता दुरुस्तीकरण करून विविध साधनांचा वापर झाल्यास सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा प्रश्न सोडविणे सोपे आहे.

**आगामी ग्रामीण उदरनिर्वाह व प्रभावी मागणी**

केन्सच्या सिद्धांताचा आधार घेऊन आगामी ग्रामीण उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविता येते. केन्सच्या प्रभावी मागणी सिद्धांतातील व विशेषत: गुणक प्रक्रियेतील बरीच गृहीते ग्रामीण भागात पाहायला मिळतात. उदा. १) केन्सनी आपल्या सिद्धांतात व गुणक प्रक्रियेत अनैच्छिक बेकारी सांगितली आहे तर आपणास ग्रामीण भागात छुपी बेरोजगारी मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते. २) केन्सच्या सिद्धांतात औद्योगिक विवेचन आहे तर ग्रामीण भागात शेतीत व्यावसायिक दृष्टिकोन वापरला जात आहे. पीक विमाद्वारे, चांगल्या व्यवस्थापनाद्वारे नैसर्गिक व कृत्रिम आपत्तीला आळा घालता येत आहे. ३) अतिरिक्त कार्यक्षमता अस्तित्वात असते. हे केन्सचे गृहीत ग्रामीण भागात जसेच्या तसे दिसते. ग्रामीण भागातील अंतिम कार्यक्षमतेचा अजूनही वापर होत नाहीत. तसेच एक बी-टाकल्यानंतर हजार देण्याची ताकद शेतीकडेच आहे. ४) भांडवलाचा पुरवठा लवचिक हे केन्सचे गृहीत ग्रामीण भागात अनुकूल बनत आहे. स्वातंत्र्यानंतर सरकारी कर्जस्रोतांचा वापर वाढत आहे. गैरसरकारी कर्जस्रोत बंद होत आहे. यामुळे केन्सचा प्रभावी मागणीचा सिद्धांत ग्रामीण परिसरात वापरणे शक्य आहे.

प्रभावी मागणी = उपभोग खर्च + गुंतवणूक खर्च + सरकारी खर्च

प्रभावी मागणीतील प्रत्येक घटक परस्परपूरक असल्यामुळे, सर्वांचा वापर झाल्यास प्रभावी मागणीमार्फत ग्रामस्थांची अंतिम कार्यक्षमता व प्रत्यक्ष कार्यक्षमता यातील फरक नष्ट होतो. थोडक्यात, केन्सच्या प्रभावी मागणी आधारे ग्रामीण उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविता येतो.

**तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन**

विश्लेषण आणि निर्वचन हे दोन्ही परस्परावलंबी घटक आहे. वास्तविक निर्वचन हा विश्लेषणाचाच एक भाग आहे. क्रमाच्या दृष्टिने विश्लेषण आणि निर्वचन या संशोधन प्रक्रियेतील शेवटच्या पायऱ्या असल्या तरी त्यांचे स्थान प्राथमिक आहे. चंद्रपूर

जिल्ह्यातील ४५० ग्रामस्थांकडून १) वैयक्तिक आणि कौटुंबिक माहिती २) आर्थिक माहिती ३) शैक्षणिक माहिती ४) आरोग्यविषयक माहिती ५) सामाजिक माहिती ६) सहकार, राजनीती व स्थलांतरण या घटकांची 'अनुसूची' मार्फत माहिती गोळा करून विश्लेषण आणि निर्वचन करण्यात आले आहे. तसेच गृहीतकांची पडताळणी सुद्धा करण्यात आली आहे.

**१. उत्तरदात्यांची सर्वसाधारण माहिती**

चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेतील विविध घटकांनी (स्त्री-पुरुष, जाती- धर्म, शिक्षित-अशिक्षित, विवाहित-अविवाहित, विमाधारक-अविमाधारक) सर्व मर्यादा लक्षात घेऊन भूमिका वठविल्यास ग्रामीण समृद्धता निश्चितपणे वाढणारी आहे.

**२. आर्थिक माहिती**

आर्थिक माहितीचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, ग्रामस्थांचे उत्पन्न कमी असून बचतही कमी आहे. तसेच सर्वाधिक उत्तरदात्यांचे आर्थिक जीवन म्हणजे आर्थिक दर्जा अतिनिकृष्ठ असलेला निदर्शनास येते. ग्रामीण औद्योगिकरण व प्रभावी मागणीत वाढ केल्यास उपभोग पातळीत वाढ घडून येऊन अति चांगला दर्जा मिळविता येतो.

**३. शैक्षणिक माहिती**

शैक्षणिक माहितीचा आढावा घेतल्यास असे निदर्शनास येते की, शिक्षणाच्या बाबतीत बऱ्याच चांगल्या प्रतिक्रिया उत्तरदात्यांनी दिलेल्या आहे. तरीही हा घटक महत्त्वपूर्ण असल्यामुळे ग्रामीण मानवी भांडवल निकृष्ठ न होण्यासाठी आवश्यक प्रयत्न करणे अपेक्षित आहे. इंग्रजी माध्यम शाळा व मराठी माध्यम शाळा यातील स्पर्धा, वाढता शैक्षणिक खर्च, शिक्षकांची भूमिका यात ताळमेळ बसविणेही आवश्यक आहे.

**४. आरोग्यविषयक माहिती**

आरोग्यविषयक सर्व प्रतिक्रियांची पडताळणी केल्यास असे लक्षात येते की, आरोग्याच्या पर्याप्त सोयीपासून ग्रामीण समाज वंचित असलेला दिसतो. बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्य धोक्यात येत असल्यामुळे कोणत्या आजारात कोणती काळजी घेणे व सामान्य स्थितीत प्रतिबंधात्मक माहितीच्या आधारावर काय करणे अपेक्षित आहे, याची संपूर्ण माहिती ग्रामस्थांना मिळणे अपेक्षित आहे.

**५. सामाजिक माहिती**

समाजिक माहितीवरून असे लक्षात येते की, केंद्र राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यशैलीवर ग्रामस्थ अंशतः समाधानी आहे. कारण अजूनही पर्याप्त पायाभूत सुविधा ग्रामीण भागात नाहीत. सरकारने गळत्या शोधून, सहकारमार्फत शोषण थांबविणे व पंचायतराज मार्फत नियोजन व अंमलबजावणी केल्यास ग्रामीण जीवन समृद्ध होईल.

**६. सहकार, राजनीती व स्थलांतरण**

सहकार, राजनीती व स्थलांतरण या घटकातील माहितीच्या आधारे लक्षात येते की, ग्रामीण परिसरात बऱ्याच चांगल्या संधी उपलब्ध असताना, त्याची ओळख न झाल्यामुळे ग्रामीण जनता शहराकडे जात आहे. ग्रामीण भागात औद्योगिकरण, तसेच सर्व उत्पादक कार्यांना प्रेरणा मिळविण्यासाठी शासन हे शेतकऱ्यासोबत आहे. याच पद्धतीची धोरणे शासन आखते हा विश्वास निर्माण झाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेतील अंतिम कार्यक्षमतेचा वापर होण्यास मदत होईल.

थोडक्यात, चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकास अभ्यासावरून लक्षात येते की ग्रामीण विकासाचा प्रश्न सोडविणे कठीण आहे. परंतु अशक्य मात्र नाही.

**तक्ता क्र. २ : गावातील पायाभूत सुविधा व कार्यशैलीवर ग्रामस्थांची समाधानता**

(कंसातील आकडे अपेक्षित वारंवारिता दर्शवितात)

| अ.क्र. | ग्रामस्थांची समाधानता पायाभूत सुविधा | समाधानी | अंशतः समाधानी | असमाधानी | एकूण | काय चाचणीचे निष्कर्षात्मक मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पर्याप्त | १०(०४) | ३०(३४) | ०२(०४) | ४२ | ८७.८६ |
| २ | अपर्याप्त | ३०(३५) | ३२१(३०४) | २२(३४) | ३७३ | |
| ३ | उपलब्ध नाही | ०२(०३) | १६(२९) | १७(०३) | ३५ | |
| | एकूण | ४२ | ३६७ | ४१ | ४५० | |

(काय चाचणीचे गणणीत/निष्कर्षात्मक मूल्य ८७.८६, काय चाचणीचे सारणी मूल्य/ क्रांतीक मूल्य ०.०५ टक्के सार्थक स्तरावरती ९.४८, मुक्त संख्या ०४)

स्रोत- अनुसूची

**निष्कर्ष**

१. चंद्रपूर जिल्ह्यात बौद्धिक व सांपत्तिक स्थितीत सरस असलेला मनुष्य ग्रामीण भागात राहण्यास फारसा तयार असलेला दिसत नाही.

२. चंद्रपूर जिल्ह्यात ग्रामीण विकास कार्यक्रमांची कमतरता नाही; परंतु अंमलबजावणीतील दोष जसे गंभीर आहेत तशीच मूल्यांकनाची अवस्था आहे.

३. चंद्रपूर जिल्ह्यातील जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास अभ्यासात, विकासामध्ये आपत्ती येणारी आहे, ही गोष्ट दुर्लक्षित असलेली दिसून येते.

४. चंद्रपूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विविध घटकात सलोख्याचे संबंध असलेले आढळून येत नाहीत.

५. चंद्रपूर जिल्ह्यात शेतीचा उत्पादक कामाकडून अनुत्पादक कामाकरिता होणारा वाढता वापर ही बाब चिंतेची बनली आहे.

६. चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेत नैसर्गिक कारखाना समृद्ध आहे. परंतु कारखान्यातील यंत्र सुरळीत ठेवण्यासाठी ग्रामस्थांकडून होणारा प्रयत्न अपुरा असल्यामुळे 'काळी बाजू' (उदा. प्रदूषण, तापमान वाढ इ.) अधिक मजबूत बनत जात आहे.

७. चंद्रपूर जिल्ह्यातील खेड्यांचे अंतर्गत व बाह्य स्वरूप बदलविणे आवश्यक असल्याचे निदर्शनास येते.

८. चंद्रपूर जिल्ह्यातील जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास अभ्यासात 'सार्थक संघर्षाचा' अभाव ग्रामीण अर्थव्यवस्थेत असलेला दिसून येते.

९. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील पशुधन, सण-उत्सव, भजनपूजन, खेळ, नैतिकमूल्ये, जीवनशैली व इतरही गोष्टी बालपणापासून वार्धक्यापर्यंत आनंद देणाऱ्या आहे. परंतु आज त्यातील जिवंतपणा कमी कमी होत चाललेला निदर्शनास येते.

**गृहीतकृत्याची पडताळणी**

१. चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामस्थ पर्याप्त पायाभूत सुविधांच्या अभावामुळे केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यशैलीवर अंशतः समाधानी आहे.

या गृहीतकृत्याच्या पडताळणीसाठी अभ्यासात सहभागी उत्तरदात्यांना पुढील दोन प्रश्न विचारून प्रतिसाद घेण्यात आला आहे. १) गावातील पायाभूत सुविधा - सर्वाधिक उत्तरदात्यांनी अपर्याप्त सुविधा आहे अशी प्रतिक्रिया दिली आहे. २) केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यशैलीवर समाधानता - अंशतः समाधानी असणारे उत्तरदाते सर्वाधिक आहे. वरील प्रतिसादावरून पायाभूत सुविधा अपर्याप्त आहे व अंशतः समाधानी असणारे उत्तरदातेही अधिक आहे असे निदर्शनास येते. काय चाचणीच्या आधारे गृहीतकृत्ये सत्य की असत्य पुढीलप्रमाणे-

तक्त्यामध्ये मुक्त संख्या ०४ आहे. काय वर्गाच्या मूल्यसारणीमध्ये ०.०५ या पातळीसाठी क्रांतिक मूल्य (Table Value) ९.४८ आहे. वरील तक्त्यामध्ये ८७.८६ हे निष्कर्षात्मक मूल्य (Calculate Value) क्रांतिक मूल्यापेक्षा जास्त असल्यामुळे H1 म्हणजे पर्यायी गृहीतकृत्ये (Alternative Hypothesis) स्वीकारले जाईल व HO हे शून्यवत गृहीतकृत्ये नाकारले जाईल. म्हणजेच पायाभूत सुविधा आणि केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यशैलीवर ग्रामस्थांच्या समाधानतेची निरीक्षित वारंवारिता मूल्य व अपेक्षित वारंवारिता मूल्यसारणी यामध्ये अर्थपूर्ण संबंध आहे. थोडक्यात, चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामस्थ पर्याप्त पायाभूत सुविधांच्या अभावामुळे केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यशैलीवर अंशतः समाधानी आहे, हे गृहीतकृत्ये सत्य ठरले आहे.

**सूचना व शिफारशी**

पुढील शिफारशीचा वापर झाल्यास निश्चितच चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण जीवन समृद्ध होईल.

१. चंद्रपूर जिल्ह्यातील जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास अभ्यासात केवळ सरकार लोकांना मदत करते असा नकारात्मक दृष्टिकोन दिसतो. अशा दृष्टिकोनाऐवजी विकासात केवळ सरकार लोकांना मदत करते असे नव्हे तर लोकही सरकारला मदत करतात असा व्यापक विचार जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकासात अभिप्रेत आहे. स्वीकारून, अंमलबजावणी केल्यास जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास साध्य होईल.

२. चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेतील विविध घटकांनी (स्त्री-पुरुष, जाती-धर्म, शिक्षित-अशिक्षित, विवाहित- अविवाहित, गरीब-श्रीमंत, शेतकरी-शेतमजूर, सरकारी-खाजगी संघटना, वृद्ध- तरुण) सर्व मर्यादा लक्षात घेऊन भूमिका वटविल्यास ग्रामीण विकासाचा संक्रमणकाळ नष्ट होऊन जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास साध्य होण्याकरिता वेळ लागणार नाही.

३. चंद्रपूर जिल्ह्यातील जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास अभ्यासात गावातील शैक्षणिक सोयी फारच उपयोगी आहे. अशी सर्वाधिक उत्तरदात्यांची प्रतिक्रिया आहे. उपलब्ध शैक्षणिक सोयी फारच उपयोगी असल्या तरी त्यात बदल आवश्यक आहे. आज मराठी माध्यम शाळा व इंग्रजी माध्यम शाळेच्या स्पर्धेत ग्रामीण मानवी भांडवल निकृष्ट बनत आहे. दुरूस्ती करण्यासाठी 'शिक्षकाची भूमिका' व मातृभाषेतून 'किमान शिक्षण' हे वर्जन वापरल्यास ग्रामीण मानवी भांडवलमार्फत सर्वसमावेशक ग्रामीण विकास साध्य होईल.

४. खेड्यांचे अंतर्गत व बाह्य स्वरूप बदलविण्याची क्षमता सहकार आणि पंचायतराज या दोनही साधनात असल्यामुळे या साधनांना कायदेशीर व नैतिक पाठींबा मिळाल्यास, शेवटच्या पात्र व्यक्तीला प्रत्येक वेळी संधी मिळून जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा प्रश्न कठीण असला तरी सोडविता येते.

५. जिल्ह्याची एकता राज्याच्या एकतेला मजबूत करते, राज्याची एकता राष्ट्रीय एकतेला मजबूत करते आणि राष्ट्राची एकता आंतरराष्ट्रीय एकतेला मजबूत करीत असल्यामुळे हा एकतेचा पाया सखोल व विस्तृत करणे सर्वसमावेशक ग्रामीण विकासासाठी आवश्यक आहे.

६. सरकारी संस्था, गैरसरकारी संस्था, पंचायतराज, प्रभावी मागणी, शिक्षण, पर्याप्त लोकसंख्या, नैसर्गिक संतुलन, एकता, सहकार्य, प्रामाणिकपणा अशा सर्व घटकांचा वापर उत्तरआधुनिकतेच्या आधारावर झाल्यास वर्तमान तसेच भविष्यकालीन पिढ्यांना सर्वकाळ आनंद मिळणारा आहे. तसेच 'तन-मन धन से सदा सुखी हो भारत देश हमारा, विश्व हमारा' ही विचारसरणी यामार्फत जिंकणे शक्य आहे.

**समारोप**

चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वसमावेशक ग्रामीण विकास या अभ्यासात असे निदर्शनास आले की, चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामस्थांची अंतिम कार्यक्षमता व प्रत्यक्ष कार्यक्षमता यात फरक व ग्रामीण अर्थव्यवस्था अपूर्ण विकसित आहे दिसून येते (पाहा - कौटुंबिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक, सामाजिक, राजकीय, सहकार आणि स्थानांतरण माहिती). हा फरक व अपूर्णता नष्ट करण्यासाठी केन्सच्या प्रभावी मागणी सिद्धांताचा वापर करता येतो. तसेच खेड्यांचे अंतर्गत व बाह्य स्वरूप बदलविण्याची क्षमता सहकार आणि पंचायतराज या दोनही साधनात असल्यामुळे या साधनांना कायदेशीर व नैतिक पाठींबा मिळाल्यास, शेवटच्या पात्र व्यक्तीला प्रत्येक वेळी संधी मिळून सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा प्रश्न कठीण असला तरी सोडविता येतो. यासाठी प्रथमतः शिक्षण व पर्याप्त लोकसंख्या जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकासाच्या पूर्वआवश्यक अटींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. थोडक्यात, सर्वसमावेशकता हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्ये असल्यामुळे वरील युक्त्या तसेच वेळोवेळी सुचणाऱ्या सार्थक युक्त्यांचा वापर करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची**


१. देशपांडे विनायक आणि देशपांडे श्रीधर, भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास), हिमालया पब्लिशिंग हाऊस, नागपूर, २०१०.

२. कराळे गंगाधर व कविमंडन विजय, ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोन (नीती, कार्यक्रम आणि व्यूहरचना) श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर,२००६.

३. कऱ्हाडे, बी. एम., शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, २०११.

४. राजूरकर, अ. ज., चंद्रपूरचा इतिहास, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, १९८२.

५. शिंदे मदन राधाकिसन, ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासन योजना, अर्थसंवाद (त्रैमासिक) मराठी अर्थशास्त्र परिषद, खंड - ३९, अंक १.

६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा चंद्रपूर, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. (२०१४-१५)


(संशोधकाने 'चंद्रपूर जिल्ह्यातील जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास : अर्थशास्त्रीय अध्ययन (२००२ ते २०१२)' या विषयावर डॉ. जे.एम.काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली गोंडवाना विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे.)

◆

# भारतातील उद्योजकता विकास : सामाजिक संदर्भ

**संतोष दास्ताने** †

**प्रास्ताविक**

औद्योगिक अर्थशास्त्र ही अर्थशास्त्रातील एक महत्त्वाची शाखा आहे. औद्योगिक उत्पादन, कामगार, वित्तपुरवठा, उत्पादकता धोरण, औद्योगिक उत्पादनांचा देशांतर्गत व्यापार तसेच त्या उत्पादनांची आयात-निर्यात अशा विविध पैलूंचा अभ्यास तसेच संशोधन त्या शाखेत चालते. त्यातीलच एक लक्षणीय विषय म्हणजे उद्योजकतेचा उदय व विकास. उद्योजकतेचे बीज उपजतच असते काय? उद्योजकता शिकवून उद्योजक होता येते काय? यशस्वी उद्योजक होण्यासाठी कोणते गुण असावे लागतात? अशा प्रश्नांची येथे चर्चा होते. उद्योजकता विकसित होऊन गुंतवणुका, उत्पादन, रोजगार यांना चालना मिळावी म्हणून सरकार अनेक योजना आखते. त्या योजनांवर मुबलक खर्च करते. पण हेही ध्यानात येते की, देशातील सर्व भागांमध्ये/पंथांमध्ये/जातींमध्ये/जमातींमध्ये उद्योजकतेचे पीक एकसारख्या प्रमाणात येतच नाही. उद्योजकता विकास ही काळाची गरज असताना उद्योजकतेची पैदास मात्र अशी असमान किंवा असमतोल पद्धतीने का व्हावी हा निश्चितच कुतुहलाचा आणि संशोधनाचा मुद्दा आहे. त्यामागे सामाजिक, मानसिक, आर्थिक, अनुवांशिक, भौगोलिक, मानवशास्त्रीय, शैक्षणिक, जीवशास्त्रीय अशी कारणे आहेत असे ध्यानात येते. त्यामुळे औद्योगिक व एकूणच आर्थिक विकासासाठी पूर्वअट मानल्या जाणाऱ्या उद्योजकतेचा विविधांगी संशोधन अभ्यास करणे गरजेचे आहे हे समजू लागते. सध्याच्या पारंपरिक औद्योगिक अर्थशास्त्रात या विषयाला काहीसे गौण लेखले गेले आहे. या विषयावर विस्तृत अशा संशोधनपर व विश्लेषणात्मक लेखनाची गरज आहे. पण त्या आघाडीवर काही अपवाद वगळता सामसूमच आहे. तथापि, योगायोग असा की ही त्रुटी भरून काढणारे एक ताजे पुस्तक हाती आले आहे व ही गरज बऱ्याच प्रमाणात भागत आहे ही समाधानाची गोष्ट आहे.[१] हरीश दामोदरन यांच्या या पुस्तकात संपत्तीची निर्मिती करणाऱ्या भारतातल्या भांडवलदार-उद्योजक वर्गाची अथवा समाजाची उत्क्रांती कशी झाली, त्या उत्क्रांती मार्गावरील ठळक मुक्काम कोणते, आजच्या जागतिकीकरणाच्या काळात त्यांचे काय स्थान आहे याचा सर्वस्पर्शी आढावा आहे. (या लेखातील पुढील

† माजी अध्यक्ष आणि माजी विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६३, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४, ई-मेल : santosh.dastane@gmail.com

विवेचन काही प्रमाणात दामोदरन यांच्या अभ्यासावर आधारित आहे.)

सध्याच्या पिढीतील विख्यात पत्रकार हरीश दामोदरन हे रूढ अर्थाने अर्थतज्ज्ञ नाहीत. पण आर्थिक विषयांवर त्यांचे विश्लेषणात्मक लेख इंडियन एक्स्प्रेस आणि इतर आघाडीच्या वृत्तपत्रांमध्ये सतत प्रसिद्ध होत असतात. शेती व ग्रामीण विकास या क्षेत्रातील अनेक समस्यांवर त्यांचे अभ्यासपूर्ण लेखन वाचायला मिळत असते. उपलब्ध सांख्यिकी माहितीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण व त्यातून निघणारे तर्कशुद्ध निष्कर्ष ही त्यांच्या लिखाणाची वैशिष्ट्ये आहेत. इकॉनॉमिक ॲन्ड पॉलिटिकल वीकली सारख्या संशोधनपर नियतकालिकातही त्यांच्या लेखनाला जागा दिलेली असते. प्रस्तुत पुस्तक हे औद्योगिक अर्थशास्त्र या उपशाखेत बसणारे आहे. त्यातही आर्थिक इतिहास या प्रकाराने हे लेखन झालेले आहे. आर्थिक इतिहासात अमुक एका कालखंडात अमुक एका देशाची/प्रदेशाची/उद्योगाची प्रगती कशी झाली, त्यामागील कारण परंपरा, त्यातील समस्या, त्यासाठी आखलेली धोरणे या सगळ्याचा चिकित्सक अभ्यास असतो. देशाच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीमागील प्रेरणा कोणत्या, त्या घडामोडीमधून कोणते धडे सूचित होतात, त्या सर्व क्रांती अथवा उत्क्रांतीमागे काही सैद्धांतिक/वैचारिक बैठक आहे का याचा विचार तेथे होतो. आर्थिक विचार व त्यांचे प्रत्यक्ष व्यवहारातील उपयोजन यांची समन्वित बैठक आर्थिक इतिहासाच्या अभ्यासात असते. तसा प्रयत्न या पुस्तकात दामोदरन यांनी केला आहे. पुस्तकाच्या शीर्षकात त्यांनी भारतातील नवभांडवलदार असा शब्दप्रयोग केला आहे. परंतु त्यातील नव हा शब्द काहीसा दिशाभूल करणारा आहे. तसेच भांडवलदार हा शब्दही ते पारंपरिक अर्थाने वापरत नाहीत. त्यांचे विवेचन भारतातील व्यापारी-उद्योजक-कारखानदार-उद्योगपती-दुकानदार अशा व्यक्तींसंबंधी आहे. काटेकोरपणे पाहाता भांडवलदार या संज्ञेचा आजचा सर्वमान्य अर्थ काहीसा निराळा आहे. तसाच फरक त्यांच्या नव या शब्दप्रयोगाबाबत दाखवता येईल. भारतात, विशेषकरून गेल्या सुमारे दोन शतकांच्या काळामध्ये व्यापार-उद्योग यांची जबाबदारी समाजातील कोणत्या गटाने/समूहाने/वर्गाने स्वीकारली, त्याची उत्क्रांती कोणकोणत्या टप्प्याने झाली, त्यामागील प्रेरणा व आव्हाने कोणती होती याचा त्यांनी डोळसपणे आणि तटस्थतेने वेध घेतला आहे. त्यांची मांडणी जेव्हा विसाव्या शतकाच्या शेवटच्या आणि एकविसाव्या शतकाच्या पहिल्या टप्प्यापर्यंत पोहचते तेव्हा प्रचलित औद्योगिक पर्यावरणामध्ये या वर्गाची कामगिरी कशी काय आहे ते पुस्तकाच्या शेवटच्या भागात मांडतात. अशा व्यापारी-उद्योजक वर्गाचा नवा अवतार कशा स्वरूपाचा आहे हे सांगण्यासाठी त्यांचा नव हा शब्दप्रयोग आहे. पुस्तकातील विवेचनाचा संदर्भ साधारणपणे एकोणिसाव्या शतकात सुरू होतो व तो थेट आर्थिक सुधारणांनंतरच्या काळापर्यंत म्हणजे, एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत पोहचतो. ब्रिटिशकालीन भारत, स्वातंत्र्यानंतरचा परंतु आर्थिक सुधारणापूर्व भारत व सुधारणायुगातील भारत अशी बहुजिनसी पार्श्वभूमी त्यांच्या लेखनाला असली तरी मूळ विषयावरील आपली पकड ढिली होऊ न देता त्यांनी तितक्याच समरसतेने आपले लेखन केले आहे. त्यांची प्रतिपाद्य विषयाशी असलेली तादात्म्यता वाखणण्यासारखी आहे.

तसे पाहाता आर्थिक इतिहास ही शाखा उपेक्षित अशी शाखा होय. सन १९६९ नंतर ज्या ऐंशीहून अधिक अर्थतज्ज्ञांना जगातील सर्वोच्च असा नोबेल

स्मृती पुरस्कार मिळाला त्यातील फक्त दोघेच अर्थतज्ज्ञ आर्थिक इतिहास या क्षेत्रातील योगदानासाठी विख्यात आहेत. भारतातील आर्थिक इतिहासाबद्दलही स्थिती फारशी वेगळी नाही. एखाद्या प्रदेशाचा आर्थिक इतिहास मांडायचा याचा अर्थ विस्तृत व सुसंगत अशी प्राथमिक माहिती (विदा) संकलित करणे हा या लेखन प्रवासातील पहिला टप्पा होय. त्या माहितीचे विश्लेषण, माहितीचा अन्वयार्थ लावणे, त्यातून तर्कसुसंगत असे अनुमान-निरीक्षणे-निष्कर्ष मांडणे हा दुसरा टप्पा होय. या सर्व संशोधनातून काही सामान्यीकरण दाखवणारे सूत्र मांडणे हा तिसरा व शेवटचा टप्पा होय. या विविध टप्प्यांनुसार यापूर्वीच्या काही मोजक्या अभ्यासकांचे व संशोधकांचे योगदान उपलब्ध आहे. उदा. प्राथमिक पातळीवरील आर्थिक-व्यापारविषयक परंपरा व माहिती यांचे संकलन रूस्तम चोक्सी या इतिहासाच्या अभ्यासकाने केलेले आढळते.[२] आर्थिक घडामोडींच्या मांडणीबरोबर काही अभ्यासकांनी विशेषकरून एकोणिसाव्या व विसाव्या शतकात भारतात आर्थिक विचाराची जडणघडण कशी झाली, त्या विचारांची उत्क्रांती कशी झाली याचा वेध घेतला आहे.[३] गेल्या काही वर्षांमध्ये भारताच्या आर्थिक इतिहासाबाबत वाढते स्वारस्य अभ्यासकांमध्ये दिसत आहे.[४] आर्थिक घडामोडींचा ऐतिहासिक अंगाने आढावा घेताना कोणती पथ्ये पाळावीत, इतिहास लेखनाचे शास्त्र कोणते याचीही चर्चा होत असते त्याचे येथे स्मरण होते.[५] भारतातील उद्योजकांची सामाजिक वैशिष्ट्ये मांडताना दामोदरन यांच्या लेखनापूर्वीच्या काही ठळक प्रकाशनांचा उल्लेख येथे उचित ठरेल. यातील पहिला लक्षणीय संदर्भ म्हणजे प्रा.धनंजयराव गाडगीळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी देशातील व्यापारी वर्गाचा उदय व वैशिष्ट्ये यावर १९५०च्या दशकात केलेले संशोधनपर लेखन. ते न्यूयॉर्क येथील इन्स्टिटट्यूट ऑफ पॅसिफिक रिलेशन्समार्फत प्रसिद्ध झाले आहे. याच विषयावर अहमदाबादच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटतर्फे १९८२ मध्ये एक परिसंवाद घेण्यात आला होता. त्यातील शोधनिबंधांचे एक पुस्तक द्विजेन्द्र त्रिपाठी यांनी १९८४ साली संपादित करून प्रसिद्ध केले आहे. समाजातील काही विशिष्ट वर्गांमध्येच उद्योगशीलतेची प्रेरणा किंवा ऊर्मी का आढळते याचे विवेचन मांडणारे शोधनिबंध यात संकलित केलेले आहेत. मुसमाडे यांनी आपल्या पीएच.डी. प्रबंधात पश्चिम भारतातील उद्योजकतेचा विकास कसकसा झाला याचा चिकित्सक आढावा घेतला आहे. त्यांच्या संशोधन अभ्यासात त्यांनी काही निवडक उद्योजकांच्या कामगिरीचे विश्लेषण करताना त्यांच्या सामाजिक वैशिष्ट्यांवरही प्रकाशझोत टाकला आहे. दामोदरन यांचे लेखन याच वाटेवरून पुढे जाताना आढळते.[६] या सर्व पूर्वप्रसिद्ध संदर्भांचा मतितार्थ असा की, इतिहासाच्या अंगाने लेखन करीत असताना अपेक्षित असलेले सर्वमान्य निकष, संकेत आणि पथ्ये यांचे पालन दामोदरन यांनी केलेले आढळते. ही या पुस्तकाची खचितच जमा बाजू होय!

**उद्योजकतेचा विकास** - I

व्यापार, उदीम, व्यवसाय, उद्योगधंदे यांची दीर्घ अशी परंपरा भारताला लाभली आहे. प्राचीन काळापासून देशात प्रचलित असलेल्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील तिसरा जो वैश्य वर्ण होता तोच पारंपरिक असा व्यापारी-उद्योजक वर्ग होय. हे मर्यादित पण निश्चित असे स्थान होते. व्यापार, विनिमय, दुकानदारी, वाणिज्यिक व्यवहार व तत्सम व्यवसाय हे वैश्य वर्णीयांचे प्रमुख काम असे. त्यावरून समाजातील काही जमाती-जाती-पंथ-गट हे व्यापारी-उद्योजक म्हणून ओळखले जाऊ लागले. समाजात जसजसा पैशाचा वापर वाढू

लागला, विशेषीकरण सुरू झाले, विनिमय व देवाणघेवाण वाढत गेली, तंत्रज्ञान सुधारत गेले तसतसा हा व्यापारी-उद्योजक वर्ग अधिक जबाबदारीने आर्थिक प्रगती घडवून आणण्यात आघाडीवर राहिला. वाहतूक व परिवहन क्रांतीने व्यापार वाढण्यास मदत झाली. नव्या बाजारपेठा वसल्या. अनेक देशांनी उदा. इंग्लंड, फ्रान्स इ. अफ्रिका-आशिया खंडात वसाहती स्थापन करून देशाचा भौगोलिक विस्तार साधला व त्याचबरोबर नवनवीन बाजारपेठा काबीज केल्या. युरोपमध्ये १६ व्या ते १८ व्या शतकात जे व्यापारवादी विचार रुजले त्यांच्या मुळाशी याच घडामोडी कारणीभूत होत्या. त्यापाठोपाठ आलेली औद्योगिक क्रांती आणि कारखानदारीची सुरुवात ही त्याच्याच पुढची पायरी होती.

भारतीय समाजात वाणिज्यिक विचार व घडामोडी रुजल्या हे खरे असले तरी येथे ब्राह्मण आणि क्षत्रिय या गटांचा वरचष्मा राहिला. क्रमानुसार वैश्य वर्गास खरोखरच तिसरे महत्त्व दिले गेले. कौटिल्याने त्याच्या अर्थशास्त्रात व्यापारी वर्गाच्या कार्याचे सविस्तर वर्णन केले आहे. पण हाच व्यापारी वर्ग बऱ्याच वेळेस 'साठेबाजी, नफेबाजी, मक्तेदारीसदृश्य संगनमत, फसवाफसवी, खोटी वजन-मापे वापरणे, भेसळ करणे' असे प्रकार करतो असे मांडून त्यांच्याकडून दंड कसा व किती वसूल करावा असेही कौटिल्य मांडतो. त्याचा व्यापारी वर्गाबाबतचा दृष्टिकोन कठोर आणि टीकात्मक होता असे जाणवते. काही धार्मिक समजुतींचा समाजमनावर जो पगडा होता त्याने व्यापारी उपक्रम काही प्रमाणात खुरटत राहिले. उदा. व्यापार हा निषिद्ध आहे, समुद्रपार प्रवास धर्मबाह्य आहे इ. यामुळे समाजात जरुरीपुरते किमान व्यापार व्यवहार होत राहिले; पण ते वैश्य वर्णातील सर्व गट आणि उपगट यांच्यापुरते मर्यादित राहिले. समाजातील सर्व थरांना बरोबर घेऊन जी एक समन्वित औद्योगिक-व्यापारी संस्कृती निर्माण होऊन पाश्चात्य समाजासारखी व्यापक औद्योगिक क्रांती त्यानंतर अपेक्षित होती ती, येथे होऊ शकली नाही. मध्ययुगीन भारतातील परकीय आक्रमणे, अशांतता, अस्थिरता, एकछत्री अंमलाचा अभाव, पारमार्थिक वृत्तीचा प्रभाव अशा गोष्टींमुळे औद्योगिक संस्कृतीची विशेष अशी निपज भारतात होऊ शकली नाही.

तथापि, पारंपरिक वैश्य वर्णात गणल्या जाणाऱ्या भारतातील कुटुंबांचा अथवा घराण्यांचा विश्वसनीय इतिहास साधारणपणे अठराव्या शतकाच्या मध्यापासून पुढच्या काळात दाखवता येतो. यात मुख्यतः गुजराती, बनिया, जैन, मारवाडी, पारशी, चेट्टियार, लोहाणा, भाटिया, सिंधी अशा जाती/जमाती किंवा गट येतात. या समूहांचा व्यापार त्यांच्या प्रदेशाच्या बाहेर भारतभरही चालत असे. शिवाय स्थानिक पातळीवर आपला प्रभाव टाकून असणारी अनेक व्यापारी घराणी होती. उदा. बंगालमधील सुवर्णबानिक व साहा, आंध्रमधील कोमटी, महाराष्ट्रातील वाणी, तमिळनाडूमधील नाडर, केरळमधील सिरियन ख्रिश्चन, कोकण/पश्चिम महाराष्ट्रातील खोत इ. या सर्वांचा मुख्यतः अन्नधान्य, डाळी, तेलबिया, हत्यारे, छोटी यंत्रे, धातूची भांडी, चामड्याच्या-तागाच्या वस्तू, कापड-चोपड यांचा व्यापार चालत असे. सावकारी चालत असे. घोडे, गाढवे, दुभती जनावरे यांचाही व्यापार त्या काळात होत असे. अनेक विख्यात व्यापारी-औद्योगिक घराण्यांचा इतिहास एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून उपलब्ध आहे. त्यात पेटिट, दावर, टाटा, खटाव, वाडिया, बिर्ला, गोएंका, ठाकरसी, गोदरेज, बजाज अशा घराण्यांचा समावेश आहे. अशा सर्व प्रमुख घराण्यांची वाटचाल, त्यांची बलस्थाने, त्यांची कामगिरी याची सविस्तर व साधार

चर्चा दामोदरन यांनी प्रस्तुत पुस्तकात केली आहे.[७] धंदाव्यापाराचे बाळकडू लहानपणापासून मिळत असल्याने वेगळे मार्गदर्शन-प्रोत्साहन-प्रशिक्षण याची गरज भासत नसे. एका पिढीनंतर उत्तराधिकारी कोण असावा याचीही चिंता नसे. या कुटुंबांचे/घराण्यांचे आपापसात रोटी-बेटी व्यवहार चालत असल्याने घराणे टिकून राहाणे, घराण्याचा विस्तार होणे यास अडचण भासत नसे. आधुनिक भारताचा आर्थिक इतिहास पाहाता साधारणपणे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून ही औद्योगिक घराणी देशात स्थिरावली. भारतीय उद्योगांना मारक असे ब्रिटिशांचे औद्योगिक धोरण, इंग्लंड व युरोपमधील तेजीमंदीचे परिणाम यांना तोंड देत येथील उद्योगांनी या काळात चांगले मूळ धरले. मध्यपूर्व, आफ्रिका, आग्नेय आशिया, चीन या भागात भारतीय उद्योगांच्या आयात-निर्याती सुरू झाल्या. कागद, साखर, सिमेंट, लोखंड-पोलाद असे नवे उद्योग सुरू झाले. भांडवलासाठी अगदी सुरुवातीस ते सावकारांवर अवलंबून असत. त्यानंतर हुंड्या व वचनपत्रे यांचा उपयोग सुरू झाला. नंतर यथावकाश बँका-प्रेसिडेन्सी बँका, विमा कंपन्या यांची स्थापना झाली. दक्षिणेकडील औद्योगिक विकास पुरगप्पा चेट्टीयार आणि त्या कुटुंबाच्या विविध सदस्यांच्या आणि कंपन्यांच्या पुढाकाराने झाला होता. त्यात सावकारी, बँका, चहाचे मळे, भात गिरण्या, निर्यात व्यापार असे उपक्रम होते. धंदा-व्यवसाय सुरू करण्याची पूर्वतयारी, भांडवलाचा पुरवठा, आवश्यक ती सल्लामसलत, बाजारपेठेची माहिती, जरूर त्या कायदेकानूंची पूर्तता, मालाची साठवणूक, वाहतूक-वितरण-विपणन यासाठी जरूर ते व्यावसायिक संपर्क या सगळ्याची व्यवस्था त्याच जाती-जमातीमधील व्यवस्थापक प्रतिनिधींमार्फत होत असे. ही घडामोड १८३३च्या कायद्यानंतर झाली. याचा फायदा असा की व्यवसाय वाढ, स्थैर्य, सातत्य, जोखमीचे किमानीकरण असे साधत असताना धंदा-व्यवसाय आपल्या जातीपंथातच राहात असे. दामोदरन यांचे वैशिष्ट्य असे की ते केवळ व्यापारी किंवा औद्योगिक घडामोडी मांडत नाहीत, तर त्यामागे कोणते घराणे, त्यांची जात-पोटजात-धर्म-पंथ अशी कुंडली मांडतात. खुल्या अर्थव्यवस्थेत व्यवसायाची संधी सर्वांना उपलब्ध असली तरी त्यामागे मानसिक अंत:प्रेरणा ऊर्मी व नैसर्गिक मनोभूमिका असणे तितकेच महत्त्वाचे असते असे ते दाखवून देतात. भारतात स्वातंत्र्यापूर्वी आणि पुष्कळ प्रमाणात स्वातंत्र्यानंतरही अशा ठरावीक घराण्यांच्या पुढाकारानेच उद्योगधंद्यांचा गाडा ओढला आहे हे नाकारता येणार नाही, असा त्यांचा सिद्धांत आहे व या पुस्तकात त्यांनी तो आवश्यक त्या सर्व तपशीलात अस्सल संदर्भांचा आधार घेऊन मांडला आहे.

**उद्योजकतेचा विकास** - II

देशातील औद्योगिक विकासाची वाटचाल - स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतर अशी दोन्ही, औद्योगिक घराण्यांच्या विस्तारातून तपासणे, त्या घराण्याचा धर्म, वर्ण, जात, पोटजात यानुसार त्या घडामोडींकडे चिकित्सेने पाहाणे असा अनोखा दृष्टिकोन दामोदरन यांनी स्वीकारला आहे. खुलेपणा आणि व्यावसायिकतेच्या काळामध्ये हा दृष्टिकोन काहीसा एकांगी किंवा वादग्रस्तही वाटेल. पण अनेक जाती/पोटजातींनी अशा औद्योगिक कूळ परंपरा दीड-दोन शतकाच्या काळापर्यंत जपल्या आहेत, वाढवल्या आहेत याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. औद्योगिक वाटचालीमध्ये जोखमीचा योग्य अंदाज घेणे, व्यवसायात प्रामाणिकपणा व नैतिकतेची मूल्ये पाळणे, सामाजिक जबाबदारी व समाजाशी असलेले उत्तरदायित्व ओळखून त्यानुसार वागणे हे सर्व

औद्योगिकगृहे करतातच असे नाही. त्या औद्योगिक घराण्याने कशी मानसिकता घडवलेली आहे, कोणत्या प्रथांचे आणि संकेतांचे आतापर्यंत पालन केले आहे या गोष्टीला औद्योगिक अर्थशास्त्रात महत्त्व देणे आवश्यक आहे, असा संदेशच लेखक देतात. औद्योगिक अर्थशास्त्राचे अभ्यासक व संशोधक या अपेक्षेला नक्कीच दाद देतील. कारण समाजातील औद्योगिक संस्कृतीची आणि विचारधारेची मशागत तसेच वाढ काही विशिष्ट गटात किंवा वर्गातच का झाली, त्यामागील सामाजिक-मानसिक कारणे कोणती हा नि:संशय अभ्यासाचा व संशोधनाचा विषय आहे. देशातील औद्योगिकगृहांचा इतिहास आतापर्यंत फक्त माहितीवजा तरी आहे किंवा प्रशंसापर लिखाणाचा आहे. पण त्या चिकित्सक आणि तुलनात्मक संशोधनास आवश्यक अशी प्राथमिक साधने धुंडाळणे, संबंधित व्यक्तींना बोलते करणे, कठोर-तर्कशुद्ध-वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे ही गोष्ट दामोदरन यांनी परिश्रमपूर्वक साधली आहे.

गेल्या सहा-सात दशकांमध्ये भारतातील औद्योगिक संरचना नाट्यमयरीत्या बदलली. त्यातही आर्थिक सुधारणा पर्व सुरू होण्यापूर्वी आणि झाल्यानंतर असे निराळे प्रवाह दाखवता येतील. औद्योगिक विकासाच्या सन १९९० पर्यंतच्या सुमारे चार दशकांच्या पहिल्या टप्प्यात वाहने, खते, रसायने, लोखंड-पोलाद, धातू उद्योग, खाण उद्योग, यंत्रे, अभियांत्रिकी यांनी आघाडी घेतलेली दिसते. तर खासगीकरण-उदारीकरण यांच्या आर्थिक सुधारणा काळात ताग-सुती कापड हे उद्योग मागे पडले; इलेक्ट्रॉनिक्स, हार्डवेअर, सॉफ्टवेअर, हॉटेल, रिअल इस्टेट, किरकोळ व्यापार, आरोग्य सेवा, सल्लासेवा, उपभोक्त्याच्या वस्तू या उद्योगांनी आघाडी घेतली आहे. औद्योगिक घराण्यांनी या गतिमान काळातील बदलांना कसा काय प्रतिसाद दिला? या घराण्यांचे भवितव्य काय? एकविसाव्या शतकात आणि इथून पुढे घराण्यांची चौकट टिकून राहील काय? ज्या घराण्यांनी आपली वैशिष्ट्ये आणि वेगळेपण जपले व टिकवले त्यांच्या नव्या पिढीला आपापल्या घराण्यांबद्दल पूर्वीइतकेच ममत्व राहील का? या सर्व मुद्द्यांबद्दलची विस्तृत अशी माहिती दामोदरन यांनी संकलित करून मांडली आहे.[८] देशाच्या विविध भागांमधील जाती-उपजाती-जमाती यांच्यामधील औद्योगिक घराण्यांनी आपले व्यवसाय करता करता 'घराणेपण' कसे जपले हे त्यांनी देताना काही जमातींचे विशिष्ट प्रकर्षित अभ्यासही (केस स्टडीज) त्यांनी समाविष्ट केले आहेत. उदा. आंध्रच्या किनारपट्टीवरील गुंटूर व प्रकाशम या जिल्ह्यांमध्ये हिंदू धर्मीयांच्या कम्मा जातीचे उच्चवर्गीय लोक राहातात. (तेथील माजी मुख्यमंत्री एन.टी.रामा राव याच जातीतील.) कम्मा जातीत शेती, सावकारी, जमिनदारी हे प्रमुख व्यवसाय. याच कम्मा जातीतील उद्योजकांनी एकमेकांना साह्य करून हजारो कोटींची उलाढाल करणारी व विविध उद्योगधंद्यातली औद्योगिक साम्राज्ये कशी उभी केली हे दामोदरन दाखवून देतात.[९] असेच अभ्यास त्यांनी तमिळनाडूतील कोंगू, नायडू व गाउंडर या जातीतील उद्योजकतेबद्दल मांडले आहेत. नाडर व एझवे या मागास जातींमध्येही उद्योजकतेचे स्फुलिंग कसे चेतवले गेले ते त्यांनी त्या त्या औद्योगिक समूहांचा आणि घराण्यांचा तपशील देऊन मांडले आहे.

देशात औद्योगिक बदल होत असताना औद्योगिक घराण्यांचा उदय-उत्कर्ष-अस्त असे चक्र चालूच असते. काही उद्योग समूहांनी शंभर वर्षांहून अधिक काळ यशस्वीपणे अस्तित्व टिकवले पण ते झपाट्याने अस्ताकडे पोहोचलेले आढळतात. चुकीचे निर्णय घेणे, नवे तंत्रज्ञान-व्यवस्थापन तंत्र न स्वीकारणे, गळेकापू

स्पर्धेत टिकाव न लागणे. योग्य तो उत्तराधिकारी न मिळणे, कौटुंबिक कलह (बिर्ला समूह, साराभाई समूह, अमीन समूह ॲलेंबिक ब्रँडची उत्पादने ही प्रसिद्ध उदाहरणे), दुसऱ्या एखाद्या उद्योगसमूहाने सक्तीने सामिलीकरण किंवा विभक्तीकरण करणे अशी अनेक कारणे यामागे आहेत. कच्छी, भाटिया हे समाज गेल्या तीन-चार दशकात मागे पडले. खटाव, ठाकरसी, किर्लोस्कर, चेट्टियार, मोरारजी, दोशी, गरवारे ही उद्योग घराणी मागे पडली. त्या नावाच्या उद्योगसंस्था एकवेळ असल्या तरी मालकी-नियंत्रण-व्यवस्थापन त्या घराण्यांचे राहिले नाही. उलट गेल्या पाच-सहा दशकात पुढे आलेली घराणी जशी जैन-मारवाडी-पारशी समाजातील आहेत तशी ती इतर जाती-उपजातींमधली आणि नवनवीन प्रदेशातीलही आहेत. नव्या उद्योग समूहांमध्ये-घराण्यांमध्ये ठळक नावे म्हणजे : हिंदुजा, छाब्रिया, अडवानी, हिरानंदानी, अंबानी, अडानी, शहा, लाला श्रीराम, फिरोदिया, मुंजाल आगा, दालमिया, मोदी, धूत, रुइया, जिंदाल, मित्तल, ओसवाल, पिरामल, साराभाई, गोएंका इ. इ. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळामध्ये औद्योगिक क्षेत्रावर प्रभाव पाडणारी अगदी थोडी घराणी होती, पण आता गेल्या काही दशकात अशी डझनवारी घराणी पुढे आली आहेत. ही केवळ संख्यात्मक वाढ नाही. आताच्या पिढीतील अनेक उद्योजक उच्च शिक्षित व वित्त व्यवहार-व्यवस्थापन या शाखांचे औपचारिक शिक्षण घेतलेले आढळतात. काही उद्योग समूहांना जेमतेम दोन-तीन दशकांचाच पूर्वेतिहास आहे. पण काटेकोर नियोजन, तंत्रज्ञानावरील पकड, परकीय सहकार्य यामुळे अशा उद्योगसमूहांनी प्रगतीचा उच्च वेग राखलेला आढळतो.

उद्योग क्षेत्रातील वर्णव्यवस्था आता निश्चितच मागे पडलेली-किंबहुना नष्टप्राय होत असलेली दिसते. समाजातील सर्व थरातील सर्व धर्मीय जाती-पोटजाती यातून उद्योजक घडत असल्याने ते आता समावेशक भांडवलशाहीचे उत्तम उदाहरण आहे, असे म्हणता येईल. या स्थित्यंतरातील टप्पेही तितकेच लक्षणीय आहेत. उदा. अगदी सुरुवातीस बनिया-वैश्य-मारवाडी-सिंधी या समाजाने उद्योगधंद्यांची धुरा सांभाळली होती. सन १९५० ते १९९० या काळात भारतात हळूहळू नागरी मध्यम वर्ग उदयास आला व त्यांनी उद्योगधंद्यांचे नेतृत्व हाती घेतले. या नागरी मध्यम वर्गाने तिहेरी भूमिका निभावली. त्यांच्या रूपाने मागणी निर्माण होऊन नव्या बाजारपेठा तयार झाल्या. त्यांच्या बचतींनी व्यक्तिगत गुंतवणुकींना बळ मिळाले. शेअर बाजारांचा विस्तार, म्युच्युअल फंडातील लाखो-कोटी रुपयांच्या गुंतवणुकी, शेअर बाजारातील जोखमी स्वीकारायची संस्कृती व मानसिकता हे सर्व याची साक्ष आहे. एका अर्थाने हे भांडवलशाहीचे लोकशाहीकरण होय. याच नवशिक्षित व्यावसायिक वर्गाच्या आगमनाने पूर्वीच्या औद्योगिक घराणे-साम्राज्ये यांच्या पोलादी भिंती वितळण्यास सुरुवात झाली. बदलत्या काळातील संदर्भ पाहाता हे स्वाभाविकच होते. भौगोलिक स्थलांतरासारखे हे सामाजिक अभिसरण ऊर्ध्वगामी गतिशीलता दाखवणारे आहे असे म्हणावे लागेल. या नवउद्योजकांची मागची पिढी दुकानदार/व्यापारी कुळातली किंवा मारवाडी/गुजराती/जैन नव्हती. शिक्षक, सरकारी नोकर, स्वयंरोजगारी यांची मुले आताच्या पिढीत उद्योजक आहेत.

नागरी मध्यम वर्गानंतर आता अगदी नजिकच्या काळात ग्रामीण मध्यम वर्गानेही उद्योजक/उद्योगपती तयार करण्याचे काम केले आहे असे आढळते. शेतीचे व्यापारीकरण, शेतीतील वाढती भांडवली गुंतवणूक व शेतीक्षेत्रातील वाढती उत्पन्ने यांचा हा एकत्रित परिणाम म्हणावा लागेल. शेतीविकासाला कृषि-

औद्योगिक प्रकल्पांची जोड देण्याचा प्रयत्न महाराष्ट्रात तसेच इतरत्र होत आहे. त्यामुळे औद्योगिक घराणी व त्यांची साम्राज्ये यांना तोडीस तोड असे नवउद्यमी नेतृत्व व नवउद्यमी उद्योगांचे उपक्रम आता एकविसाव्या शतकात मूळ धरू लागले आहेत.

**उद्योजकतेचा विकास - III**

उद्योजकतेचा उगम व विकास यामागे जाती-जमाती-पंथांमधील मानसिकतेचा काही प्रमाणात का होईना हात असतो असे मांडताना दामोदरन यांनी यातील प्रादेशिकतेकडेही लक्ष वेधले आहे.[१०] वर नूमद केलेली समावेशक भांडवलशाही दक्षिण व काही प्रमाणात पश्चिम भारतात फोफावली पण उत्तर भारतात तितकीशी रुजली नाही असे तपशीलात पाहाता दिसते. याचे प्रमुख कारण म्हणजे इंग्रजी भाषेचा प्रसार व स्वीकार व इंग्रजी माध्यमातील शिक्षण तुलनेने दक्षिण भारतात प्रकर्षाने घडून आले, पण ते उत्तर भारतात तितक्या प्रमाणात नाही. त्यामुळे आता जाती-पोटजातीपेक्षा काकणभर अधिक महत्त्व व्यावसायिक शिक्षण तंत्रज्ञानाचा स्वीकार, उद्योगांचे विविधीकरण, व्यावसायिक दृष्टिकोन यांना दिलेले आढळते. उदा. दक्षिण भारतातील साखर उद्योग हा पॅरी (चेट्टियार), शक्ती शुगर, धरणी शुगर (गोंडर्स), अरूण शुगर (मुदलियार), पोन्नी शुगर (ब्राह्मण), राजश्री शुगर (नायडू), आंध्र शुगर (कम्मा), जीएमआर इंडस्ट्रीज (कोमटी), गायत्री शुगर (रेड्डी), कोठारी शुगर (गुजराती बनिया), एम्पी शुगर (एजवे) अशा विविध जाती-जमाती-पंथांच्या हातून विकसित झाला आहे. जातीपातींची बंधने व त्यांचे अलिखित नियम-परंपरा हे गळून पडण्यास सुरुवात झाली आहे. उत्तर भारतातील साखरउद्योग मात्र अजूनही कित्येक पिढ्यांची परंपरा असलेल्या बनिया (मारवाडी-खत्री) या जमातींमध्ये राहिला आहे व त्यांच्या बाहेर गेलेला दिसत नाही. साक्षरता, उच्चशिक्षणाचा प्रसार यांतील उत्तर व दक्षिण भारतात जी तफावत आहे त्यामुळे हे घडले आहे असे अनुमान काढण्यास येथे जागा आहे.

पश्चिम भारतातील म्हणजे मुख्यतः महाराष्ट्र व गुजरातमधील उद्योजकांच्या सामाजिक संरचनेतील बदल मांडताना दामोदरन 'सहकारी भांडवलशाही' या संकल्पनेचा आधार घेतात. ही दोन्ही राज्ये भारतात अनुक्रमे सहकारी साखरउद्योग व सहकारी दुग्धव्यवसाय (अमुल) याने ओळखली जातात. सहकारी तत्त्वांचा आधार घेऊन मराठा व समाजाने महाराष्ट्रात व पाटीदार समाजाने गुजरातेत हे उद्योग भरभराटीस आणले. ही दोन्ही राज्ये १९६० साली स्वतंत्रपणे अस्तित्वात आली. त्यावेळेस अल्पविकसित अशा व्याख्येत बसणारी राज्ये औद्योगिक आघाडीवर तितकीशी प्रगत नव्हती. पण शेती विकासाचे विस्तारित प्रतिमान म्हणून या दोन्ही राज्यांनी कृषिऔद्योगिक विकासाची वाट स्वीकारली. महाराष्ट्राने ऊस, दूध, कापूस यांच्या उत्पादनावर आणि त्यांच्या प्रक्रियांवर लक्ष केंद्रित केले. हा विकास मुख्यत: सहकारी संस्थांमार्फत झाला. गुजरातमध्येही अशीच घडामोड दूध, ऊस, भुईमूग यांच्या उत्पादनास अग्रक्रम देऊन झाली. मराठा समाजाने साखर उत्पादनाबरोबर व्यापार, वितरण, पतसंस्था, बँका अशा व्यवसायातही घट्ट पाय रोवले आहेत. महाराष्ट्रात या समाजाच्या बरोबरीने लिंगायत (वारणा सहकारीचे कोरे, पंचगंगा सहकारीचे रत्नाप्पा कुंभार, दत्त सहकारीचे सा. रे.पाटील), जैन (जवाहर सहकारीचे कल्लाप्पा आवाडे) अशाही जमाती पुढे आल्या. पाटीदार समाज मात्र गुजरातेतील सहकारी संस्थांमधून काहीसा दूर होतो आहे असे गेल्या दोन-तीन दशकात दिसते. तेथे त्यांची जागा आता लेवा-पाटीदार, कोळी, बरइया यांनी घेतलेली आहे. अनुकूल सरकारी धोरणे, सरकारचे उदार अर्थसाह्य आणि

सर्वस्पर्शी नेतृत्व यामुळे साधारणपणे १९६० ते २००० हा सहकारी चळवळीचा सुवर्णकाळ मानला जातो. या काळात महाराष्ट्राचे समाजकारण, अर्थकारण व राजकारण सहकारी चळवळीभोवती फिरत होते. आजही हा समाज महाराष्ट्रावरील आपली पकड बऱ्याच प्रमाणात टिकवून आहे.

**उद्योजकतेचा विकास - IV**

देशातील गुजराती-बनिया-मारवाडी-मराठे-रेड्डी-चेट्टियार यांनी उद्योगधंद्यांमध्ये कसकसे योगदान दिले याचा लेखाजोखा मांडताना काही अल्पसंख्य जातीजमाती यांचीही दखल या पुस्तकात घेण्यात आली आहे.[११] संख्येनुसार पारशी समाज जरी अल्पसंख्य या व्याख्येत बसत असला तरी टाटा-गोदरेज-वाडिया-दावर या पारशी कुटुंबांचे देशाच्या औद्योगिक प्रगतीत डोंगराएवढे योगदान आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. या घराण्यांचा उल्लेख वर आला आहेच. इतर अल्पसंख्य समूहांपैकी किमान दोन-तीन गटांचा उल्लेख जाता जाता करता येईल. एक म्हणजे मुस्लीम व दुसरे ख्रिश्चन या धर्मीयांचे देशाच्या औद्योगिक उभारणीत घडून आलेले योगदान! मुस्लीम धर्मीयांमध्ये मेमन, बोहरा, दाऊदी बोहरा, खोजा या पंथीयांमध्ये (त्यात शिया व सुन्नी हे प्रवाह आहेतच) उद्योग-व्यापाराची परंपरा पूर्वीपासूनच दिसून येते. त्यांची मुख्य वस्ती कच्छ, सौराष्ट्र, दक्षिण गुजरात, सुरत या भागात. ही जमात मुख्यतः व्यापारी. मुलतानी या एतद्देशीय सावकारांकडून त्यांना भांडवलाचा पुरवठा होई. कापड-चोपड, मसाला, धान्य, छोटी यंत्रे, हत्यारे यांचा देशात तसेच विदेशात त्यांचा व्यापार चालत असे. चीन, सिलोन, ब्रह्मदेश, दक्षिण अफ्रिका, पूर्व अफ्रिका येथे त्यांचा निर्यात व्यापार असे. त्यांच्यामध्ये कारखानदारी अगदी नगण्य. अपवाद करीमभाई इब्राहिम या खोजा कुटुंबाचा. त्यांच्या मुंबईत नऊ कापडगिरण्या होत्या. पण १९३० च्या मंदीत त्या बुडाल्या. आदमजी दाऊद व अहमद इब्राहिम ही दोन जेतपुरी मेमन पंथातील कुटुंबेही कारखानदारीत थोडेफार नाव घेण्याजोगी. निजामाच्या पुढाकाराने मात्र कागद, साखर, धातुउद्योग, तंबाखू (वजीर सुलतान टोबॅको) या क्षेत्रात मुस्लीम उद्योजकांची कामगिरी लक्षणीय दिसते. मध्य व दक्षिण कोकणात आजही कोकणी मुस्लीम लोकसंख्या आहे. जहाजबांधणी, मासेमारी, फळांचा, धान्याचा व्यापार यात ते गुंतलेले. भाषा, सवयी, चालीरीती संस्कृती या गोष्टींनी मूळ कोकणी लोकसंख्येशी पूर्णपणे मिळून मिसळून असणारे! स्वातंत्र्याच्यावेळी देशाची फाळणी झाल्यामुळे काही व्यापारी-कारखानदार-उद्योजक यांचे पाकिस्तानात स्थलांतर झाले. केरळमधील मुस्लीम हे मलबारी मुस्लीम किंवा मोपले म्हणून ओळखले जातात. आखाती देशात नोकरी-व्यवसायानिमित्त गेलेल्या लोकांनी पाठवलेल्या पैशातून केरळमध्ये अनेक उद्योग, शैक्षणिक संस्था, इस्पितळे यांची उभारणी गेल्या तीन-चार दशकात झालेली दिसते. अनिवासी भारतीयांच्या या पैशाने केरळ राज्यातील औद्योगिक विकासास चालना मिळाली. आजही अनेक मुस्लीम उद्योगपती मोठ्या व प्रसिद्ध कंपन्यांचे प्रवर्तक-संचालक म्हणून नावाजलेले आहेत. त्यातही प्रमुख नावे : आझीम प्रेमजी (विप्रो), खोराकीवाला (व्होखार्ट), लोखंडवाला (जमीन व्यवहार), महंमद नूरानी (झोडियाक क्लोदिंग), युसुफ हमीद (सिप्ला) इ.

मध्य केरळ हा मुख्यतः सिरियन ख्रिश्चन यांच्या प्रभावाखाली होता. शेती, चहा-रबर-मसाल्याचे पदार्थ यांचे मळे, कृषिप्रक्रिया, सावकारी, वित्तीय संस्था, बँका, चिट फंड, शैक्षणिक संस्था असे विविधीकरण या समाजाकडून झालेले आढळते.

अल्पसंख्यांकात गणला जाईल पण विस्ताराची

मुबलक क्षमता असणारा गट म्हणजे दलित समाज. दलित समाजातील उद्योजकता व दलित समाजातील उद्योगपतींचा गट आता एकविसाव्या शतकात मोठ्या वेगाने प्रगती करीत आहे. दिल्ली येथील दलित व्यापार वेल्फेअर असोसिएशन व पुणे येथील दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (डिकी) या संस्था यात आघाडीवर आहेत. डिकीचा विस्तार आता देशातील २९ राज्यांमध्ये झाला असून परदेशातही ७ ठिकाणी त्यांचे कार्य चालते. त्यांचे ३००० हून अधिक सदस्य आहेत. रसायने, हवाबंद अन्न, प्लास्टिक, कापड, सौरऊर्जा, बांधकाम, कीड नियंत्रण या उद्योगात त्यांनी बस्तान बसवले आहे. देशातील नक्षलपट्ट्यात जाऊन तेथे उद्योगधंद्यांची स्थापना करण्याचे धाडसी काम ते करीत आहेत. 'नोकऱ्या मागण्यापेक्षा नोकऱ्या देण्याचे काम करा' असा त्यांचा मूळ विचार आहे. एकच औद्योगिक घराणे किंवा एका जाती/पोटजातीतील व्यक्ती यांनी उद्योगधंदा सांभाळायचा याऐवजी दलित समाजातील विविध प्रवाहातील तरुण लोक एकत्र येऊन नवप्रवर्तनावर भर देतात, लघु व सूक्ष्म उद्योगांची कास धरतात ही आश्वासक घटना आहे. पारंपरिक घराणेशाहीला प्रतितोलन म्हणून हे कृतिशील उत्तर आहे. याच संदर्भात ध्यानात आलेली एक लक्षणीय घडामोड म्हणजे गेल्या काही दशकात व्यवस्थापक, संचालक, उद्योजक या पदांपर्यंत पोचलेला महिला वर्ग. यातही घराण्याचा वारसा असणाऱ्या महिला थोड्या पण असा वारसा नसणाऱ्या व शिक्षण, गुणवत्ता, आत्मविश्वास व कामगिरीच्या बळावर उद्योग जगतात सर्वोच्च पदापर्यंत पोहचलेल्या महिलांची संख्या आता डझनाच्या पटीत घ्यावी लागेल. मागच्या पिढीतील जहाज उद्योगातील सुमती मोरारजी हे नाव चटकन डोळ्यासमोर येते. पण आता अरुंधती भट्टाचार्य, नैना लाल किडवाई, चंदा कोचर, वंदना लुथ्रा, शिखा शर्मा, सायमन टाटा, एकता कपूर, निसावा गोदरेज, इंद्रा नूयी, इंदू जैन, किरण मुजुमदार शॉ, स्वाती पिरामल, गीता पिरामल इ. महिलांनी अनेक जुन्या-नव्या उद्योगांमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. घराण्याच्या चौकटी भेदून व काचेचे छत छेदून होणारी ही प्रगती उद्योग जगाला व समाजाला अभिमानास्पद आहे.

देशाचा औद्योगिक विकास विविध जाती-पंथांशी निगडित अशा औद्योगिक घराण्यांनी केला असला तरी या एकूण व्यवस्थेत कालांतराने काही दोष निर्माण झाले. बहुतेक औद्योगिक घराण्यांना केव्हा ना केव्हा तरी उत्तराधिकारी न मिळण्याचा कटू अनुभव घ्यावा लागला आहे. टाटासारखे अव्वल घराणेही यातून सुटले नाही. बिर्ला घराण्यातील मृत्युपत्राचा वाद न्यायालयात कित्येक वर्षे गाजत होता. साराभाई, अमीन, बिर्ला, बजाज, अंबानी, कोठारी या घराण्यांमध्ये विभाजन होताना वादविवाद, कटुता हे काही काळ चव्हाट्यावर येत राहिले. घराण्याची प्रतिमा, ग्राहकांचा व गुंतवणूकदारांचा विश्वास यावर याचा प्रतिकूल परिणाम होतो. अशा औद्योगिक घराण्याच्या समूहात ज्या कंपन्या असतात त्यांचे आपापसात कित्येक वेळेस शंकास्पद अथवा बेकायदेशीर वित्तीय व्यवहार होतात. त्याने औद्योगिक विश्व ढवळून निघते. या अशा गोष्टींची फारशी दखल या पुस्तकाने घेतलेली नाही. पण याच मुद्द्यांचा आधार घेऊन अभ्यासकांना व संशोधकांना अधिक संशोधन करण्यास वाव आहे असे येथे म्हणता येईल.

**निष्कर्षात्मक अभिप्राय**

प्रस्तुत लेखातील मध्यवर्ती संकल्पना अशी की भारतात विशेष करून गेल्या दीड-दोनशे वर्षात जसे उत्पादनाचे विविधीकरण झाले तसे व्यापार-उद्योगात गुंतलेल्या जाती/जमाती/पंथ/धर्मीयांचेही झालेले

दिसते. समाजातील काही ठरावीक लोकांनी व्यापार-उदीम-उद्योग करायचा, इतरांनी त्या फंदात फारसे पडायचे नाही ही कडेकोट आणि ताठर वर्णव्यवस्था कालपर्यंत टिकून होती असे आढळते. उद्योगात गुंतलेल्या एकेका कुटुंबाची वंशावळ देखील अशी कित्येक पिढ्यांची परंपरा दाखवून देते. पण शिक्षण आणि तंत्रज्ञानाचा प्रसार, जागतिकीकरणाचा रेटा, बदलती मानसिकता यांमुळे हे जलबंद कप्पीकरण हळूहळू अस्ताला जात आहे, असेही दिसते. भारतातील उद्योगक्षेत्र अधिकाधिक व्यावसायिक होत आहे, असे येथे स्पष्टपणे जाणवते.

*(प्रस्तुत लेखातील संदर्भांसाठी साह्य केल्याबद्दल डॉ. राजस परचुरे तसेच गोखले अर्थशास्त्र संस्थेचे ग्रंथालय आणि बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथालय यांचा मी आभारी आहे. लेखाचा सुरुवातीचा मसुदा वाचून बहुमोल सूचना केल्याबद्दल डॉ. मंजुषा मुसमाडे, डॉ. अविनाश कुलकर्णी आणि अज्ञात समीक्षक यांचे मी आभार मानतो. लेखातील मतांची जबाबदारी सर्वस्वी माझीच! - लेखक)*

**संदर्भ व टीपा**

१. Harish Damodaran – India's New Capitalists, Hachette Publishing House, Gurugram (India) Revised Edition 2018.

२. सन १९६० ते १९७५ या दरम्यान रूस्तम दिनशा चोक्सी यांनी पश्चिम भारतातील वेगवेगळ्या प्रदेशात स्थूलमानाने सन १८०० ते १९३९ या दरम्यान रयतेची आर्थिक स्थिती कशी काय होती याचे वर्णन करणारी अनेक पुस्तके लिहिली. मुंबई इलाख्यातील सिंध, दक्खन, गुजरात, कर्नाटक, कोकण असे प्रदेश त्यांनी निवडले होते. शेती उत्पादने, वस्तूंचा व्यापार, खरेदीविक्री, वस्तूंच्या किमती, त्या प्रदेशाचा इतर प्रदेशांशी असणारा व्यापार याबद्दलची विस्तृत माहिती ते देतात. आर्थिक घडामोडींसंबंधी काही सिद्धांत मांडण्यासाठी जी प्राथमिक माहिती हवी असते ती येथे मिळते. पश्चिम भारतात पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजी अंमल हळूहळू लागू होत असताना आर्थिक व्यवहार कसे होत गेले त्यासाठी हा दस्तावेज महत्त्वाचा आहे.

३. या विषयावर ठळक संदर्भ : (a) B N Ganguli;- Indian Economic Thought – 19th Century Perspectives, Tata McGraw Hill, New Delhi, 1977, & (b) Bhabatosh Datta – Indian Economic Thought – 20th Century Perspectives, Tata McGraw Hill, New Delhi, 1978.

४. या विषयावर सध्या मुबलक लेखन होत आहे. पण अस्सल संदर्भांचा वापर करून सुसंगत मांडणी करणारे संदर्भ साहित्य पुढीलप्रमाणे : Cambridge Economic History of India Vol. I 1200-1750 (1982) & Vol. II 1757 – 2003 (2005).

Teerthankar Roy – Economic History of India, Oxford University Press, New Delhi, 3rd Edition 2011.

५. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे इतिहासकार एडवर्ड कार (Carr) यांनी १९६१ साली केंब्रिज विद्यापीठात सहा व्याख्याने दिली. ती पुढे What is History या शीर्षकाखाली प्रसिद्धही झाली. पेंग्विन बुक्स, २री आवृत्ती १९८७. या पुस्तकाचा मराठी अनुवाद सुदैवाने उपलब्ध आहे. जिज्ञासूंनी तो जरूर वाचावा. (इतिहास म्हणजे काय ? मराठी अनुवाद - वि.गो. लेले, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९९०).

६. या विषयावरील पूर्वप्रसिद्ध संदर्भ पुढीलप्रमाणे : (a) Gadgil, D. R. – Notes on the Rise of

the Business Communities in India, Institute of Pecific Relations, New York, 1951.
(b) Tripathy, Dwijendra (Ed) – Business Communities of India, Manohar Publications, New Delhi, 1984.
(c) Musmade, Manjusha – Development of Entrepreneurship in Western India, Unpublished Ph.D. Thesis submitted to S P Pune University, Pune, 2010.

७. दामोदरन, प्रकरण २.
८. पूर्वोक्त, प्रकरणे ९,१०,११.
९. पूर्वोक्त, प्रकरण ४.
१०. पूर्वोक्त, प्रकरण १०.
११. पूर्वोक्त, प्रकरण ९.

◆

## चूक-भूल

अर्थसंवादच्या (एप्रिल-जून २०२०/खंड ४४/अंक १) मध्ये अनावधानाने पुढील चुका राहून गेल्या आहेत -

राजकोषीय पैशावरील (Fiscal space) पृ.८०, वरून ओळ ३ री, ९३५००००००० रु. (पृ. ८२, वरून ओळ ५ वी) आणि राजकोषीय पैशावर (Fiscal space) पृ. ८३, वरून ओळ ७ वी-

यांच्याऐवजी अनुक्रमे राजकोषीय पैसावरील (Fiscal space), ६९३,५०,००००० रु. आणि राजकोषीय पैसावर (Fiscal space) असे वाचावे.

आम्ही दिलगीर आहोत.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

---

देशातील चलनवाढ ही देशांतर्गत आर्थिक धोरण प्रतिबिंबित करते.

**- मार्टिन फेल्डस्टीन**

---

# ‘करोनाबंध’ उलगडताना...!

**अनिलकुमार वावरे** †

ग्रंथाचे नाव : करोनाबंध
लेखक : डॉ.जे.एफ.पाटील
प्रकाशक : समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी, कोल्हापूर
पृष्ठ संख्या : १३०
मूल्य : २०० रू.

**प्रस्तावना**

एकपेशीय अमीबापासून विस्तारत गेलेल्या या जीव-भौतिक विश्वाच्या पसाऱ्यात स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजणाऱ्या मानव प्रजातीला एका सुक्ष्मातिसूक्ष्म विषाणू ‘करोनाने’ त्राहीमाम् करून सोडलं आहे. आपण सर्वच सध्या या वास्तवदर्शी काळाचे साक्षीदार आहोत. सर्वत्र निराशा, भय, धावपळ आणि थिजलेपण व्यापून राहिलेला काळ आपण अनुभवत आहोत. मात्र अशा काळातही करोनाविषयी जनमानस तयार करण्याचे अनेक प्रयत्न देखील होत आहेत. इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मिडिया, समाजमाध्यमे यांद्वारे तर हे काम अव्याहतपणानं सुरूच आहे. मात्र त्यांचं आयुष्य व प्रभाव हा अल्पकालिक व अंशिक असतो. म्हणूनच ग्रंथरूपाने करोनाचा वेध घेणारे प्रयत्न महत्वाचे ठरणार आहेत. कारण पुस्तके ही काळाच्या पटलावर रेखाटलेल्या लेण्यांप्रमाणे असतात. इंग्रजी व अन्य भाषांमध्ये असे अनेक प्रयत्न झाले. मात्र मराठीमध्ये वृत्तपत्रीय लेख, स्तंभ, संपादकीय याव्यतिरिक्त फारसं काही पुढं आलं नाही. तेवढा एक ललितरम्य स्वरूपातील ‘करोनाच्या कृष्णछायेत’ हा कांदबरीवजा ग्रंथ डॉ.मृदुला बेळे यांनी काही दिवसांपूर्वी राजहंस प्रकाशनाद्वारे प्रकाशित केला. मात्र करोनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय पैलूंच्या अनुरोधाने विवेचन असलेला ग्रंथ व तोही मराठीत येणं अपेक्षित होतं. मराठीचं लेखनविश्व, त्याची समृध्दता, व्यासंगी व अभ्यासूजनांची परंपरा पाहता अशा ग्रंथाची फार प्रतिक्षा वाचकांना व अभ्यासकांना करावी लागली नाही. महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ असलेल्या प्रा.डॉ.जे.एफ. पाटील लिखित ‘करोनाबंध’ या समाजवादी प्रबोधिनीद्वारे प्रकाशित ग्रंथाने ती प्रतीक्षा संपवली. त्यायोगे करोनाचा सामाजिक, आर्थिक, राजकीय आयामांनी वेध घेणारा ग्रंथ मराठीतील वाचकांसाठी सिध्द झाला.

† अध्यक्ष, अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
आजीव सभासद क्र. : ८८०, भ्रमणध्वनी : ९८५०११७२२६, ई-मेल : dranilwavare@gmail.com

२१ व्या शतकाला व एकूणच जगाला निर्णायक वळण देऊ पाहणाऱ्या करोना रोगावर बेतलेल्या 'करोनाबंध' या जे.एफ.पाटील लिखित ग्रंथाचं या निमित्ताने एक वाचक या नात्याने नीर-क्षीर विवेकातून केलेलं परीक्षण हे या ग्रंथाचं वाङ्:मयीन औचित्य तटस्थपणे मांडण्याचा एक प्रयत्न आहे.

**ग्रंथाचे शीर्षक :**

करोना काळाचा, त्यातील घटनांचा वेध घेणाऱ्या या ग्रंथाला लेखकांनी 'करोनाबंध' हे दिलेलं शीर्षक करोनाने मानवी जगण्यावर केलेल्या खोलवर परिणामाची गर्भितता व्यक्त करणारं आहे. 'बंध' म्हणजे आवळून टाकणारा पाश. बंधाला अनेकविध गाठी असतात. त्या उकलल्याशिवाय बंध सुटत नाही. करोनाने मानवाला, त्याच्या जगण्याला अनेकविध पाशांनी 'बंध' करून टाकलेलं आहे. हे 'बंध' मृत्युचे, आजारपणाचे, टाळेबंदीचे, अर्थहानीचे असे अनेकविध आहेत. त्यामुळे अशा करोनाप्रणीत बंधाचे विश्लेषण करणारा हा ग्रंथ खऱ्या अर्थाने 'करोना बंध'च आहे. शीर्षकापासूनच वाचकांना विषयाच्या गांभीर्याकडे ओढण्यात लेखक यशस्वी झालेत.

दुसरी बाब म्हणजे कोणत्याही ग्रंथाचे शीर्षक ग्रंथाबद्दल जेवढं दिग्दर्शन करते, तितकेच ते त्या ग्रंथप्रपंचातून वाचकांना कोणत्या भावी दिशांचं दिशादर्शन व्हायला हवं तेही अबोधपणानं सांगते. 'करोनाबंध' हे शीर्षक अशाच प्रकारचं आहे की जे वाचकांना करोनानं टाकलेले बंध तर दाखवून देतेच. शिवाय, बंध म्हटल्यानंतर त्यानंतर येते ती त्या बंधातून सुटका! त्या सुटकेचे दिशादर्शन यातून होऊन जाते. किमानपक्षी आपल्या जाणीवा तरी त्या अनुषंगाने सजग होऊ लागतात. असे दोन्ही हेतू या शीर्षकातून साध्य होताना दिसतात. बाधितांचे मृत्यु, संसर्गितांना बरे करण्याचं आव्हान, संसर्गाला अटकाव करण्याची शर्थ, आर्थिक नुकसानीची भरपाई असे अगणित बंध सोडविणे, त्यासाठी ते समजावून घेणे करोनाबंधच्या माध्यमातून शक्य होईल.

**ग्रंथाचे स्वरूप :**

वास्तवात 'करोनाबंध' हा एक 'लघु लेख' संग्रह आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख व महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ म्हणून परिचित असलेले प्रा.डॉ.जे.एफ. पाटील यांनी करोना काळाचा, त्यातील घटना-प्रसंगाचा घेतलेला हा चिकित्सक वेध आहे. लेखक गेली अनेक वर्षे आर्थिक, सामाजिक विषयांवर सातत्याने लिहिणारे, बोलणारे सामाजिक शास्त्राचे सिध्दहस्त लेखक व भाष्यकार आहेत. वयाच्या ऐंशीतही त्यांनी अनुभवलेला हा करोना काळ त्यांनी शब्दबध्द केला. करोना काळातील घडामोडींना आपल्या अनुभवी, अभ्यासू नजरेतून पाहताना ''आपण यावर किमान दोन दिवसांतून एक लेख लिहायचाच'' या संकल्पबुध्दीतून त्यांचा हा लेखन प्रपंच सिध्द होत गेला. त्यामुळेच त्यांच्या या लेखनास करोना काळाच्या घटनांची लय साधली आहे. यातूनच ३७ लघुलेख व काही टिपणे तात्कालिक विषयांच्या अनुषंगांनी लिहिलेली आहेत. यातील बरेचसे लेख करोना काळात सकाळ, पुढारी, लोकमत, देशदूत यांसारख्या दैनिकांमध्ये प्रसिध्द झालेले आहेत.

वृत्तपत्रीय लिखाणाचं आयुष्य हे बहुधा अल्पजीवी असतं. परिणामी बोललेले शब्द जसे वाऱ्यावर विरून जातात तसे वृत्तपत्रीय लिखाणही काळाआड होण्याचा संभव असतो. परिणामी डॉ.जे.एफ.पाटील सरांनी करोना काळातील घटनांचा घेतलेला साक्षेपी वेध ग्रंथबध्द झाला. हे एक प्रकारे योग्यच झाले. आता तो पुस्तक रूपात चिरस्थायी होईल. यातून तो बहुसंख्याकांसाठी ज्ञात होत जाईल व त्याची नोंदही

घेतली जाईल.

ग्रंथातील सर्व लेखांचे वाचन केल्यानंतर करोनारूपी घनदाट जंगलाचा माग काढण्याकरता कुण्या एका जाणकाराने पायवाटा दाखवाव्यात तसे विषय, त्यातले बारकावे उलगडत जातात. अगदी प्रारंभीच 'करोनाचा आर्थिक धसका!' या शीर्षकातून करोनाची बहुव्याप्त समीक्षा अगदी मोजक्या व प्रभावीपणे मांडलेली आहे. आरोग्य, स्थलांतर, जागतिक आरोग्य संघटना, मा. मुख्यमंत्री उध्दव ठाकरेंचे नामनिर्देशन, दारू विक्रीचा पेच अशा तात्कालिक विषयांवर व घटनांवर लेखक मार्मिकपणे भाष्य करतात. यातून नित्याच्या स्थानिक पातळीपासून अगदी जागतिक स्तरावरील घटनांकडे वरवरच्या उथळपणाने न बघता त्यामध्ये तार्किकता कशी असली पाहिजे याचं दिग्दर्शन वाचकांना करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. कामगारांच्या प्रश्नावर लिहिलेल्या लेखातून या आघाडीवर करण्यासारखं बरंच काही आहे व आजवर फारसं काही न केल्याने सध्याचे प्रश्न गंभीर असल्याचा निष्कर्ष समोर येतो. एका लेखात तर करोना प्रसार वाढत गेल्यास आणिबाणी येवू शकते! ती आली तर कशी असेल, त्याचे स्वरूप, परिणाम यावरही साद्यंत विवेचन केलेले आहे.

या सर्व लेखसंग्रहामध्ये सर्वाधिक भर हा करोनोत्तर काळ कसा असेल? यावर दिलेला दिसून येतो. लेखकांनी याविषयी तब्बल चार लेख लिहिले आहेत. ज्यामध्ये भावी काळातील आर्थिक सुधारणा, सामाजिक बदल, कामगार, सार्वजनिक खर्च यांचा भविष्यातील वेध घेतला आहे. यानंतर 'टाळेबंदी' या करोनाप्रणीत घटनेचे बँकिंगवर झालेले परिणाम, लॉकडाऊन पश्चात करावयाचे नियोजन, टाळेबंदीची आवश्यकता या पैलूंना स्पर्श करणारे, त्यावर उपाय सुचवणारे तीन लेख पाहायला मिळतात. लेखक स्वत: अर्थशास्त्रातील तज्ज्ञ असल्याने सरकारची आर्थिक धोरणे, आरबीआयचे मौद्रिक धोरण, राज्याचे वित्तीय प्रश्न यासंबंधीचे दोन लेख देखील लक्षवेधी आहेत.

एकंदर लिखाणामध्ये 'कोव्हीड १९ एक आत्मपरीक्षण' हा लेख करोना साथरोगाच्या पार्श्वभूमीवर आपल्याला व एकूणच व्यवस्थेला आत्मपरीक्षण करायला लावणारा आहे. आज ज्या प्रमाणात करोनाचा प्रसार वाढतोय व त्याचा अटकाव करण्यासाठी आपण जे प्रयत्न करतोय ते पाहता आपल्यातील उणीवा, त्रुटी यांचा गांभीर्याने विचार करण्यास लेखक आपल्याला प्रवृत्त करतात. ''वर्तमान काळातील घटनांना भूतकालीन संदर्भ असतात'' या न्यायाने आत्ता जे करोनाविषयी घडतंय त्याचे स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय असे भूतकालीन संदर्भ अधोरेखित होणे गरजेचे आहे. कारण त्याशिवाय या आपत्तीची व्याप्ती, त्यावरचे उपाय यांच्या नेमक्या दिशा कळणार नाहीत. तसा सविस्तर अभ्यास झाल्यानंतरच करोनोत्तर काळाचे नियोजन यथायोग्यपणे होवू शकेल. सर्वच विषय विवेचनात सरकारचा विचार प्राधान्याने केलेला दिसतो. पण व्यक्ती, समाज आणि मग सरकार अशा उत्क्रांत रचनेची मानवी व्यवस्था असल्याने जशी माणसं असतील तसाच समाज असतो व जसा समाज असेल त्याच वृत्ती, प्रवृत्तीचं सरकार सत्तेत असतं. त्यामुळे करोनाबंधाला आवश्यक असलेली व्यक्तिगत व सामाजिक जीवनाची नीरगाठ अजून जरा उकलवली गेली असती तर विषयाची व्यापकता वाढली असती.

सरकारांद्वारे करोना उपचार व अटकाव याबाबतीत जे नियोजन केलं गेलं त्याचेही विश्लेषण ग्रंथात दिलेले आहे. मात्र करोनासारखी आपत्ती व तिचा प्रसार हा भौमितिक श्रेणीने वाढतोय व त्या तुननेत आपल्या नियोजनाचा वेग हा गणिती श्रेणीत राहिला. तसेही

नियोजन हे नियंत्रित परिस्थितीत व दीर्घकाळात शक्य असतं. करोना आपत्ती मुळातच अचानक आलेली, अनियंत्रित व अल्पकालीन असल्याने नियोजनाच्या चौकटीत तिला जोखणं मोठं कठीण काम आहे.

एकूण विश्लेषणात करोना रोगाच्या काळात देशभरात ज्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, नैसर्गिक आपत्ती, घटना, प्रसंग घडले त्याचा करोना साथरोग नियंत्रणावर झालेला परिणाम अधोरेखीत होणे गरजेचे होते. भारत-चीन सीमेवरील तणाव, भारत-नेपाळ सीमा वाद, पाकिस्तानी सीमेवरील तणाव, दहशतवादी हल्ले, महाराष्ट्रातील साधूंची झालेली हत्या, निसर्ग चक्रीवादळ, टोळधाडीचं संकट, अतिवृष्टीनं केलेलं नुकसान असे अनेक प्रसंग, घटना करोनाशी जोडलेल्या होत्या. त्यांच्या संदर्भासह करोना काळ जोखणं गरजेचं आहे.

करोना काळाचं विश्लेषण जेव्हा आपण वाचत जातो तेव्हा भांडवलदार-श्रमिक, श्रीमंत-गरीब, शहरी-ग्रामीण, विकसित-अविकसित अशा सर्वांसाठी करोना वेगवेगळा आहे. शहरी, श्रीमंत लोकांकरता तो साथ सोवळयाचा भाग आहे. तरी कामगार व गरीबांकरता ती आपत्ती आहे.

लेखकांनी आपल्या विवेचनात करोना महामारीमुळे प्रचलीत झालेल्या टाळेबंदी, सोशल डिस्टन्सिंग, होम-क्वारंटीन यांसारख्या इंग्रजी शब्दांसाठी, कुलपबंदी, ठाणबंदी, पिंजराबंदी, निवासबंद, सामाजिक दुरांतरण यांसारख्या मराठी नव्या पारिभाषिक शब्दप्रयोगांचा केलेला वापर अभ्यासकांचा शब्दसंग्रह वाढवणारा ठरणार आहे. करोनाशी संबंधीत अनेक संकल्पना देखील एका लेखाद्वारे दिल्या आहेत. एकूणच १३० पृष्ठांच्या मर्यादीत व आटोपशीर विवेचनात विविधांगी मुद्दयांचा परामर्श घेण्याचा हा लेखनप्रयोग वाचकांना करोनाविषयी सजग व जिज्ञासाप्रवृत्त करेल यात शंका नाही.

**ग्रंथाचे वाङ्मयीन महत्त्व :**

कोणतंही साहित्य, त्याचं महत्व हे त्याच्या वरवरच्या स्वरूपापेक्षा लेखकाचा त्यामागचा अंतर्निहीत उद्देश काय आहे? मांडणीमागील भूमिका कोणत्या मुलभूत आधारशिलेवर आहे? यावरून ठरत असते. डॉ.जे.एफ.पाटील लिखित 'करोनाबंध' ग्रंथाचे यासंदर्भातील महत्व या दृष्टिने पुढे येते की, करोनाच्या आरोग्य, वैद्यक, आर्थिक, सामाजिक, राजकीय कंगोऱ्यांचं यथार्थ परीक्षण करणारं, त्यावर उपयांची किमान दिशा सांगणारं मराठीतील पुस्तक समाजवादी प्रबोधिनीसाठी त्याचे केलेले प्रकाशन हा देखील या ग्रंथाचा महत्वाचा गुण निकष आहे. कारण महाराष्ट्राच्या वैचारिक जडण-घडणीचे भरणपोषण करण्यात समाजवादी प्रबोधिनीचं योगदान अनन्यसाधारण आहे. शिवाय या ग्रंथातून येणारी व्यवहार्य मिळकत लेखकांनी प्रबोधिनीच्या कार्याला दिली असल्याने त्याला एकूणच उदात्ततेचा परिसस्पर्श लाभला आहे.

'करोनाबंध' वाचताना पानोपानी लेखकाचा एक भाव सातत्याने जाणवत राहतो तो असा की, आपली मांडणी, विवेचन करताना एका जबाबदार नागरिकाच्या तात्कालिक घटनांप्रतीच्या सजग प्रतिक्रिया आणि त्यासंबंधीची आपल्या पूर्वचिंतनाची सांगड घालत झालेली ही वैचारिक अभिव्यक्ती आहे. परिणामी ठिकठिकाणी व्यक्त झालेली मते फारच प्रांजळ वाटतात. ऐतिहासिक नोंदीदेखील अगदी चपखलपणाने वापरलेल्या आहेत. शिवाय करोना काळात सरकार, समाज, माध्यमे यांनी जे जे स्तुत्य केलं त्याचं मुक्त कंठाने कौतुकही केलेलं आहे. मात्र त्या सोबतच ज्या चुका निदर्शनाला आल्या त्यांची तटस्थ व वस्तुनिष्ठ चिकित्सा करण्याचं दाखवलेलं धारिष्ट्य

(धारिष्ट्य या अर्थाने, कारण अलीकडे व्यवस्थेवर टीका केल्यास तो 'देशद्रोह' ठरतो. त्यामुळे बहुसंख्य बुध्दिजीवी त्यात पडेनासे झालेत) हे स्पृहणीय आहे. लेखक एवढ्यावरच थांबले नसून त्यांनी बहुतांशी बाबींबर आपल्या उस्फूर्त अशा शिफारशी देखील दिलेल्या आहेत. लेखक हे याआधी महाराष्ट्राच्या नियोजन मंडळावर सदस्य होते. त्यांच्या याच पूर्वीच्या कार्यकल्पाची छाप त्यांच्या या सुचनांतून व शिफारशींतून दिसून येते.

**लेखकाविषयी :**

डॉ.जे.एफ. पाटील हे प्राध्यापक, लेखक, वक्ते अशा विविध आयामांनी मराठी वाचकांना सुपरिचित आहेत. अनेक संदर्भग्रंथ, त्यांचे संपादन, वृत्तपत्रीय लेख, व्याख्याने अशा स्तरांतून आजही वयाच्या पंच्च्याहत्तरीनंतरही काम केले आहे. त्यांनी एरवी सर्वांनाच भयगंडाने, अनिश्चिततेनं ग्रासणाऱ्या करोना काळावर बेतलेलं 'करोना बंध' हे पुस्तक लिहिणं म्हणजे आजच्या कर्त्या पिढीला एक क्रियाशीलतेचा दिलेला सूचक परिपाठच आहे. लेखकांनी स्वातंत्र्या-नंतरची सुरूवातीची काही वर्षे पाहिली व अनुभवली असल्याने, नियोजनाच्या पर्वामध्ये स्वत: काम केलं असल्याने आजच्या करोनाग्रस्त व्यवस्थेचं त्यांचं विवेचन हे अनुभवांच्या बोटाला पकडत मार्गक्रमण करताना दिसतं. अफाट वाचन, व्यासंग, या वयातही जागृत असलेलं कुतुहल, चौकसपणा मांडणीत सातत्याने येत राहतो. हे लेख जरी लघु स्वरूपात असले तरी वयोवृध्द व तपोवृध्द अशा हार्डकोअर अकेडमीशिअन 'थोडक्यात पण महत्वाचं' गुंजचं जणू ग्रंथीत केलेलं आहे.

**आहे मनोहर तरी....!**

'करोनाबंध' विविध अंगांनी जेव्हा आपण उलगडत जातो, तेव्हा त्याच्या गुणवैशिष्ट्यांसह तटस्थपणानं पाहू गेल्यास काही बाबी समोर येतात. करोना काळात जी टाळेबंदी लागू झाली, ती सुरवाती-सुरूवातीला सर्वांसाठी स्वागतार्ह होती. कारण त्यातून संसर्ग थांबेल असा आपला कयास होता. करोना-बंधातील सुरूवातीच्या लेखांतही हेच दिसून येतं. मात्र जून संपेपर्यंत हा आशावाद मावळतो. लेखक देखील याबाबत लवचिकपणे बदलत्या परिपोषात शेवटच्या काही लेखांत टाळेबंदीची चिकित्सा करतात. पण या सर्वात टाळेबंदीचा फायदा उठवत आरोग्य उपकरणे व साधने निर्मात्यांनी, टेस्टींग लॅब्जनी जी लोकांची लूट केली, त्यातून हे क्षेत्र मोठ्या फायद्यात आलं. दुसरीकडं किराणा व जीवनावश्यक वस्तूंचा उच्चांकी खप झाल्याने व्यापारी व उत्पादक कंपन्यांची चंगळ झाली. अशा गोष्टींसह टाळेबंदीची मीमांसा झाली असती तर विषयाची व्यापकता आणखी वाढली असती. संपूर्ण लेखात करोनोत्तर काळाची दिशा, विविध क्षेत्रांबाबत कशी असेल हे देखील सांगण्यावर भर होता. मात्र करोना साथरोग हा आयात झालेला व आंतरराष्ट्रीय सांधेजोड असलेला प्रश्न आहे. त्याचे जरी अर्थ, राजकीय व सामाजिक परिणाम होत असले तरी त्याचा उगम वैद्यकीय क्षेत्रातून झाला. त्यामुळं त्याच्या उपायांचे, अटकावाचे, प्रसाराचे व सर्व प्रकारच्या हानीचे दुवे हे आरोग्य व वैद्यकाशी संबंधीत आहेत. त्यासंबंधीचे विज्ञान अंदाजावरच चालत नाही. प्रयोग, पडताळणी, अनुमान यांनी ते सिध्द होत होत वर्तमानाच्या बरोबर चालतं. त्यामुळे विषाणूचा प्रसार, लक्षणं जसजशी बदलत गेली. तसं सगळं बदलत गेलं. त्यामुळे लेखकांनी केलेल्या तात्कालिक विश्लेषणांना मर्यादा पडणं साहजिकच होतं.

पुस्तकातील काही टिपणांमध्ये 'आत्मनिर्भर भारत' या योजनेवर देखील लिहिलं आहे. ज्यात शेती व खाजगी क्षेत्रासाठी या पॅकेज व योजनेचं महत्व व

उपयुक्तता सांगितली आहे. मुळात २० लाख कोटी या स्थूल आकड्यातील पॅकेजविषयी सुरूवातीला सर्वांनाच कौतुक होतं. मात्र नंतर जेव्हा या २० लाख कोटींची चिकित्सा होत गेली तसे यामध्ये 'इक्वीटी फंडींगचा' असलेला मोठा भाग, आरबीआयच्या धोरणांद्वारे 'लिक्वीड' स्वरूपातील बँकींग, वित्तीय संस्था, सरकारी उद्योग यांना देऊ केलेली (प्रत्यक्षात दिलेली नाहीत) कर्जे याचाच भरणा मोठा आहे. थोडक्यात या २० लाख कोटीचं गणित हे ''२ लाख कोटी प्रत्यक्ष दिलेले व १८ लाख कोटी आम्ही देऊ'' असं आहे. या वस्तुस्थितीसह याचं विवेचन करण्यासाठी देखील खूप वाव होता.

करोना काळात मंदी येईल, रोजगार जातील अशा अटकळी मांडल्या गेल्या. प्रस्तुत ग्रंथातही त्याची मांडणी आहे. मात्र नोबेलची मानकरी ठरलेल्या 'नज थिअरींनी' ग्राहकांच्या वर्तनशास्त्राचा प्रभाव सिध्द केला नाही, त्याप्रमाणे अनिश्चित काळाच्या भयगंडाने पछाडलेल्या ग्राहकांनी वारेमाप वस्तुसंग्रह केला. शहरांतून गावांकडे मोठे स्थलांतर झालं. गावांकडे आलेल्यांनी शेती, घरे यांमध्ये सुधारणा व गुंतवणुकी सुरू केल्या. लोकांनी आपल्या बचती, निवृत्तीनंतरच्या रक्कमांमधील पैसे मोठ्या प्रमाणावर काढले. परिणामी आपण जेवढ्या प्रमाणात मागणी मांद्य कल्पिलेलं होतं तेवढ्या प्रमाणात ते आलं नाही. याचाच अर्थ आपल्याला करोना काळाचं विश्लेषण करताना ग्राहकांचं मानसशास्त्र देखील विचारात घ्यायला हवं. शहरांतील कुटुंबेच्या कुटुंबे गावाकडे आली व करोनाच्या रेट्यामुळे एकत्र कुटुंब पध्दती पुन्हा सुरू झाली. यातून 'कुटुंब शेती' सुरू झाली. यापूर्वी ग्रामीण भागात शेतीसाठी मजूर मिळत नव्हते. आता ते मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. टाळेबंदीत ट्रॅक्टरचा विक्रमी खप झाला. अशा पैलूंसह मांडणी करायला बराच वाव आहे. मात्र हे पुस्तक समयोचीत अशा प्रसंगांवर भाष्य करणाऱ्या काही समस्यांचं, त्यांच्या उपायांचं विवेचन करणाऱ्या लेखांचा संग्रह आहे, या मर्यादेत त्याकडं पाहिल्यास त्याचं महत्व निर्विवाद आहे. तरीही एका अनुभवी व सिध्दहस्त लेखकांनी लिहिलेल्या लघुलेखांचा हा संग्रह भल्यामोठया संदर्भ ग्रंथाइतकाच मार्गदर्शक आहे. त्यामुळे करोना काळाचा पट मांडणारं हे लेखांकन करोनाच्या यथार्थ इतिहासाची साक्ष आहे.

**समारोप :**

'करोनाबंध' या पुस्तकाच्या आगमनानं मराठी साहित्यविश्वात करोनाच्या अभ्यासपूर्ण पुस्तक लेखनाला एक मोकळी वाट करून दिली आहे. त्याचा माग घेत नवोदीत लेखकांना येत्या काळात बऱ्याच प्रश्नांना भिडण्याची प्रेरणा मिळेल, अभ्यासकांच्या चिंतनाला नवे आयाम मिळत जातील. संशोधकांसाठी हक्काचं संदर्भस्थळ म्हणून हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल. धोरणकर्त्यांना ते दीपस्तंभाप्रमाणं मार्गदर्शन करेल. गुंतागुंतीनी, अस्थिरतेनी व्यापलेला करोना काळ कसा समजावून घ्यावा याचा एक वस्तुपाठच करोनाबंधामुळे आपल्याला जे.एफ. पाटील सरांनी घालून दिला आहे. त्याच्या प्रकाशात येणाऱ्या अभ्यासकांच्या प्रतिभेला, अभिव्यक्तीला, संशोधनाला नवनिर्मितीचे, ज्ञानसृजनाचे धुमारे फुटावेत हीच सदिच्छा! ◆

# शेल कंपनी (Shell Company)

**शि. ना. माने** †

"The crucial problem is not creating new jobs. The crucial problem is creating new jobs that humans perform better than algorithms." (Yuval Noah Harari in Homo Deus, 2015, P. 380)

अनुवाद : नवीन नोकऱ्यांची निर्मिती करणे हा कळीचा प्रश्न नाही. कळीचा प्रश्न हा आहे की संगणितचलित अन्वेषण पद्धतीपेक्षा (Algorithms) माणसे जास्त चांगल्या पद्धतीने पार पाडतील अशा नोकऱ्या निर्माण करणे.

घडलेल्या उदाहरणाने याचे स्पष्टीकरण करू. २०व्या शतकाच्या अखेरच्या दशकात केरळ किनाऱ्यावर एक चमत्कार घडला. तेथील मच्छिमार भ्रमण दूरभाषांचा वापर करू लागले. त्यापूर्वी समजा, ३० कि.मी. परिसरात ठरावीक अंतरावर तीन मच्छिमार बोटींच्या साहाय्याने मासे पकडत होते. त्यांना प्रत्येकाने प्रत्येक दिवशी किती मासे पकडले याचा बिनचूक अंदाज करणे शक्य नव्हते. परिणाम? त्या दिवशीच्या मागणीपेक्षा पुरवठा अतिरिक्त झाल्यामुळे अतिरिक्त मासे फेकून देण्याशिवाय गत्यंतर नव्हते आणि असे प्रसंग वारंवार येत होते. परंतु भ्रमण दूरभाषाचा शोध व वापर शक्य झाल्यामुळे अतिरिक्त माशांचे संकट टळले. कारण प्रत्येकाने किती मासे पकडले याची बिनचूक व ताबडतोबीची माहिती त्यांना मिळू लागली.

विदाविज्ञान हा आज २१ व्या शतकातील धर्म आहे. 'नवी कौशल्ये व नव्या नोकऱ्यां'च्या युगात उठ-बस 'फ्युचर ऑफ एम्प्लॉयमेंट'चा भयगंड किंवा बागुलबुवा निर्माण करणे योग्य नव्हे. आज प्राथमिक शाळेत मुलांना मिळणारे ज्ञान, ती मुले ज्यावेळी ४० वर्षांची होतील, त्यावेळी अप्रस्तुत किंवा कालविसंगत होणार आहे. हवे तर त्याला 'ज्ञानाचा विरोधाभास' म्हणा! सारांश, गुन्हेगारी तपासयंत्रणा, सुरक्षा, आरोग्यसेवा, वाहतूक व्यवस्था, शिक्षण, न्यायदान, आदी क्षेत्रांत कमीत कमी मानवरूपी श्रमात जास्तीत जास्त फल देणाऱ्या नवप्रज्ञाचलित फलप्रामाण्यवादाची ही सुरुवात आहे.

सुरुवातीच्या विधानाचा अन्वयार्थ पाहिल्यानंतर आता आपण शेल कंपन्यांचा अर्थ व त्यांचे स्वरूप यांचा संक्षेपात विचार करू.

विशेषत: ८ नोव्हेंबर, २०१६ नंतर (निश्चलनीकरण) ही संज्ञा चलनात आली.

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.
आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

करचुकवेगिरी व काळ्या धनाचे वैध चलनात रूपांतरण करणे यांना अटकाव करण्यासाठी केंद्र सरकारने काही ठोस निर्णय घेतले. आता एक सुरुवात म्हणून शेल कंपनीची व्याख्या करणे जरूर होते. त्याशिवाय त्यांच्याविरूद्ध कायदेशीर कारवाई करणे शक्य व योग्य नव्हते.

ऑक्सफर्ड डिक्शनरीत 'Shell Company'तील व येथे लागू पडणारा शेल शब्दाचा पुढील अर्थ दिला आहे : the outer covering of an egg, nut, kernel or seed. म्हणजे अंडे, दाणा, खोबरे किंवा धान्य यांवरील संरक्षक आवरण किंवा कवच असे त्याचे भाषांतर होईल. उदाहरणार्थ, शेंगदाणा शब्दातील दाण्यावरील संरक्षक कवच, आवरण, टरफल किंवा शेंग (शेल).

**व्याख्या :** ''केवळ नाममात्र अस्तित्व असलेल्या अथवा बिगरसूचिबद्ध बड्या कंपन्यांखातर गैरव्यवहार करण्याच्या युक्तीने शेअर बाजारात सूचिबद्धता संपादन करणाऱ्या कंपन्या.'' (केंद्रीय कंपनी व्यवहार मंत्रालय). दुसरी व्याख्या सी. राममनोहर रेड्डी यांच्या डीमॉनेटायझेशन अँड ब्लॅक मनी(२०१७) या पुस्तकातील मूळ इंग्रजी व्याख्येचा मराठी अनुवाद आहे. ती पुढे दिली आहे. ''समभाग व्यवहारात करचुकवेगिरी करण्यासाठी स्थापन झालेल्या शेल कंपन्या.'' अशा ३३१ असामान्य (Abnormal) स्वरूपाची गुंतवणूक व निधीचा ओघ बड्या बिगर-सूचिबद्ध कंपन्यांकडून संशयास्पदरित्या सूचिबद्ध शेल कंपन्यांच्या माध्यमातून सुरू असल्याचे कंपनी व्यवहार मंत्रालयाला आढळून आली आणि त्या कंपन्यांविरुद्ध मोहीम म्हणून मंत्रालयाने त्यांची नोंदणी रद्दबातल केली. तसेच अशा व्यवहारात गुंतलेल्या १,६२,००० शून्य व्यावसायिक क्रिया करणाऱ्या कंपन्यांची नोंदणी देखील यापूर्वीच रद्दबातल केली. शिवाय, सुमारे २०-२५ वर्षांपूर्वी स्व. जयललिता व त्यांची सखी शशिकला यांनी कर चुकविण्यासाठी ३४ शेल कंपन्या स्थापन केल्या होत्या आणि त्यांनी निर्माण केलेल्या काळ्या धनाचे परत वैध चलनात रूपांतरण करण्यासाठी ५० बँक खाती उघडली होती. त्यांचे हे संशयास्पद व्यवहार त्यावेळी उजेडात आले होते. फरक हा की त्यावेळी शेल कंपनी ही संज्ञा ज्ञात नव्हती. असो.

आतापर्यंतच्या चर्चेच्या आधारे कवचधारी कंपनी, कवच कंपनी हे मराठी पर्याय सुचविले आहेत.

◆

सार्वजनिक आरोग्य, सुरक्षा, नैतिकता आणि सामान्य कल्याण यांचे संरक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

**- ॲलन ऑल्फ**

# अरिष्ट गृहीतक, राजस्व दुरांतरण

**जे. एफ. पाटील** †

वर्तमान लेखात इंग्रजीत वापरले जाणारे काही शब्द व त्यासाठी मराठी प्रतिशब्द खाली दिलेत.

**१. अरिष्ट गृहीतक :** या अर्थाचा इंग्रजी शब्दप्रयोग ब्रिटिश कोलंबिया विद्यापीठ (कॅनडा) येथे कार्यरत असणाऱ्या प्रा.डॉ.अमर्त्य लाहिरी यांनी त्यांच्या "Catch a crisis by horns' या दि.१०.०९.२०२० च्या इकॉनॉमिक टाईम्समधील लेखात वापरला आहे. मूळ शब्दप्रयोग -

>Crisis Hypothesis - असा आहे.

>Crisis ला मराठी प्रतिशब्द - अरिष्ट वापरला जातो.

>Hypothesis ला मराठी प्रतिशब्द - गृहीतक वापरला जातो.

हे शब्द योग्य आहेत म्हणून प्रस्तुत लेखकाच्या मते - 'अरिष्ट गृहीतक' हे मराठीकरण योग्य वाटते.

अरिष्ट याला समानअर्थी म्हणून - संकट, आपत्ती असेही शब्द आहेत. म्हणून '' आपत्ती गृहीतक'' वा ''संकट गृहीतक'' असाही प्रतिशब्द करता येईल. दुसऱ्या बाजूस >Hypothesis ला मराठीत - परिकल्पना, अभ्युपगम असेही शब्द आहेत. म्हणून- 'अरिष्ट परिकल्पना' असाही शब्दप्रयोग वापरता येईल. प्रस्तुत लेखकाच्या मते 'अरिष्ट गृहीतक' अधिक सोपे, अर्थसंक्रमण करणारे वाटते.

ओघाने-अरिष्ट गृहीतक म्हणजे महत्त्वाचे धोरणात्मक बदल, अरिष्ट काळातच सहजपणे करता येतात. कोविद-१९ महामारीच्या अरिष्टाच्या पश्चात आत्मनिर्भर भारत योजनेत-कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा बदल, आवश्यक वस्तू कायदा बदल व कृषी विपणन करार कायद्यातील सुधारणा ही त्यांची ताजी उदाहरणे आहेत.

**२. राजस्व दुरांतरण :** या अर्थाने हा शब्दप्रयोग रिझर्व्ह बँकेचे माजी डेप्युटी गव्हर्नर श्री.विरल आचार्य यांनी "Close the fiscal distancing"- The Economic Times, Dtd.13.09.2020 - च्या अंकात वापरला आहे. अर्थसंकल्पीय उद्दिष्ट्ये, मर्यादा व त्या बाबतीत सरकारी अनुभवात येणारे/पडणारे अंतर या अर्थाने Fiscal Distancing हा शब्दप्रयोग वापरलेला दिसतो. त्याला आपण 'राजस्व दुरांतरण' असा शब्दप्रयोग वापरू. असे राजस्व दुरांतरण टाळण्यासाठी - कमी करण्यासाठी श्री.विरल आचार्य

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

यांनी दोन संस्थात्मक सुधारणा सुचविल्या आहेत.

१. द्विपक्षीय राजस्व समिति >(Bipartisan Fiscal Committee)

२. सार्वजनिक क्षेत्र कर्ज गरजपत्रक (Public Sector Debt Requirement)

३. जागतिक नवप्रवर्तन निर्देशांक (Global Innovation Index):

दी इकॉनॉमिक टाईम्सच्या दि.१५.०९.२०२० च्या अंकात Reinvention of Innovation - या मथळ्याखाली लेखात ग्लोबल इनोव्हेशन असा शब्द प्रयोग वापरला आहे. शुंपीटरच्या सिद्धांताप्रमाणे आर्थिक विकासाच्या दोन मूळ प्रेरणा - नवप्रवर्तन (वस्तू, तंत्र, संघटन, कच्चा माल) व २. पतपुरवठा : उपरोक्त लेख नीतीआयोगाचे उपाध्यक्ष राजीव कुमार व अटल इनोव्हेशन मिशनचे व्यवस्थापकीय संचालक आर.रामनन यांनी लिहिला आहे.

नुकत्याच प्रकाशित झालेल्या ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्समध्ये भारताचा क्रम ४८ वा (एकूण १३० देशांत) लागला आहे. २०१५ ला हा निर्देशांक भारताचा ८१ वा होता, ही मोठी सुधारणा आहे.

जागतिक नवप्रवर्तन निर्देशांक (GII) तयार करण्यासाठी

- ८० दर्शकांचा
- ५ गटात विभागणी करून

गुण मोजले जातात, हे पाच गट -

- संस्था
- मानव संसाधन व संशोधन
- पायाभूत सेवा-सुविधा
- बाजार सुधारणा
- व्यावसायिक सुधारणा

नव्या पद्धतीत मानक-मूल्य (Brand Value) हा नवा दर्शक वापरला आहे. उत्पन्न पातळीच्या पलीकडे असणाऱ्या व अधिक मूल्याचा वस्तू/सेवा निर्माण करण्याची क्षमता त्यातून व्यक्त होते.

◆

**Announcement for Call of Articles**
**Dr. Ravindra Sabnis Memorial Prize**

Marathi Arthshatra Parishad has considered an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand Only for outstanding contribution in form of an article published during the calendar year 2019 in standard accredited journals an themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for Submission of the articles (Four Copies) for this year contest is 31st October 2020. For further details, contact the undersigned at this address.

**Prof. Dr. Kailas K. Patil**
'Saptashrungi', Near Parvati Mangal Karyalaya,
Trimurti Nagar, Parbhani 431 401
Mob. 9423102863, 9921568252

# महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२–२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२–२४३२ ५९३१ ई–मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in

## मंडळाच्या योजना

१. पुस्तक प्रकाशन योजना–विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

## मंडळाची निवडक प्रकाशने

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित–संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व – डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास–रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश – संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला– के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज – श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई–बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

## मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

## शासकीय ग्रंथागारांचे पत्ते
## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३११०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कोविड-१९


घाबरु नका... पण जागरुक रहा

## हे करा....स्वतःला व इतरांना सुरक्षित ठेवा

### कोविड-१९ संसर्गाची लक्षणे

खोकला I ताप I श्वासोच्छसाला अडथळा निर्माण होणे

साबण व पाणी वापरून आपले हात स्वच्छ धुवा.





शिंकताना व खोकताना आपल्या नाकावर व तोंडावर रुमाल धरा.


सर्दी किंवा फ्ल्यू सदृश्य लक्षणे असलेल्या लोकांशी नजीकचा संपर्क टाळा.





मांस आ ण अंडी पूर्णपणे शिजवून व उकडून घ्या.

जंगली अथवा पाळीव प्राण्यांशी निकट संपर्क टाळा.



## गर्दीच्या ठिकाणी शक्यतो जाणे टाळावे.

**अधिक माहितीसाठी आपल्या जवळील शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधा.**

| राष्ट्रीय कॉल सेंटर क्र. | राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्र. | टोल फ्री हेल्पलाईन क्र. |
|---|---|---|
| +91-11-23978046 | 020-26127394 | 104 |

| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | कार्यवाह | प्रमुख संपादक |
|---|---|---|---|
| अनिल बा. सुर्यवंशी (सोलापूर) | कैलास के. पाटील (परभणी) | मारोती वि. तेगमपुरे (अंबड) | राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर) |

सर्व कार्यकारिणी सदस्य - मराठी अर्थशास्त्र परिषद

जनहितार्थ प्रकाशित

मूल्य : रु. १०/– ( सभासदांकरिता विनामूल्य)